15-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 10:00

15-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ D/ MMP/ 10:00

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या हरकतीच्या मुद्याद्वारे मी आपले लक्ष एका बाबीकडे वेधू इच्छितो. आज सोमवार आहे. अधिवेशनाच्या कामकाजाच्या संदर्भात तयार केलेल्या नियमावलीच्या पुस्तकातील भाग एक, नियम क्रमांक-3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज कशा पध्दतीने असावे या संदर्भात वर्षानुवर्षे हा जो नियम आहे त्यानुसार कामकाज चालले पाहिजे. माझा हरकतीचा मुद्दा हा आहे की, विधीमंडळाच्या बैठकीच्या संदर्भातील नियम क्रमांक-3 मध्ये "राज्यपालांनी संविधानाच्या अनुच्छेद 174 अन्वये विधानपरिषदेच्या अधिवेशनाची वेळ व जागा नेमून देणारी अधिसूचना काढल्यानंतर, अशारितीने नेमलेली वेळ व जागा यासंबंधी सचिव, प्रत्येक सदस्यास एक आवाहनपत्र (समन्स) पाठवतील." नियम क्रमांक-4 (1) मध्ये म्हटले आहे की, "अधिवेशनास प्रारंभ झाल्यानंतर, सभापती निदेश देतील अशा दिवशी विधानपरिषदेची बैठक सुरु होईल." नियम क्रमांक-4 (2) मध्ये नमूद केल्याप्रमाणे "सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर सभागृहाच्या बैठकी, सामान्यप्रमाणे (अ) सोमवारी 14.00 वाजता सुरु होऊन 16.00 वाजल्यापासून ते 16.30 वाजेपर्यंतच्या अर्ध्या तासाच्या विश्रांती कालानंतर 18.00 वाजता समाप्त होतील." म्हणजे लवकरात लवकर दुपारी 1.00 वाजता आणि उशिरात उशिरा दुपारी 2.00 वाजता बैठक सुरु करण्याची पध्दत आहे. सभापती महोदय, सचिवांनी आपल्याला सल्ला दिला असल्यामुळे माझा हरकतीचा मुद्दा नाकारण्याचा पीठासीन अधिकाऱ्यांना अधिकार आहे. परंतु नियमामध्ये काय म्हटले आहे? सभापतींनी अन्यथा निदेश दिला नसेल तर.....सभापतींना असा निदेश देण्याची पाळी का आली हा महत्वाचा प्रश्न आहे. या अधिवेशनाचा पहिला आठवडा संपला. गेल्या वेळी अधिवेशन संपत असताना कामकाज सल्लागार समितीमध्ये काही विधेयकांसंबंधी आग्रह धरला होता. चार दिवसाच्या अल्प कालावधीतील अधिवेशनामध्ये विधेयके आणू नका असे आम्ही आपल्यासमोर सांगितले होते. परंतु शासनाकडून सांगण्यात आले की, आम्ही फक्त विधेयके कामकाजपत्रिकेत दाखवू, चर्चेला घेणार नाही. परंतु आम्हाला कल्पना होती. वास्तवात असे नसते. चर्चेला घेणार नसाल तर कशासाठी कामकाजपत्रिकेत दाखवता? परंतु आम्ही दाखवू असा आग्रह धरण्यात आला. माननीय सभापतींचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.2

SGB/ D/ MMP/ 10:00

श्री.दिवाकर रावते.....

मान राखावा म्हणून आम्ही मान्यता दिली. कामकाज आहे हे लोकांना दाखविण्यासाठी, उगाच अधिवेशन घेतलेले नाही हे दाखविण्यासाठी अशी भूमिका घेतली जात असावी. परंतु अशा प्रकारची विधेयके मंजूर करुन घेण्याकरिता, कायदे करुन घेण्याकरिताच हे विधीमंडळ आहे. सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी इतर मार्गाने विविध आयुधांचा वापर केला जातो, त्या आयुधांचा यामध्ये उल्लेख केला आहे. परंतु अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून विधेयके आणा अशाप्रकारचा आग्रह आमचा असतो. याचे कारण म्हणजे विधेयके चर्चेला येतील. किती वेळ चर्चा करावयाची? चर्चा थांबविता येत नाही. परंतु पहिला आठवडा संपला तरी एकही विधेयक सभागृहात चर्चेला आले नाही. दुसऱ्या आठवड्यातील तीन दिवस उलटून गेले तरी विधेयके चर्चेला आली नाहीत. मी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये हे निदर्शनास आणून दिले. विधानसभेत विधेयके मंजूर झाली नाहीत, त्यात आमचा दोष नाही. काही विधेयके विधानपरिषदेत पारित केल्यानंतर ती विधानसभेत चर्चेसाठी दाखविली जातात. काही विधेयके विधानसभेत पारित झाल्यानंतर विधानपरिषदेत चर्चेसाठी येतात. कामकाजाची वाटणी केली जाते. सरकारची कायदा करावयाची मानसिकता असेल, सरकारला विधेयक मंजूर करुन घ्यावयाचे असेल तर अशी विधेयके चर्चेला येतात आणि बहुमताच्या जोरावर कायदा मंजूर होतो. त्याचा अर्थ बहुमत आहे म्हणून कायदा मंजूर करता येत नाही. त्या त्या विधेयकावर सर्वंकष चर्चा करणे भाग आहे. काही विधेयके वाटून घेतली असती, त्यातील काही परिषदेत आली असती तर ती या सभागृहात मंजूर होऊन विधानसभेत चर्चेसाठी दाखविता आली असती. काही विधेयके विधानसभेत मांडली गेली आहेत. दोन आठवड्यामध्ये विधेयकांवरील चर्चेच्या संदर्भात या सदनामध्ये सन्माननीय सदस्यांना भाग घेण्यास वाव मिळाला असता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बी.1...

श्री. दिवाकर रावते .....

पण हा दोष कोणाचा हे मात्र कळले नाही. अर्थात हा दोष शासनाचाच आहे. तेव्हा सरकारमध्ये काम करणाऱ्या मंत्री महोदयांना विधि मंडळाच्या कामकाजामध्ये अजिबात रस नाही. फक्त आलेले दिवस ढकलायचे, संध्याकाळ झाली की हसत हसत जायचे आणि अधिवेशन संपल्यानंतर आपण पुन्हा आपल्या गाड्या फिरवायला मोकळे, ही भावनाच दुर्दैवी आहे. या राज्याचे आम्ही राज्यकर्ते आहोत, प्रत्येक तास जनतेसाठी वेचावयाचा आहे ही भावना राज्यकर्त्यांमध्ये दिसतच नाही. विरोधी पक्ष त्यातील उणिवा दाखविण्याची आपली भूमिका पार पाडत असतात ती अधिवेशन काळात आणि अधिवेशन नसताना आंदोलनाच्या माध्यमातून ते सरकारच्या निदर्शनास आणून देत असतात. आजची विशेष बैठक का बोलवावी लागली हा माझा खरा मुद्दा आहे. विधिमंडळात आज तिन्ही विधेयके चर्चेसाठी दाखविलेली आहेत. विधेयकावर बोलत असताना सदस्यांना आपल्याला थांबविता येणार नाही परंतु विधेयकाच्या संदर्भात मात्र शासनाची मानसिकताच दिसत नाही म्हणूनच मी म्हणालो की, विधिमंडळाच्या कामकाजात मंत्र्यांना अजिबात रस नाही. मला आठवते की, सहाव्या अधिवेशनात प्रत्येक वेळेस मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून सभागृहाचा किती वेळ वाया गेला हे शेवटच्या दिवशी सांगण्याची या सभागृहात प्रथा सुरु झाली. माननीय सभापतींना हे जाहीर करावे लागते की, मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाचे कामकाज किती वेळा तहकूब करावे लागले हे दुर्दैव आहे. तरी देखील शासनाला जाग येत नाही. तसेच संसदीय कामकाज मंत्र्यांनी देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत किंवा मंत्री परिषदेत ज्या ठिकाणी राज्यमंत्री देखील उपस्थित असतात त्या बैठकीत अशा प्रकारच्या मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे किती वेळ फुकट जातो याबाबत तंबी देता येत नाही. तसेच ही मंत्र्यांची नैतिक जबाबदारी नाही काय ? परंतु राज्यकर्त्यांना मात्र त्याचे काहीच देणे-घेणे नाही, कोणी विचारतही नाही तसेच वर्तमानपत्रांच्या माध्यमातून एकदाही यासंदर्भात स्फुट आलेले दिसत नाही. अर्थात वर्तमानपत्रांनी काय छापायचे, काय लिहायचे हा त्यांचा प्रश्न आहे. आमची मात्र अशा प्रकारे सभागृहाची बैठक लवकर घेऊन मुस्कटदाबी केली जाते. परंतु किटलीतील वाफ जसजशी वाढत जाते तसतसे तिचे झाकण आपोआप उघडते. अशा प्रकारे आम्हाला संतप्त केले जाते आणि गोंधळ कधी होतो व आपण त्यात कामकाज कसे पास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

करुन घेतो ही नवीनच पध्दत आता निर्माण केली आहे. जर शासनाची सरकार चालविण्याची मानसिकताच नसेल तर सरकारच बरखास्त करुन टाका म्हणजे नवीन व हुरुप असलेले लोक जनतेची सेवा करण्यासाठी पुढे येतील. लाल दिव्याची गाडी मिळाल्यानंतर दिल्लीपर्यंत मुजरा करीत फिरतात. परंतु ज्यापक्षाने आपल्यावर जबाबदारी टाकली आहे ती जबाबदारी सुध्दा पार पाडता येत नाही ? मला सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांचा अभिमान वाटतो. एवढ्या हाय प्रोफाईलमध्ये राहिल्यानंतर देखील त्यांनी कधीच तक्रार केली नाही. एक सामान्य सदस्य म्हणून ते सभागृहात त्यांचे काम असो वा नसो कायम बसून असतात. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड आणि सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले हे देखील कायम बसून असतात.....अडथळा.....आम्ही राहत नाही, आम्ही जातो येतो किंवा थांबत नाही, ते आमचे डावपेच असतात पण या सभागृहात ज्या मंत्र्यांची जबाबदारी आहेत त्यांनी हजर राहणे आवश्यक नाही काय ? आज सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजता बोलावली, कामकाज पत्रिकेवर चार-पाच विधेयके दाखविली आहेत. ती होतील किंवा नाही हा भाग वेगळा परंतु इतक्या बेजबाबदारीने शासनाने सभापतींना आदेश काढायला भाग पाडावे यालाच माझी हरकत आहे, त्यासंदर्भात माननीय सभापतींकडून मार्गदर्शन अपेक्षित आहे.

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी हरकतीच्या मुद्याद्वारे या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात त्यांनी शासनाकडून काही महत्वाच्या बाबतीत औदासिन्य दाखविले जाते यासंदर्भात आपले परखड मत मांडलेले आहे. विधिमंडळ कामकाजाच्या संदर्भात मंत्रीमहोदयानी वेळेवर उपस्थित न राहणे, यासंदर्भात ज्येष्ठ सदस्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागणे असा अनुभव आपल्या सर्वांना आलेला आहे. असे प्रकार वारंवार उद्‌भवल्यामुळे ब-याच वेळा सभागृहाचे कामकाज लांबणीवर पडते. राज्याच्या हिताच्या दृष्टिकोनातून सभागृहाचे कामकाज आटोपण्यासाठी मग वारंवार उशिरापर्यंत सभागृह सुरु ठेवणे किंवा न उरकलेले काम आटोपण्यासाठी पुन्हा दुस-या दिवशी सभागृह सकाळी लवकर सुरु करणे अशा प्रकारच्या गोष्टी अनेक वेळा घडतात. त्यामुळे या ठिकाणी नियमित उपस्थित राहणा-या सदस्यांना ही बाब खटकणे साहजिक आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेला मुद्याशी मी सहमत आहे. परंतु आपण या सभागृहाचे अत्यंत ज्येष्ठ, जिज्ञासू सदस्य आहात. सभागृहाच्या कामामध्ये आपण ज्या पध्दतीने सहभाग घेता ते कौतुकास्पद, अभिमानास्पद आहे असे मी या ठिकाणी सांगतो. आपण अद्यापपर्यंत सभागृहाच्या कामकाजात नेहमीच सहकार्य करीत आलेला आहात. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भातील नियम वाचून दाखविला आहे. नियमाला आपण ब-याच वेळा अपवाद करीत असतो, कधी कधी सदस्यांच्या विनंतीवरुन आपल्याला काही गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे आपण या ठिकाणी मांडलेला हरकतीचा मुद्दा मी फेटाळला आहे असे मी म्हणणार नाही, परंतु आपला हरकतीचा मुद्दा निश्चित स्वरुपी लक्षात घेऊन एवढीच विनंती करतो की, आज सभागृहापुढे भरपूर कामकाज आहे. हे सर्व कामकाज पूर्ण करण्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो व सभागृहाच्या आजच्या कामकाजात सहभागी व्हावे अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.XI OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, AND THE MAHARASHTRA MUNICIAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण आमच्या भावनांचा आदर केल्यामुळे मी आपल्याला धन्यवाद देतो. काल सुध्दा सभागृह लवकर बोलवण्यात आले होते परंतु मंत्री महोदय, उपस्थित नसल्यामुळे आपल्यालाच दिलगिरी व्यक्त करावी लागली होती. काल माझा एकही ठराव नसतांना मी सभागृहात हजर होतो. अतिरिक्त कामकाज ठेवून सुध्दा मंत्री उपस्थित राहत नाही त्यामुळे या सरकारला काम करण्याची इच्छा नाही. या सरकारला फक्त सत्तेचा उपभोग घ्यावयाचा आहे, त्यातून जे काही मिळवायचे ते मिळवायचे आहे. मग तो मान-सन्मान असेल पैसाच असेल असे मी म्हणत नाही. त्यामुळे हे सरकार जनतेचे सरकार नाही हा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्याची आपण मला संधी दिल्याबद्दल मी सरकारचे आभार मानतो व जनतेला आवाहन करतो की, या सरकारला जनतेची काम करण्याची इच्छा शक्ती नसल्यामुळे या सरकारला परत येथे पाठवू नका.

आज मी ज्या विषयावर बोलतो आहे तो विषय अत्यंत गंभीर असा आहे. मला खरच खेद आणि दु:ख होत आहे की, ज्यावेळेला सदस्य येथे बोलतात परंतु सरकारला असे वाटते की, सदस्यांना बोलायचे तेवढे बोलतील, बसतील आणि जातील परंतु आम्ही सर्व विधेयके पास करुन घेऊ. परंतु सभापती महोदय, असे करणे योग्य नाही. आपण जानकार आहात, आपण सक्षमतेने काम करतात. मागच्या वेळेला देखील अशाच प्रकारचे विधेयक मांडले गेले होते. अशा प्रकारचे जेव्हा विधेयक सभागृहात मांडण्यात आले होते तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख होते. त्या विधेयकाच्या संदर्भात मी माझ्या कालच्या भाषणात ओझरता उल्लेख केला होता. पाच बूथ मागे आपल्याला एक प्रतिनिधी निवडायचा आहे. यासंदर्भात रीतसर निवडणूक घ्यावयाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/

श्री. दिवाकर रावते ....

आहे. नगरसेवकाची जशी निवडणूक होते, आमदाराची जशी निवडणूक होते, खासदारांची जशी निवडणूक होते तशी या विषयाच्या संदर्भात महानगरपालिकेने निवडणूक घ्यावयाची आहे. यामध्ये पाच बूथ मागे एक प्रतिनिधी निवडावयाचा आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

त्या ठिकाणी कोणाला को-ऑप्ट. करण्यात येणार आहे यासबंधी मी नंतर सविस्तर बोलणार आहे. मुंबई शहरामध्ये एकूण 227 नगरसेवक आहेत . म्हणजे या शहरामध्ये 227 बुथ आहेत प्रत्येक बुथमधून 5 जण निवडून येणार असल्यामुळे जवळजवळ 1200 उप नगरसेवक निवडून येतील. मूळ 227 नगरसेवक आहेत त्यांच्या संख्येत प्रत्येक बुथमागे 5 उपनगरसेवकांची भर पडणार आहेत. ते सर्वजण त्या भागात फिरणार असून जनतेचे प्रश्न समजावून घेणर आणि ते वॉर्ड ऑफिसरांच्या कार्यालयात जाणार आहेत. अशा वेळी नगरसेवकाने काय करारवयाचे ? त्या दोघांमध्ये वादच सुरु होतील ना ? मी आपल्याला उदाहरण देतो. एक कॉग्रेसचा नगर सेवक आहेत त्याचे सात बुथ आहेत त्यातील 5 उपनगरसेवक शिवसेनेचे आहे दोन उपनगरसेवक दुस-या पक्षाचे आले तर कॉग्रेसच्या नगरसेवकाने काय करावयाचे ? किंवा उलट परिस्थिती निर्माण झाली आणि एखाद्या वॉर्डमध्ये शिवसेनेचा नगरसेवक असेल तेथे सहा बुथमध्ये कॉगेसचे उपनगरसेवक आहे एक बुथमध्ये आणखी दुस-या पक्षाचा उपनगरसेवक आला तर काय करावयाचे ? अशा प्रकारचे विधेयक शासनाकडून मागे मांडण्यात आले होते. सुरुवातीला त्या विधेयकावर खालच्या सभागृहात चर्चा झाली होती त्यानंतर हे विधेयक या सभागृहात मांडले होते. त्यावेळी आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणून दिली होती. अशा प्रकारे 1200 जण जर निवडून आले तर शहरामध्ये काय परिस्थिती निर्माण होईल.? सभापती महोदय, काल मी होर्डिंग्जबंधी बोलत होतो.त्या सर्वांचे होर्डिंग्ज संपूर्ण शहरात लावले जातील. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने वा केलेल्या कामाचे एवढया मोठया प्रमाणावर जर होर्डिंग्ज लावण्यात आले तर संपूर्ण मुंबई त्यानेच भरुन जाईल. आता आमदार, खासदार, नगरसेवक इत्यादींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्थानिक लोक कौतुकाने होर्डिंग्ज लावतात त्यानंतर पुन्हा हे पाचजण निवडून येतील त्यांचीही होर्डिंग्ज लावले जातील. सन्माननीय मंत्री श्री.रमेशचंद्र बंग या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांना मी सांगतो की त्यांच्या वाढदिवसानिमित्त नागपूर शहरात जर होर्डिंग्ज लावण्यात आले तर ते मी समजू शकतो परंतु मुंबई शहरामध्येसुध्दा काही वेळा त्यांचे होर्डिंग्ज लावण्यात येतात.

श्री.जयंत प्र.पाटील (बसून) ठाणे शहरात सुध्दा लावण्यात येतात.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

श्री.दिवाकर रावते : ठाणे येथे जे होर्डिंग्ज लावण्यात येतात त्याचे राजकारण वेगळे आहे. दीड फूट माणसाचे 50 फुट उंचीचे होर्डिंग्ज लावण्यात येतात. अशा प्रकारे मोठ मोठी होर्डिंग्ज लावण्यात आल्यामुळे माणसाची वाढ होत नाही.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : मिया वितभर आणि दाढी हातभर.

श्री.दिवाकर रावते : दाढीची वाढ तरी होत असते परंतु होर्डिंग्ज लावल्यामुळे माणसाची वाढ होत नाही. मिया जर वितभर असेल व त्याने दाढी हातभर ठेवली तर त्याची गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद होत असते.

सभापती महोदय, मागच्या वेळी सरकारने जे विधेयक आणले होते त्या संदर्भात आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केल्यानंतर व ही बाब त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी ते विधेयक मागे घेतले होते. परंतु मुंबईवर खुनशीपणाने हे करावयाचेच अशा प्रकारे निर्ढावलेल्या मानसिकतेतून या अधिका-यांनी हे नवीन खूळ आणलेले आहे.सदनाच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की , केन्द्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात एक सामंजस्य करार झालेला असे शब्द या विधेयकात आहेत. सभापती महोदय, या संदर्भात मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असून या ठिकाणी मी अधिकृतपणे सांगतो की, अशा प्रकारे कोणताही सामंजस्य करार झालेला नाही. तेव्हा मी त्यांना हे सांगितले की, आम्हाला तुम्ही एक बाब समजावून सांगावी. महाराष्ट्र सरकार आणि केन्द्र सरकार ही दोन राष्ट्रे आहेत काय ?. घटनेतील तरतुदीप्रमाणे केन्द्र सरकारमध्ये सहकार मंत्री आहेत आणि त्यांच्या अधिपत्याखाली सहकाराचे कायदे करावयाचे असतात. सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की घटनेतील तरतुदी अत्यंत स्पष्ट आहेत. घटनेमध्ये पहिली यादी, दुसरी यादी आणि कंकरंट लिस्ट अशा एकूण तीन याद्या आहेत . कोण कोणत्या विषयासंबंधी केन्द्र सरकारने कायदे करावयाचे आहेत याचा उल्लेख पहिल्या यादीमध्ये आहे आणि घटनेतील पहिल्या यादीनुसार केन्द्र सरकारलाच ते अधिकार आहेत. त्या विषयाच्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार राज्य सरकारला नाहीत. त्याचबरोबर कोण कोणत्या विषयासंबंधी राज्य

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

सरकारने कायदे करावयाचे याबाबतीत घटनेतील दुस-या यादीत उल्लेख करण्यात आलेला आहे त्याप्रमाणे राज्य सरकारने कायदे करावयाचे असतात. त्याचबरोबर तिस-या कंकरट लिस्ट प्रमाणे केन्द्र सरकार आणि राज्य सरकार असे दोघेही कायदे करु शकात अशा प्रकारे घटनेमध्ये अतिशय स्पष्टपणे सांगण्यात आलेले आहे. एखादा कायदा जर केन्द्र सरकारने केलेला असेल तर त्याची अंमलबजावणी करणें राज्यावर घटनात्मक बंधनकारक आहे. तो कायदा राज्य सरकारला आवडो अथवा न आवडो त्याची अंमलबजावणी राज्य सरकारला करावीच लागते. परंतु प्रचंड जमिनी महाराष्ट्रात घेण्याचा फक्त मनोदयच व्यक्त केला नाही तर शेकडो आणि हजारो एकर जमिनी राज्यातून दिल्लीत गेलेल्यां राज्यकर्त्यानी जमिनी विकत घेतल्या आहेत.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि आता कमाल जमीन धारणा कायद्याप्रमाणे त्या आपल्याला ठेवता येत नाही. कमाल जमीन धारणा कायदा रद्द केल्याशिवाय त्या आपल्याकडे राहणार नाहीत. तर मग हा कायदा कसा रद्द करावयाचा? म्हणून घटनेतील तरतुदीप्रमाणे त्यासंबंधीच्या विधेयकावर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या सभागृहामध्ये मी एकटा बोलत होतो. त्यावेळी माजी मुख्यमत्री श्री.विलासराव देशमुख सभागृहामध्ये उपस्थित होते. ज्याप्रमाणे दोन राज्यांनी ठराव केल्यानंतर तो कमाल जमीन धारणा कायदा आणला गेला त्याप्रमाणे देशातील दोन राज्यांनी हा कायदा आमच्याकडे नको म्हणून सांगितले. त्यामध्ये हरयाणा आणि दुसरे एक कॉग्रेस पक्षाची सत्ता असलेले राज्य होते. त्या दोन राज्यांना ठराव करण्यास सांगितले व त्यांनी तशाप्रकारचा ठराव केल्यानंतर केंद्र सरकारने तो कायदा रद्द करुन आपल्या राज्यामध्ये सुध्दा तो रद्द करावयास लावला. आपल्या या सभागृहामध्ये रात्री 12 वाजेपर्यंत त्यावर चर्चा झाली, त्यानंतर तो कायदा रद्द झाला. ज्यांच्याकडे लँड सिलिगचा कायदा नाही त्यांच्याकडे शेकडो एकर जमीन राहणार आहे अशी परिस्थिती आहे. आज याठिकाणी त्या जमिनींची यादी वाचण्याचा हा विषय नाही. आणि म्हणून या कायद्याचे खंडन करीत असतांना तो धोकादायक असेल, तो राज्याला मारक असेल तर अशाप्रकारे राज्याला मारक ठरणारा कायदा ताबडतोब थांबविण्याचे राज्यकर्त्यांचे काम असते. ते माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी केले होते. म्हणून मी काल माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, आपण हे विधेयक मागे घ्यावे. या विधेयकाचे होणारे गंभीर परिणाम लक्षात आल्यानंतर काल मला कॉग्रेसच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी भेटून हे विधेयक थांबविले पाहिजे अशी मागणी केली. प्रत्येक पक्षाच्या दृष्टीने हे विधेयक भयानक त्रासदायक ठरणारे आहे. क्षेत्र सभा म्हणजे काय याबाबत मी चर्चा केली. सभापती महोदय, मंत्रिमहोदय पोस्ट कार्ड पाठविण्याबाबत म्हणाले. आज असे दिसते की, कित्येक दिवस पोस्ट कार्ड पोहोचत नाही. आजोबाने नातवाला पाठविलेले पत्र नातू म्हातारा झाल्यानंतर त्याला मिळाले अशाप्रकारची बातमी दूरदर्शनवर दाखविली जाते. त्यामुळे पोस्ट कार्ड ही ऑथेंन्टिसिटी आहे काय?

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, विधेयकात असे म्हटले आहे की, " अशा प्रत्येक बैठकीस, क्षेत्र सभेच्या क्षेत्रात विस्तृत प्रसिध्दी देण्यात येईल". त्यामुळे याठिकाणी पोस्ट कार्डचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, हे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले त्यावेळी मी म्हटले की, आज लोकांना माहीत असून सुध्दा लोक मतदान करण्यासाठी जात नाहीत.त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला एक पोस्ट कार्ड पाठविले जाईल असे आपण ठरविले. तशाप्रकारची तरतूद करण्याबाबत महानगरपालिकेला सूचना करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याच विषयावर चर्चा सुरु आहे. याचा अर्थ असा की, 5 हजार मतदार हे त्या क्षेत्र सभेचे सदस्य आहेत. आपण याठिकाणी काय करीत आहोत ते पहा. माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेब मी आपणास हात जोडून विनंती करतो की, आपण हे विधेयक थांबवावे. ही बैठक लावली आहे याबाबत पाच हजार लोकांना समजले पाहिजे. आज बैठक लावली आहे हे तुम्ही कोणत्या माध्यमातून त्यांना सांगणार? मला नको असलेले निमंत्रण मी कुणाला देऊ शकत नाही. म्हणून मंत्रिमहोदयांनी पोस्ट कार्ड पाठविण्याचा व्हाया मिडीया काढला. क्षेत्र सभेमध्ये कुठे पाच हजार मतदार असतील, कुठे साडे चार हजार असतील, कुठे चार हजार असतील. हे सर्व क्षेत्र सभेचे सदस्य असून कायदा संमत झाल्यानंतर त्या सर्वांना निमंत्रण दिले गेले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आपण विचार करावा की, संबंधितांना निमंत्रण कसे जाणार आहे ? तर पोस्ट कार्डव्दारे निमंत्रण पाठविले जाणार असल्याचा व्हाया मिडिया काढण्यात आला आहे. म्हणजे एका क्षेत्र सभेसाठी 5000 पोस्ट कार्ड पाठवावयाची असतील तर ती पोस्ट कार्ड लिहिण्यासाठी मॅन पॉवर किती लागणार आहे? ती किती दिवस अगोदर पासून लिहिली पाहिजेत ? तसेच यासाठी येणारा खर्च किती असेल आणि तो कोण करणार आहे ? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच क्षेत्र सभेच्या बाबतीत पोस्टर लावणार आहात काय ? तसे असेल तर ती कुठे लावणार आहात ? इ.विविध प्रश्न यातून निर्माण होत आहेत. जर पोस्ट कार्ड कुरियरने पाठवावयाची असतील तर त्यासाठी प्रचंड खर्च येणार आहे. तो कोण करणार आहे ? तसेच या क्षेत्रसभा घ्यावयाच्या आहेत, त्यासंबंधात व्याख्या दिलेली आहे. "डब्ल्यू-डब्ल्यू-डब्ल्यू, व्ही-व्ही, एक्स-एक्स" हे सर्व मराठीमध्ये आलेले आहे. हे शब्द कोणते ते कळत नाही, म्हणजे अजूनही अधिकाऱ्यांची मानसिकता बदललेली नाही. हे अधिकारी मराठीचे इंग्रजीमध्ये भाषांतर करीत नाहीत, तर इंग्रजीचे मराठीमध्ये भाषांतर करीत आहेत. तसे करा, पण ते करीत असताना पूर्णपणे मराठीत भाषांतर करावे. खरे म्हणजे याठिकाणी मराठीमध्ये योग्य प्रकारे भाषांतर झालेले नसताना, विधीमंडळाच्या सचिवांनी हे विधेयक स्विकारलेच कसे ? मघाशी सांगितल्याप्रमाणे याठिकाणी मराठीत यु-यु, व्ही-व्ही, डब्ल्यू-डब्ल्यु, एक्स-एक्स, 50टयू,50टव्ही, सीसी-डब्ल्यू, टीएक्स वगैरे दिलेले आहे आणि ते काय आहे हे कळलेले नाही. क्षेत्रसभेचा अध्यक्ष हा निवडून आलेला नगरसेवक असेल, ठीक आहे. तसेच क्षेत्रसभेच्या जागेच्या बाबतीत देखील विचित्र प्रकार आहे. यासाठी हॉल घेणार असाल तर तो किती मोठा असणार आहे, त्यामध्ये किती लोक सामावू शकतात वगैरे बाबी आहेत. क्षेत्र सभेचा महत्वाचा भाग असा आहे की, ती ग्रामसभा ठरविणार. सभापती महोदय, आपण बहुतेक सर्वजण ग्रामीण भागामध्ये काम करतो, आजही गावामध्ये काही मंडळी ही प्रतिष्ठित आहेत आणि त्यांच्या शब्दाला मान दिला जातो. ते बोलल्यानंतर त्यावर कोणी काही बोलत नाही. किंबहुना आजही न्यायनिवाडा करावयाचा असेल तर त्यांना बोलाविले जाते आणि त्यांच्या शब्द मानला जातो.त्यातून व्यसन मुक्ती,तंटा मुक्त गाव करणे वगैरे विषय हाताळले जातात. ग्रामीण भागामध्ये काही कन्सेप्ट आहेत.तेथील प्रमुखांनी नुसता हात वर केल्यानंतर तेथील सर्व लोक गप्प बसतात. परंतु शहरामध्ये तसे नाही. याठिकाणी क्षेत्रसभा बोलाविली तर काय होणार आहे ? कारण शहरामध्ये आज अशी स्थिती आहे की, शेजाऱ्यांचा-....

.. . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

शेजाऱ्याशी संबंध नसतो. चाळीमध्ये देखील आपसात एकमेकांची एवढी भांडणे असतात की, विचारण्याची सोय नाही. त्यामुळे शहरामध्ये जेव्हा हे सर्वजण क्षेत्रसभेसाठी एकत्र येतील, तेव्हा ग्रामीण भागातील ग्राम सभेप्रमाणे येथे चर्चा होणार नाही. तर शहरातील क्षेत्रसभेमध्ये काय परिस्थिती निर्माण होईल यासंबंधी मी परवाच्या दिवशी वर्णन केलेले आहे. या सभेमध्ये यादवी तर माजेलच पण क्षेत्रसभेला जे अधिकार दिलेले आहेत, ते पाहिल्यानंतर यातील भयानकता अधिक लक्षात येते.शहरामध्ये महानगरपालिकेचे कार्यालय असते. ग्रामीण भागातील जनता नगरपालिकेकडे जाते. शहरातील जनतेच्या तक्रारी असतात की, आम्हाला पाणी मिळत नाही, संडासाची टाकी भरलेली आहे, कचरा साठलेला आहे वगैरे. नगरसेवकांकडे तक्रारी आल्यानंतर ते महानगर-पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे जाऊन त्यांच्याशी चर्चा करतात. ग्रामीण भागामध्ये माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली डी.पी.डी.सी.च्या बैठका होत असतात, तशी महानगरपालिकेमध्ये उप आयुक्त यांच्याकडे दर महिन्याला एक बैठक होत असते. त्या बैठकीमध्ये जे क्रॉनिक प्रश्न असतात ते मांडले जातात. त्यावर उप आयुक्त निर्णय देऊन काम करतात. त्याचे मिनिटस् तयार केले जाते आणि पुढच्या बैठकीमध्ये त्याचा कार्यकारी अहवाल सादर केला जातो.

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यामध्ये आता थोडी सुधारणा झाली आहे. जी प्रभाग समिती आहे ती काम करते की, नाही याचे ऑडिट, त्याची छाननी करण्याचे प्रशासनाने ठरविले आहे. प्रभाग समिती ही एक बलशाली समिती निर्माण झाल्यानंतर आता उपायुक्त आणि विभाग अधिकारी त्यांनी त्या बैठकीसाठी काही नागरिकांना निवडले आहे. ते निवडून आलेले प्रतिनिधी नाहीत. त्यांना कसे निवडले हे माहीत नाही. त्यांनी ज्या नागरिकांना निवडले आहे त्यांची महिन्यातून एकदा बैठक घेतली जाते आणि त्या बैठकीमध्ये ते सगळे प्रश्न मांडतात. ज्या प्रश्नाकडे नगरसेवक बघत नाही असे प्रश्न ते मांडतात. आत मुंबईमध्ये एक नवीन धंदा सुरु झालेला आहे. ही एक गंभीर बाब आहे. शहरामध्ये कसे प्रश्न निर्माण होतील अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अर्धे सदस्य हे श्री. अण्णा हजारे यांच्या समित्यासारखे काम करतात. श्री. अण्णा हजारे यांनी गावागावामध्ये भ्रष्टाचार निर्मुलन समित्या निर्माण केल्या होत्या. त्यांनी कार्ड छापले होते. श्री. अण्णा हजारे यांचा भ्रष्टाचाराशी काही संबंध नाही. त्यांनी प्रामाणिकपणे भ्रष्टाचार निर्मुलन समित्या स्थापन केल्या पण त्याचे कारण देऊन भष्टाचार कसा करता येईल हे काम त्या समित्यांकडून चालू होते. महाराष्ट्रामध्ये त्या समित्या भ्रष्टाचार करीत होत्या. त्यामुळे उद्विग्नतेने श्री. अण्णा हजारे यांनी त्या समित्या बरखास्त केल्या होत्या. त्यांना आत्मक्लेश झाला. हे खरे आहे की, पोटच्या पोरासारखे एखाद्याला मोठे करावयाचे आणि त्याने नंतर दणादण हाणावयाचे अशी परिस्थिती झाली होती. त्यामुळे श्री. अण्णा हजारे यांना आत्मक्लेश झाला. सभापती महोदय, यामध्ये जे आयुक्त, उपायुक्त नेमलेले आहेत ते काय करतात ? ज्या ठिकाणी इमारतीचे काम चालू झाले असेल त्या ठिकाणी ओपन स्पेस बरोबर सोडली नाही, योग्य जागा सोडलेली नाही, एफ.एस.आय. जास्त वापरला अशा तक्रारी लिहितात. त्यांचे पाण्याचे कनेक्शन, सिवरेज कनेक्शन अडवतात. त्या बैठकीचे मिनिट्स तयार होतात. यामध्ये नगरसेवक नसतो. आता प्रभाग समितीच्या कामाचा आढावा घेण्याचे काम चालू आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणतात की, हा विषय यामध्ये आहे काय ? मी सांगू इच्छितो की, हाच विषय यामध्ये आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना सांगू इच्छितो की, तो विषय इतका भयानक आहे की, आपण ऐकले तर आपल्याला मूर्च्छा येईल. या विधेयकामध्ये पृष्ठ क्रमांक 4 वर क्षेत्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभेचे हक्क आणि अधिकार दिलेले आहेत. हे विधेयक मागे घेतले नाही तर गंभीर परिस्थिती निर्माण होईल. मला अजूनही का बोलते ठेवले आहे हे कळत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, हे विधेयक थांबवू पण अजून ते का झाले नाही, हे कळत नाही. क्षेत्र सभेचे जेवढे मतदार आहेत त्यांची ही सभा आहे. म्हणजे क्षेत्र सभेमध्ये असलेल्या प्रत्येक सदस्याचा हा अधिकार आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, " महानगरपालिकेच्या संबंधित अधकाऱ्याकडून, महानगरपालिकेकडून देण्यात येणाऱ्या सेवांची आणि क्षेत्रामध्ये पार पाडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांची माहिती मिळवणे." हे किती गंभीर आहे ते आपण बघावे. मागच्या वेळी क्षेत्र सभेमध्ये अमूक अमूक निर्णय झाले आहेत याबाबत ते विचारतील. आधी त्या अधिकाऱ्याला नगरसेवक विचारत होते तसेच नंतर त्या अधिकाऱ्याला पाच, दहा नागरिक विचारत होते. अधिकाऱ्याकडे आपले काम घेऊन गेलो पण अधिकारी आपल्याकडे लक्ष देत नाही म्हणून आधी लोक नगरसेवकांकडे येत होते. मुंबईमध्ये लोक आमदारांकडे येतात. आता क्षेत्र सभेच्या प्रत्येक सदस्याला हा अधिकार दिलेला आहे. यामध्ये असे म्हटले आहे की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

"महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांकडून, महानगरपालिकेडून देण्यात येणा-या सेवांची आणि क्षेत्रामध्ये पार पाडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांची माहिती मिळविणे" हा अधिकार आहे. हे अधिकार किती लोकांना देणार ? एखाद्या क्षेत्रात एक माणूस आला, दोन माणसे आले, तीन आले, पाच आले, 100 लोक आले, 200 लोक आले, 500 लोक आले तर त्यांना माहिती द्यावी लागेल, कायद्यात तरतूद आहे म्हणून त्यांना माहिती दिली पाहिजे. तुम्ही त्यांना नाही म्हणू शकत नाही. हजारो नागरिक त्या अधिका-यांवर माहिती घेण्यासाठी तुटून पडले तर ते अधिकारी काम कधी करणार आणि माहिती कधी देणार ? क्षेत्र सभेला हक्क व अधिकार असे यामध्ये म्हटले आहे. पण प्रभाग समित्यांवर हे बालंट आले आहे. कलम 50 टएक्स मधील (एक) मध्ये असे म्हटले आहे की, "प्रभाग समितीकडून क्षेत्र सभेने केलेल्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीसह क्षेत्र सभेच्या अधिकारितेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयांची माहिती मिळविणे, म्हणजे त्या एका माणसाचे त्या प्रभाग समितीवर नियंत्रण आले. 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्राने 'क्षेत्र सभेचे सदस्य झाल्यामुळे' या शीर्षकाखाली चांगला लेख दिला आहे. प्रभाग समितीवर हक्काचे नियंत्रण आले. "क्षेत्र सभेने केलेल्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीसह क्षेत्र सभेच्या अधिकारितेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयांची माहिती मिळविणे" असे यात नमूद केले आहे. पुढे (ब) मध्ये असे म्हटले आहे की, क्षेत्र सभेच्या अधिकाकारितेसंबंधातील निर्णयांचा पाठपुरावा करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मिळवणे" म्हणजे पाठपुरावा करण्यात येईल. तुम्ही काय काम केले, कामाचा प्रस्ताव तयार केला काय, त्याचे एस्टिमेट तयार केले काय, ते मंजुरीसाठी पाठविले काय, ते मंजूर झाले काय, ते कोणत्या अधिका-याकडे गेले, त्यावर तुमची सही झाली काय, त्यामध्ये कोणत्या त्रुटी काढल्या आहेत, तुम्ही त्रुटी का काढता ? माझे काम लवकर झाले पाहिजे, माझ्या क्षेत्र सभेतील काम लवकर झाले पाहिजे, हे सर्व विचारण्याचे अधिकार मिळाले आहेत. या सर्व प्रश्नांचा आधार घेऊन पाठपुरावा केला जाईल. पुढे (तीन) मध्ये असे नमूद केले आहे की, स्वच्छता राखणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि प्रदूषणास आळा घालणे यांसारख्या सार्वजनिक हिताच्या बाबींविषयी लोकांमध्ये

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.दिवाकर रावते....

जागरुकता निर्माण करणे" सभापती महोदय, एनजीओच्या वाढत्या संख्येमुळे जीव नकोसा झाला आहे. एका बैठकीला गेला असताना प्रथम एनजीओंना बाहेर काढावे असे लोकप्रतिनिधींना सांगण्याची वेळ आली होती. या एनजीओंनी नाकात दम आणला आहे. ते लोक काम केल्याचे पत्र लिहितात, कामाचे फोटो दाखवितात, त्यामुळे या लोकांना परदेशातून प्रचंड डोनेशन येते. पैसा मिळविण्यासाठी हे एनजीओ आहेत, लोकांची कामे करण्यासाठी नाही. हे एनजीओ कोणत्या मंत्रिमहोदयांच्या नियंत्रणाखाली येतात ते समजत नाही. या सदनात त्यांच्या खर्चाची चौकशी करण्यासाठी एखादी कमिटी नेमावी. हे एनजीओज काम करतात त्यासाठी त्यांना कोठून पैसा येतो, त्यापैकी ते किती खर्च करतात, उर्वरित पैशाचे काय करतात त्याचा कधी तरी हिशोब सभागृहासमोर आला पाहिजे. सध्या एनजीओ हा मोठा विषय झाला आहे. हे विधेयक तर एनजीओच्या पलिकडे गेले आहे.

सभापती महोदय, माझे एका इमारतीमध्ये कार्यालय आहे. त्याची हाऊस गल्ली आहे. मी त्या कार्यालयात दिवसा काम करीत असतो. मी तेथे रहात नाही. माझ्या शेजारच्या इमारतीमध्ये रहात असलेली महिला कदाचित समाजसेविका असावी, मी तिला ओळखत नाही. ती महिला एक दिवशी माझ्या कार्यालयात आली. माझ्याकडे आल्यानंतर तिने इंग्रजी भाषेत माझ्याशी भांडण करण्यास सुरुवात केली. ती महिला असल्यामुळे मी तिचे सर्व ऐकून घेतले. मी तिला विचारले की, आपण कोण ? ती म्हणाली की, मी तुमच्या शेजारच्या इमारतीमध्ये राहते.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / परिपृच्छेसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

तुम्ही माझ्याशी का भांडता असे मी त्या महिलेला विचारले. तिने सांगितले की, हाऊस गल्ली साफ झाली पाहिजे. सभापती महोदय, साफसफाई करण्याची माझी जबाबदारी आहे काय ? त्या महिलेला वाटले की मी त्या इमारतीचा मालक आहे म्हणून ती माझ्याशी भांडत बसली. मग मी तिला सांगितले की, मी या इमारतीचा मालक नाही, ही इमारत माझी नाही. माझे कार्यालय येथे आहे. मी येथे राहात देखील नाही. हा माझा स्वत:चा सात-आठ महिन्यापूर्वीचा अनुभव आहे. मी जेव्हा मुंबईमध्ये नसतो त्यावेळी माझ्या कार्यालयामध्ये बसत असतो. या विधेयकान्वये स्वच्छता राखण्याची जबाबदारी ही क्षेत्रसभेच्या सदस्यावर टाकलेली आहे. स्वच्छता राखण्याच्या बाबतीत पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या बाबतीत किती भांडणे होतील ? मग स्वच्छता आणि पर्यावरण तुम्ही कसे राखणार ? चाळींमधून तर परिस्थिती किती तरी वेगळी आहे. सहकारी इमारतीमधील लोक गॅलरीमध्ये झाडे लावतात. झाडांना घातलेल्या पाण्याचा खाली राहाणा-याला त्रास होतो. सहकारी गृहनिर्माण संस्था या सहकार कायद्यान्वये झालेल्या असल्यामुळे त्या कायद्यांतर्गत निदान कारवाई तरी करता येते. परंतु चाळींच्या बाबतीत काय करणार ? वरच्या मजल्यावरील माणासाने गॅलरीत झाडे लावली आणि त्रास खालच्या माणसांना होत असेल तर त्याबाबतीत काय करणार ? सभापती महोदय, परिस्थिती किती गंभीर होते याचे मी आपणास उदाहरण देतो. पोर्तुगिज चर्चच्या मागील इमारतीमध्ये सैन्य दलातील एक निवृत्त अधिकारी राहात होता. त्याच्या बाथरुममध्ये वरच्या मजल्यावरुन पाणी गळत होते. वरती महिला राहात होती. त्या महिलेला सांगून, तक्रार करुन तो अधिकारी थकला. त्याच्या बाथरुममध्ये रोजच पाणी असायचे. एकदा ती महिला त्याला रस्त्यात भेटली आणि त्याने तिला सांगितले की, तुमच्या बाथरुममधील पाणी माझ्या बाथरुममध्ये गळत असते, तुम्ही बाथरुम कधी दुरुस्त करणार आहात ? त्या महिलेने काहीच उत्तर दिले नाही. इतके दिवस त्रास सहन करुन, त्याबाबतीत तक्रारी करुन काहीच केले जात नाही म्हटल्यावर सैन्यदलामधील त्या अधिका-याच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्याने सरळ स्वत:कडील रिव्हाल्व्हर काढून दिवसाढवळया भर रस्त्यात त्या महिलेवर गोळया झाडून तिचा खून केला. आता तो निवृत्त अधिकारी जेल मध्ये आहे. स्वच्छता राखणे, पर्यावरण राखणे, प्रदुषण रोखणे यासंबंधातील जबाबदारी क्षेत्रसभेच्या सदस्यावर टाकलेली आहे. सभापती महोदय, या क्षेत्रसभेमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

काय होईल याचे वर्णन मी काल केले. क्षेत्रसभेमध्येच प्रत्येक जण म्हणेल की, हा अधिकार माझा आहे, तो अधिकार माझा आहे. चाळी-चाळींमध्ये काय परिस्थिती होईल ? त्या ठिकाणी प्रदुषण रोखण्यासाठी, पर्यावरण राखण्यासाठी वेगवेगळया गँग तयार होतील आणीबाणीच्या वेळी चाळी-चाळी मधून दिवसपाळीच्या, रात्रपाळीच्या गस्त घालणा-या समितीच्या निर्माण होतात. मग या बाबतीत काय परिस्थिती निर्माण होईल याचा कधी आपण विचार केलेला आहे काय ? एका चाळीच्या क्षेत्रसभेचे नेतृत्व एक व्यक्ती करील, दुस-या चाळीच्या क्षेत्रसभेचे नेतृत्व दुसरी व्यक्ती करील. एका घरातील फोडणीचा वास दुस-याच्या घरात जातो अशा मुंबईतील चाळी आहेत. जुन्या चाळीमधील अंतर जेमतेम पाच फूट इतके असते. एकाने आपल्या स्वयंपाक घरामध्ये एक्झॉस्ट फॅन लावला तर त्याच्या घरातील धूर दुस-याच्या घरात जातो. मग आपण प्रदुषण नियंत्रण कसे करणार ? या कायद्यान्वये क्षेत्रसभेला हक्क मिळणार आहेत. या विधेयकाच्या कलम 4 मध्ये असे म्हटलेले आहे की,...

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पाणी पुरवठा करणे, रस्त्यावर व मार्गावर दिवे लावणे, साफसफाई आणि मलनि:सारणाची विल्हेवाट लावणे, सार्वजनिक स्वचछता, वादळी पावसाची पाणी व घनकचरा व्यवस्थापन व इतर नागरी सोयी-सुविधा या विषयी संबंधित प्रभाग अधिका-यांनी त्या बैठकीस उपस्थित रहावयाचे आहे. त्या बैठकीसाठी वॉर्ड ऑफिस उपस्थित राहणार आहे. मुंबईत या सभेची पूर्णपणे वाट लागणार आहे. मुंबईत प्रत्येक नगरसेवकाचा मतदार संघ 40 हजार लोकसंख्येचा आहे, 45 हजार लोकसंख्येचा आहे. अशा सात ते आठ क्षेत्र सभा होतील. या क्षेत्रात साधारणपणे 14 बैठका होतील. या सर्व सभा एका वर्षात घ्यावयाच आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : पाच पोलींग बुथची एक क्षेत्रीय सभा असून पाच सभेपेक्षा जास्त सभा घेता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : क्षेत्र सभा 5 घेतल्या जातील. आपण नगरसेवकांच्या मतदार सघातील लोकसंख्या डिव्हाईड करा. मुंबईतल्या नगरसेवकांच्या मतदार संघात पाच सभा होतील. तसेच वर्षाला ग्रामसभेसारख्या दोन सभा घेतल्या जाणार आहेत. एकूण 10 सभा होतील, त्या सभेला वॉर्ड ऑफिसरचे सर्व अधिकारी उपस्थित राहतील. या बैठकांमध्ये अधिका-यांचे काय होणार आह? क्षेत्रसभेत पाणी पुरवठा, रस्ता व मार्गावरील दिवे ही कामे झाली आहेत की नाहीत हे पाहण्यासाठी हमरी गेलीं में वाले सगळे दांडू घेऊन त्या सभेस उपस्थित राहतील. सन्माननीय श्री. संजय निरुपम यांचे सगळे प्रतिनिधी हमारे गली मे रस्ता चाहिऐं, हमारी गली में पाणी चाहियें, हमारी गली में संडास चाहिऐं या मागणीसाठी ते लोक त्या बैठकीमध्ये उपस्थित राहतील. हमरी गली में हे मी बोलत नाही. ही मंडळी त्या बैठकीत जातील तेथे तेथे मागणी करतील. त्यावेळी यह कहाँ सें आयें, इनको भगाव असेही करतील. सन्माननीय श्री. नसीम खान हे नव्याने राज्याचे गृह राज्यमंत्री झालेले आहेत. त्यांनी काल एक तंबी दिली. हा मुद्दा फार गंभीर आहे. आज सकाळी एक बातमी आलेली आहे. क्षेत्र सभेचा कसा सत्यनास होणार आहे, ती बातमी त्याचे प्रात्यक्षिक आहे. या मुंबई शहरामध्ये भाषिक वाद निर्माण करणा-यांवर कडक कारवाई केली जाईल असे गृह राज्यमंत्री यांनी जाहीर केले आहे. श्री. अझरुद्दीन हे कोठून निवडून आले याची मला माहिती नाही. श्री.अझरुद्दीनचा आणि या राज्याच्या काय संबंध आहे. पूर्वी तो आमच्या देशाचा क्रिकेटर होता. तो राज्यभेत निवडून आला. त्याचा तिकडे सत्कार करण्यात आला. तो निवडून आल्याबद्दल तुम्ही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्याला मिठया मारा. त्याचा सत्कार करता आहात, त्याबद्दल आमची काही तक्रार नाही. या देशात कोणी कोणाचाही सत्कार करु शकतो. परंतु त्याच्या सत्कार सभेमध्ये मुंबईतील मराठी भाषिकांना तंबी देण्यात आली. मराठी भाषिकांना कशासाठी दम दिला ? त्यांनी पुन्हा असे जाहीर केले की, आता कोणत्याही परप्रांतीयांनी घाबरण्याचे कारण नाही. मैं हु ना. मी या ठिकाणी मुंबईचे विदारक चित्र मांडतो आहे. मी सॅम्पल पीस या ठिकाणी मांडतो आहे. आणि या कायद्याची अडचण सगळीकडे निर्माण होणार आहे...

यानंतर श्री. बोरले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

नगरसेवकांच्या प्रभागामध्ये हे सर्व होणार आहे. मी प्रत्येक नगरपालिकेसंबंधी बोलत नाही. तुमची इच्छा असेल तर मी ते नंतर बोलतो. नागपूर, संभाजीनगर, नांदेड, कोल्हापूरमध्ये काय होईल हे तुमची इच्छा असेल तर मी बोलतो. मुंबई शहरामध्ये काय होईल त्याचे चित्र मी उभे करीत आहे आणि ते सर्वांकरिता आहे, असे माझे मत आहे. माझे भाषण संपल्यानंतर आपणही बोला. मी खाली बसू काय ? तुम्ही आमचे चांगले मार्गदर्शक आहात.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना बिलावर बोलावयाचे असेल तर ते बोलू शकतात.

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, मी मुंबई शहराचा महापौर होतो. मुंबई शहरातील बारीकसारीक जडणघडण मला माहिती आहे आणि तुम्हालाही माहिती असेल, असे मी गृहीत धरतो. मुंबई शहरात ज्यांनी काम केले त्यांना याची माहिती आहे. या विधेयकाच्या माध्यमातून काय निर्माण होणार आहे, ते मी मांडत आहे. पाणी, वीज, शौचालय कोठे असावे हे क्षेत्र सभेमध्ये ठरणार आहे. त्यामुळे त्या भागातील माणूस उभा राहून बांबू घेऊन सांगणार की, आमच्या गल्लीत पाहिजे. तेथे हा वाद निर्माण होईल की नाही ? मी जे मांडत आहे ते आपण समजून घ्यावे. मुंबई शहराचा तुम्ही बहुढंगी अंगाने स्वीकार केलेला आहे. राज्य घटनेची पाचर सतत आमच्या मुस्कटात कोंबून आमचा गळा बंद करण्याचा प्रयत्न करीतच आहात ना ? आम्ही ते नाकारत नाही. आम्ही या देशाचे नागरीक आहोत. आम्ही घटना स्वीकारलेली आहे आणि आम्हाला ते मान्य आहे. परप्रांतीय लोंढे हा विषय वेगळा आहे आणि ते आपण घटनेने थांबवू शकतो, हे मी परवा वाचून दाखविलेले आहे. त्यावेळी आपण मला मदत केली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आपण हे सर्व थांबवू शकतो हे मी मांडत असतांना आपण मला मदत केली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद दिले. मला आनंद वाटला. सत्ताधारी पक्षातील तुमच्यासारख्या एका सदस्याला याची जाणीव आहे, याचा मला आनंद वाटला. तो प्रश्न वेगळा आहे आणि हे अंगार आता फुललेले आहेत. आता निवडणुकीनंतर विजयाचा उन्माद निर्माण झालेला आहे. रोज तंबी दिली जाते. हरकत नाही. नागरिक त्याचा योग्य समाचार घेतील. परंतु या क्षेत्र सभेमध्ये काय निर्णय होणार आहे, ते मी सांगतो. आपण ते नाकारु शकता काय ? अधिका-यांची काय गत होईल ? मी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

यांच्याशी बोलतांना सांगत होतो की, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते श्री.आर.आर.सिंग होते. ते नेहमी मराठीत बोलायचे. मला कधीही असे वाटले नाही की, ते भैय्या आहेत. ते मराठीमध्ये बोलत होते. ते हिंदीमध्ये बोलल्याचे मला कधी आठवत नाही. त्यांचे वागणे सुध्दा मराठी माणसासारखेच होते. तुमचा तर प्रश्नच नाही. माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांचा जन्म राम जन्माच्या दिवशी झालेला असल्यामुळे आमचे भाग्य उचळले आहे. त्यांचा जन्म राम नवमीचा आहे. ते आल्या पासूनच तुळजापूर वगैरे हे सर्व सुरु आहे. यापूर्वी कधी असे होत नव्हते. आपण हे लक्षात घ्यावे. हा महत्वाचा मुद्दा आहे. आतापर्यंत कोणीच असे केले नाही. तुमच्या हातात आल्यापासून हे घडत आहे ? त्याला काही संकेत असतील. ते आम्हाला माहीत नाही. सत्ताधारी पक्षाचे सदस्य त्याला अंधश्रध्दा म्हणतील. परंतु तो विषय वेगळा आहे.

सभापती महोदय, हे मी गंभीरपणे मांडतो आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, मधुकर चव्हाण नगरसेवक होते. ते विधानपरिषदेवर निवडून आलेले आहेत. सत्ताधारी पक्षातील सदस्य नगरसेवक झाले आणि नंतर विधानपरिषदेवर निवडून आलेले आहेत की नाही याची मला माहिती नाही. परंतु प्रश्न गंभीर आहे. क्षेत्र सभेला तुम्ही अधिकार दिले, हक्क दिले. सार्वजनिक स्वच्छता, वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन मला अद्याप याचा अर्थ कळलेला नाही. हा तांत्रिक विषय आहे. तो इंजिनिअरिंगचा विषय आहे, हवामान तज्ज्ञांचा विषय आहे.

यानंतर श्री.भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

काय करायचे त्याचे. क्षेत्रसभेचे सदस्य आरडाओरड करतील. घनकचरा व्यवस्थापन हा अत्यंत गंभीर विषय आहे. मुंबई शहरामध्ये दररोज जवळजवळ साडेचार हजार टन कचरा गोळा होतो. कॉम्पॅक्टर यंत्रणा ही मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो त्यावेळी मंजूर झालेली योजना आहे. त्यावेळी आम्ही 80 कॉम्पॅक्टर खरेदी केले होते. आज महापालिकेकडे 700 ते 800 कॉम्पॅक्टर आहेत. एका कॉम्पॅक्टरमध्ये दुप्पट कचरा सामावला जातो. परंतु घनकचरा व्यवस्थापन हा विषय क्षेत्रसभेमध्ये घेतल्यानंतर काय होईल याचे मार्गदर्शन सन्माननीय मंत्रीमहोदयांनी करावे. भांडुप, मुलुंड आणि चेंबूर या ठिकाणी डंपिंग ग्राऊंड आहेत. त्या परिसरातील क्षेत्रसभेमध्ये काय परिस्थिती निर्माण होईल? पुण्यातील आमदारांना हा प्रश्न गंभीरतेने जाणवेल. तेथे काय परिस्थिती निर्माण झाली आहे? कचऱ्यावरुन काय चालले आहे? रोज बातमी वाचायला मिळत आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी आता सभागृहात उपस्थित नाहीत. आठ दिवस पुणे शहरातील कचरा उचलला गेला नाही. डंपिंग ग्राऊंड अडवून ठेवले. थातुरमातुर बोळवण करुन आंदोलन मागे घेतले. परंतु आता पुन्हा आंदोलन सुरु झाले आहे. तेथील बिल्डरला मदत करण्यासाठी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकाने काय केले ते आम्ही दूरदर्शनवर पाहिले. त्या नगरसेवकाला घन कचरा नेताना आम्ही कधी पाहिले नाही. मी जरी मुंबई शहराचा प्रश्न मांडत असलो तरी त्यावरुन संपूर्ण महाराष्ट्रात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती असणार आहे. मुंबई शहरामध्ये परप्रातीयांचे प्राबल्य असल्यामुळे हाणामारी होणारच आहे. परंतु संभाजीनगर, नांदेड या शहरांमध्ये आपापसात हाणामारी होईल. नागपूर हा हिंदीचा बेल्ट आहे. नागपूर ही पूर्वी मध्यप्रदेशची राजधानी होती, त्यामुळे तेथे हिंदी भाषिक अधिक आहेत. तो विषय वेगळा आहे. घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी कचरा निवारण केंद्रे आहेत, जी डंपिंग ग्राऊंड आहेत तेथे काय परिस्थिती निर्माण होईल? त्या त्या क्षेत्रसभेमध्ये सदस्य सांगतील की पहिले आमच्या येथील डंपिंग ग्राऊंड बंद करा. याठिकाणी कचरा आणणे बंद करा. क्षेत्रसभेमध्ये तेथील नागरिक एकत्र येतील आणि आंदोलन करतील. संपूर्ण मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन हा एक मोठा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फर हुसेन यांनी घनकचरा व्यवस्थापन या विषयावर सभागृहात अर्धातास चर्चा घडवून आणली होती. इतका हा गहन विषय आहे. या संदर्भात निर्णय होणे फार गरजेचे आहे. आज ना उद्या हा विषय चर्चेला आला पाहिजे. या विधेयकामध्ये म्हटले आहे की,

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नागरी सुविधांच्या संदर्भात इतर नागरी सुविधा.....म्हणजे त्यात काहीही आले. क्षेत्रसभेने केलेल्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीसह क्षेत्रसभेच्या अधिकारितेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाची माहिती मिळविणे असे या विधेयकामध्ये म्हटले आहे. बेकायदेशीर बांधकामाच्या संदर्भात काय परिस्थिती निर्माण होईल? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्याकडून मला मार्गदर्शन हवे आहे. मिठी नदीच्या संदर्भात सगळ्यात चांगले काम सन्माननीय श्री.किरीट सोमय्या यांनी केले आहे. बेकायदेशीर झोपडपट्टया हटविणे, पाईपलाईनच्या बाजूला असलेल्या झोपड्या हटविणे हे मान्य आहे. परंतु तेथे राहणारे जे मतदार आहेत ते प्रभाग समितीचे, क्षेत्र सभेचे सदस्य आहेत. ते सभेला येऊ शकतात. विधेयकामध्ये म्हटले आहे की, वादळी पावसातून निर्माण होणाऱ्या पाण्याचा निचरा.....म्हणजे मिठी नदीचे पात्र रुंद केले पाहिजे आणि त्यासाठी त्या क्षेत्रात येणारी बांधकामे हटविली पाहिजे. मंत्रीमहोदयांनी हे विधेयक मागे घ्यावे. फार गंभीर आहे. सभापती महोदय, हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. विचित्र परिस्थिती निर्माण होईल. काय होणार आहे? मिठी नदीच्या क्षेत्रातील बांधकामे हटविली पाहिजेत. कुर्ला भागातील मिठी नदीच्या पात्रातील बांधकामे हटविली जात नाहीत, इतर भागातील हटविली जातात, त्याच्या खोलात मी जात नाही. राजकीय रंग देता येत असला तरी मी तो देणार नाही. तेथील नागरिक हे क्षेत्रसभेचे मतदार असल्यामुळे क्षेत्रसभेला ते उपस्थित असणार आहेत. शासनाने वादळी पावसाच्या पाण्याचा निचरा हा विषय यामध्ये घेतला आहे. त्यामुळे मिठी नदीच्या रुंदीकरणामध्ये जी बांधकामे येतील ती आम्ही हटविणार असे तुमचे म्हणणे असेल तर त्यांना हटविलेच पाहिजे.

एम.1....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)

श्री. दिवाकर रावते .....

कॉम्प्रमाईज नाही, पर्यायी जागा द्या आणि बाहेर जा. तुमचे काही सांगता येणार नाही. फक्त पर्यायी जागा घ्या आणि बाहेर जा. हा प्रश्न मुंबईत मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असून तो सोडवावयाचा आहे. हा प्रश्न प्रभागाचा किंवा विभागाचा नाही. क्षेत्रसभेमध्ये प्रभागात नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रभाग समितीला सहकार्य करणे. म्हणजे प्रभाग समितीला सहकार्य करावयाचे आहे. आता मला सांगा की, विभाग समित्यांचे अध्यक्ष जे असतील त्यांच्यासमोर दररोज 25 नागरिक असे सहकार्य करण्यासाठी आले तर काय होणार ? प्रत्येक प्रभागात असे उत्साही लोक असणारच. ते म्हणतील शिवाजी पार्कच्या कट्टयावर बसण्यापेक्षा विभाग समितीच्या अध्यक्षांकडे जाऊन बसू. आमच्या भागात ज्येष्ठ नागरिक आहेत ते सकाळी महापौरांकडे जाऊन दररोज सतावत असतात. कुर्ला येथील मिठी नदीचे क्षेत्र हटवायचे असेल तर ते हटवायला देतील काय ? ते म्हणतील की आम्ही आमचे पाहून घेऊ. क्षेत्रसभेकडे स्वच्छताविषयक व्यवस्था प्रभागात व्हावी म्हणून प्रभाग समितीला सहकार्य करणारे 25 लोक आले तर त्या व्रिभाग समितीच्या अध्यखांचे काय होणार ? त्यांनी सांगितले की, आता मला वेळ नाही, मला बैठकीसाठी जायचे आहे, थांबा. सहकार्य करायला आलेले लोक म्हणणार की, नाही आम्ही क्षेत्रसभेचे सदस्य आहोत, कायद्यामध्ये तशी तरतूद आहे आणि आमचे काम आहे की आपल्याला सहकार्य करणे. सरकारने तसा कायदा केला आणि आमचे कर्तव्य आहे की आपल्याला सहकार्य करावे. त्यानंतर मुंबई अधिनियम क्र. 3 च्या कलम 50 (ट)(ट) प्रभाग समितीच्या संदर्भात हे कलम आहे. ही सुधारणा नव्याने करण्यात आली. अगोदर हे कलम 50 (ट) असेच होते परंतु नंतर त्यात सुधारणा करण्यात आली आहे. महापालिका 25 पेक्षा अधिक नसतील इतक्या प्रभाग समित्यांची रचना करील व प्रत्येक समितीमध्ये महापालिका ठरविल असे लागू असलेल्या दोन प्रभागांचा समावेश करील आणि मग यासंदर्भात त्यांचे अधिकार आहेत. त्यांनी काय करावयाचे तर ही भली मोठी यादी आहे. त्यात पाणीपुरवठा, जलनि:सारण, तसेच नागरिकांच्या सर्वसाधारण अडचणी त्वरित दूर करणे, प्रभागाच्या खर्चाचे निरनिराळ्या लेखाशीर्षाचे अंदाजपत्रक आयुक्तांकडे पाठविण्यापूर्वी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यावर विचार करणे आणि शिफारस करणे हा सर्वात महत्वाचा भाग आहे. क्षेत्रसभेने सांगितलेले प्रस्ताव असतील त्यांची छाननी करावयाची तसेच त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावयाची. समजा प्रभाग समितीचा अध्यक्ष हा काँग्रेस पक्षाचा, मेजॉरिटी आहे म्हणून तो अध्यक्ष असेल आणि क्षेत्रसभेत शिवसेना, राष्ट्रवादी किंवा भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक असतील त्यांच्या भागातील प्रस्ताव आले तर क्षेत्रसभेत प्रायॉरिटी कोणाची असणार आहे ? अशा गोष्टींचे स्पष्टीकरण होत नाही. आता या प्रभाग समितीला कायद्याने अधिकार दिले आहेत परंतु पूर्वी हा अधिकार स्थायी समितीकडे होता, इम्प्रुव्हमेंट कमिटीला अधिकार होता, शिक्षण समितीला तो अधिकार होता. प्राथमिक आराखडा मंजूर करण्यासाठी अशा उपनगरीय समित्या होत्या आणि त्यांच्याकडे हे अधिकार होते. त्यांनी जोपर्यंत असे आराखडे मंजूर केले नाही तोपर्यंत त्यासाठी एस्टीमेट अथवा मान्यता स्थायी समिती देत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्यामध्ये सुध्दा प्रभाग समिती आलेली आहे. प्रभाग समितीने ते वर पाठवायचे आहे. यासाठी अर्थसंकल्प तरतूद होणार मग हा अर्थसंकल्प मंजुरीसाठी येणार . स्थापत्य समिती शहर, स्थापत्य समिती उपनगर ही फक्त नावे देत असते. आता त्यांच्याकडे बाकी कामे राहिलेली नाहीत. त्यांची सर्व कामे प्रभाग समितीकडे आलेली आहेत. आमच्या रस्त्याचे काय केले म्हणून आता नागरिक आपल्याला विचारायला येणार. त्यामुळे प्रभाग समिती नक्की कोणाला प्रायोरीटी देणार? कशी देणार आहे? तेथे सुध्दा राजकारण होणार आहे कारण त्या ठिकाणी पक्षाचे नगरसेवक निवडून आलेले आहेत. नगरपरिषदा, पंचायत समितीमध्ये सुध्दा सर्व राजकारणच चालत असते. ज्याच्या हातामध्ये काठी त्याच्या हाती सत्तेची म्हैस असते. हाच प्रकार खालपासून वरपर्यंत चालत असतो. आपण या विधेयकात जो क्लॉज टाकलेला आहे त्यामुळे कामे कशी काय होणार आहेत? आपण प्रभाग समितीला अधिकार दिलेला आहे. विधेयकात आपण असे म्हटले आहे की, "प्रभाग समिती संबंधित खर्चाच्या अंदाजपत्रकाचे अर्थसंकल्पाच्या निरनिराळ्या लेखा परीक्षकाचे प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविण्यापूर्वी विचार करणे व त्याबाबत शिफारस करणे" असे म्हटलेले आहे. क्षेत्र समितीची शिफारस प्रभाग समितीने नाकारली तर आपण काय करणार आहात? कारण याबाबत आयुक्तांना अधिकारच नाही. याबाबतीत विधेयकात काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रभाग समिती व क्षेत्र समितीला आपण अधिकार दिलेले आहेत त्यामुळे अधिका-यांमध्ये फार गोंधळ होणार आहे. विधेयकात असेही म्हटले आहे की, "प्रभाग समितीमध्ये पाच लाखाच्या पालिका बांधकामाच्या नकाशाच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे, मात्र महापालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विर्निदिष्ट तरतूद केली पाहिजे त्या तरतुदीप्रमाणे हे करता येणार आहे". प्रभाग समिती आपल्या पध्दतीने काम करीत असते. प्रत्येक नगरसेवकाची कामे त्या ठिकाणी होत असते. नागरी वनीकरण, पर्यावरण संरक्षणचे काम प्रभाग समितीला दिलेले असून या कामाकडे लक्ष देण्यास क्षेत्रीय समितीला सुध्दा सांगण्यात आलेले आहे. प्रभाग समितीला मार्गदर्शन करण्यासाठी सुध्दा जाण्याचे काम दिलेले आहे. म्हणजे चारही बाजूने कामकाज कसे होणार नाही याची काळजी या विधेयकात घेण्यात आलेली आहे. प्रभाग समिती कशा प्रकारे निर्माण होते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद लोकशाहीला समजून उमजून केलेली आहे. यामध्ये महानगरपालिकेतील सभागृहाचा नेता आणि विरोधी पक्ष नेता या दोघांनी एकत्र बसून सभागृहातील गट नेते या सर्वांनी एकत्र बसून आपला प्रस्ताव तयार करुन प्रभाग समितीवर ज्या पक्षाचे जेवढे सदस्य निवडून आलेले असतील त्या प्रमाणात प्रतिनिधीत्व दिले गेल्यानंतर ती प्रभाग समिती तयार होते. ज्या प्रक्षाचे जास्त नगरसेवक आहेत त्या पक्षाची ती प्रभाग समिती होणार. प्रभाग समितीच्या अध्यक्षांना खूप अधिकार दिलेले आहेत. प्रभाग समितीच्या अध्यक्षांना गाडी दिली जाते तसेच सर्व काही दिले जाते परंतु क्षेत्र सभेचे तसे नाही. त्या भागातील सर्व मतदार हे क्षेत्र समितीचे सदस्य आहेत त्यामुळे ते पक्षनिहाय प्रतिनिधीत्व नाही तर सर्वसदस्यत्व प्रतिनिधीत्व आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

प्रत्येकला हे अधिकार मिळालेले आहेत. प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सर्वसामान्य व्यक्तिला नसतो. त्याला हा अधिकार नसल्यामुळेच प्रशासन व्यवस्थितपणे चालले आहे. प्रत्येक व्यक्ती जर त्याच्या फाईलीच्या संदर्भात मंत्रालयात येऊन तेथील अधिका-याकडून माहिती घेण्याचा व वारंवार हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करु लागली तर प्रशासन चालणार नाही. लोकशा्ही पध्दतीने लोकप्रतिनिधींनी केलेल्या कायद्यातील तरतुदीप्रमाणेच प्रशासन चालत असते. अन्यथा प्रशासन कोलमडून पडल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक व्यक्ती जर हस्तक्षेप करु लागली तर संबंधित अधिका-याला काम करणे अवघड होईल आणि काम करण्या ऐवजी प्रत्येक व्यक्तिला उत्तरे देण्यामध्येच त्या अधिका-याचा वेळ जाईल शेवटी कंटाळून तो रजेवर निघून जाईल.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियातील कलम 250 (टट) च्या पोट कलम 7 (क) च्या खंड (क) च्या नंतर पुढील जादा खंड दाखल करण्यात येणार आहे.असे म्हटलेले आहे. त्यामुळे प्रभाग समिती नंतर दुसरी एक समिती नेमण्यात येणार असून हे छेद देणारे कलम आहे. पूर्वी हे अधिकार महानगरपालिकेला होते ते अधिकार खालच्या पातळीवर देण्यात आले होते. ते ठीक आहे. खालच्या पातळीवर अधिकार देण्यात आल्यामुळे प्रभाग समितीला ते अधिकार मिळाले होते. परंतु आर्थिक अधिकार पाच लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत दिले आहेत. अशा प्रकारे जरी मर्यादित अधिकार देण्यात आलेले असले तरी काल पुरवणी मागण्या कशा प्रकारे सादर करण्यात आल्या होत्या हे आम्ही सर्वांनी पाहिलेले आहे. विधिमंडळ निर्माण
झाल्यापासून विधिमंडळात प्रथमच पुरवणी मागण्यांना सप्लीमेन्टरी जोडण्यात आलेली आहे. प्रत्येक आमदारांच्या मतदारसंघातील .एक लाख रुपयांची, दीड लाख रुपयांची कामे त्यात सुचविण्यात आलेली आहेत. ही निवडणुकीची तयारी आहे. आपल्या हातात सत्ता असल्यामुळे तो आपलाच अधिकार आहे त्यामुळे त्याबाबतीत आम्ही काही बोलू शकत नाही. परंतु आपण आता ज्या प्रकारे केलेले आहे त्या प्रकारे आम्ही सत्तेत आल्या नंतरसुध्दा करु. या अनुभवावरुन आम्हाला ही गोष्ट शिकायला मिळालेली आहे. तुम्ही शेवटच्या वर्षी तसे केलेले आहे परंतु आम्ही मात्र पाच वर्षे तसे करु. ठीक आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

सभापती महोदय, हा कायदा प्रभाग सामितीला छेद देणारा आहे.स्थायी समितीला छेद देणा-या प्रभाग सामित्या स्थापन करण्यात आल्या होत्या आणि त्या बाबतीत आमचे काहीही म्हणणे नाही. सत्तेचे विकेन्द्रीकरण केलेले असल्यामुळे शासनाने तो चांगला निर्णय घेतला आहे.जास्तीत जास्त कामे होण्याकरता शासानाने वाव दिला आहे परंतु त्याच्याही पलीकडे जाऊन शासनाने हा निर्णय घेतलेला आहे आणि काल पर्यत गल्लीत असलेले कामकाज माझ्या गॅलरीपर्यत आणलेले आहे. काल सन्माननीय सदस्या श्रीमती फोजिया खान असे म्हणाल्या की,खासदारांचा निधी खाजगी संस्थांना देता येतो परंतु आमदारांचा निधी खाजगी सस्थांना देता येत नाही तेव्हा तो निधी खाजगी संस्थांना देण्याची परवानगी देण्यात यावी. त्यांची व्यथा मला समजली आणि ग्रामीण भागात खाजगी सस्थाना हा निधी दिल्यामुळे काय घडते हे देखील मला माहीत आहे .खासदार कोणाला निधी देतात हे आपल्याला सुध्दा माहीत आहे.जेवढया खासदारांच्या स्वत:च्या संस्थां आहेत त्या संस्थाना करोडो रुपयांचा निधी दिला जातो .इमारत बांधणे, फर्निचर विकत घेणे, कॉप्युटर खरेदी करणे इत्यादी कामासाठी हा निधी त्यांच्याच सस्थेला दिला जातो. हा निधी जनतेच्या उपयोगी पडत नाही .इमारती त्याच फंडातून बांधावयाच्या, कॉप्युटर, फर्निचरसुध्दा त्याच फंडातून घेतले जाते. जो काही खर्च केलेला आहे तो कशासाठी केला आहे हे जर सांगितले तर सर्वाना धक्का बसेल. जनतेच्या पैशातून स्वत:च्या करोडो रुपयाच्या प्रॉपर्टीज खासदारांनी विविध सस्थेच्या नावाने जमा केल्या आहेत. इमारत बांधण्याकरिता, कॉम्प्युटर आणि फर्निचर खरेदी करण्याकरिता हा निधी खर्च केला जाते कारण ती संस्थांप त्यांची स्वत:चीच असते सन्माननीय सदस्या फौजिया खान यांचा असा मुद्दा होता की,अशा पकारची परवानगी आपण आम्हाला द्यावी. खासदार श्री. वरपूडकर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना निधी देणारच नाहीत त्यामुळे आमदार निधीतून या कामासाठी खर्च करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. रस्त्यावरचा विकास गल्लीपर्यन्त आणला तर ते मी समजू शकतो परंतु गल्लीतील विकास गॅलरीपर्यत आणला आहे. मुंबईतील अनेक लोक गॅलरीत स्वयंपाक करतात आणि भांडीसुध्दा तेथेच धुतात . बकरी अड्डयाच्या ठिकाणी जर आपण पहिले तर ट्रकवाले तेथे राहतात फक्त

झोपडीत बेडरुम असते स्वयंपक बनविणे, कपडे आणि भांडी धुणे इत्यादी कामे झोपडी बाहेर रस्त्यावर केली जातात.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धलिखित प्रत / मुद्रणेत्तर नाही

DGS/ MAP/ KGS/ 11:15

श्री. दिवाकर रावते...

ते व्यवस्थित करा याबाबत मी काल आपल्याला सांगितले. अशाप्रकारे या झोपडपट्टयांचे इंटेरिअर चालू आहे. सभापती महोदय, हा अधिकार कसला आहे? या विधेयकात म्हटले आहे की, "पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, मलप्रवाह विल्हेवाट, मल:निस्सारण, वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, स्वच्छताविषयक बांधकामे आणि विकास योजना यांच्या संबंधात शिफारशी करणे आणि त्यांचा नियत कालांतरांनी आढावा घेणे, महानगरपालिकेच्या विकासविषयक कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेल्या ऐच्छिक कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग मिळविणे, प्रभागातील उपवनांच्या देखभालीची सुनिश्चिती करणे आणि प्रत्येक निवडणूक प्रभागाला यथायोग्य प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप करण्याकरिता शिफारस करणे" सभापती महोदय, या विधेयकामध्ये आपण काय करीत आहात? मुंबई शहरात निवडून आलेला नगरसेवक आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद आहे काय असे विचारु शकतो काय? उद्या झोपडीत राहणारा सामान्य नागरिक त्याठिकाणी येऊन दादागिरी करणार आणि महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद झाली पाहिजे असे कायद्यातील तरतुदीप्रमाणे म्हणणार. तो प्रभाग समितीचा अधिकार आहे, प्रभाग क्षेत्र समितीचा अधिकार आहे. प्रशासकीय कामकाजामध्ये सर्वसामान्यांचा कितपत हस्तक्षेप असावा याचे काही नियंत्रण आणि नियोजन आहे की नाही? बैठकीमध्ये होणाऱ्या मारामाऱ्यांपलिकडे जाऊन पक्षाचे वेगवेगळे प्रतिनिधी असतात, त्यांना निवडणूक लढवायची असते. त्यांना निवडून यायचे असते . त्यामुळे माझ्या प्रभागासाठी अर्थसंकल्पात तरतूद झाली नाहीतर तो वाट लावणार. त्यामुळे तो होर्डींग लावणार. त्या होर्डीमध्ये म्हणणार की, अमूक प्रभाग क्षेत्र समितीमधून मी तरतूद करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी ती तरतूद नाकारली, अशाप्रकारे बदनामी करणारे एक होर्डींग असेल तर तरतूद केली म्हणून दुसरे होर्डींग लावले जाईल. काल मला 1200 उपनगरसेवकांची चिंता होती. ते रद्द झाले. आता ही होर्डींग लावणारे 12 हजार लोक तयार झाले. आज एका पक्षामध्ये एक नगरसेवक असला तरी नगर सेवक होण्याची दहा लोकांची इच्छा असते. अशाप्रकारे प्रत्येक पक्षांमध्ये ते आहेत. एक एक वॉर्डमध्ये 70 ते 80 लोकांना नगरसेवक होण्याची इच्छा आहे. हे लोक हेच काम करणार नाही? त्यामुळे आपण कुठे चाललो आहोत? कुठली अनारकी निर्माण करणार आहोत? आपण यादवी निर्माण करणार आहोत. आता तर एखादा सनदी अधिकारी निवृत्त झाला की, त्याला आपण आमदार व्हावे असे वाटते. कमवलेल्यातील दहा टक्के खर्च करुन आमदार व्हावे असे त्याला वाटते. म्हणून तो कुठल्या तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

पक्षाकडे जातो. तू कमवलेस, खाल्लेस आता गप्प बस ना. हा केवळ तुमचा आणि आमचा विषय नाही. या सनदी अधिकाऱ्यांना कुणीही आपल्या पक्षात घेता कामा नये असे माझे मत आहे. परंतु पक्षाचा निर्णय असल्यामुळे आपण काही करु शकत नाही. परंतु मला व्यक्तिगत असे वाटते की, तुम्ही 58 वर्षे सेवा करतांना काय वाटोळे केले ते केले तेव्हा आता स्वस्थ घरी बसा ना. ते सर्व निपटून झाल्यानंतर इथे पुन्हा फावडा खेचायला येतो. तुमच्याकडे दुग्धव्यवसाय खाते होते, त्यावेळी ते श्री. आडे अधिकारी होते. हा माणूस कोटीमध्येच बोलतो. त्यामुळे प्रभाग समितीचा अधिकार नावाचे हे एक नवीन फॅड आले आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप करण्याकरिता शिफारस करणे. हे संमत झाल्यानंतर किती प्रस्ताव येतील, आणि त्यामधून काय निर्माण होईल? माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेब मी आपणास अत्यंत कळकळीने विंनंती करतो की, हे विधेयक मागे घेण्याकरिता आपण आपल्या सरकारला सांगावे. हे विधेयक बरोबर नाही. एखाद्या अधिकाऱ्याला इथून पाचर मारता आली नाहीतर तिथून मार असे सांगणारे हे विधेयक आहे. हा कायदा निर्माण करुन या मुंबईचे वाटोळे केले आहे, हे बरोबर नाही. प्रभाग समितीपर्यंत ठीक होते. इथेही थोडीशी सत्ता खालपासून वरपर्यंत अनुभवायला मिळते. सभापती महोदय,हा कायदा निर्माण होत असतांना माननीय सदस्य डॉ. हिराणी यांच्या अकोला जिल्हयातील बाभुळगावला ग्रामसभा होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, याबाबतीत अत्यंत गंभीर परिस्थती काय आहे, ते मी सांगतो. मी तेथे जात असतो, त्यामुळे मला त्याची माहिती आहे कारण मी त्यामध्ये मध्यस्थी केली आहे, म्हणून सांगू इच्छितो.दि.14 ऑक्टोबर 2008 रोजी अकोला येथील बाभुळगावमध्ये ग्राम सभा झाली होती आणि त्यावेळी दोन गटामध्ये तुंबळ वादावादी झाली. त्यानंतर तेथील ग्राम सरपंचांनी शिवीगाळ केली म्हणून लोक त्यांच्यावर अट्रॉसिटी ॲक्ट खाली गुन्हा दाखल करण्यासाठी गेले होते. तेथील पोलीस विभाग प्रचंड तणावाखाली होता. याठिकाणी पुण्याचे सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशीसाहेब आलेले आहेत. पुणे येथे एस.बी.नावाचे अधिकारी आहेत. आज टी.व्ही.वर दाखविण्यात आले म्हणून त्या अधिकाऱ्याच्या नावाची अद्याक्षरे लक्षात राहिली आहेत. एस.बी., त्यालाही मराठीमध्ये स्वत:चे नाव लिहिता येत नाही. एस.म्हणजे कोण ? बी.म्हणजे कोण? ते लिहिता येत नाही. याबाबतीत मी सतत ओरडलो तरी हे प्रकार अजून सुरुच आहेत. काही फरक पडत नाही. तर या अधिकाऱ्याने एक वर्षे दबावाखाली गुन्हा दाखल केला नाही. आता काय करावयाचे ? ग्राम सभेमध्ये भांडण झाले. अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यासाठी लोक गेले. शेवटी आम्ही वकिलाला सांगितले की, सरपंचावर अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल होत आहे. तर ग्रामसेवक जो सरकारी अधिकारी आहे, त्याने निवेदन दिले की, या व्यक्तीने शिवीगाळ केली आहे, तर तक्रार नोंदवून घे,नाहीतर घ्यावयाची नाही.मग तो ग्रामसेवक गायब झाला, या गावामध्ये ग्रामसेवक म्हणून काम कसे करावयाचे ? तो घाबरला आणि पळून गेला. मग त्याला आठ दिवसामध्ये शोधून आणले. तेव्हा या सभांमध्ये अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे येथे उपस्थित नाहीत. नगरसेवक क्षेत्रसभेचा अध्यक्ष आहे आणि उद्या जर एखाद्या नगरसेवकाची वाट लावावयाचीच ठरविले ती काय परिस्थिती निर्माण होईल. तुम्ही हे थांबविणार आहात की नाही.

(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (खाली बसून) : नगरसेवकाला अधिकार आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नगरसेवक क्षेत्रसभेचा अध्यक्ष आहे. आपल्याला विनंती आहे, आपण ठाणे महानगरपालिकेचे महापौर होतात. आपल्या महापौर पदाकरता किती मोठे बलिदान झालेले आहे हे आपल्यालाही माहिती आहे.

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती :माझ्यासाठी नाही.चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये,म्हणून मी सांगतो की, वेळप्रसंगी मी बलिदान देऊन तुम्हा लोकांना किती मदत केलेली आहे. तुम्ही माझे बलिदान घेतलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण ठाणे महानगरपालिकेचे महापौर होतात. आपल्याला ठाणे महानगरपालिकेतील परिस्थिती माहिती आहे. त्यामुळे हे विधेयक पास झाल्यानंतर ठाण्यामध्ये देखील अशीच परिस्थिती निर्माण होईल. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड येथे उपस्थित नाहीत. ते कदाचित पोलीस स्टेशनमध्ये चौकशीसाठी गेले असतील. ते कुठे आहेत हे माहिती नाही. त्यांनी कचरा वगैरे नेऊन टाकला मग त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला वगैरे सगळे काही झाले. यातून काय-काय निर्माण होईल ? त्यामुळे एखाद्याची बदनामी करावयाची असेल तर काय-काय होईल ? त्यातून छात्र सभेची अध्यक्ष महिला नगरसेविका असेल, तुम्ही या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करावा. तुम्ही उगाच हट्टाने हे करु नका.मागच्या वेळेला माननीय मंत्री महोदयांनी असाच काहीतरी गोंधळ निर्माण झाला होता, म्हणून व्यापक असलेले एक विधेयक मागे घेतले होते. हे विधेयक तर आणखी उपद्व्याप निर्माण करणारे आहे. म्हणून मी अत्यंत नम्रपणे विनंती करतो की, याठिकाणी गंभीर अशा स्वरुपाचे जे विधेयक आणलेले आहे, ते कोणत्याही पातळीवर, कोणत्याही स्वरुपामध्ये स्विकृत होऊ नये. यातून महानगरपालिकेच्या कारभाराचा पूर्ण विचका होईल, कोणतेही काम होणार नाही. महानगरपालिकेमध्ये ज्यांची सत्ता असेल, त्या सत्तारुढ पक्षाला तेथे काम करता येणार नाही. तुम्ही या माध्यमातून प्रत्येक घरामध्ये विकासाची गंगा नेण्याची स्वप्न पहात असताना,प्रत्यक्षात जेव्हा प्रत्येक घरातील माणूस विकासासाठी हातामध्ये काठी घेऊन रस्त्यावर येईल, तेव्हा विकास तर सोडाच पण डोकी फुटतील, यादवी नक्की माजेल आणि कायदा आणि सुव्यवस्थेचा किती प्रश्न निर्माण होईल हे सांगता येत नाही.अजून याचे गांभीर्य नगरसेवका-पर्यंत पोहोचलेले नाही. ते पोहोचेल तेव्हा नगरसेवक खडबडून जागे होतील पण तोपर्यंत वेळ निघून गेली असेल. मग काय करणार असा प्रश्न निर्माण होईल. नंतर हा कायदा मागे घ्यावयाचा का ? असा प्रश्न निर्माण झाल्यानंतर मग कायदा मागे घेऊन नामुष्की होण्यापेक्षा आजच सन्मानाने नगरपालिकेच्या,महानगरपालिकेच्या विकासाकरता प्रभाग समितीचा आपण जो कायदा केलेला आहे.

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

श्री. दिवाकर रावते .....

त्या कायद्यात 5 लाखापर्यंतच्या निधीचा विकास करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झालेला आहे. पाहिजे तर प्रभाग समितीची ताकद आणखी वाढवून त्या समितीला बळ द्या. प्रत्येक नागरिक विकास करु शकत नाही. त्यामुळे आपण अशा प्रकारे प्रत्येक नागरिकाला आपल्या कारभारामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार देऊन प्रशासन यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचे जे काम यातून होणार आहे ते ताबडतोब थांबवावे अशी नम्र विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11 या ठिकाणी चर्चेसाठी आले आहे. विधानसभेने हे विधेयक मंजूर केले आहे. विधेयकाचा हेतू चांगला आहे. "Peoples' participation in power" किंवा "Peoples' participation in development" यासंदर्भात आणलेले हे विधेयक आहे. या विधेयकामध्ये फार मोठी कलमे आणलेली आहे अशातील भाग नाही. आपल्याला नेहमी विधेयक आणत असताना महापालिकांच्या संदर्भात तीन कायद्यांमध्ये दुरुस्त्या कराव्या लागतात. मी आपल्या माध्यमातून माननीय राज्यमंत्र्यांना सांगेन की, नागपूर आणि उर्वरित महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका आहेत त्यांच्या संदर्भात एक कायदा आपण केला पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकांसाठी एक कायदा करण्याच्या संदर्भात प्रक्रिया देखील मागे सुरु होती. त्या पध्दतीचा एक कायदा होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासंदर्भात आपण विचार करावा. आदर्श नगर राज असा उल्लेख उद्देश व कारणे यामध्ये केलेला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, केंद्र शासनाने आपल्याला जे सूचित केलेले आहे त्या माध्यमातून आपण हे विधेयक आणलेले आहे. आदर्श नगर राज विधेयकामध्ये आणखी काय आहे ? केवळ क्षेत्र सभा आपण निर्माण कराव्यात या व्यतिरिक्त अजून काही आपल्याला केंद्र शासनाकडून सुचविण्यात आले आहे काय यासंदर्भात माहिती द्यावी. भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्यामधील सामंजस्य करार नेमका काय आहे ? या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांना आणि नगरपालिकांना कसा फायदा होणार आहे ? खरे तर केंद्र शासनाचे अभिनंदन केले पाहिजे की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानातून आपल्याला निधी प्राप्त झाला. आतापर्यंत महाराष्ट्रातील महानगरपालिकांना निधी उपलब्ध होत नव्हता परंतु या योजने अंतर्गत केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिला. परंतु त्याचे देखील निकष काय आहेत ? लोकसंख्या लक्षात घेऊन देशातील सर्व महानगरपालिकांना निधी उपलब्ध करुन देतात की, केंद्र शासनाला हव्या त्या पध्दतीने त्या त्या शहरांना निधी उपलब्ध होतो ? दिल्लीला जास्त निधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

उपलब्ध होतो आणि मुंबईला त्याप्रमाणात फार कमी निधी उपलब्ध होतो. आपण देखील केंद्र शासनाशी संवाद साधून जास्तीत जास्त निधी महाराष्ट्रातील महानगरपालिकांना, नगरपालिकांना आणि विशेषत: मुंबई महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कार्यवाही आपल्या माध्यमातून व्हावी. त्याचे वाटपाचे निकष काय आहे हे राज्याला समजले पाहिजे. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना हे समजले पाहिजे. कोणते निकष लावून या निधीचे वाटप करतो ? पायाभूत विकास सुविधांसाठी निधी उपलब्ध होणार आहे. पायाभूत विकासाच्या बाबतीत अशी परिस्थिती आहे की, मुंबई महानगरपालिकेपासून ते 'ड' वर्ग महानगरपालिकांपर्यंतच्या महापालिकांमध्ये पायाभूत विकास सुविधा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये क्षेत्र सभेचा उल्लेख केलेला आहे. क्षेत्र सभेच्या बाबतीत मी तपशीलवार बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्याबाबत या ठिकाणी सांगितले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

यामध्ये असा उल्लेख केला आहे की, "रस्त्यांवर व मार्गांवर दिवे लावणे, साफसफाई, मलप्रवाह विल्हेवाट, सार्वजनिक स्वच्छता, वादळी पावसाचे पाणी व घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये राबविल्या जाणा-या कार्यक्रमांना, विशेषेकरुन रोग प्रतिबंधक कार्यक्रमांना तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमांना सहाय्य करणे आणि साथीचे रोग व नैसर्गिक आपत्ती याबाबतच्या घटनांची माहिती कळविण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे," म्हणजे ही सर्व कर्तव्ये त्यांना दिलेली आहेत. परंतु महानगरपालिकेतील क्षेत्रीय समित्यांना अधिकार मात्र शून्य आहे. शासनाने त्यांना कर्तव्ये नेमून दिली आहेत, पण अधिकार काही नाही. अधिकार काय दिलेले आहेत तर महानगरपालिकेपासून माहिती मिळविणे, प्रभाग समितीकडून तुम्हाला पाहिजे असलेली माहिती मिळविणे एवढाच अधिकार या समितीला आहे. पण निधी दिलेला नाही. त्यांनी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. परंतु कर्तव्ये पार पाडत असताना त्यांना अधिकार नसेल तर क्षेत्र समित्या काय काम करु शकतील, यासंबंधी शासनाने निश्चतपणे विचार केला पाहिजे. मी असे म्हणत नाही की, क्षेत्र समित्या प्रभाग समित्यांवर ओव्हरलॅपिंग करणार आहेत. पण केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या माध्यमातून प्रभाग समितीचे किंवा अन्य समित्यांचे अत्यंत चांगल्या पध्दतीने विकेंद्रीकरण झाले झाले. पण क्षेत्र समिती आणि प्रभाग समिती यांच्यामध्ये वाद निर्माण होऊ शकेल की, आम्ही तुम्हाला शिफारस केली आहे. म्हणजे शिफारस करण्याचे त्यांना कर्तव्य दिले आहे. ती शिफारस करीत असताना देखील एक प्रभागातील एक पंचमांश किंवा एक सप्तमांश भागातील नेमक्या कोणत्या गल्लीत किंवा रस्त्यावर दिवे लावावयाचे, कोणत्या भागाला पाणी अगोदर द्यावयाचे असे प्रश्न निर्माण होतील. शासनाचा हेतू चांगला आहे. परंतु हेतू कितपत साध्य होऊ शकेल याबद्दल मला शंका आहे. या क्षेत्र समितीचे अध्यक्ष नगरसेवक आहे. ते नगरसेवक अप्रिय होतील अशी मला भीती वाटते. त्यांना एखादे काम सांगितले आणि पुढील सहा महिन्यात ते काम झाले नाही तर तुम्ही काय कामाचे, कशाला आमचा वेळ दवडता असे त्यांना म्हटले जाईल. कर्तव्य आणि अधिकार यात समतोल असावयास पाहिजे नाही. त्यासाठी त्यांना निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. मग ते कोणत्याही पक्षाचे नगरसेवक असोत. त्या नगरसेवकांना महानगरपालिकेकडून

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

आधीच कमी निधी मिळतो. या क्षेत्र समित्या चांगल्या पध्दतीने कार्यरत झाल्या पाहिजेत अशी सरकारची इच्छा असेल तर त्यासाठी निधी दिला पाहिजे. ज्याप्रमाणे प्रभाग समितीला अधिकार दिले आहेत त्याप्रमाणे काही प्रमाणात तेथील क्षेत्र समितीला अधिकार दिले पाहिजेत, अन्यथा हा कायदा यशस्वी होणार नाही, म्हणून या क्षेत्र समित्यांना अधिकार द्यावेत अशी विनंती करतो. काम झाले नाही तर नगरसेवक अडचणीत येईल. सर्वांना खूष करणारा माणूस अजून जन्माला यावयाचा आहे. त्या क्षेत्र समितीवर नगरसेवक बसल्यानंतर पहिल्या बैठकीला काही अडचण येणार नाही. परंतु दुस-या बैठकीपासून अडचण येण्यास सुरुवात होईल. आम्ही केलेल्या शिफारशीचे पुढे काय झाले या प्रश्नाचे उत्तर कोणी देऊ शकणार नाही. म्हणून शासनाला या विधेयकात सुधारणा करता आली तर ती करावी. सभापती महोदय, या विधेयकातील कलम 66(ई) मध्ये असे नमूद केले आहे की, नगरपरिषदेच्या संबंधित अधिका-यांकडून, नगरपरिषदेकडून देण्यात येणा-या सेवांची आणि क्षेत्रामध्ये पार पाडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांची माहिती मिळवणे" सभापती महोदय, महाराष्ट्रातील अ,ब व क वर्ग नगरपरिषदांमध्ये प्रभाग समित्या नाहीत. या कायद्यानुसार शासनाने तेथे प्रथम प्रभाग समित्या निर्माण कराव्यात नंतर या क्षेत्र समित्या आणाव्यात. प्रभाग समित्यांची गरज नसेल तर आम्ही नगरपरिषदांमध्ये प्रभाग समिती नेमणार नाही असे शासनाने म्हणावे. परंतु या विधेयकातील 66-ई मध्ये तसे नमूद केलेले आहे की,"क्षेत्र सभेस पुढील हक्कांचा व अधिकारांचा याबाबतील विहित केलेल्या कार्यपध्दतीला अधीन राहून, वापर करता येईल." पुढे (2) मध्ये देखील नगरपरिषदांचा उल्लेख आहे. राज्यातील अ,ब व क वर्ग नगरपरिषदांमध्ये प्रभाग समित्या अस्तित्वात नाहीत. महानगरपालिकांमधील प्रभाग समितीला अधिकार असतात. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील अ, ब व क वर्ग नगरपरिषदांमध्ये प्रभाग समित्यांची नेमणूक करावी.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

यानंतर श्री.शिगम....

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:35

(श्री. अरुण गुजराथी ...)

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपवितो.या विधेयकान्वये आपण वैधानिक अधिकार दिलेले आहेत. विधेयकाच्या खंड 3 मधील 50 टयू, 50 टव्ही, 50टब्ल्यू द्वारे क्षेत्र समितीचे हक्क व अधिकार वापरण्यासंबंधीची कार्यपध्दती विहीत करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेतलेले आहेत. खंड 3 मध्ये मुंबई महानगरपालिकेसंबंधी, खंड 6 मध्ये प्रांतिक महानगरपालिकासंबंधी, खंड 10मध्ये नागपूर महानगरपालिकेसंबंधी आणि खंड 13 मध्ये नगरपरिषदासंबंधी सांगितलेले आहे. या निमित्ताने मी एक प्रश्न उपस्थित करु इच्छितो की, आपण ही बैठक घेतल्या नंतर त्या बैठकीमध्ये ठराव पास करणार की बैठकीचा सेन्स विचारात घेणार ? दोन हजार, पाच हजार माणसे एकत्र आली की अमूक एका रस्तावर लाईटची व्यवस्था करावी, अमूक ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी यासंबंधी ठराव करणार करणार की सेन्स विचारात घेणार? एखाद्या रस्त्याच्या कामाला आपण प्राधान्य द्यायचे म्हटले तर त्यामध्ये काय काय अडचणी येतील याचाही विचार करायला पाहिजे. शासनाच्या विधेयकाबद्दल शंका नाही. केन्द्र शासनाने सांगितिलेले आहे की, आपण जनतेचा सहभाग घेतला पाहिजे. या विधेयकामध्ये काही दुरुस्त्या करणे आवश्यक आहे. नगरसेवकांनी 4 सभा घेतल्या नाहीत तर आपोआप त्याचे नगरसेवक पद जाणार आहे. तेथे देखील डिस्क्रीशनरी पॉवर्स असल्या पाहिजेत असे माझे मत आहे. सभापती महोदय, वेळ थोडा असल्यामुळे मी येथेच थांबतो.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009 चे . वि.स.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण अशा प्रकारचा कायदा केल्या शिवाय आपणाला केन्द्राकडून पैसे मिळणार नाहीत असे केन्द्र सरकारने कुठे सांगितलेले असेल तर त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये खुलासा करावा. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी स्पष्टपणे सांगितले की, याबाबतीत काही मूलभूत प्रश्न निर्माण होतील. एका सरकारने दुस-या सरकार बरोबर सामंजस्य करार केल्याचे मी तरी अजून पाहिलेले नाही. या ठिकाणी तत्कालीन ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे पाटील हे सांगायचे की, वीज निर्मितीच्या बाबतीत शासनाने अमूक एका कंपनी बरोबर सामंजस्य करार केलेला आहे. विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये केन्द्र सरकारबरोबर सामंजस्य करार केल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. काही वेळा केन्द्र सरकारचे किंवा राज्य सरकारचे आय.ए.एस.अधिकारी परदेशामध्ये जाऊन तेथील नागरी सुविधांचा अभ्यास करतात. परदेशात 10-10 चौ.कि.मी.वर 14-14 घरे असतात. मग तेथील व्यवस्था आपण जशीच्या तशी येथे आणण्याचा प्रयत्न केला तर रोगा पेक्षा इलाज भयानाक अशी परिस्थिती होईल हे मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे. सभापती महोदय, नागरी सुखसोई निर्माण करण्याच्या बाबतीत जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घ्यावे या उद्देशाने 74वी घटना दुरुस्ती करण्यात आली. मागच्या वेळी जे विधेयक आणले होते त्यावर सभागृहामध्ये सर्वंकष चर्चा इ ाल्यानंतर शासनाने ते विधेयक परत घेतले. ते त्यावेळच्या शासनाचे श्हाणपणे होते. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी या विधेयकातील त्रुटी शासनाच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

एखादा आमदार असेल आणि त्याच्या कार्यक्षेत्रात राज्यभेच्या सदस्याने वा विधानपरिषद सदस्याने आमदार फंड देऊन कामास सुरुवात केली तर तो आमदार विकास कामच थांबवितो. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी अनेक बारकावे या ठिकाणी सांगितले. त्यामुळे त्या गोष्टींचा मी पुनरुच्चार करीत नाही. मी या विधानसभा मतदार संघातून निवडून आलो आहे, मला या मतदार संघातील लोकांनी निवडून दिले आहे. म्हणून मला विचारल्या शिवाय विधान परिषदेच्या सदस्यांने वा राज्य सभेच्या सदस्याने त्या क्षेत्रातील विकास कामावर खर्च करु नये. त्यामुळे विधानपरिषद सदस्यांना तसेच राज्यसभा सदस्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात विकास निधी खर्च करता येत नाही. परंतु या ठिकाणी शासन मोठया प्रमाणात गोधळ निर्माण करीत आहे. सभापती महोदय, घटनेच्या 74 व्या घटना दुरुस्ती केलेली आहे. आमदार, खासदार,नगरसेवक आहेत, मतदारांनी त्यांना निवडून दिल्यानंतर मतदारांच्या हातात लोकप्रतिनिधींना विनंती करण्या पलिकडे काहीही अधिकार नसतो. आमदार साहेब एवढे काम करा, खासदार साहब एवढे काम करा, नगरसेवक महोदय, आपण आमचे एवढे काम करुन द्या. त्या त्या विभागात नागरी सोयी-सुविधा ज्या आहेत, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यात लोकांचा अधिकाधिक सहभाग असावा हा खरा उद्देश आहे. समजा मी नगरसेवक आहे, मी काय करतो, मला ज्या बुथमधून जास्त मते मिळाली असतील तेथे मी जास्तीत जास्त काम करण्याचा मी प्रयत्न करतो. राजकारण असे नेहमी होत राहते. मुंबईत पूर्वी दादा लोकांचे राज्य होते तेथे विकास कामे करावीत म्हणून सांगण्यास जात नव्हते. बुथ काऊन्टींग ची पध्दत सुरु झाली. मधल्या काळात वस्त्या, वस्त्यांमध्ये लोकांमध्ये आपापसात मारामा-या झाल्या. चाळी चाळीतील लोकांमध्ये भांडणे झाली. या वस्तीतून, या दोन चाळीतून आपल्याला मतदान केलेले नाही. त्या लोकांना सगळया नागरी सोयी-सुविधा पासून वंचित ठेवण्याचा सुडबुध्दीने तेथील लोकप्रतिनिधी प्रयत्न करीत असत. 74 व्या घटने दुरुस्तीच्या उद्देश होता की, त्या सुडबुध्दीला बळी पडू नये आणि नागरी सुख सोयीपासून नागरिक वंचित राहू नये त्यामुळे घटनेत ही दुरुस्ती करण्यात आली होती. हे विधेयक आणून त्या मूळ उद्देशाला शासनाने सुरुंग भासलेला आहे. नगरसेवक निवडून गेलेले आहेत, तसे पाच बुथमध्ये पाच हजार लोकांनी पाच प्रतिनिधी निवडून द्यावेत. त्या पाच प्रतिनिधींनी आपापल्या मतदार संघात 500 किंवा 1000 लोकांना सांगण्याचे काम करावे. परंतु या ठिकाणी

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

तुम्ही एकाच ठिकाणी, एकाच वेळेला पाच हजार लोकांना बोलाविणार आहात. त्या सभेत पाच हजार लोक एकत्र आले तर कार्यकर्ते एकमेकाची डोकी फोडतील. तेथे विकासाचे काम काहीही होणार नाही.

या ठिकाणी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाची योजना आणली आहे. ही योजना आणताना मुंबई शहरावर काही अटी शासनाकडून घालण्यात येत आहेत हे मला कळत नाही. आंतरराष्ट्रीय नाणे निधी आहे, जागतिक बँक आहे, जी राष्ट्र अविकसित आहेत, त्यांना कर्ज देतांना अटी घालते. आमच्या महानगरपालिकेची आयडा-2, आयडा-3 पाण्याची योजना आहे. त्या योजनेला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पैसे उपलब्ध करुन दिले. जागतिक बँकेने पैसे उपलब्ध करुन दिले आहेत. या योजनेसाठी पैसे देत असताना अनेक प्रकारच्या अटी घातल्या. एफ.एस.आय.वाढवा, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या कामासाठी अशा अशा प्रकारच्या गोष्टी करा, विजेचे दर वाढवा, पाण्याचे दर वाढवा. या अटी घालण्यामागचे कारण असे आहे की, ते धनको आहेत, ते रुणकोकडून कर्ज वसूल करण्यासाठी अटी घालत असते. अटी घातल्या तरच कर्जाची परतफेड लवकर होऊ शकेल या उद्देशाने सररहू धनको अटी टाकत असते. या दोन्ही प्राधिकरणावर अमेरिकेचा दबाव असल्यामुळे, हे देश आपल्या दबावाखाली कसे राहतील, आपल्या समोर लाचार कसे राहतील, अमेरिकेचे हित कसे जपले जाईल या गोष्टीला ते जास्त महत्व देतात. तशा प्रकारचे लक्ष केंद्र सरकार या योजनेच्या संदर्भात घालणार आहे काय ? ही सगळी जबाबदारी महानगरपालिकेवर टाकण्यात आलेली आहे. केंद्रात सरकार वेगळे आहे आणि राज्यामध्ये सरकार वेगळे आहे अशी परिस्थिती देशात काही ठिकाणी आहे. आता सरकारने मुंबई महानगरपालिकेचे सगळे अधिकार काढून घेतलेले आहेत. एका लेखणीच्या फटका-याने ते अधिकार कमी करुन टाकले आहेत. मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, तसेच नगरपरिषदा आहेत, त्यांच्याकडून आलेले प्रस्ताव थोडे जरी शासनाच्या विरोधातील आहेत असे संशय आला तरी ते प्रस्ताव शासनाला रद्द करता येतात. सभापती महोदय, कलम 69 (सी) टेंडरच्या नोटीसच्या संदर्भातील आहे. टेंडरची प्रोसेस वेळोवेळी पुढे ढकलतात. आज टेंडर उघडणार नाहीत. टेंडर उद्या निघतील. ही पध्दत दोन, तीन वेळा पुढे ढकलली गेली तर ते टेंडर पास करण्यासबंधीचे अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत....

यानंतर श्री. बोरले...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

म्हणजे तुम्ही इनजनरल त्या महासभागृहाचे अधिकार गोठवून टाकलेले आहेत, संकुचित केलेले आहेत. सर्व अधिकार आपल्याला हातात घेतलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, कलम 69(c) मध्ये आयुक्तांना अधिकार आहेत. परंतु तो प्रस्ताव शासनाकडे येणार आहे. शासनाकडे प्रस्ताव आल्यानंतर शासन त्याला मंजुरी देणार आहे. 50-60 कोटी रुपये मंजूर करावयाचे असतील तर शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागणार आहे. शासनाकडे प्रस्ताव गेल्यानंतर त्याला मंजुरी मिळणार आहे. त्यामुळे आयुक्तांना अधिकार नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : अध्यक्ष महोदय, एअर कंडिशनरमध्ये बसलेला जो अधिकारी आहे त्याला प्रत्यक्ष व्यवहार कळत नाही. जगातील प्रत्येक देशामध्ये स्वीत्झलँडमध्ये, नेदरलँडमध्ये माणसे मिळत नाहीत. तेथे फुटपाथवर माणसे दिसत नाहीत. तेथे 100-200 लोक एकत्र आले आणि शांतपणे चर्चा करुन आपल्या गावामध्ये नगरामध्ये विकास करावयाचा असेल तर ते शक्य आहे. येथे ते शक्य आहे काय ? मला असे वाटते की, या सर्व गोष्टी करीत असतांना आपण याचा प्रामुख्याने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही 5 हजार लोकांना निमंत्रण देणार आहात. आपण 5 हजार लोकांना निमंत्रण दिल्यानंतर त्याचा कोरम काय ठरविणार ? एखादा माणूस कोटामधून स्टे आणू शकतो. तो असे म्हणू शकतो की, मला निमंत्रण मिळाले नाही त्यामुळे मी त्या सभेला गेलो नसल्यामुळे मला कामकाजावर बहिष्कार टाकता आला नाही, मला बोलता आले नाही. त्यामुळे काम सुकर होण्याऐवजी गोंधळ निर्माण होईल. आपण प्रभाग समिती निर्माण केली. आता त्या प्रभाग समितीला काही अर्थच राहणार नाही. आपण या विधेयकाच्या माध्यमातून नगरसेवकांचे आणि समितीचे सर्व अधिकार काढून घेतलेले आहेत. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मुंबई महानगरपालिकेला कर्ज देतांना मुळामध्ये सामंजस्य करार झालेला आहे की नाही हे रेकॉर्डवर आले पाहिजे. आपण त्याची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवावी. सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, महानगरपालिकेचा टॅक्सचा कायदा बदलतांना आम्ही त्या समितीमध्ये विचारणा केली होती. पश्चिम बंगाल सरकारने तुमच्या सर्व अटी फेकून दिल्या. केरळने सर्व अटी उधळून लावल्या आणि सांगितले की आम्हाला जवाहरलाल नेहरु योजनेच्या माध्यमातून पैसे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

मिळणार असतील तर आम्हाला अटी घालून पैसे देऊ नका. आम्हाला केंद्र शासनाचा वाटा समप्रमाणात मिळाला पाहिजे आणि मुळात तुम्ही आमच्यावर कोणती मेहरबानी करीत आहात ? मुंबई शहरामध्ये महराष्ट्राच्या बाहेरुन लाखो लोक येतात. काल के.ई.एम. आणि इतर सर्व रुग्णालयांचा सर्व्हे झाला. के.ई.एम. रुग्णालयामध्ये महाराष्ट्रातील 15 ते 20 टक्के लोक सुध्दा ॲडमिट नाहीत. सर्व बाहेरचेच लोक ॲडमिट आहेत. ते देशाचे नागरीक आहेत. आजारी पडल्यानंतर त्यांना सवलत मिळावी, हे सर्व योग्य आहे. परंतु केंद्र सरकार पैसे देत असतांना तुम्ही महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार कुंठीत करणार असाल तर ते योग्य नाही. मला आठवते की, माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची अशाच प्रकारचे विधेयक आणले होते आणि त्यावर विचार करण्यासाठी ते विधेयक मागे घेण्यात आले होते आणि यामध्येच शहाणपण आहे. शेवटी सभागृहामध्ये चर्चा कशासाठी केली जाते ? चर्चेतून अनेक अडचणी लक्षात येत असतात. सभापती महोदय माझी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनाने हे विधेयक मागे घ्यावे. त्या ठिकाणी 8-10 दिवसांची सवलत द्यावी. एक समिती नियुक्त करावी. आम्ही 5-6 तास समितीमध्ये चर्चा करतो. या कायद्याचा मूळ उद्देश चांगला आहे. परंतु मूळ उद्देशाला सुरुंग लावणारी या विधेयकातील सर्व कलम असल्यामुळे त्याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून कोणत्याही प्रकारचा हट्ट न धरता हे विधेयक मागे घ्यावे आणि नंतर अध्यादेश काढावा किंवा हे विधेयक नागपूर अधिवेशनामध्ये मंजूर करुन घ्यावे. आपण केंद्र शासनाला वचन देऊन सांगा की, सभागृहामध्ये चर्चेच्या वेळी काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत आणि त्याचा गांभीर्याने विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने कोणत्याही प्रतिष्ठेचा विचार न करता, भविष्यात जर यातून गोंधळ निर्माण होणार असेल तर तो गोंधळ टाळण्यासाठी एका चांगल्या हेतूने 74 वी घटनादुरुस्ती झालेली आहे. त्या अनुषंगाने आपण त्याला सपोर्टिंग असा कायदा करु. गोंधळ निर्माण करणारा कायदा शासनाने घाईघाईने मंजूर करु नये. हे विधेयक पास करावे, असा हट्ट शासनाने करु नये, अशी माझी कळकळीची विनंती आहे. सभापती महोदय आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.भोगले.....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विलासराव शिंदे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश हा चांगला आहे. मागील वेळेला हे विधेयक सादर करण्यात आले आणि त्यातील त्रुटी लक्षात आल्यानंतर या विधेयकामध्ये आता दुरुस्ती करण्यात आली आहे. परंतु हे विधेयक सादर झाल्यानंतर त्यावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुंबई महापालिकेच्या संदर्भातील अवस्था सांगितली. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी महाराष्ट्रातील इतर नगरपालिकांची माहिती देऊन हे विधेयक मंजूर झाल्यास काय होईल हे सांगितले. मी याठिकाणी विधेयकाबाबत सुचवू इच्छितो की, महाराष्ट्रातील अ, ब, क व ड वर्ग नगरपालिकांमध्ये प्रभाग समित्या नाहीत. तेथे जर प्रभाग समित्या निर्माण करावयाच्या झाल्या तर छोट्या छोट्या नगरपालिकांची अवस्था काय आहे याचा पहिल्यांदा विचार होणे आवश्यक आहे. या बिलाच्या माध्यमातून 2000 ते 5000 लोकांची क्षेत्रसभा निर्माण करावयाची आहे, त्या क्षेत्रसभेला अधिकार काही नाहीत. उद्देश चांगला असला तरी जसे शेळीच्या गळ्यात लोळ्या असतात, त्यामधून दूध निघत नाही तशीच अवस्था या बिलाची आहे. उद्देश चांगला असला तरी यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. कोणतीही गोष्ट कायद्याने निर्माण झाली की, माणूस फक्त हक्क बजावण्याकडे प्रवृत्त होतो. म्हणून या विधेयकातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी अनेक गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. या विधेयकामध्ये नोटीस असा शब्दप्रयोग केलेला आहे. नोटीस म्हणजे किती दिवसाची हे म्हटले पाहिजे. कायद्यानुसार किमान 3 दिवसाची, 7 दिवसाची नोटीस द्यावी लागते. कार्डाने सभेसाठी बोलावले जाणार आहे. कार्ड पाठविणे कायदेशीर ठरत नाही. कार्डाचा खर्च खूप मोठा होणार आहे. ग्रामसभेसारखी ही क्षेत्रसभा आहे असे म्हटले आहे. परंतु ग्रामसभेच्या ठरावाला काही अधिकार आहेत. क्षेत्रसभेचा ठराव होणार. ठराव करण्याचा अधिकार नाही. तरी देखील ठराव केला जाणार. फक्त माहिती मिळविण्यासाठी झटापट होणार आहे. यासाठी नोटीसऐवजी ग्रामसभेमध्ये दवंडी दिली जाते आणि मग ग्रामसभा बोलावली जाते. प्रत्येक मतदाराला पत्र पाठविण्याची व्यवस्था ग्रामसभेमध्ये नाही, याचा विचार याठिकाणी केला जावा. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अ, ब, क व ड नगरपालिकांचा विचार करीत असताना अ व ब नगरपालिकांमध्ये काही प्रमाणात अधिकारी असतात. परंतु क व ड नगरपालिकांमध्ये क्षेत्रसभेचा जो सचिव असणार आहे तो अधीक्षक यापेक्षा कमी दर्जाचा असता कामा नये असे विधेयकामध्ये म्हटले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव शिंदे....

सभापती महोदय, महाराष्ट्रातील क वर्ग नगरपालिकांमध्ये, अनेक छोट्या छोट्या नगरपालिकामध्ये एकच अधीक्षक असतो. अधीक्षक दर्जाचा एकच अधिकारी असतो. या अधिकाऱ्याला नगरपालिकेच्या सर्व सभासदांच्या सभा घ्याव्या लागतील. हे शक्य होणार आहे का? या विधेयकामध्ये म्हटले आहे की, नगरपालिकेने नियुक्त करावयाचा अधिकारी अधीक्षक या पदापेक्षा कमी दर्जाचा असता कामा नये. अशा प्रकारच्या अनेक विसंगती या विधेयकामध्ये आहेत. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. या सर्व गोष्टींचा विचार व्हावा, यामधून कोणताही गोंधळ निर्माण होऊ नये एवढीच माझी विनंती आहे.

एक्स.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास शिंदे .....

किंबहुना या क्षेत्रसभेचा कायदा मंजूर करण्यासाठी .....

उपसभापती : विधेयक क्र. 11 वरील चर्चा सुरुच असून सन्माननीय सदस्य ऑन लेग आहेत.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(11.55 ते 12.00 बैठक स्थगित)

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित श्री. माणिकराव गोविंदराव ठाकरे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देतांना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. मानिकराव गोविंदराव ठाकरे यांनी शपथ घेतली.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 च्या प्रस्तावाबाबात

सभापती :आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेचे दोन प्रस्ताव आलेले आहेत. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, भगवानराव साळुंखे यांचा असून त्यांनी "राज्यातील "कायम" विना अनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द काढून वेतन अदा होणेबाबत विषयावर अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात निर्णय जाहीर केला जाईल असे आश्वासन माननीय मुख्यमंत्री महोदय व शिक्षण मंत्री महोदयांनी दिलेले असणे, हजारो शिक्षक आझाद मैदानावर गेल्या 15 दिवसांपासून आंदोलन करीत असणे, शासनाचा निर्णय मिळाल्याशिवाय आंदोलन समाप्त न करण्याचा निर्धार करणे, शासनाने कायम विनाअनुदानित शाळांसंबंधी शासन निर्णय काढलेला नसणे, यापूर्वीच्या आश्वासनाप्रमाणेच या वेळेसही शासन आमची फसवणूक करते की काय ? अशी शंका निर्माण होणे, आंदोलन कर्त्यांचे आंदोलन तातडीने संपुष्टात येण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

तसेच दुसरा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी दिलेला असून, त्यांनी आपल्या प्रस्तावात म्हटले आहे की, "पुण्यात राहणा-या श्रीमती सुलभा यशवंत नातू, सहकार नगर पुणे-9 यांचे घर त्यांच्या नातेवाईकांनी सामाईक असून त्यापैकी काही नातेवाईकांनी आपली जागा तेथील बांधकाम व्यावसायीकाला विकली असून याने श्रीमती नातू यांचे घर खाली करण्यासाठी, 40-45 गुंडानी दिनांक 6.2.2008 रोजी त्यांच्या घराचा हिस्सा जबरदस्तीने ताब्यात घेणे, तसेच त्यांनी त्यांच्या घरावर दारुच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार करुन त्यांनी त्याकडे केलेले दुर्लक्ष तसेच दीपक मानकर, दत्त सागर, साधना वर्तक, नगर सेवक, पुणे यांनी श्रीमती नातू यांना एका राजकीय पक्षाच्या कार्यालयात बोलावून जबरदस्तीने सहया घेणे, अशा प्रकारे प्लॉट खाली करुन घेण्याचा तेथील बांधकाम व्यावसायीकांच्या असलेला डाव, तसेच पोलीस आयुक्त श्री. व्ही.डी. मिश्रा, नाशिक यांनी शहरातील 17 गुंडाना तडीपार करुन 25 गुंडाना तडीपारच्या दिलेल्या नोटीसा, सदर गुंडांचा राजकीय पक्षांशी असलेला संबंध व नाशिक रोड येथील पोलिसांच्या हत्येप्रकरणी 31 गुंडावर मोक्काअंतर्गत केलेली कारवाई, या प्रकरणानंतर अल्पावधितच सदर कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्तांची शासनाने बदली करणे, या प्रकरणी नाशिक येथील सर्व पक्ष व तेथील नागरीकांनी केलेला तीव्र निषेध व सुरु केलेली धरणे आंदोलने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" असे दोन नियम 289 चे प्रस्ताव दिलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ..

या दोन्ही नियम 289 च्या प्रस्तावांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारलेली आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने मी शासनाला एक विनंती करीत आहे...

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण आपल्या अधिकारात निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मला काहीही म्हणावयाचे नाही परंतु.....

सभापती : माझा निर्णय मी घोषित केलेला आहे. या दोन्ही 289 च्या प्रस्तावांना माझ्या दालनात अनुमती नाकारलेली आहे. मी फक्त 289 च्या प्रस्तावाचा विषय येथे वाचून दाखविलेला आहे कायम विना अनुदानित शाळांच्या संदर्भात या पूर्वी सभागृहात सविस्तर चर्चा झालेली आहे याची शालेय शिक्षण विभागाच्या मत्री महोदयांनी नोंद घ्यावी. त्याचबरोबर 289 च्या दुस-या प्रस्तावाचा विषय नाशिक आणि पुणे या जिल्हयातील प्रकरणाशी संबंधित असून तो विषय गृह विभागाचा असल्यामुळे माननीय गृह मंत्र्यांनी त्याची नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी मु.शी : तोंडी उत्तरे

ठाणे जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली बैठक

(१) * ५०२८१ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री. अरविंद सावंत : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचे अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हयातील लोकप्रतिनिधींची एक बैठक दिनांक २३ सप्टेंबर, २००८ रोजी मंत्रालयात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत पाणी पुरवठा विभागातील सचिव यांना ठाणे जिल्हयात लवकरच प्रत्यक्ष पाहणीसाठी पाठविण्यात येईल असे मा.मंत्री यांनी जाहिर आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर बैठक दि.२३ सप्टेंबर, २००८ रोजी मंत्रालयात झाली आहे.

(२) ठाणे जिल्हयातील अपूर्ण योजनांचा आढावा ठाणे येथे प्रधान सचिव (पापुवस्व) यांनी घ्यावा असे बैठकीत ठरले आहे.

(३) व (४) ठाणे जिल्हयातील पाणी टंचाईबाबत तसेच अपूर्ण पाणी पुरवठा योजनांबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्यात येऊन पाणी टंचाई दूर करणे व अपूर्ण योजना पूर्ण करण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणेला योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात " हे अशंत: खरे आहे " असे म्हटलेले आहे त्या ऐवजी "हे खरे आहे" असे वाचावे "

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील पाणी पुरवठयाच्या संदर्भात प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न विचारण्यात येत असतो. ठाणे जिल्हयातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण भागात मोठयाप्रमाणावर पाणी टंचाई जाणवत आहे. ठाणे जिल्हयातील निरनिराळया पाणी पुरवठयाच्या योजना पूर्ण झालेल्या आहेत . ज्या योजना सुरु आहेत त्या योजनांच्या कामात मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे. माझ्या औचित्याच्या मुद्याच्या

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुषंगाने या संदर्भात दिनांक 23 सप्टेंबर 2008 रोजी माननीय मंत्री महोदयांनी मंत्रालयात एक बैठक घेतली होती . त्या बैठकीत त्यांनी काही निर्णय घेतले होते . मला माननीय मंत्री महोदयांना पहिला प्रश्न असा विचारावयाचा आहे की, ठाणे जिल्हयात सूर्या, विक्रमगड, भातसा या सारखे 6 मोठे प्रकल्प बांधकामाधीन आहेत. त्याचबरोबर 11 लहान पाटबंधा-याच्या कामांना अजूनही मान्यता मिळालेली नाही. पिंजार, शाई, तिल्हेर, वसई, काळू ,घारगळी, नंबरवाडी, अपरजांबे, कामन, अशा 11 लघू पाटबंधा-याच्या कामांना प्रशाकीय मान्यता मिळालेली नाही तेव्हा त्या प्रकल्पांना मान्यता देऊन या प्रकल्पाची कामे केव्हा सुरु करण्यात येणार आहे.? त्याचबरोबर माननीय मंत्री महोदयांच्या बैठकीत निरनिराळया तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांचा बोजवारा उडालेला आहे यासंबंधी देखील चर्चा झाली आहे. मुरबाड तालुक्यात 64 पाणी पुरवठयाच्या योजना कागदपत्रांवर राहिलेल्या आहेत, शहापूर तालुक्यात 123 पाणी पुरवठा योजना असून त्यापैकी 101 पाणी पुरवठा योजनांचे कोणत्याही प्रकारचे काम सुरु झालेले नाही. मला माननीय मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, या पाणीपुरवठा योजनांची नेमकी स्थिती काय आहे ? या प्रकल्पाची कामे केव्हा सुरु करण्यात येणार आहे? त्याचप्रमाणे माझा तिसरा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांच्या बैठकीत पाणी पुरवठा योजनांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की विभागाच्या प्रधान सचिवांना ठाणे जिल्हयात पाठवून सर्व पाणी पुरवठा योजनांची चौकशी करण्यात येईल माझ्या माहिती प्रमाणे प्रधान सचिव ठाणे येथे येऊन त्यांनी बैठक घेतली नाही किंवा लोकप्रतिनिधीकडून माहिती घेतली नाही. तेव्हा प्रधान सचिव या योजनांची चौकशी करणार आहेत काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, प्रधान सचिव ठाणे येथे जाऊन बैठक घेतील असे माझ या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळी मी सांगितले होते परंतु ठाणे येथे बैठक घेण्या ऐवजी मुबईत मंत्रालयात बैठक घेणे सर्वाच्या दृष्टीने सोयीचे असल्यामुळे प्रधान सचिवांनी मुंबईत बैठक घेतली होती. ठाणे जिल्हयातील पाणी पुरवठयाच्या संदर्भात या सभागृहातील सन्माननीय सदय्य श्री.. संजय केळकर यांनी जसा प्रश्न उपस्थित केला होता तसेच खालच्या सभागृहातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्यांनी वेळोवेळी मुद्दा उपस्थित केला होत .2008-2009 सालामध्ये दिनांक 2.8.2008,20.8.2008,8.9.2008.16.9.2008,23.9.2008,24.10.2008,1.11.2008 त्यानंतर 3.1.2009,14.1.2009,28.1.2009,14.1.2009,,17.2.2009,7.3.2009,4.2.2009,16.4.2009,

नतर श्री.सरफरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50281...

श्री. अजित पवार....

20.4.08, 20.5.08 ला बैठका झाल्या. या बैठका केवळ ठाणे जिल्हयातील पाणी पुरवठया करिता नाहीतर कधी उल्हास नदीच्या पाणी वाटपाबाबत, तर कधी कुठल्यातरी गावच्या पाणी पुरवठा योजनेबाबत, कधी मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याची अडचण सोडविण्याबाबत, किंवा मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठयाच्या संदर्भात या बैठका झाल्या. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, ठाणे जिल्हा आणि ठाणे जिल्हयाच्या परिसरामध्ये नागरीकरण मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे तेथील महानगरपालिकांना आपण आपली धरणे बांधण्याची कामे सुरु करा असे शासनाने त्यांना सुचविले आहे. त्यापध्दतीने मुबई महानगरपालिकेने त्यांच्या काही धरणांची कामे सुरु केली आहेत. परंतु कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, मीरा-भाईंदर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सांगितले की, आमची स्वत:ची धरण बांधण्याची ऐपत नाही. अलिकडच्या काळात जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन मिशनमधून अशाप्रकारच्या कामांना केंद्र सरकार व राज्य सरकार मदत करते. उदा. मधल्या काळात नवी मुंबईने मोरबे धरण बांधून पूर्ण केले. त्या धरणामुळे नवी मुंबईचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे. परंतु ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर नागरीकरण होत असल्यामुळे ठाणे जिल्हयातील अनेक धरणे राज्य सरकारच्या विचाराधीन आहेत. हे करीत असतांना त्याठिकाणी स्थानिक जनतेचा सुध्दा मोठया प्रमाणावर विरोध आहे. काही ठिकाणी आदिवासींच्या जमिनी जात आहेत तर काही ठिकाणी वन विभागाच्या जमिनी जात आहेत, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्ची जमिनी जात आहेत. शाई, पोशीर, बाळगंगा, काळू यापैकी काही धरणांच्या बांधकामांना सिडकोकडून, एमएमआरडीएकडून परवानगी मिळाली आहे. मधल्या काळात सूर्या धरणाचे काम सुरु झाल्यानंतर 96 कोटी रुपयांची नेट प्रेझेंट व्हॅल्यू वन विभागाकडे भरावयाची होती. परंतु ती भरता येत नव्हती म्हणून त्याठिकाणी 4 टीएमसी पाणी अडविता येत नव्हते. आता मात्र एमएमआरडीएने 96 कोटी रुपये दिले असल्यामुळे यावर्षीच्या पावसाळयामध्ये अतिरिक्त 4 टीएमसी पाणी त्याठिकाणी अडविले जाईल. अशाप्रकारे अनेक ठिकाणी कामे करुन ठाणे जिल्हा किंवा ठाणे जिल्हयाचा जो ग्रामीण भाग आहे, तिथे पिण्याच्या पाण्याच्या योजना करण्याकरिता राज्यशासन प्रयत्नशील आहे. सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांनी मुद्दा उपस्थित केला की, ठाणे जिल्हयामध्ये काही ठिकाणी योजना अर्धवट आहेत. तर काही ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचा त्यांनी आरोप केला. सद्या ज्या योजना हातामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

ता.प्र.क्र. 50281...

श्री. अजित पवार....

आहेत त्या पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु आहे. या सर्व योजना मार्च 2010 पर्यंत पूर्ण करण्याचा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा प्रयत्न राहणार आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे निधीची कमतरता भासणार नाही. ज्याठिकाणी भ्रष्टाचाराच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत त्याठिकाणी तक्रारीची शहानिशा करुन आणि चौकशी करुन त्यामध्ये जर स्थानिक कमिटी जबाबदार असेल किंवा अधिकारी दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. अशापध्दतीने ठाणे जिल्हयातील आणि त्या परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा राज्य सरकार प्रयत्न करीत आहे.

श्री. मुजफ्फर हुसैन : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर आहे याचा मंत्रिमहोदयांनी उल्लेख केला आहे. मागील वर्षी वसई तालुक्यातील 80 गावांना पाणीपुरवठा करावयाच्या योजनेच्या भूमिपूजनाचा समारंभ माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला होता. त्या योजनेचे काम अद्यापि सुरु झाले नाही. ते कधी सुरु होणार आहे? त्याचप्रमाणे वसई नगरपरिषद आणि नवघर-माणिकपूर नगरपरिषद यांचेकडून त्या योजनेसाठी पैसे घेण्यात आले आहेत. परंतु त्या योजनेमध्ये नगरपरिषदांना समाविष्ट करण्यात आले नाही. तो समावेश करण्यात येईल काय? तिसरा प्रश्न असा की, मीरा-भाईंदर महानगरपालिकेला एमआयडीसीच्या माध्यमातून 35 एमएलडी पाणी पुरवठा करण्याचे मागील व त्यापूर्वीच्या अधिवेशनामध्ये शासनाने जाहीर केले होते. त्यानुसार आतापर्यंत 10 एमएलडी पाणीपुरवठा केला जात आहे. बाकीचा 25 एमएलडी पाणीपुरवठा आपण केव्हा करणार आहात?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50281 . . . .

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यामध्ये वाढीव वसई-विरार मधील 69 गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना आहे. याच्या पहिल्या टप्प्यातील गुरुत्व वाहिनीची कामे प्रगतीपथावर आहेत. 122 कि.मी.च्या पाईपपैकी 62 कि.मी.च्या पाईपचा पुरवठा झालेला आहे आणि 9 कि.मी.पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये वितरण व्यवस्था व जलकुंभाच्या कामांची प्रारुप निविदांच्या दृष्टीने कागदपत्रे तयार करण्यात येत आहेत. ती तयार झाल्यानंतर त्या कामाचे टेंडर देखील काढण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी इतर बाबतीत विचारलेले आहे.मी सुरुवातीलाच सांगितले की, सूर्या धरणावर गेट बसविल्यानंतर आपल्याला एम.एम.आर.डी.ए.च्या मदतीने ॲडिशनल 4 टीएमसी पाणी उपलब्ध होत आहे. आम्ही एम.एम.आर.डी.ए.ला 96 कोटी देत असताना असे सांगितले आहे की, जेथे-जेथे पाण्याची कमतरता भासत आहे,त्याठिकाणी पाणी देण्यासाठी मदत करावी.तसे एम.एम.आर.डी.ए.ने मान्य केलेले आहे.सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी इतर अडचणी मांडलेल्या आहेत. त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून योग्य त्या सूचना देण्यात येतील आणि ती कामे देखील तातडीने कशी पूर्णत्वाला नेता येतील यादृष्टीने पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रयत्न करील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी उल्हास नदीचे पाणी तेथील स्थानिक स्वराज्य संस्था उचलतात. या उल्हास नदीच्या पाणी वापरावर आणि तेथील पाणी उचलण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपण पाणी नियामक मंडळ किंवा पाणी नियामक आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात बैठकीमध्ये चर्चा झाली होती आणि तशा प्रकारची उपाययोजना करण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले होते. याबाबतीत पुढे काय कार्यवाही झाली, याची माहिती मिळू शकेल काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, यामध्ये ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमलेली असून, आपण त्यांनाच तेथे अधिकार दिलेला आहे. त्यांनी ठाणे जिल्ह्याच्या परिसरामध्ये या कामांच्या बाबतीत काही अडचणी येतात. याबाबतीत आपण महानगरपालिकेचे सन्माननीय वरिष्ठ पदाधिकारी आणि नगरपालिकेचे सन्माननीय सदस्य यांची ती कमिटी केलेली आहे. यासंदर्भात थोडा विलंब झालेला होता. हा अधिकार कोणाला द्यावा याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सुध्दा बरीच चर्चा झाली होती. परंतु यामध्ये ठाणे महानगरपालिका ही ..

. . . .2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वात जास्त पाणी घेणारी महानगरपालिका असल्यामुळे ठाणे महानगरपालिकेचे जे कोणी महापौर असतील, ते या कमिटीचे कायम अध्यक्ष म्हणून कामकाज पहातील. यामध्ये ज्या काही अडचणी येतील, त्या दूर करण्याकरता जर त्यांना को-ऑर्डीनेशन करावयाचे झाले किंवा मदत करावयाची झाली तर राज्य शासनाचा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मदत करील. समजा एम.आय.डी.सी.चे बार्वी धरण आहे, त्यांनी तेथे ऊंची वाढविण्याचे काम हातामध्ये घेतलेले आहे. ते काम देखील लवकर कसे पूर्ण करता येईल, त्याकरता काही सूचना द्यावयाच्या असतील तर राज्य सरकारने केवळ ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांना अध्यक्ष करुन, सगळे काही त्यांच्यावर सोपविलेले आहे अशातला भाग नाही. उद्या जर तेथे काही तक्रारी आल्या तर त्यांच्यावर देखील राज्य शासन देखरेख करील आणि येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत राहील.

. . . .2 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोल्हापुर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील गाव व वाडयांना पाणीपुरवठा करण्याबाबत करावयाची उपाययोजना

(2) * 50688 **श्रीमती उषाताई दराडे,श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजीया खान, श्री.गुरुनाथ कुलकर्णी , श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यात अनेक तलाव असून या परिसरातील 20 गावे व वाड्यांना मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई भासते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नंतर सदर टंचाईग्रस्त गावे व वाड्यांना पुरेसा पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (1) नाही.

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, कोल्हापुर जिले के राधानगरी तालुके के बारे में उत्तर में "नाही" लिखा गया है. मैं मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि वहां पर अनेक तालाब हैं, इसका उत्तर "नाही" है या परिसर में पाणी टंचाई है, इसका उत्तर "नाही" है ? टंचाईग्रस्त 20 गांवों को पानी देने के लिए शासन की क्या योजना है ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, राधानगरीच्या परिसरा-मध्ये किती पाऊस पडत असतो. शाहू महाराजांनी बांधलेले त्या काळातील राधानगरी धरण आहे. त्या धरणामध्ये एकंदरीतच पाण्याची परिस्थिती नेहमी चांगली असते. याठिकाणी उत्तर देत असताना तेथे अनेक तलाव नाहीत म्हणून पहिल्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे राधानगरी तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारे पिण्याच्या पाण्याची कमतरता नाही. एकंदरीतच तेथील सर्व परिस्थिती पाहता, आधीच कोल्हापूर पाणी टंचाईचा आराखडा तयार केलेला आहे. कोल्हापूर जिल्हयातील एकंदरीत 29 गावे आणि 74 वाडयांसाठी 1 कोटी 2 लाख 94 हजार रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्यामध्ये जेथे अडचण आहे, तेथे विंधण विहिरी घेणे, नळ योजनांच्या दुरस्त्या करणे, विंधन विहिरींच्या दुरुस्त्या करणे, तात्पुरत्या पूरक नळ पाणी पुरवठा योजना करणे किंवा टँकरने पाणी पुरवठा करणे, विहिरी अधिग्रहण करणे वगैरे अशी कामे आपण करीत आहोत आणि सध्या कोल्हापूर जिल्हयामध्ये फक्त शाहूवाडी तालुक्यामध्ये एक टँकर सुरु आहे. बाकी कोल्हापूर जिल्हयामध्ये एकही टँकर सुरु नाही.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नाही

अकोला शहराला पाच दिवसाआड होणाऱ्या
पाणी पुरवठ्याबाबत करावयाची उपाययोजना

(३) * ५०३०६ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहराला पाणी पुरविणाऱ्या महान धरणात सध्या केवळ १० टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे सध्या शहरवासियांना पाच दिवसाआड पाणी पुरवठा होतो, हे खरे आहे काय,

(२) अकोला शहराला महान धरणातून होणारा पाणी पुरवठा मर्यादित असल्यामुळे वान प्रकल्पातून जलवाहिनी टाकण्यासाठी आतापर्यंत साडे पाच कोटी रुपये खर्च झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या जलवाहिनीची नीट देखभाल न झाल्यामुळे ती योजना मोडीत निघाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी शासन कोणती पर्यायी उपाययोजना करीत आहे वा करणार आहे ?

श्री.अजित पवार : (१) हे खरेआहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सद्य:स्थितीत शहराला काटेपूर्णा प्रकल्पावरुन दररोज ३० दश लक्ष लिटर पाणीपुरवठा सुरु आहे. त्यातून ५० लिटर्स दरडोई दरदिवशी इतका पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त १६७९ हातपंप, जेट पंप ३६, सबमर्सिअल पंप २५२ कार्यरत आहेत. तातडीची उपाययोजना म्हणून कापशी तलावावरुन पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून या योजनेमधून शहरास २ दशलक्ष लिटर अधिकचा पाणीपुरवठा होणार आहे. याशिवाय आवश्यकतेनुसार हातपंप घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. काटेपूर्णा धरणात अत्यल्प पाणीसाठा असल्याने त्या धरणावर आधारीत खांबोरा व मूर्तीजापूर पाणीपुरवठा वेगळ्या केल्याने उपलब्ध पाण्याचा वापर अकोला शहरासाठी करण्याचे नियोजन केले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये विसंगती आहे. पहिल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये अकोला शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे हे मान्य केलेले आहे. अकोला शहरात पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतो असे म्हटले आहे. तथापि, चौथ्या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले आहे की, सद्य:स्थितीत शहराला काटेपूर्णा प्रकल्पावरुन दररोज 30 दशलक्ष लिटर पाणीपुरवठा सुरु आहे त्यातून 50 लिटर दरडोई दरदिवशी इतका पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याचा अर्थ उत्तरामध्ये विसंगती आहे. माननीय मंत्रिमहोदय हे उत्तर दुरुस्त करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50306 .....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, अकोला शहराला पाणी पुरविणाऱ्या महान धरणात सध्या केवळ 10 टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे सध्या शहरवासियांना पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतो, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला 'हे खरे आहे' असे उत्तर दिले आहे. चौथा प्रश्न असा विचारलेला आहे की, या शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी शासन कोणती पर्यायी उपाययोजना करीत आहे वा करणार आहे ? त्या अनुषंगाने या ठिकाणी चौथ्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी हे मान्य केले आहे की, अकोला शहराला पाच दिवसाआड पाणीपुरवठा सुरु आहे किंवा पाच दिवसाआड एकदा पाणी मिळते परंतु चौथ्या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले आहे की, दरडोई दरदिवशी 50 लिटर इतका पाणीपुंरवठा करण्यात येत आहे. ही विसंगती आहे. चौथा प्रश्न असा विचारलेला आहे की, या शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी शासन कोणती पर्यायी उपायोजना करीत आहे वा करणार आहे ? उत्तरामध्ये उपाययोजना सांगितलेली नाही. उत्तरात असे म्हटले आहे की, 1679 हातपंप, जेट पंप 36, बसमर्सिबल पंप 252 कार्यरत आहेत. तातडीची उपाययोजना म्हणून कापशी तलावावरुन पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर असून या योजनेतून शहरांस 2 दश लक्ष लिटर अधिकचा पाणीपुरवठा होणार आहे. ही प्रस्तावित योजना आहे. आता सद्य:स्थितीत पाच दिवसाआड एकदा पाणी येते. शासनाने साडेसात कोटी रुपये अकोला पाणीपुरवठ्यासाठी वाण प्रकल्पावरुन येणाऱ्या वाहिनीसाठी दिलेले आहेत त्यातील साडेपाच कोटी रुपये खर्च झाले. ती पाईपलाईन गांधीग्रामजवळ चोकअप झालेली आहे. त्यामुळे ते पाणी येत नाही. काटेपूर्णा प्रकल्पातून 2 टक्केच पाणी येते. त्यामुळे अकोला शहराची पाणीपुरवठ्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. प्रस्तावित जो प्रोजेक्ट आहे तो पूर्ण झालेला नाही. कापसी तलावाचा प्रकल्प पूर्ण झालेला नाही. ते काम सुरु आहे. कंत्राटदाराने काम का थांबविले याचे उत्तर मिळाले नाही. वाण प्रकल्पाची पाईपलाईन गांधीग्रामजवळ ब्रेक झालेली आहे. कापसी तलावाचा प्रकल्प पूर्ण झालेला नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे साडेसात कोटी रुपये पाठविले आहेत हे खरे आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50306 ..... श्री. पांडुरंग फुंडकर ...

असल्यास त्या निधीचा उपयोग कोठे करण्यात आला ? अकोला शहराला तातडीने पाणीपुरवठा करण्यासाठी शासन काय करणार ? बोअरवेल आणि टँकरव्दारे पाणी पुरवठा करावयाचा असेल तर 50 लाख रुपये लागतील असा प्रस्ताव महापालिकेने आपल्याकडे पाठविला आहे. त्यासंदर्भात काय झाले ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आजच्या घडीला काटेपूर्णा प्रकल्पामधून दररोई 30 दश लक्ष लिटर पाणी अकोल्याकरिता देतो. ते पाणी देत असताना अकोला शहराने पाच झोन केलेले आहेत. त्या पाच झोनपैकी एका झोनला एक दिवस दरडोई 50 लिटर पाणी देतो त्यानंतर दुसऱ्या दिवशी दुसऱ्या झोलना पाणी देतो. त्यामुळे पहिल्या झोनचा परत नंबर येण्यासाठी पाच दिवस लागतात. अशा प्रकारची त्या शहराची परिस्थिती आहे. एक गोष्ट खरी आहे की, वेळोवेळी राज्य सरकारने आणि अकोला स्थानिक स्वराज्य संस्थेने सुध्दा या शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न सुटावा म्हणून अनेक गोष्टी केलेल्या आहेत. आपण मागच्या काळामध्ये एक योजना घेतली होती. ती योजना केली असताना मधल्या काळामध्ये पाऊस आला आणि दुसऱ्याच वर्षी ती योजना पाऊस आल्यामुळे वाहून गेली. वाण धरणावरुन तातडीची पाणीपुरवठा योजना सन 2004-05 मध्ये कार्यान्वित केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये 84 खेडी घेण्यात येत आहेत. छोटा बाजार गावापासून अकोला शहरामध्ये 25 कि.मी.पर्यंत पाईप लाईन जाणार होती. नंतरच्या काळात पाऊस पडल्यामुळे 180 मीटरपर्यंत सदर पाईप लाईन वाहून गेली. 2006 मध्ये पूर्णा नदीला पूर आला होता. त्या कामासाठी 20 लाख 57 हजार रुपये लागतील. आता जर ती पाईप लाईन केली तर जी 84 खेडी छोटा बाजार....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ती गावे प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेतून दिली आहेत. त्याच्या खालच्या गावांपासून पाणी देत देत....

श्री.अजित पवार : वाहून गेलेली 180 मीटर लाईनसाठी 20.50 लाख रुपये शासन खर्च करील, परंतु त्याच्यातून पाण्याचा प्रश्न सुटू शकत नाही. सदर योजनेतून पाणी घ्यावयाचेच म्हटले तर 1.8 द.ल.लिटर पाणी उपलब्ध होईल आणि दर तिस-या दिवशी त्याठिकाणी मिळेल. सध्या वाण धरणात पुरेसा पाण्याचा साठा उपलब्ध नाही, त्याच्यातून अपुरा पाणीपुरवठा होणार असल्यामुळे टंचाई मधून योजनेस मंजुरी दिलेली नाही. फक्त काटेपूर्णा धरणातून 90 द.ल.लिटर दररोज पाणीपुरवठा केला जातो. सध्याच्या परिस्थितीत या धरणात मृत 11.32 द.ल.घ.मी. इतका साठा उपलब्ध आहे. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे 30 द.लक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या शहराला पाण्याच्या मोठया अडचणीला सामोरे जावे लागत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, अकोला महानगरपालिकेच्या मालकीच्या कापशी तलावातून 2 एम.एल.डी.इतके पाणी घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम महानगरपालिका करीत आहे. परंतु शासनामार्फत हे काम 15 दिवसामध्ये पूर्ण कसे होईल यादृष्टीने प्रयत्न केले जातील. तसेच 2009 मध्ये सदर तातडीचे काम म्हणून प्रस्तावित केले होते ते काम...

श्री.पांडुरंग फुंडकर : ते काम कंत्राटदाराने थांबविले आहे.

श्री.अजित पवार : सन्माननीय विरोधी पक्ष नेते यासंबंधी नवीन माहिती देत आहेत. यासंबंधी ताबडतोब महानगरपालिकेच्या आयुक्तांशी संपर्क साधून जर कंत्राटदार चालढकल करीत असेल तर त्यांना ताबडतोब जी काही वॉर्निंग द्यावयास पाहिजे ती दिली जाईल, वेळ पडली तर त्यांना बदलून दुस-या कंत्राटास नेमून ते काम 15 दिवसामध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न राज्य शासनाचा राहील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

ता.प्र.क्र.50306...

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, त्याठिकाणी दोन प्रकारची पर्यायी व्यवस्था आहे असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. प्रश्न क्रमांक 3 ला 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. वाण प्रकल्पाची 180 मीटरची जलवाहिनी वाहून नादुरुस्त झाली आहे, हे मंत्रिमहोदयांनी कबूल केलेले आहे. ही जलवाहिनी तातडीने दुरुस्त केली जाईल काय आणि दुसरा प्रश्न असा आहे की, कापशी तलावापासून अकोल्या पर्यंत बीडची बीओटी तत्वावर पाईनचे काम एका ठेकेदाराला दिले होते. त्या ठेकेदाराने जवळपास 4 कोटीची बीडची पाईन लाईन काढून नेली आहे.त्या ठेकेदाराने महापालिकेला हमीपत्र दिले होते की, मला बीडची पाईन लाईन मोफत दिल्यास त्याच्या बदल्यात मी 1 कोटीची पीव्हीसीची पाईप लाईन टाकून देतो. या गोष्टीला 3 वर्षे झालेली आहेत. त्याने बीडची 4 कोटीची पाईप लाईन विकून टाकली आणि पर्यायी व्यवस्था म्हणून 1 कोटीची पीव्हीसीची पाईप लाईन आतापर्यंत टाकलेली नाही. शासनाच्या माध्यमातून त्या ठेकेदारावर कारवाई करणार आहे का आणि 180 मीटरची लाईन दुरुस्त केली जाणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी असे म्हटले होते की, 180 मीटर पाईप लाईन दुरुस्त करण्यासाठी 20 लाखापेक्षा अधिक खर्च येणार आहे. ती दुरुस्त केली तरी त्यामध्ये तेवढे पाणी उपलब्ध नाही आणि त्याच्यातून तरी अकोल्याच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटत नाही. उलट दुस-या गावांची पिण्याच्या पाण्याची योजना अडचणीमध्ये येऊ शकेल. या लोकांना पाणी देताना दुस-या जनतेला पाणी देण्यास अडचण येता कामा नये अशी खबरदारी शासन घेत आहे. सन्माननीय सदस्यांनी बीडच्या पाईप लाईनच्या कामात भ्रष्टाचार झाला असे म्हटले आहे, त्यांनी ही अधिकची माहिती दिली आहे. त्यामध्ये जर कोणी दोषी असेल तर ताबडतोब त्या व्यक्तीला किंवा कंत्राटदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जाईल, वेळ पडली तर त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अकोला हे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील शहर आहे. या शहराच्या पाणीपुरवठयाचा मुख्य उद्भव हा काटेपूर्णा धरणावर आधारित आहे

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

काटेपूर्णाचा उद्‌भव हा बेभरवशाचा असल्याचे सिध्द झालेले आहे. मागे तीन-चार वेळा असे बिकट प्रसंग आलेले आहेत. सन 2005मध्ये या शहरावर मोठे संकट आले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी तातडीने उपाय योजले म्हणून ते वर्ष कसे तरी निभावले. 1679हातपंप, 36 जेट पंप,252 सब्मर्सिबल पंप आहेत असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. परंतु ते बेभरवशाचे स्त्रोत आहेत. या बिकट परिस्थितीमध्ये तातडीची उपाययोजना म्हणून हातपंपाचा प्रस्ताव महानगरपालिकेने पाठविलेला आहे. तेव्हा सन 2005मध्ये जशी उपाययोजना केली होती तशी उपाययोजना करण्यासंबंधीचा निर्णय 8-10 दिवसामध्ये घेणार काय ? सरफेस वॉटरसंबंधी माझ्याकडे असलेली माहिती आता येथे सांगून काही उपयोग नाही. काटेपूर्णाचा उद्‌भव बेभरवशाचा असल्यामुळे सरफेस वॉटरच्या माध्यमातून पर्यायी कायम स्वरुपी योजना कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांची 15 दिवसात बैठक घेऊन निर्णय करण्यात येईल काय ?

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जो पहिला प्रस्ताव आहे त्याला 8 दिवसाच्या आत मान्यता देण्यात येईल आणि जो दुसरा प्रस्ताव आहे त्याबाबतीत सर्वसंबंधितांची बैठक 15 दिवसात घेण्यात येईल. अकोला शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रा. बी.टी.देशमुख, तसेच तेथील लोकप्रतिनिधी यांच्या बरोबर सर्वसंबंधित अधिका-यांची, महानगरपालिकेच्या पदाधिकांची येत्या 30 जूनच्या आत बैठक बोलाविली जाईल आणि अकोला शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दूर करण्याकरिता जे जे काही करणे शक्य असेल ते सर्व करण्याच्यादृष्टी शासन कार्यवाही करील.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जालना जिल्ह्यात पिण्याच्या व शेतीकरिता पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई

(४) * ५३०२४ श्री. सुरेश जेथलिया , डॉ. नीलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील भोकरदन, अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा तालुक्यातील भूजल पातळी बरीच खाली गेल्याचे शासनाने केलेल्या भूजल सर्वेक्षणात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाच तालुक्यांतील भूजल पातळी खाली गेल्याने माहे मार्च, २००९ पासून तेथे तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पाच तालुक्यांत पाणी टंचाईमुळे शेती फळबागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री.अजित पवार : (१) होय

(२) होय

(३) अंशत: खरे आहे.

(४) पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत जालना जिल्हयातील भोकरदन, अंबड, घनसावंगी, परतूर व मंठा या पाच तालुक्यातील पाणी टंचाई भासणाऱ्या गावात आवश्यकतेनुसार नवीन विंधण विहिर घेणे, विहिर अधिग्रहण करणे, तात्पुरती पुरक नळ योजना घेणे, टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे या उपाययोजना घेतल्या आहेत. पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी उपरोक्त ५ तालुक्यात १८० नळ पाणी पुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

श्री. सुरेश जेथलिया : जालना जिल्ह्यातील मंठा, परतूर आणि घनसावंगी या तालुक्यातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्याच्या बाबतीत बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. मार्च 9 पासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली असल्याचे शासनाने मान्य केलेले आहेत. तसेच या तीन तालुक्यामध्ये पाण्याविना फळबागांचे अंशत: नुकसान झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की या तीन तालुक्यातील फळबांगाचे शंभर टक्के नुकसान झालेले आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टँकर उपलब्ध होत नाहीत. परतूर नगरापालिके मध्ये 8-10 दिवसातून एकदा पाणी येते. परतूर तालुक्यामध्ये दुधना हा प्रकल्प 20 वर्षापासून रेंगाळलेला आहे. हा प्रकल्प केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ? तसेच मंठा, परतूर व घनसावंगी या तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याकरिता कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 53024....

श्री. अजित पवार : शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता माननीय राज्यपालांचे डायरेक्शन्स घेऊन चांगल्या प्रकारे निधी पुरवणी मागण्यामध्ये मंजूर करीत आहोत. अलिकडच्या काळात मराठवाडयाला जलसंपदा विभागा मार्फत मोठया प्रमाणावर निधी देण्यात आलेला आहे.

...नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी अनेक बॅरेजेस्ची कामे हाती घेण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्य या ठिकाणी माहिती सांगितली की, मराठवाडयातील धरणांना अधिक गती देण्याची गरज आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दुधना प्रकल्पाच्या बाबतीत उल्ेख केला. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, दुधना प्रकल्पाच्या कामासाठी यंदाच्या बजेटमध्ये अधिक निधी देण्याचे काम निश्चितपणे केले जाईल. पाच तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील अडचणी भासलेल्या आहेत, त्या तालुक्याती पिण्याच्या पाण्याची कामे भारत निर्माण योजनेतून मार्च 2010 पर्यंत करण्याचा पाणी पुरवठा स्वच्छता विभागाचा प्रयत्न राहील. त्या योजनेच्या कामासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झालेला असल्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही. या विभागात फळबाग शेतक-यांचे फळबागांचे नुकसान झालेले आहे. पाठिमागच्या काळत देखील त्या विभागात अशाच प्रकारचे नुकसान झालेले होते. त्यावेळी फळबाग शेतक-यांना 6 कोटी 34 लाख रुपयांचे निधीचे वाटप बाधीत शेतक-यांना करण्यात आलेले आहे. आता देखील राज्य शासनाने आदेश दिले आहेत की, 15 दिवसामध्ये फळबागांच्या नुकसानीचे आकडे राज्य सरकारकडे पाठवा. वेगवेगळया गावांमध्ये ग्रामसेवक, तलाठी, ग्रामविस्तार अधिकारी, यांच्या माध्यमातून नुकसानीची पाहणी करण्याचे काम चालले आहे. ती पाहणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर तेथील निश्चित किती शेतक-यांचे झाले आहे याची माहिती मिळणार आहे. ज्या शेतक-यांचे फळबागाचे नुकसान झाले आहे, त्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची भूमिका राज्य शासन निश्चितपणे घेईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील सूर्या नदीवरील बंधारा कोसळल्याची घटना

(५) * ५०७५० श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जमा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री सुभाष चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्रीमती अलका देसाई , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील सूर्या नदीवरील तीन कोटी रुपये खर्चून बांधलेला आणि हजारो हेक्टर जमिनीवर बागायतीसाठी उपयुक्त ठरलेला बांधारा माहे जानेवारी, २००९ च्या सुमारास कोसळल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा बंधारा कोसळल्याने या बांधकामात भ्रष्टाचार झाला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतीश पाटील,श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (१) अंशत: हे खरे आहे.

सूर्या नदीवर खडकोली, ता.पालघर, जि.ठाणे येथील को.प. बंधारा साखळी क्र.० ते ३५ मीटरमध्ये भूभाग खचल्यामुळे क्षतीग्रस्त झाला आहे.

(२) नाही.

(३) व (४)

सदर बाबीची तांत्रीक तपासणी व मार्गदर्शन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व धरण सुरक्षीतता संघटना, नाशिक यांच्याकडे करण्यात आली असून योग्य ते निष्कर्ष हाती आल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा बंधारा कोसळल्याचे उत्तरात मान्य केले आहे. सदर बंधारा फुटल्यामुळे बागायती शेतीचे नुकसान झाले आहे. बागायती शेतीचे किती नुकसान झाले आहे व ज्या शेतक-यांचे बागायती शेतीचे नुकसान झाले आहें, त्यांना नुकसान भरपाई शासनाकडून

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्यात आली आहे काय ? सदर बंधारा कोसळला आहे, त्याची तपासणी सुरु आहे. त्या तपासणीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय? असल्यास, त्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.सतीश पाटील : सभापती महोदय, सदर बंधारा कोसळल्यामुळे आजुबाजूच्या कोणत्याही शेतक-याचे बागायती शेतीचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा कोणत्याही प्रकारचे प्रयोजन नाही. बंधारा कोसळल्याच्या अनुषंगाने चौकशी झाली. त्या चौकशीअंती असे आढळून आले की,सातत्याने येणरी भरती-ओहटी चक्रामुळे बंधाऱ्याच्या खालच्या बाजुने वारंवार बदलणारा प्रवाह त्यामुळे त्या बंधाऱ्याच्या पाण्याच्या स्थिरतेमध्ये मोठया प्रमाणात बदल झाला ते एक कोसळण्यामागचे कारण आहे. दुसरे कारण मानव निर्मिती आहे. त्या बंधा-याच्या आजुबाजुची वाळू उपसली जाते आहे, वाळू उपसल्यामुळे खड्डा निर्माण झाला आणि त्यामुळे सुध्दा हा बंधारा कोसळला आहे. भौगोलिक स्थितीत बंधा-याच्या भागातील भूस्तर साधारणत: 13 मीटरपर्यंत खोलीत मऊ माती मिश्रीत असल्यामुळे पाईपींग ॲक्शन होऊन मायनिंग झाल्यामुळे सदरचा बंधरा फुटलेला आहे.

(तारांकित प्रश्न क्रमांक 51580)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत तालुक्यात झालेली सर्वच अपूर्ण असलेली कामे

(७) * ५०७९२ श्री सुभाष चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जमा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा , श्रीमती मधु जैन : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत तालुक्यात झालेली सर्वच कामे अपूर्ण असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २००९ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत झालेली कामे अपूर्ण राहण्यामागील कारणे काय आहेत व या प्रकल्पातील पाणी ग्रामस्थांच्या घरात पोहचलेच नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी टंचाई दूर करण्यासाठी हा प्रकल्प राबवित असल्याने हा प्रकल्प अपूर्ण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा अपूर्ण असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष साळुंखे : सभापती महोदय, विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये एकूण किती गावात जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यात आले ? या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत काय ? या प्रकल्पांची कामे करणा-या ठेकेदारांची नावे काय आहेत ? त्या ठेकेदारांनी अद्यापपर्यंत कामे पूर्ण केलेली नाहीत असे आढळून आले ही गोष्ट खरी आहे काय ? सप्टेंबर, 2009 अखेर जलस्वराज्य प्रकल्पांची कामे बंद करणार आहे, याबाबतची सत्यस्थिती काय आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना सांगू इच्छितो की, एखादी योजना हाती घेतली तर त्या योजनेचा काळ ठरलेला असतो. शासनाने जलस्वराज्य योजनांतर्गत कामे घेतली होती, आपल्याला कुठल्याही परिस्थितीमध्ये मार्च 2010 पर्यंत या योजनेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन केले होते.

यानंतर श्री. बोरले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50792.....

श्री.अजित पवार.....

एकंदरीत जलस्वराज्य प्रकल्पामध्ये समाविष्ट ग्रामपंचायतींची संख्या 3018 होती. योजना पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु झालेल्या ग्रामपंचायतींची संख्या 2053 होती. प्रगतीपथावर कामे असणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या 965 होती. आम्ही 965 ग्रामंपचायतींचे नियोजन केलेल आहे. आम्ही सप्टेंबर 2009 पर्यंत 603 ग्रामपंचायती, डिसेंबर 2009 पर्यंत 232 ग्रामपंचायती आणि मार्च, 2010 पर्यंत 130 ग्रामपंचायतींची कामे पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. सिंधुदुर्ग जिल्यासंदर्भात बोलायचे झाले तर जलस्वराज्य प्रकल्पामध्ये ग्रामपंचायतींचे एकूण 75 प्रकल्प मंजूर झाले. 29 प्रकल्पामधून पाणी पुरवठा सुरु आहे आणि 46 प्रकल्पांचे काम बाकी आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे तीन टप्प्यामध्ये काम पूर्ण करण्यासंदर्भात आमच्या विभागाचा प्रयत्न राहील. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी कोणत्या ठेकेदाराला काम दिलेले आहे असा प्रश्न विचारलेला आहे. सभापती महोदय, एका ठेकेदाराला काम दिले जात नाही. एखाद्या ग्रामपंचायतीच्या कामामध्ये घोटाळा झाला असेल, तक्रारी आल्या असतील आणि त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर संबंधित ठेकेदाराची शहानिशा केली जाईल आणि त्या ठेकेदाराने कामामध्ये गडबड केलेली आहे काय, दर्जेदार काम केलेले नाही काय याची माहिती घेतली जाईल आणि त्या ठेकेदाराची चूक असेल तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. कोणत्याही ठेकेदाराला पाठीशी घातले जाणार नाही.

श्री.राजन तेली : अध्यक्ष महोदय, माझा प्रश्न असा आहे की, जलस्वराज्य प्रकल्पाची 70 ते 80 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. या प्रकल्पाची मुदत सप्टेंबरमध्ये संपणार आहे. मग राहिलेले काम कसे पूर्ण करण्यात येणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, यासंदर्भात जिल्हापरिषदेने कंत्राटी पद्धतीने तज्ज्ञांची नेमणूक केली होती. शासन त्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेणार काय किंवा त्यांना पूर्ण वेतनश्रेणीवर घेणार काय ? पंजाब, उत्तरांचल अशा तीन-चार राज्यांमध्ये अशा लोकांना पूर्ण वेतनश्रेणीवर घेतलेले आहे. त्याप्रमाणे शासन याचा विचार करणार आहे काय ?

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, एक गोष्ट खरी आहे की, ही योजना सन 2009 मध्ये पूर्ण करावयाची होती. एप्रिल, 2009 मध्ये जागतिक बँकेच्या प्रतिनिधींबरोबर आढावा बैठक झाली

..2...

ता.प्र.क्र.50792.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

होती. त्या बैठकीमध्ये राज्यातील ज्या 26 जिल्हयांमध्ये जलस्वराज्य प्रकल्पांच्या योजना सुरु आहेत त्यांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी एक गोष्ट लक्षात आली की, काही योजना 2009 पर्यंत पूर्णच होत नाहीत. त्या योजना का पूर्ण होत नाहीत तर काही ठिकाणी ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, लोकसभांच्या निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे त्या कालावधीमध्ये काम होऊ शकले नाही. काही ठिकाणी निधीचा अपहार झालेला असल्यामुळे संबंधितांवर फोजदारी गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यामुळे काही कामे रेंगाळलेली आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यामुळे काही कामे रेंगाळलेली आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. काही ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये विविध समित्यांमध्ये अंतर्गत वादामुळे योजनेची कामे प्रलंबित राहिलेली आहेत तर काही ठिकाणी न्यायालयीन याचिकेमुळे योजनेची कामे दीर्घकाळ प्रलंबित राहिलेली आहे अशी वेगवेगळी अनेक कारणे आहेत. या योजनेसाठी जागतिक बँकेचा निधी मिळत असल्यामुळे त्यांच्या अधिका-यांबरोबर मार्च, 2010 पर्यंत यासंदर्भात येणा-या त्रुटी, अडचणी लक्षात घेऊन ही कामे पूर्ण करण्याचे नियोजन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केलेलस की, या प्रकल्पावर जे लोक काम करीत आहेत त्यांच्या संदर्भात शासन काय निर्णय घेणार आहे ? ज्या गोष्टीमुळे राज्य शासनावर आर्थिक बर्डन येते त्यासंदर्भात वित्त विभाग आणि इतर सहका-यांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा लागतो. पाणी पुरवठा खात्याचा मंत्री म्हणून मी यासंदर्भात एवढेच सांगतो की, जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामामध्ये असणारे अधिकारी किंवा कर्मचारी असतील त्यांच्या संदर्भात राज्य शासन सहानुभूतीपूर्वक विचार करेल.

श्री.परशुराम उपरकर : अध्यक्ष महोदय, जलस्वराज्य प्रकल्पांच्या ब-याच कामामध्ये आर्थिक अनियमितता आणि अपहार झालेला आहे. आर्थिक अपहार झालेल्या ठिकाणी संबंधितांकडून वसुली करुन त्यांच्यावर कारवाई करणार काय ? जलस्वराज्य प्रकल्पाच्या अधिका-यांच्या संगनमताने श्री.मारुती बावीसकर हा ठेकेदार जवळ जवळ 10-15 योजनांचे काम बघतो. तो स्वत: सुपरव्हिजन करतो, एस्टीमेट तयार करतो आणि काम करतो. त्या ठेकेदारावर शासन कारवाई करणार आहे काय ?

यानंतर श्री.भोगले .....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी एका व्यक्तीबद्दल माहिती दिली आहे. आपण नेहमीच सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी असल्याचे गृहित धरुन त्यावर कारवाई करीत असतो. निश्चितच या संदर्भात कारवाई केली जाईल, त्याची माहिती घेतली जाईल. पहिला मुद्दा असा उपस्थित केला की, या संदर्भातील काम वेळेवर पूर्ण केले जाणार का? ते काम वेळेवर पूर्ण कसे होईल हे पाहिले जाईल. या जलस्वराज्य प्रकल्पामध्ये ज्या गावामध्ये अपहार झाला त्याची चौकशी केली जाईल. चौकशी केल्यानंतर अपहाराबद्दलची बाब गंभीर असेल तर फौजदारी गुन्हा दाखल करणे गरजेचे असेल तर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल. कोणत्या पक्षाचा, गटाचा, तटाचा, नेत्याचा किंवा कोणाचा वरदहस्त आहे का याचा विचार केला जाणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा पाटबंधारे विभागातील शाखा अभियंत्यानी तलावाच्या कामात व वाहन दुरुस्तीमध्ये केलेला गैरव्यवहार

(८) * ५३११३ श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. दिवाकर रावते : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाखा अभियंता पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांनी सन २००६ ते २००८ या कालावधीत तलावाच्या कामात व वाहन दुरुस्तीमध्ये लाखो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी तेथील कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग व शासनाकडे आल्या आहेत तसेच तलावांच्या व वाहन दुरुस्तीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा अत्यंत खप कमी असलेल्या वर्तमान पत्रातून देवून शासनाच्या निविदा प्रसिध्दीबाबत असलेल्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाखो रुपयांची कामे ही व्हॅट नसलेल्या निविदाधारकांना देवून शासनाचा विक्रिकर बुडविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांचे तुकडे पाडून ते तेथील मंजूर सोसायट्यांना ३०-३० कामे देवून आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला असून तलावाच्या व वाहन खर्चावर व इतर कामांवर १०-११ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री.अजित पवार : (१) अशाप्रकारची तक्रार कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांच्याकडे प्राप्त झालेली नसून, शासनास प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीचे दक्षता पथक, पुणे यांच्याकडून प्राथमिक अन्वेषण करण्यात येत आहे.

(२), (३), (४), याबाबत अधिक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे यांच्याकडून प्राथमिक अन्वेषण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे एकाच सोसायटीला 30-30, 40-40 कामे दिली आहेत. श्री.भागवत, शाखा अभियंता गेली 15 वर्षापासून तेथे कार्यरत आहेत, त्यांची चौकशी केली जाईल काय?

श्री.अजित पवार : त्याची चौकशी केली जाईल आणि विदर्भाच्या बाहेर त्याची ताबडतोब बदली केली जाईल. मी आजच ब्रिफिंग घेत असताना बऱ्याच गोष्टी माझ्या कानावर आल्यानंतर मी सचिवांना सांगितले की, याची ताबडतोब उचलबांगडी करा आणि अमरावती किंवा नागपूर विभागात बदली न करता पश्चिम महाराष्ट्रात घेऊन या. अशा पध्दतीने कारवाई केली जात आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शाखा अभियंत्याबाबतशासनास तक्रार केव्हा प्राप्त झाली आणि चौकशीचे आदेश केव्हा दिले गेले?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : तक्रार दिनांक 22.8.2008 रोजी दाखल झाली. तक्रार आल्यानंतर ताबडतोब दक्षता पथक, पुणे यांच्याकडे चौकशीचे प्रकरण सोपविले आणि सूचना दिल्या आहेत की, 24 तासाच्या आत त्यांनी अहवाल दिला पाहिजे. अद्याप अहवाल आलेला नाही. 22.8.2008 रोजी तक्रार प्राप्त झाली. तक्रार आल्यानंतर अस तक्रारदारांनीच असे सुचविले की, कोणा एकट्यालाच चौकशी करावयास देऊ नका. पुणे विभागामध्ये दक्षता पथक, पुणे यांच्याकडून चौकशी करावी. तशा पध्दतीने दक्षता पथक, पुणे यांना चौकशी करण्यास सांगितले आहे. त्यांना तीन महिन्याची अधिकची मुदत दिली आहे. तीन महिन्यात अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. तोपर्यंत वाट न पाहता त्यांची बदली करण्यात येईल आणि तीन महिन्यांनी अहवाल आल्यानंतर त्यात आर्थिक बाबतीत घोटाळा केलेला असेल, भ्रष्टाचार केला असेल तर ती रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्याबद्दलची पुढील कारवाई केली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती जिल्हा परिषदेतील ३१७ ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची सद्य:स्थिती

(९) * ५०३६० श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.सय्यद जमा , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. चरणसिंग सप्रा , श्री सुभाष चव्हाण , श्री. दिवाकर रावते , श्री. गोपीकिसन बाजोरिया : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९४ ते २००२ या कार्यकाळात अमरावती जिल्हा परिषदेने ७४२ ग्रामीण पाणी पुरवठा योजना तयार केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३१७ ग्रामीण पाणी पुरवठा योजना राज्य गुप्तचर विभागाने तपासणी केली असता कोणत्या गावात राबविल्या गेल्या हे दिसून आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ९ जानेवारी, २००९ रोजी ३१७ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांबाबत चर्चा करण्यासाठी राज्य गुप्तचर विभागाची बैठक बोलविण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बैठकीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास तद्नुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.अजित पवार : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) जिल्हापरिषद अमरावती यांचे अंतर्गत तयार केलेल्या ७४२ पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करुन त्या कार्यान्वीत केल्या आहेत. परंतु योजनेच्या पंपींग मशिनरी व साहित्य, वाहन दुरुस्ती, इंधन वंगन तेल यामध्ये सन १९९४-१९९५ ते २००१-२००२ या काळात ४ कंपन्यांची कागदोपत्री खरेदी दाखवून अपहार झाल्याचे प्राथमिक लेखा परिक्षण अहवालात दिसून आल्यावर संबंधीताविरुध्द दि.२६/६/२००६ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती येथे शहर गु.र.नं.२७८/०६ भा.दं.वि.च्या विविध कलमाखाली दाखल करण्यात आला आहे, पुढील तपास राज्य गुन्हा अन्वेषण विभाग, अमरावती मार्फत करण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये समाविष्ट असलेल्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे का? राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, अमरावती यांना तपासणीचे काम दिले आहे ते पूर्ण झाले आहे का? त्यांचे निष्कर्ष काय आहेत? तपासणी पूर्ण झाली नसेल तर विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, हा प्रश्न गेल्या आठवड्यात खालच्या सभागृहात चर्चेला आला होता. ही अतिशय गंभीर बाब आहे. २० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेचा भ्रष्टाचार झालेला आहे. २०, २४, ६५, २०३ एवढ्या रक्कमेचा अपहार झाल्याचे दाखविण्यात येत

..५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. १९९४ ते २००२ या काळात पंपिंग मशिनरी साहित्य खरेदी, वाहन दुरुस्ती, इंधन, वंगण तेल इत्यादी खरेदीबाबतचा हा भ्रष्टाचार आहे. याचा आवाका पाहिल्यानंतर एक लक्षात आले की, हा तपास एका-दोघांवर सोपवून चालणार नाही. म्हणून राज्याच्या गृहमंत्र्यांना मी सांगितले की, एक पोलीस उपअधीक्षक, ५-६ अधिकारी व कर्मचारी असणारे विशेष पथक नेमावे. त्यांनी येत्या तीन महिन्यात तपास करण्याबद्दल त्यांना मुदत द्यावी आणि यामध्ये ३-४ अधिकारी दोषी सापडले आहेत, परंतु ही बाब लक्षात घेतल्यानंतर या प्रकरणात आणखी २५-३० अधिकारी दोषी आढळण्याची शक्यता आहे. हेही पाहिले की, यामध्ये कोणी लोकप्रतिनिधी सामील आहे का? परंतु एकंदरीत या सगळ्या तपासणीत कोणी लोकप्रतिनिधी आढळून आले नाहीत.

...२आय.१...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50360..... श्री. अजित पवार....

हे प्रकरण जिल्हा परिषदेशी संबंधित असल्याने हा तपास पोलीस खात्याला करण्यास सांगितले आहे. मागील काळात थोडासा विलंब झाला ही गोष्ट खरी आहे पण आता यापुढे कुठल्याही परिस्थितीत विलंब होणार नाही तसेच वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी माहिती घेऊन हा तपास लवकरात लवकर करण्यात येईल आणि ज्यांनी चुका केल्या आहेत विशेषत: यात पुरवठादार बोगस, बिले बोगर, जवळपास 15 हजार चेकचा तपास करावयाचा अशा प्रकारे एकूण या तपास कामाचा आवाका मोठा आहे. त्याबाबत मी विधानसभेत माहिती दिलेलीच आहे आणि विधानपरिषदेतही सांगू इच्छितो की, या प्रकरणात कोणालाही पाठीशी घालण्याची शासनाची भूमिका नाही. या प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल. तसेच वसुली करण्यासाठी जे काही निर्णय घेण्याची गरज असेल ते निर्णय सुध्दा घेण्यात येतील.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : उत्तरामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे त्याची चौकशी करण्यात येईल, असे सांगितले. परंतु माझी विनंती आहे की, चौकशीत जे अधिकारी दोषी आढळून येतील अथवा आज जे दोषी असतील त्यांना निलंबित करुन ही चौकशी करणार काय ? कारण चौकशी सुरु असताना ते अधिकारी नोकरीत असतील तर त्यांचा चौकशीवर प्रभाव पडू शकतो म्हणून त्यांना निलंबित करण्यात येईल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, याप्रकरणात प्रथम स्थानिक पोलीस, अमरावती हे तपास करीत होते. त्यामध्ये ए.बी. तायडे वगैरे अधिकारी तपास अधिकारी म्हणून होते. त्यामुळे अफरातफरीच्या तपासामध्ये श्री. रमेश चंदनवार, तत्कालीन कार्यकारी अभियंता, जि.प.सिंचन विभाग, अमरावती यांनी ही चौकशी केली होती व नंतर गुन्हा दाखल करण्यात आला. आता त्यासंबंधीचा तपास सीआयडी अमरावती हे करीत आहेत. याप्रकरणातील काही लोक ऑलरेडी सेवानिवृत्त झालेले आहेत तर काही लोकांना निलंबित करण्यात आले आहे. त्यात जिल्हा परिषद सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, यांत्रिक, वित्त विभागातील ऑडिटर, मुख्य लेखाधिकारी (अंतर्गत लेखापरीक्षण), वित्त विभाग, अशा प्रकारे जवळपास 25-30 अधिकारी समाविष्ट आहेत, असे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केली की, काही लोक तपासामध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करु शकतात परंतु तशा पध्दतीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50360..... श्री. अजित पवार....

कोणाकडूनही कुठलीच गोष्ट होऊ दिली जाणार नाही. तपासानुसार जे.एस.दुधे, सहाय्यक अभियंता (यांत्रिकी) यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. अन्य तीन अधिकाऱ्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्ह्याखाली तपास चालू आहे. यातील काही अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन घेतला आहे परंतु श्री. दुधे, पी.आर.नंदेश्वर आणि डी.जे.कोथळकर हे सेवानिवृत्त झालेले आहेत. तर जे सर्व्हिसमध्ये आहेत त्यातील काहींना बडतर्फ करण्यात आले आहे. अशा प्रकारे जे सेवानिवृत्त झालेले असतील त्यांची आणि जे कार्यरत असतील त्या सर्वांची या विशेष पथकामार्फत चौकशी होईल व संपूर्ण वस्तुस्थिती आपल्यासमोर येईल. त्या आधारे गुन्हे दाखल करुन योग्य ती शिक्षा शासन त्यांना देईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अमरावती मधील अत्यंत गंभीर असे प्रकरण समोर आलेले आहे. त्यात अत्यंत स्पष्टपणे म्हटले आहे की, सन 1994 ते 2002 या काळातील चार कंपन्या कागदोपत्री खरेदी दाखवून अपहार झाल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट झालेले आहे. ही कागदपत्रे फक्त सादर केली आणि संपूर्ण पैसा काढून घेण्यात आला आहे. याप्रकरणात आणखी बरेच अधिकारी असण्याची शक्यता आहे. एवढी प्रचंड रक्कम सरळसरळ काढून घेण्यात आली याला तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार नाहीत काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

खोटी कागदपत्रे तयार करुन मोठया प्रमाणात रक्कम काढून घेण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात त्यावेळच्या सीईओ यांची सुध्दा चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. पिण्याच्या पाण्याचे हे प्रकरण आहे. या गोष्टीचा उलगड लेखा परीक्षणात स्पष्ट झालेला असून या प्रकरणात सहा वर्षे निघून गेलेली आहेत. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे व यामध्ये जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे तसेच या प्रकरणात सीईओ यांना सुध्दा गृहीत धरुन त्यांची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या सभागृहाच्या सदस्यत्वाची आजच शपथ घेतली असून त्यांनी आज पहिलाच प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. ठाकरे यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात योग्य पध्दतीने तंतोतंत कारवाई केली जाईल. या प्रकरणातील सीईओ यांना पाठीशी घातले जाणार नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामथे-फणसवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरणाला लागलेली गळती

(१०) * ५३२१३ श्री.भास्कर जाधव : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामथे-फणसवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील धरणाला मोठ्या प्रमाणात गळती लागली असून अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्याने पूर्ण क्षमतेने भरलेले धरण आता रिकामे होऊ लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर धरणाची दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.अजित पवार : (१) धरणाचे दगडी सांडवा बांधकामातून व पक्ष भिंतीतून गळती होत आहे.
(२) व (३) निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी कामथे-फणसवाडी धरणाला गळतील लागल्याचे मान्य केलेले आहे. 2व 3 नंबरच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे". परंतु "निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येईल", अशा प्रकारचे शासनाचे नेहमी उत्तर असते परंतु या ठिकाणी "निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे" असे म्हटलेले आहे त्यामुळे या शासनाने यासंदर्भात लागणा-या खर्चासाठी निधीची तरतूद केलेली आहे असे मी समजतो. त्यामुळे या धरणाची गळती बंद करण्यासाठी शासनाने किती रक्कमेची तरतूद केलेली आहे ? तसेच हे काम किती कालावधीत पूर्ण होईल ? माननीय मंत्रीमहोदयांना मी विनंती करतो की, आपल्याकडे पाटबंधारे विभाग तसेच पाणीपुरवठा विभाग सुध्दा आहे. या कामथे-फणसवाडी धरणापासून चिपळूण शहर अवघे अडीच ते तीन कि.मी. अंतरावर आहे. 25-30 वर्षापूर्वी या धरणातून चिपळूण शहराला ग्रॅव्हीटीने पाणी उपलब्ध करुन दिले जात होते म्हणून हे धरण सुस्थितीत करुन चिपळूण शहराला ग्रॅव्हीटीने पाणी देण्याचा प्रयत्न केला जाईल काय ? असा माझा पॉईंटेड प्रश्न आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पॉईंटेड प्रश्नाला पॉईंटेड उत्तर देतो. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भातील कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या जातील. तसेच सन्माननीय सदस्यांनी पहिला जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कामथे-फणसवाडी धरणासाठी 35 लक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 53213.....

श्री. अजित पवार .....

रुपये खर्च येणार आहे. आता पावसाळा सुरु होणार आहे. साधारण जुन, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यात कोकणात मुसळधार पाऊस पडत असतो त्यामुळे सप्टेंबर महिन्यानंतर 35 लक्ष रुपये उपलब्ध करुन दिले जातील तसेच पावसाळा संपल्यानंतर कामथे-फणसवाडी येथील धरणाचे काम सुरु केले जाईल. पुढचा पावसाळा सुरु होण्यापूर्वी काम पूर्ण केले जाईल व यासंदर्भातील सूचना सेक्रेटरींना मी आजच दिलेल्या आहेत. या धरणासाठी लागणा-या निधीची कमतरता असेल तर पुरवणी मागण्यामध्ये ॲडीशनल निधी उपलब्ध करुन घेण्यास सांगितलेले आहे. सन 2010 चा पावसाळा सुरु होण्याच्या आत या धरणासाठी 35 लक्ष रुपये देऊन कामथे-फणसवाडी धरणाची गळती थांबविण्याच्या संदर्भातील कार्यवाही जलसंपदा विभागाकडून केली जाईल. गळतीच्या कामासाठी ग्राऊटींग करावे लागत असते. त्यामुळे या ठिकाणीही ग्राऊटींगच्या कामाला प्राधान्य दिले जाईल व काम करुन घेतले जाईल. कामथे-फणसवाडी या धरणातून ग्रॅव्हीटीने चिपळूण शहरला पाणी पुरवठा करण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात येतील.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, कामथे-फणसवाडी या धरणाला गळती लागल्यामुळे हे सर्व धरण रिकामे झालेले आहे. हे धरण दुरुस्त करण्याचे आपण आजच आदेश दिलेले असल्यामुळे मी आपले आभार व्यक्त करतो. तसेच हे धरण पूर्णपणे गाळाने भरलेले आहे. म्हणून या धरणाच्या दुरुस्तीबरोबर या धरणातील गाळ काढण्याचे काम देखील हाती घेतले जाणार आहे काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, कामथे-फणसवाडी धरणाचा गाळ काढण्यासाठी यांत्रिकी विभागाची मशिनरी दिली जाईल. कोल्हापूरच्या रकांळा तलावातील जलपर्णी आणि गाळ काढण्याचे काम देखील हाती घेण्यात आलेले आहे. गाळ काढतांना फक्त विंधनाचा खर्च महानगरपालिकेने करावयाचा आहे, मशिनरीचा खर्च यांत्रिकी विभाग करेल. इंधनासाठी जो निधी लागतो त्यासाठी आपल्याला डीपीडीसीमध्ये तरतूद करता येते. त्यामुळे रत्नागिरीच्या पालकमंत्र्यांना इंधनासाठी डीपीडीसीमध्ये काही लाखाची तरतूद करण्याच्या संदर्भात सूचना त्यांना

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार.....

दिल्या जातील. या धरणाचा गाळ काढण्यासाठी पावसाळयानंतर मशिनरी उपलब्ध करुन दिली जाईल. एकीकडे धरणाची गळती थांबविण्याच्या कामाला सुरुवात केली जाईल आणि दुस-या बाजूने या धरणातील गाळ काढण्याच्या कामाला देखील सुरुवात केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : लेखी उत्तरे

मु.शी : अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची बारावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे. या यादीच्या मुद्रित प्रती अद्याप मुद्रणालयाकडून आलेल्या नसल्यामुळे चक्रमुद्रित प्रती सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत. मुद्रीत प्रती उपलब्ध झाल्यानंतर त्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : लेखी उत्तरे

मु.शी : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " प्रा.वैद्यनाथन समितीच्या अहवालानुसार सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान वि.प.स. यांच्या दिनांक 25 जुलै, 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 43489 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे

(प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

सभापती : महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्राच्या संदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने सन 2009-2010 चे वार्षिक नियोजन आणि सन 2008-2009मधील वितरित करण्यात आलेला निधी व मार्च 2009 अखेर झालेल्या खर्चाच्या जिल्हा निहाय तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्राच्या संदर्भात दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने सन 2009-2010 चे वार्षिक नियोजन आणि सन 2008-2009 मधील वितरित करण्यात आलेला निधी व मार्च 2009 अखेर झालेल्या खर्चाच्या जिल्हा निहाय तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी. : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

प्रा.बी.टी.देशमुख (समिती सदस्य) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा तेरावा अहवाल सभागृहाला सादर करतो

सभापती : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

पृ.शी. मु.शी : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा अठरावा अहवाल सभागृहाला सादर करतो

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे

--

पृ.शी.मु.शी : अंदाज सामितीचा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अदाज समितीचा चोविसावा, पंचविसावा, सव्विसावा व सत्ताविसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : अंदाज सामितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : विधान परिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे

श्री.संजय दत्त (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद आश्वासन समितीचा सन 2003 मधील पहिल्या अधिवेशनातील एकशे एकावन्नावा अहवाल, दुस-या अधिवेशनातील एकशे बावन्नावा अहवाल व तिस-या अधिवेशातील एकशे त्रेपन्नावा अहवाल तसेच सन 2004 मधील पहिल्या अधिवेशनातील एकशे चोपन्नावा अहवाल सभागृहाला सादर करतो

सभापती : विधान परिषद आश्वासन समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमासंबंधी

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये इतके कामकाज दाखविण्यात आले आहे, त्यातील नेमके कोणते कामकाज होणार आहे?

सभापती :सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने संपूर्ण कार्यक्रम पत्रिकेमधील कामकाज व्हावे या अपेक्षेने कामकाज दाखविण्यात आले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये जवळपास सहा विधेयके आहेत, त्याच प्रमाणे पुरवणी मागण्यांवरील चर्चा आहे, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने आहेत, लक्षवेधी सूचना आहेत...

सभापती : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविलेल्या लक्षवेधी सूचना उद्या सकाळी विशेष बैठकीमध्ये घेता येऊ शकतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे नाही. या कार्यक्रम पत्रिकेमधील सर्व विषयांचे गांभीर्य विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना आहे.परंतु सरकार जर या सभागृहाच्या कामकाजामध्ये गंभीर नसेल तर आम्ही वेठ बिगारासारखे सभागृहामध्ये उपस्थित रहावयाचे काय? परवाच्या दिवशी सकाळी मंत्रिमहोदय उपस्थित न राहिल्यामुळे त्यावेळी दाखविण्यात आलेले कामकाज बाद झाले. सभापती महोदय, आपण आमचे संरक्षण करता, आम्ही केलेल्या मागणीप्रमाणे आपण कामकाज लावता ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्याप्रमाणे कामकाज पूर्ण झाले पाहिजे. त्या कामकाजाची सरकारला गरज वाटत नाही. सरकारला ज्या कामकाजाची गरज वाटते ते कामकाज पूर्ण करण्यासाठी आम्ही आलो आहोत काय? आजची कामकाज पत्रिका पाहिल्यानंतर छातीमध्ये धडकी भरते. आज दाखविण्यात आलेले कामकाज पूर्ण करण्यासाठी एक आठवडा पाहिजे. एवढे कामकाज पूर्ण करण्याबाबत आपण आमच्याकडे सहकार्याची अपेक्षा केली आहे. तेव्हा आता काय करायचे हे आम्हाला आता कळत नाही. या सभागृहामध्ये प्रत्येक मंत्रिमहोदय आपल्या विभागाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर धोपटी गुंडाळले की निघाले. शेवटी इथे कुणी नसते. माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांना तुम्ही जाऊ नका असे सांगावे लागले. माननीय दादासाहेबांचा प्रश्न नाही, ते बारीकसारीक गोष्टी पहातात. आणि आपली जबाबदारी पार पाडतात. सभापती महोदय,

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

याठिकाणी दाखविण्यात आलेली विधेयके ही विधानसभेमधून येणार होती. आज सकाळी ज्या विधेयकावर चर्चा झाली. ते वाचल्यानंतर लक्षात आले की, हे घोटाळयाचे विधेयक आहे. त्यावर आम्हाला उपसूचना देता आल्या नाहीत. आणि आपण म्हणणार की, या विधेयकाला उपसूचना देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्षाकडून मागणी केल्याप्रमाणे सिंचनाच्या विषयावर चर्चा दाखविण्यात आलेली नाही...

सभापती : सिंचनाच्या विषयावरील चर्चा उद्या घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे हे सर्व कामकाज केव्हा पूर्ण होणार आहे? सभापती महोदय, आपणाकडून केवळ आम्हाला संरक्षण नको तर सत्ताधारी पक्षाकडून आमच्यावर दडपण आणून हे कामकाज पूर्ण करण्याबाबत आग्रह धरण्यात येऊ नये एवढेच आम्हाला सांगावयाचे आहे. यामध्ये आमचा काही दोष नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं जानना चाहती हूं कि अर्धा तास चर्चा पर आज चर्चा होगी या नहीं ? ऐसा न हो कि अर्धा तास की चर्चा आगे के लिए टाल दी जाये. मेरी विनती है कि अर्धा तास चर्चा पर आज ही चर्चा होनी चाहिए.

सभापती : त्याबाबत सुध्दा मी पहातो. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या अनुषंगाने शासनाने आपले मत सांगावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ज्यावेळी कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा होते त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेते त्याठिकाणी उपस्थित असतात. तसेच, सत्ताधारी पक्षाचे नेते देखील उपस्थित असतात. त्यावेळी सर्वांच्या अनुमतीने चर्चा होऊन सभागृहाचे काम ठरविण्यात येते. वास्तविक पहातां, कामकाज सल्लागार समितीमध्ये अमूक दिवसामध्ये एवढे कामकाज घेतले तर जास्त बरे होईल अशाप्रकारे एकमताने निर्णय होऊन त्याची अंमलबजावणी होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अमूक इतके कामकाज घ्यावे यासंबंधी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये निर्णय होत नाही. पहिल्या दोन आठवडयामध्ये विधेयके घेण्यात आली नाहीत. शेवटच्या आठवडयात सर्व विधेयके दाखविण्यात आल्यानंतर त्यावर नियमानुसार चर्चा होणार नाही. आपल्याला जर नियम बाजूला ठेवून चर्चा करावयाची असेल तर गोष्ट वेगळी. कामकाज सल्लागार समितीमध्ये एका दिवसात किती कामकाज घ्यावे हे ठरलेले नाही.प्रत्येक दिवशी शासकीय कामकाज घ्यावे असे ठरते. परंतु त्याप्रमाणे मागील दोन आठवडयात एकही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर...

विधेयक दाखविण्यात आले नाही, आणि शेवटच्या आठवडयात सर्व विधेयके दाखविण्यात आली तर कसे होईल?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, विधानसभेमध्ये देखील रोज दोन विधेयके घेण्याचे ठरले होते तरीदेखील दोन विधेयके होत नव्हती म्हणून शनिवारचा दिवस पूर्णपणे विधेयकांसाठी ठेवला. त्या सभागृहामध्ये शनिवारी विधेयके मंजूर झाल्यानंतर आज या सभागृहामध्ये दाखविण्यात आली म्हणून ही अडचण निर्माण झाली. वास्तविक पहाता, सभागृहाचे कामकाज समन्वयाने झाले पाहिजे या माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या मताशी मी सहमत आहे. ही बाब माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री यांच्या लक्षात आणून देण्यात येईल. आणि यापुढे अशी तक्रार राहणार नाही याची शासनाच्या वतीने खबरदारी घेतली जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये कार्यक्रम निश्चित करतो. त्या दरम्यानच्या काळामध्ये असे काही प्रश्न उपस्थित होतात की, त्यामुळे एखादी तातडीच्या विषया-वरील चर्चा सुध्दा घ्यावी लागते. मग ती चर्चा दीड तासाची असेल किंवा दोन तासाची असेल. अशा प्रकारे आपण दोन-तीन विषयावरील चर्चा घेतलेल्या आहेत. उद्या देखील एका विषयावरील चर्चा आहे.ही गोष्ट खरी आहे की, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर एकाच वेळी किमान पाच ते सहा शासकीय विधेयके चर्चेसाठी दाखविण्यात आलेली आहेत. ही वस्तुस्थिती खरी आहे की, विधान परिषदेमध्ये कालपासूनच ही बिले चर्चेसाठी दाखविण्यात आलेली आहेत. यापूर्वी आपण सर्वांच्या सहकार्याने दोन छोटी बिले पारीत केलेली आहेत. मला असे वाटते की, या अनुषंगाने पहिल्या दिवसापासूनच शासकीय विधेयकांच्या बाबतीत काटेकोरपणे कामकाज केले तर सदनामध्ये एकदम एवढी बिले चर्चेसाठी येण्याचा प्रसंग येणार नाही. पण यामध्ये असे आहे की, विधानसभेने एखादे विधेयक पारीत केले तरच ते विधान परिषदेमध्ये चर्चेसाठी येणार आहे.त्याचप्रमाणे विधानपरिषदेने एखादे विधेयक पारीत केले तरच ते विधानसभेमध्ये चर्चेसाठी जाणार आहे. या अनुषंगाने विधानसभेने पारीत केलेली विधेयके आज येथे चर्चेसाठी आलेली आहेत. याबाबतीत सांगावयाचे तर विधानसभेने शनिवार, दि.13-06-2009 रोजी विधेयकांच्या संबंधातील चर्चा ठेवली होती.त्यामुळे ही बिले विधान परिषदेमध्ये आज सोमवार, दि.15-06-2009 रोजी चर्चेसाठी आलेली आहेत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मला असे वाटते की, याठिकाणी जर आपण महत्वाच्या बाबी मांडल्या तर बरे होईल. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अनु.क्र.11 वरील "सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)" ही अत्यंत महत्वाची चर्चा आहे. त्यानंतर "विरोधी पक्षाच्या वतीने देण्यात आलेला नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव" असून यावरील चर्चा देखील आपल्याला आज पूर्ण करणे आवश्यक आहे. यानंतर आज सकाळच्या सत्रामध्ये दाखविण्यात आलेली शासकीय विधेयके आणि दुपारच्या सत्रामध्ये दाखविण्यात आलेली शासकीय विधेयके असा हा एकंदर कार्यक्रम आहे. तसेच दोन अर्ध्या तासाच्या चर्चा आहेत. लक्षवेधी सूचना देखील आहेत.विशेष उल्लेख आहेत. मला असे वाटते की, आज "विशेष उल्लेखाच्या सूचना" घेण्यात येऊ नयेत. अर्ध्या तासाची चर्चा देखील घेऊ नये. लक्षवेधी सूचनांच्या अनुषंगाने काय करावयाचे याबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले मत मांडावे.

. . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना घेण्यात याव्यात. नाहीतर आजच्या लक्षवेधी सूचना आणि उद्या देण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना घेण्यासाठी पुन्हा उद्या सकाळी सभागृहाचे कामकाज ठेवले जाईल. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर ज्या लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत, त्या घेतल्या पाहिजेत.

सभापती : ठीक आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी यासंदर्भात आपल्या भावना व्यक्त केल्यानंतर, माननीय मंत्री श्री.अजित पवारसाहेबांनी ज्या भावना व्यक्त केल्या असून, या दोघांनीही व्यक्त केलेल्या भावना योग्य आहेत. यातून मध्यम मार्ग काढण्याच्या दृष्टीने सांगावयाचे तर अधिवेशनाचा कालावधी दोन दिवस वाढविला तर हे सर्व कामकाज पूर्ण होईल आणि याला न्याय देता येऊ शकेल एवढीच माझी भावना आहे.

सभापती : यापूर्वीच कामकाज सल्लागार समितीने याबाबतीत निर्णय घेतलेला आहे आणि तो सभागृहामध्ये वाचूनही दाखविण्यात आला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज याठिकाणी कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले सगळे कामकाज पूर्ण होणार नसेल तर घाईगर्दीमध्ये हे काम कसे पूर्ण करणार ? याठिकाणी महत्वाची विधेयके दाखविण्यात आली आहेत. यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलविण्यात यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी आपण आदेश देऊन सुध्दा दि. 02-06-2009 पासूनची नियम 93 च्या सूचनांवरील उत्तरे आलेली नाहीत. सभापती महोदय, काही-काही नियम 93 च्या सूचनांच्या बाबतीत आम्ही आपल्याला विनंती केल्यानंतर, त्याचा सन्मान करुन, आपण त्या दुसऱ्या दिवशी चर्चेसाठी घेतल्या जातात. पण दि.02-06-2009 पासूनची नियम 93 च्या सूचनांवरील उत्तरे आलेली नाहीत. मग शेवटच्या दिवशी 100-100 उत्तरे आमच्या पिजन होलमध्ये ठेवणार. सभापती महोदय, आमच्यावर हा एक प्रकारे अन्याय आहे, आपण न्याय दिला पाहिजे. तसेच सकाळच्या सत्रामध्ये सुध्दा विधेयकावरील चर्चा लवकर पूर्ण करावी असेच सांगितले जाते.

सभापती : मी माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो. काही सन्माननीय सदस्यांची अशी सूचना आहे की, अधिवेशनाची मुदत आणखी दोन दिवस वाढविण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये सभागृहामध्ये जे मत व्यक्त करण्यात आलेले आहे, ते माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

सभापती : ठीक आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरी विनती है कि इस अर्धा तास चर्चा को आप आगे न बढ़ायें. इसी अधिवेशन में इस पर चर्चा होनी चाहिए.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी यापूर्वी अर्धा तास चर्चा दिली होती. परंतु ती त्यावेळी न घेता पुढे ढकलण्यात आली होती. आता आजच्या अर्ध्या तासाच्या चर्चा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तर ती अर्ध्या तासाची चर्चा उद्या घेणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करतो आणि दोन्ही बाजूच्या नेत्यांशी चर्चा करतो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, त्याआधी आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक नऊ (ब) वर 'लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे' अशी बाब दाखविलेली आहे, ती आपण घ्यावी.

सभापती : ठीक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मंत्रालयात काम करणाऱ्या कक्ष अधिकाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेबाबत" या विषयासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील व इतर वि.प.स. यांनी दिनांक 25 जुलै, 2008 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील आंबिवली गावानजीक असलेले नागेश्वरी धरणाचे पूर्ण बिल अदा केल्याबाबत" या विषयासंबंधी सर्वश्री जयंत पाटील व इतर वि. प. स. यांनी दिनांक 13 मार्च, 2008 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाड तालुक्यातील माझेंरी गावाजवळील वरंध घाटात जीप उंचीवरुन खाली पडून झालेला अपघात" या विषयासंबंधी सर्वश्री रमेश शेंडगे व इतर वि. प. स. यांनी दिनांक 22 एप्रिल, 2008 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.16 ते 1.27 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.28 ते 2.00 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

डॉ. दीपक सावंत : उपसभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाजाच्या संदर्भात कोणता निर्णय झालेला आहे ?

उपसभापती : आपले सर्वांचे सहकार्य असेल तर आजचे कामकाज आपण पूर्ण करु शकू.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

सन्माननीय सदस्य श्री.गोपीसशन बाजोरिया आपला श्री.कोठारी यांच्यासंबंधीचा प्रश्न मी निकाली काढलेला आहे. या बाबतीत काय घडले ते आपणास माझ्या दालनात सांगेन.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, धन्यवाद.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामानाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण व भगवानराव साळुंखे यांनी "राज्यातील ग्रंथालयीन कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीचा व सेवाशर्तींचा विषय गेली अनेक वर्षे शासनाकडे प्रलंबित असणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवानराव साळुंखे यांनी "कोल्हापूरयेथील सेंट झेव्हिअर्स हायस्कूल व होली क्रॉस गर्ल्स कॉन्व्हेंट स्कूल या दोन इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देणा-या संस्था सुरुवातीपासून अल्पसंख्यांक संस्था असल्याचे भासविणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व मधुकर चव्हाण यांनी "पश्चिम महाराष्ट्रातील कायम दुष्काळी भाग सिंचनाखाली आणण्यासाठी उदात्त हेतूने सांगली जिल्ह्यातील अशा महत्वाकांक्षी योजनांना 26 एप्रिल, 1984 साली प्रशासकीय मान्यता मिळणे, सदर योजनांवर कोटयवधी रुपयांचा खर्च होऊनही शेतक-यांना सिंचनाचा लाभ न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील यांनी "अलिबाग तालुक्यातील थेरोडा मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. थेरोडा यासंस्थेचे सभासद श्री. दयाराम वि . हल्े याची मंगळवार, दिनांक 26.5.2009 रोजी दुपारी समुद्रात मच्छिमारी करीत असताना लाटांच्या तडाख्यात सापडून बोटीला जलसमाधी मिळून सुमारे 5 लाख रुपयाचे नुकसान होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3...

उपसभापती....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतराव खोटरे व दिलीपराव सोनवणे यांनी "निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवरील कर्मचारी दुस-या निवृत्त वेतनार्ह आस्थापनेवरील सेवेत दाखल झाला असल्यास दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी व नंतर अर्ज केलेल्या कर्मचा-यांमध्ये भेदभाव निर्माण करणारा शासन निर्णयाबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे व जयंत प्र. पाटील यांनी "राज्य शासनाकडून बौध्द समाजास महार वतनी जमिनी देण्यात येणे, कित्येक महार वतनी जमिनी संबंधित लाभार्थ्यांकडून ग्रामपंचायती मार्फत पुन्हा संपादित करुन गावठाण घोषित करुन मूळ वतनी जमिनी परिचित धनदांडग्यांना देण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "पावसाळा जवळ आलेला असताना मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील अनेक दुरुस्तीची कामे अपूर्ण असणे, मार्गावरील अनेक ठिकाणी डोंगरावरील छोटया छोट्या दरडी कोसळण्याची भीती असल्याने त्याच्या देखभालीकडे होत असलेले दुर्लक्ष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी,अशोकराव मानकर,केशवराव मानकर यांनी "नागपूर शहरातील अनधिकृत ले-आऊटमध्ये विकासाची कामे करण्यास मनपा व नागपूर सुधार प्रन्यास यांच्यात असलेला समन्वयाचा अभाव " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

4...

उपसभापती....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी " दिनांक 13जून, 2009 रोजी औरंगाबाद येथील अहिंसा नगरमध्ये राहणा-या एका 19 वर्षीय तरुणीचा खून करुन तिच्यावर बलात्कार करणे, सदर घटना घडून तीन दिवस होऊनही अद्याप गुन्हेगारांना अटक करण्यास होत असलेली दिरंगाई " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री गोपीकिसन बाजोरिया यांनी " हाजिअली येथील शासकीय निवासस्थाने तसेच लाला कॉलेजच्या सार्वजनिक रस्त्यावर व परिसरात अनेक खाजगी जुन्या कार अनेक महिन्यांपासून उभ्या केल्या असल्याने तेथे कचरा व घाट साचल्याने लोकांना चालणे अवघड होणेबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारली आहे.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शिरंगे ता.दोडामार्ग येथील संरक्षित वनात विनापरवाना होत असलेली वृक्षतोड

मु. शी. : शिरंगे ता.दोडामार्ग येथील संरक्षित वनात विनापरवाना होत असलेली वृक्षतोड याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर,किरण पावसकर,अरविंद सावंत यांनी "शिरंगे, ता.दोडामार्ग येथील संरक्षित वनात विनापरवाना होत असलेली वृक्षतोड" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 1980 चा वन संवर्धन कायदा आहे. या कायद्यामध्ये अशी मशिनरी सोडण्याची तरतूद आहे काय ? अशा प्रकारची मशिनरी वन विभागाच्या कक्षेत सोडावयाची असली तर त्यासाठी वन विभागाच्या भोपाळ येथील केंद्रीय कार्यालयाची परवानगी घ्यावी लागते हे खरे आहे काय ? अशाच पध्दतीने माणगाव तालुक्यातील आंजिवडे येथे वन जमिनीतील वृक्षांची मोठया प्रमाणात तोड झाली आहे. सदर वृक्षाची तोड श्री.भोसले नावाच्या आरोपीने जे.सी.पी. लावून तोडली आहेत. या प्रकरणी श्री. भोसले नावाच्या आरोपीस 10 हजार रुपयांच्या दंडाची कारवाई करुन सोडून दिले आहे. त्या आरोपी विरुध्द पुन्हा चौकशी करुन योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे, त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी डिटेल माहिती दिली तर त्यांचे विरुण्द चौकशी करुन कारवाई केली जाईल. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यावेळी त्यांच्याकडे असलेला जे.सी.पी.सुध्दा जप्त करण्यात आलेला होता. जे.सी.पी.जप्त केल्यानंतर सक्षम अधिका-यांकडून माहिती घेतली की, कलम 53 प्रमाणे त्यांना तो अधिकार आहे. त्या अधिकारासंबंधीची माझ्याकडे प्रत उपलब्ध आहे. यासंदर्भात चौकशी केल्यानंतर शेताचा रस्ता दुरुस्त करावयाचा होता, त्यासाठी दुस-याचा जे.सी.पी. भाडयाने घेतला होता. सदरहू जे.सी.पी. जप्त करण्यात आला होता, हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर जे.सी.पी.चे मालक न्यायालयात हजर होते. त्याने देखील सांगितले की, माझा जे.सी.पी.भाडयाने दिला होता. त्यांच्याकडे भाडेपावती व इतर कागदपत्रे पाहिल्यानंतर न्यायालयाने सांगितले की, या प्रकरणी वन विभागाच्या सक्षम अधिका-यांनी निर्णय घ्यावा. संबंधित जे.सी.पी. सोडण्यासाठी 5 लाख रुपयाची जमानत घेण्यात आली आहे. न्यायालयास ज्यावेळी गरज भासेल त्यावेळी आरोपी व आणि मालक यांना हजर करता येते. याबाबतीत मी चौकशी केली की, असे करता येते काय ? जप्त केलेले वाहन कोर्टाच्या परवागनी शिवाय मिळू शकत नाही. मला शंका उपस्थित झाली होती. कलम 53 प्रमाणे अधिकार देण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची परवानगी देऊ शकतो. यासाठी जे कागदपत्रे लागतात, त्या कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. सदर प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्याची माझी पूर्णपणे तयारी आहे.

15-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) QQ-7

ABG/ KGS/ MMP/ 14:05

पृ. शी. : सहकारी पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु. शी. : सहकारी पंतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,विनोद तावडे,संजय केळकर,मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री रामनाथ मोते,विनोद तावडे,संजय केळकर,मधुकर चव्हाण यांनी सहकारी पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. बोरले....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, हे निवेदन परवा सुध्दा चर्चेला आले होते. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी यासंदर्भात काल प्रश्न उपस्थित केला होता. माननीय मंत्री महोदयांनी काल असे उत्तर दिले होते की, एका महिन्यामध्ये ऑडिट फीबद्दल निर्णय घेऊ. सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, श्री.मनोहर त्रिभुवन यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. हे अधिकारी सी.ए. यांची नियुक्ती करण्यासाठी त्यांच्याकडून ऑडिट फीसाठी 50 टक्के रकमेची मागणी करतात. आपल्याला यावर बंधन घालयचे असेल तर महाराष्ट्रामध्ये सी.ए.चे पॅनल नियुक्त करावे. ज्या पतसंस्थांना ऑडिट करायचे आहे ते सी.ए.मार्फत ऑडिट करुन घेतील. उत्तरामध्ये भ्रष्टाचार सिद्ध झालेल्याचे मान्य करण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आपण सी.ए. मार्फत पतसंस्थांचे ऑडिट करण्यासाठी एक स्वतंत्र पॅनल 8 दिवसात उभारणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, परवाच या विषयावर चर्चा झालेली आहे. त्यावेळी मी असे उत्तर दिले होते की, एका महिन्याच्या आत यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल. सरकार पतसंस्थांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेऊन ऑडिट फी कमी करण्यासंदर्भात निर्णय घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिवा या अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेने त्यांच्या मागण्यांसंदर्भात शासनाकडे वेळोवेळी निवेदनाद्वारे केलेली मागणी

मु.शी.: शिवा या अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेने त्यांच्या मागण्यांसंदर्भात शासनाकडे वेळोवेळी निवेदनाद्वारे केलेली मागणी याबाबत सर्वश्री पांडुरंग फंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरुपसिंग नाईक (विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "शिवा या अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेने त्यांच्या मागण्यांसंदर्भात शासनाकडे वेळोवेळी निवेदनाद्वारे केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लिंगायत वाणी आणि लिंगायत यांची वीरशैव संघटनेच्यावतीने 14 मार्च रोजी माननीय उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या काही मागण्या मान्य करुन त्या संबंधित विभागाकडे पाठविण्यासंबंधी त्यांना ठोस आश्वासन दिले होते. निवेदनाच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, लिंगायत वाणी व लिंगायत या जातीसह उपजातीचा इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग अशा त्या त्या प्रवर्गात समावेश करण्याबाबतची मागणी राज्य मागासवर्ग आयोगाकडे दिनांक 29 डिसेंबर, 2008 रोजी पाठविण्यात आलेली आहे. सदरहू आयोगाकडून सर्वेक्षण अहवाल अप्राप्त आहे. आयोगाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल." सभापती महोदय, साधारणत: हा अहवाल शासनाकडे किती दिवसात येईल आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी घेतलेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे आपण विविध विभागांकडे ज्या सूचना पाठविल्या होत्या त्याची अंमलबजावणी झालेली आहे काय ? त्या सूचना किती होत्या आणि त्यापैकी किती सूचनांची अंमलबजावणी झालेली आहे ?

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, आयोगाकडून सर्वेक्षण अहवाल प्राप्त व्हायचा आहे. आयोगाने त्या संघटनांकडे नमुना पाठविलेला आहे. अजून त्या नमुन्यामध्ये माहिती आलेली नाही. नमुन्यामध्ये माहिती आल्यानंतर आयोगाच्या शिफारशी शासनाकडे येतील. त्याप्रमाणे त्या संघटनेने फॉर्म भरुन दिलेला नाही. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांकडे यासंदर्भात ज्या बैठका झाल्या त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी जे निर्देश दिलेले आहेत ते मी वाचून दाखवितो. पहिली मागणी अशी आहे की, महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत प्रस्ताव रोजगार व स्वयंरोजगार विभागाने तयार करुन मंत्री महोदयांकडे सादर करावा. अद्याप असा प्रस्ताव रोजगार हमी विभागाने तयार केलेला नाही. दुसरी मागणी अशी आहे की, राज्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे पंचायार्थ मठ संस्था आणि विरस्थ मठे यांच्या व्यवस्थापनासंबंधी सूचना केली होती. विधी व न्याय विभागाने अजून याबाबतीत निर्णय घेतलेला नाही. तिसरी मागणी अशी होती की, विधानसभा परिसरात पुतळा उभारण्यासाठी माननीय विधानसभा अध्यक्ष यांची अनुमती घेण्यासाठी माननीय उपमुख्यमंत्री यांच्या स्तरावर पत्र पाठविण्यात येईल. हे सामान्य प्रशासन विभागाचे काम आहे. लवकरात लवकर कार्यवाही होईल असे उत्तर आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, दिनांक 6 सप्टेंबर, 2007 आणि 14 मार्च, 2008 रोजी जी बैठक झाली त्या बैठकीत माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या.

यानंतर श्री.भोगले .....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..... निवेदन क्रमांक-4....

मागण्या मान्य झाल्यानंतर आता मार्च, 2008 ते जून, 2009 पर्यंत एक वर्षापेक्षाही अधिक काळ उलटून गेला. कोणत्याही विभागांकडून यावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यांची मागणी होती की, बसवेश्वर महामंडळ स्थापन करण्यात यावे. या जातीचा ओबीसीमध्ये समावेश करा. किमान या दोन मागण्या तरी मान्य झाल्या पाहिजे होत्या. बसवेश्वर महामंडळ स्थापन करण्याबाबतची मागणी आहे त्यासंबंधी मंत्रीमहोदय ताबडतोब निर्णय जाहीर करतील काय? कपिलधारा या क्षेत्राचा विकास करण्यासाठी निधी मंजूर करणार आहात काय?

श्री.सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, हे जे विषय आहेत त्यामधील ओबीसीमध्ये समावेश करण्यासंबंधीचा विषय हा फक्त या विभागाशी निगडित असून इतर विषय या विभागाशी निगडित नाहीत. त्यामुळे आम्ही संबंधित विभागांकडे पाठपुरावा करु. दुसरे काही करु शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेत प्रवेश मिळणे

मु. शी. : 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेत प्रवेश मिळणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेत प्रवेश मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हे उत्तर पूर्णत: दिशाभूल करणारे आहे. निवेदनात म्हटले आहे की, मुंबई विभागातून 96387 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यानंतर निवेदनात जागेचे वाटप सांगितले आहे त्यात वाणिज्य 7377व जागा आहेत असे नमूद केले आहे. जे आडाखे बांधले आहेत त्याला कोणताही बेस नाही. काही विद्यार्थी बहि:स्थ विद्यापीठांमध्ये ॲडमिशन घेतील, 12 वी नंतर काही विद्यार्थी शिक्षण सोडून देतात, 2/3 विद्यार्थी आणखी कुठे ॲडमिशन घेतात असेही नमूद केले आहे. कॉम्प्युटर सायन्स, बी.एससी (आयटी) च्या किती जागा आहेत हे सांगितले आहे. हे जे प्रमाण दाखविले आहे ते फेल ठरले, जास्तीत जास्त विद्यार्थी कॉमर्सकडे वळले तर ही प्रवेश यंत्रणा कोलमडून पडेल अशी भीती वाटते म्हणूनच ही 93 ची सूचना मी उपस्थित केली होती. 12 वी नंतर शिक्षण न घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शासनाकडे उपलब्ध आहे का? किती विद्यार्थी इतर विद्यापीठात बहि:स्थ विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत आहेत? प्रवेशासाठी जागा शिल्लक राहिल्या तर नवीन तुकड्यांना मान्यता दिली जाईल का? ती देताना त्यांची फी नियंत्रणात ठेवणार का?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जी महाविद्यालये नवीन तुकड्यांसाठी विद्यापीठाकडे मागणी करतील त्यांना नवीन तुकडयांसाठी परवानगी देऊ. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये जे पदवी अभ्यासक्रम चालविले जातात, तेथे बहि:स्थ विद्यार्थी म्हणून बाहेरील व राज्यातील लोक प्रवेश घेतात. मी सभागृहाला खात्री देऊ इच्छितो की, आपला जो अनुभव आहे त्यानुसार 12 वी नंतर विद्यार्थी बी.एम.एस., बी.एससी (आयटी), लॉ, अकाऊंट अँड फायनान्स, बँकिंग इन्शुरन्स आणि इतर कोर्सेसकडे वळतात. आपल्याकडे 1.80 लाख जागा उपलब्ध असल्यामुळे काही अडचण येणार नाही. अडचण आली तर नवीन तुकड्यांना परवानगी देऊ. येत्या सहा दिवसात नवीन महाविद्यालयांना आपण कॉमर्ससाठी परवानगी देत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : भटक्या व विमुक्त जातीच्या तरुणांना हवाई वाहतूक व आदरातिथ्य क्षेत्रात नोकऱ्यांची संधी मिळणे

मु. शी. : भटक्या व विमुक्त जातीच्या तरुणांना हवाई वाहतूक व आदरातिथ्य क्षेत्रात नोकऱ्यांची संधी मिळणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरुपसिंग नाईक (विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याणमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते यांनी "भटक्या व विमुक्त जातीच्या तरुणांना हवाई वाहतूक व आदरातिथ्य क्षेत्रात नोकऱ्यांची संधी मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, हवाई वाहतूक आणि आदरातिथ्य क्षेत्रात मोठया प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध झाल्यामुळे भटक्या व विमुक्त समाजाच्या तरुणांमध्ये या क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत म्हणून हवाई वाहतूक व आदरातिथ्य क्षेत्रातील व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमासाठी भटक्या व विमुक्त जातीतील तरुणांना प्रवेश मिळावा अशी मागणी आम्ही काही दिवसापूर्वी केली होती. सरकारने धोरण जाहीर केले त्यानुसार हा पदविका अभ्यासक्रम भटक्या व विमुक्त जातीसाठी सुध्दा आदिवासींप्रमाणे लागू करु, एका वर्षात आवश्यक ती यंत्रणा उभी करु असे शासनाने सांगितले होते. आता दोन वर्षे होऊन गेली. शासनाने अद्याप निधी दिला नाही. यंत्रणा उभी केली नाही. भटक्या व विमुक्त जातीसाठी असलेली ही योजना गुंडाळण्याचा सरकारचा मनोदय आहे का? ही योजना लागू करण्यासाठी टाईम बाऊंड कार्यक्रम जाहीर करणार आहात का? यावर्षी हा अभ्यासक्रम सुरु होईल का?

2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरुपसिंग नाईक : सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी म्हणजे खऱ्या अर्थाने हे केले पाहिजे या मताचा मी आहे म्हणून जेवढ्या लवकर हे करता येईल तेवढ्या लवकर करण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, मी टाईम बाऊंड कार्यक्रम घेऊन करणार काय अशी विचारणा केली आहे. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी किती दिवसात करणार हे सांगितलेच नाही.

उपसभापती : आता मी निवेदन क्र. 7 चर्चेला घेत आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

उपसभापती : निवेदन क्र. 8, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक असा कालावधी सांगितलेला नाही. त्यांनी कृपया किती कालावधी करणार हे सांगावे.

श्री. सुरुपसिंग नाईक : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन जेवढ्या लवकर करता येईल तेवढ्या लवकर हे करण्याचा प्रयत्न करु.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागा सोडून बोलत असतात.)

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी आपणास हवे तेच उत्तर दिले पाहिजे, असा आग्रह धरणे योग्य नाही. मी निवेदन क्र. 9 चर्चेला घेत आहे.

(गोंधळ)

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आपण माननीय मंत्री महोदयांना निदेश द्यावेत अशी आमची विनंती आहे.

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांना मी दोन वेळा उत्तर देण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी दोन वेळा उत्तर सुध्दा दिले. त्यांनी काय उत्तर द्यावे हे मी त्यांना सांगू शकत नाही, ते त्यांनीच ठरवायचे असते.

श्री. मधुकर चव्हाण (जागेवरुनच बोलतात) : लोक आपल्याला मते देतात म्हणून सत्तेचा माज आला आहे काय ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांना मी अशी सूचना करु इच्छितो की, किमान एक वर्षाच्या आत तरी याबाबत आपण कार्यवाही करावी.

श्री. सुरुपसिंग नाईक : महोदय, आपल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्या वक्तव्याला हरकत घेत ते कामकाजातून काढून टाकण्याची मागणी करतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी "तुम्हाला सत्तेचा माज आला आहे काय" अशा प्रकारचा जो शब्दप्रयोग केला तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल आणि पुन्हा अशा प्रकारचे शब्द त्यांनी सभागृहात वापरु नयेत, असेही त्यांना सांगण्यात येत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्री महोदयांनी किमान कालावधी तरी सांगावा.

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांना मी तसे निदेश दिले आहेत.

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, आपण निदेश दिल्याबद्दल मी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने आपले आभार व्यक्त करतो.

.....3

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/

पृ. शी. : चौंडी विकास प्रकल्पांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थानाचा विकास करणे

मु. शी. : चौंडी विकास प्रकल्पांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थानाचा विकास करणे याबाबत सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, यांनी "चौंडी विकास प्रकल्पांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थानाचा विकास करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी गेल्या पाच वर्षापासून चौंडी विकासाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करीत आहे. युतीचे शासन असतांना या योजनेचे काम 90 टक्के पूर्ण झाले होते परंतु या आघाडी शासनाने गेल्या 8 वर्षामध्ये या योजनेसाठी एक फुटकी कवडी सुध्दा न दिल्यामुळे चौंडी विकास प्रकल्पांतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळाचे विकास काम आता पडावयास आलेले असून या ठिकाणी गवत उगवलेले आहे. या ठिकाणी कुत्रे आणि ढोरे सुध्दा बसलेली असतात. या योजनेसाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल असे तत्कालीन वित्त मंत्री यांनी मार्च 2008 मध्ये अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळी सांगितले होते परंतु अजून पर्यंत या कामाला फुटकी कवडी सुध्दा दिलेली नाही. या अधिवेशनामध्ये सुध्दा या कामासाठी काहीही तरतूद केलेली नाही. आता निवडणुकीच्या तोंडावर माननीय मंत्री श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी शिल्पसृष्टीचा प्रकल्प सुरु करुन त्या प्रकल्पाचा नारळ सुध्दा फोडलेला आहे. या कामासाठी जे पैसे दिले जाणार होते ते पैसे या शिल्पसृष्टीकडे वळविलेले आहेत. त्यामुळे चौंडी विकास प्रकल्पासाठी किती निधी दिला जाणार आहे व हा प्रकल्प केव्हा पूर्ण होणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी कृपया सभागृहाला द्यावी.

श्री. सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगांव असणा-या अहमदनगर जिल्हयातील चौंडी येथील स्मारकाचे जतन आणि विकास करण्यासाठी यावर्षी 2 कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात येईल अशी तत्कालीन वित्त मंत्री यांनी मार्च 2008 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषणा केली होती. त्यानंतर दिनांक 24.2.2009 रोजी शासनाने एक जीआर काढून त्यास प्रशासकीय मान्यता सुध्दा दिलेली होती. या कामाच्या निविदा काढल्या असून कामास सुरुवात देखील झालेली आहे. जे काम झालेले आहे त्यासंदर्भातील फोटोग्राफ्स माझ्याकडे आहेत ते मी आपल्या माहितीसाठी पाठवितो. आता हे काम प्रगतीपथावर असून या कामासाठी जो टाईम लिमिट दिलेला आहे त्या टाईम लिमिटमध्येच हे काम पूर्ण होणार आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शासनाने आपल्या मर्जीतील निवडक शाळांना अनुदान देऊन अन्य पात्र शाळांना अनुदानापासून वंचित ठेवणे

मु. शी. : शासनाने आपल्या मर्जीतील निवडक शाळांना अनुदान देऊन अन्य पात्र शाळांना अनुदानापासून वंचित ठेवणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण व भगवानराव साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण व भगवानराव साळुंखे यांनी "शासनाने आपल्या मर्जीतील निवडक शाळांना अनुदान देऊन अन्य पात्र शाळांना अनुदानापासून वंचित ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील विना अनदानित तुकडयांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने प्रोसिजर निश्चित केलेली आहे. जिल्हा स्तरावर, विभाग स्तरावर शिक्षण समित्यांच्या माध्यमातून मुल्यांकन केले जाते व ते प्रस्ताव शिक्षण संचालकांकडे येतात. शिक्षण संचालकांच्या माध्यमातून सदर प्रस्ताव शासनाकडे येत असतात व त्यानंतर मग शासन संपूर्ण प्रस्तावाच्या आधारे कोणत्या तुकडया पात्र आहेत व कोणत्या तुकडया अपात्र आहेत याचा निर्णय घेते. उत्तरात म्हटले आहे की, "सन 2007-08 या वर्षामध्ये राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांतील 636 तुकडयांना अनुदानास पात्र ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालनालयातर्फे शासनास प्राप्त झाला होता". सभापती महोदय, यासाठीच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झालेल्या आहेत. कोणत्या तुकडया अनुदानास पात्र आहेत व कोणत्या तुकडया अनुदानास पात्र नाहीत याचा निर्णय झालेला असून राज्य शासनाने राज्य स्तरावर निर्णय घेतांना ज्या तुकडया पात्र आहेत त्यांना अपात्र ठरविले असून ज्या तुकडया अपात्र आहेत त्यांना पात्र ठरविलेले आहे. आपल्या मर्जीतील शाळांना अनुदान दिले गेले आहे. ज्या शाळा पात्र आहेत त्यांचे देखील अनुदान वगळलेले आहे.

यानंतर सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

शिक्षण संचालक यांच्याकडून आलेल्या यादीची पुन्हा एकदा तातडीने पडताळणी करुन ज्या तुकडयांना पात्र समजण्यात आले आहे त्यांना अनुदान देणार काय? ज्यांना अपात्र घोषित केले आहे, त्यांना अनुदान मंजूर केले त्यांचा फेरविचार करणार काय? आणि अल्पसंख्यांक शाळांच्या बाबतीत या राज्यात अन्याय केला जात आहे. त्यांना आरक्षणाची तरतूद लागू नाही, परंतु आरक्षण पूर्ण नाही म्हणून त्या प्राथमिक शाळांतील वर्ग तुकडयांना अनुदानापासून वंचित ठेवले आहे. अशाप्रकारे एकेका शाळेमध्ये दहा ते अकरा वर्ग आहेत. विभूती प्रकाशानंद या अल्पसंख्यांकांच्या शाळेचा प्रस्ताव गेल्या अकरा वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असतांना त्यांना अनुदान दिले जात नाही. या सर्व गोष्टींचा तातडीने आढावा घेऊन एक महिन्याच्या आत निर्णय घेणार काय?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान देण्याचा निर्णय शासन निर्णय दि.8 नोव्हेंबर 2000 अन्वये निश्चित झाला. त्यानुसार जिल्हयातून शिक्षणाधिकारी, सह संचालक आणि संचालक यांचेमार्फत प्रस्ताव शासनाकडे आल्यानंतर त्याची तपासणी करण्याचे अधिकार शासनाला असल्यामुळे या स्तरावर पात्र आणि अपात्रतेचा विचार केला जातो. आणि जर ते पात्र आणि अपात्रतेच्या निकषात बसत आहेत की नाहीत हे ठरविण्याचा अधिकार शासनाला आहे. तरीसुध्दा माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अशा ठिकाणी काही शाळा पात्र असतील त्यांना अपात्र ठरविले असेल किंवा अपात्र असतील त्यांना पात्र ठरविले असेल तर त्याबाबत निश्चितपणे शासन स्तरावर बैठक घेऊन त्यावेळी सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलाविण्यात येऊन त्यावर विचार करण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : माझा हरकतीचा मुद्दा आहे..

उपसभापती : आपला हरकतीचा मुद्दा नाही. प्रत्येक नियम 93 च्या सूचनेवर एकच प्रश्न विचारण्यास अनुमती दिली असल्यामुळे माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये स्वतंत्र सूचना देण्यास हरकत नव्हती. शासनाचे धोरण हे हिंदू आणि मुस्लिम यांच्याकरिता वेगवेगळे नसून ते सर्व समावेशक असते. त्यामुळे कुणीही वेगळी चूल मांडण्याची गरज नाही. माननीय सदस्यांनी उद्या स्वतंत्र नियम 93 अन्वये सूचना दिल्यास तिला अनुमती देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 23 शाळा अनधिकृत घोषित करणे

मु. शी. : मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 23 शाळा अनधिकृत घोषित करणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 23 शाळा अनधिकृत घोषित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, 24 अनधिकृत शाळांना नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत, त्या शाळा अनधिकृत असल्यामुळे त्यामधून विद्यार्थी बाहेर पडायला लागले आहेत . महानगरपालिकेकडे असलेल्या 386 भूखंडापैकी 72 शाळांचे भूखंड शाळा आणि मैदानासाठी आरक्षित आहेत. त्यामध्ये काही भूखंडाच्या बाबतीत विकासकांनी महानगरपालिकेच्या करामध्ये सूट घेऊन शाळा सुरु केली आहे. प्रश्न असा आहे की, या अनधिकृत शाळांमधील विद्यार्थी बाहेर पडले आहेत. त्या शाळांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय? अनेक वर्षापासून त्या शाळा सुरु होत्या. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले.

दुसरा प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडामध्ये ज्या शाळा विकसित करण्यात आल्या आहेत त्यांच्या करारात महानगरपालिकेकरिता 10 टक्के कोटा राखीव आहे असे म्हटले आहे. महानगरपालिकेने या विद्यार्थ्यांना त्याठिकाणी पाठविल्यास त्या त्या शाळांमध्ये या मुलांना प्रवेश दिला जाईल काय?

श्री. नाना पंचबुध्दे : मीरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये 24 अनधिकृत शाळा घोषित केल्या होत्या. त्यापैकी पाच शाळांना शासनाची मान्यता प्राप्त झाली. त्यापैकी 3 शाळांना नोटिस बजाविण्यात आली. त्यामुळे 16 शाळा बंद करण्यासाठी पुन्हा शाळांना नोटिस देण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी महानगरपालिकेची जी जागा आहे त्या जागांवर अनधिकृत शाळा बांधून तेथील जागा पटांगणासाठी सुध्दा वापरण्यात येते त्याबाबत उल्लेख केला आहे. त्याबाबत महानगरपालिकेला निश्चितपणे कळविण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. त्या शाळांमध्ये महानगरपालिकेला त्यांच्या ॲग्रीमेंटप्रमाणे 10 टक्के कोटा दिलेला आहे. महानगरपालिकेने या अनधिकृत शाळेतून ज्या मुलांना बाहेर काढलेले आहे किंवा अन्य जे विद्यार्थी आहेत, त्यांना जर रेकमेंड करण्यात आले तर संबंधित शाळांना या मुलांना प्रवेश दिला पाहिजे. तसा तो दिला जाईल काय ? जर या शाळांनी मुलांना प्रवेश दिला नाही तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ? कारण या शाळा महानगरपालिकेच्या भूखंडावरील शाळा आहेत, ते करोडो रुपये कमवत आहेत. परंतु गरीब मुलांना तेथे प्रवेश दिला जात नाही. तसा तो देण्यात यावा म्हणून महानगरपालिकेने त्यांच्याशी ॲग्रीमेंट केलेले आहे. जर या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला नाही तर त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

उपसभापती : याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी जे सांगितले, ते एकदम बरोबर आहे. महानगरपालिकेच्या भूखंडावर ज्या खाजगी शाळा आहेत, त्यांनी महानगरपालिकेला एक विशिष्ट कोटा ठरवून द्यावा. कारण महानगरपालिका क्षेत्रामध्ये गोरगरिबांची बरीच मुले शिकत असतात. त्यामुळे महानगरपालिकेचे हे उत्तरदायित्व आहे की, ज्या गोरगरीबांची मुले या शाळेमध्ये येतात, त्यांना योग्य शिक्षण देणे. आपण हे भूखंड अशा प्रकारच्या खाजगी संस्थांना देतो. ज्याप्रमाणे राज्य शासनाने जागा दिलेल्या हॉस्पिटलमध्ये गरीब रुग्णांचा कोटा ठेवण्यात येत असेल किंवा आपण त्यांना तसे ठेवण्यास भाग पाडत असू. तर मग महानगरपालिकेच्या जागेवर ज्या-ज्या खाजगी शाळा आहेत, त्यांच्यावर देखील अशा प्रकारचे बंधन घालण्यात यावे की, जेणेकरुन त्या शाळेमध्ये गोरगरीब लोकांची मुले देखील जाऊ शकतील. आपण अशा प्रकारची ताबडतोब एखादी तरतूद करावी. जर अशा प्रकारची तरतूद केली नसेल तर ती करण्यात यावी. पण अशा प्रकारच्या शाळांमध्ये गोरगरीब लोकांच्या मुलांना प्रवेश देण्यास भाग पाडण्यात यावे.

श्री.नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, होय.

. . . .2 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रिलायन्स एनर्जीने केलेल्या वीज दरवाढीच्या विरोधात शिवसेनेने काढलेला मोर्चा.

मु.शी. : "रिलायन्स एनर्जीने केलेल्या वीज दरवाढीच्या विरोधात शिवसेनेने काढलेला मोर्चा"याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नसीम खान (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "रिलायन्स एनर्जीने केलेल्या वीज दरवाढीच्या विरोधात शिवसेनेने काढलेला मोर्चा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .2डब्ल्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझे दोन छोटे प्रश्न आहेत. रिलायन्स एनर्जीच्या विरोधामध्ये दि.08-06-2009 रोजी शिवसेनेने जो मोर्चा काढला होता, त्यामध्ये आंदोलकांवर जो लाठीहल्ला करण्यात आला. याला जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर आम्ही कारवाई करु असे आम्हाला उत्तर देण्यात आले होते. त्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई करणार आहात काय ? तसेच श्रीमती सुभद्रा कदम यांनी त्यांचा डोळा गमावलेला आहे. शासन त्यांना कोणती नुकसान भरपाई देणार आहे ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, याठिकाणी कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण ज्या प्रकारचा मोर्चा काढण्यात आला होता, त्यावेळी बरीच गर्दी होती आणि ती गर्दी बेकाबू झाली होती. तसेच त्यावेळी पोलिसांच्या गाडीवर आणि खाजगी स्विप्टवर दगडफेक करण्यात आली, जाळपोळ करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधूराच्या सहाय्याने तेथील परिस्थितीवर कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला आहे. नंतर पोलिसांवर सुध्दा दगडफेक करण्यात आली. एक डी.सीपी., ए.सी.पी., पी.आय.ई., डब्ल्यु.पी.सी., उपायुक्त-1, उपनिरीक्षक-4, पोलीस शिपाई-2, होम गार्ड-1, महिला होमगार्ड-9 इतके लोक यामध्ये जखमी झालेले आहेत. तसेच याठिकाणी 6 लाख 50 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत नुकसान भरपाईची तरतूद नाही. तसेच दुसरी काही कारवाई करण्याची मला गरज वाटत नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता की, श्रीमती सुभद्रा कदम यांनी त्यांचा डोळा गमावलेला आहे. शासन त्यांना कोणती नुकसान भरपाई देणार आहे ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सदरहू प्रकरणामध्ये श्रीमती सुभद्रा कदम या आरोपी आहेत. त्यामुळे आरोपिंना अशा प्रकारे नुकसान भरपाई देण्याची तशी काही तरतूद नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, त्या बाई बाजूला बसलेल्या होत्या.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.नसीम खान : सभापती महोदय, श्रीमती सुभ्रद्रा कदम यांच्यावर शासकीय रुग्णालयामध्ये इलाज सुरु आहे आणि त्यांची प्रकृती चांगली आहे. मी आजच ही माहिती घेतलेली आहे. पण याठिकाणी नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत धोरणामध्ये तरतूद नसल्यामुळे ते करता येणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण स्वत: शासनाला पोलीस स्टेशन बांधण्यासाठी निदेश दिले होते. त्यावरुन दंगल झाली होती. तेव्हा दंगल करणाऱ्या लोकांना ताबडतोब एक तासाचा उशीर न करता एक लाख रुपयांची मदत जाहीर केली. त्याबाबत आम्ही काही बोललो नाही आणि येथे मात्र या लोकांना दंगलखोर म्हणत आहात. समजा असले तरी सुध्दा या महिलेचा कायमचा डोळा गेलेला आहे. त्याबाबतीत शासन काय मदत करणार आहे ? हा प्रश्न आहे. तर माननीय मंत्री महोदय त्यांना दंगलखोर म्हणत आहेत. मग तुम्हाला असे काही लिहून दिलेले आहे काय ? की, अल्पसंख्यांकांनी दंगल करावयाची आणि मदत घ्यावयाची आणि बाकीच्यांनी असेच मरावयाचे. असे या सरकारचे धोरण आहे काय ? आपली बोलण्याची ही पध्दत बरोबर नाही.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, या शासनाने पक्षपातीपणाचे धोरण स्विकारलेले नाही. या अनुषंगाने जो आरोप करण्यात आलेला आहे, तो चुकीचा आहे, निराधार आहे. तशा प्रकारची तरतूद नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, आपण सुध्दा सत्तेमध्ये होतात. आपल्याला सर्वांना माहिती आहे की, ...

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. अशा प्रकारे नुकसान भरपाई देण्याची काही तरतूद नाही. पण जर अशा प्रकरणांमध्ये कोणाला मदत करावयाची असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहाय्यता निधीच्या माध्यमातून ती करता येईल. तशा प्रकारे आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे . . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. तुम्ही फक्त तुमचेच म्हणणे मांडणार का ? जरा माझे ऐकून घ्यावे.

यानंतर श्री.बरवड . .. .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसिम खान ....

(अडथळा) सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. तशा प्रकारचे निवेदन करावे. पाहिजे तर माननीय मुख्यमंत्र्यांकडे आम्ही आपल्यासोबत येऊ आणि त्यामध्ये मदत करु.

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 11 बाबत

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे हे निवेदन उद्या घेण्यात यावे.

उपसभापती : ठीक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्रातील विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे 100 टक्के शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी इत्यादीची प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता

मु. शी. : महाराष्ट्रातील विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे 100 टक्के शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी इत्यादीची प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरुपसिंग नाईक (विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "महाराष्ट्रातील विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे 100 टक्के शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी इत्यादीची प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, हे निवेदन इतर मागासवर्गीयांवर अन्याय करणारे आहे. 1998-99 पासून 2003-04 पर्यंत म्हणजे पाच वर्षे केंद्र सरकारच्या धर्तीवर इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती, परीक्षा शुल्क वगैरे देण्यात आलेले नाही ही अत्यंत अशोभनीय बाब आहे. या निवेदनामध्ये जे निकष लावलेले आहेत त्यामध्ये पहिल्या निकषामध्ये (अ) मध्ये असे म्हटले आहे की, ज्या इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांनी अनुदानित वा शासकीय व्यावसायिक महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे त्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी दिली जाते. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु (ब) मध्ये इतर मागासवर्गाच्या बाबतीत जी विसंगती आहे ती दु:खदायक आहे. ज्या इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांनी विना अनुदानित / कायम विनाअनुदानित व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयात शासकीय कोट्यातून प्रवेश घेतला आहे, त्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती अदा केली जाते. म्हणजे ज्यांनी शासकीय कोट्यातून प्रवेश घेतला त्यांना आपण दिले. पण ज्या इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासकीय कोट्यातून प्रवेश घेतला नाही, ज्यांनी खाजगीमधून प्रवेश घेतला किंवा डायरेक्ट खाजगी संस्थेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असेल, अनेक ठिकाणी केंद्रीय पध्दत नाही. उदा. डिप्लोमा इन फॉर्मसीमध्ये डायरेक्ट प्रवेश सुरु आहेत आणि त्याची खात्याकडून मंजुरी येते, असे व्यावसायिक शिक्षण घेतले जाते त्या विद्यार्थ्यांना 100 टक्के केंद्राच्या निदेशानुसार, धोरणानुसार आणि जी.आर.नुसार 100 टक्के शिष्यवृत्ती, शिक्षण फी आणि परीक्षा फी देणार काय ? या ठिकाणी 50 टक्के असे म्हटले आहे. आमची अशी मागणी आहे की, ते 100 टक्के द्यावे. आपण 100 टक्के देणार काय ?

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली ती माझ्या मते योग्य आहे आणि ते केले पाहिजे म्हणून मी मंत्रिमंडळापुढे हा विषय घेऊन जाईन. त्या ठिकाणी जो निर्णय होईल त्याप्रमाणे ते करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मानीव किंवा एकतर्फी हस्तांतरणाच्या कायद्याच्या अनुषंगाने नियम करण्यास होत असलेला विलंब

मु. शी. : मानीव किंवा एकतर्फी हस्तांतरणाच्या कायद्याच्या अनुषंगाने नियम करण्यास होत असलेला विलंब यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सहकारी गृहनिर्माण संस्थांना व त्यामध्ये राहणाऱ्या सदनिकाधारकांना दिलासा देणारा मानीव किंवा एकतर्फी हस्तांतराचा (डिम्ड कन्वेअन्स) कायदा तीन वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर गत वर्षीच्या हिवाळी अधिवेशनात मंजूर करणे, मा.राष्ट्रपतींची त्यावर स्वाक्षरी झाल्यानंतर दिनांक २५ फेब्रुवारी, २००८ रोजी तो राजपत्रात प्रसिध्द होणे, परंतु सुमारे १० महिने झाले तरी अशा हस्तांतराची नेमकी प्रक्रिया व नियमावली ठरविण्यास विलंब होत असल्यामुळे सामान्य माणसाच्या हितासाठी केलेल्या सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, बिल्डर लॉबीच्या दबावाखाली व शासनाच्या निष्क्रियतेमुळे ही नियमावली होण्यास विलंब होणे, या संबंधिचे अधिकार सक्षम अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधकांना (सहकारी संस्था) देण्यासंबंधीची अधिसूचना काढण्यात येणे, परंतु, या संबंधीची नियमावली न झाल्यामुळे जिल्हा उपनिबंधकाकडे एक लाखाहून अधिक अर्ज सहकारी गृहनिर्माण संस्था व सदनिकाधारकांनी दाखल करुनही अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही व निर्णय होत नसल्यामुळे लाखो सदनिकाधारकांवर स्वत:च्या मालकीच्या घरात भाडेकरु म्हणून राहण्याची वेळ येऊन मालकी हक्कापासून वंचित रहावे लागणे, शासनाचे या संदर्भात होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी संबंधित सदनिकाधारकांच्या मनात शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही तथा शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण आम्हाला आता न्याय आणि संरक्षण दिले पाहिजे. 2005 साली या ठिकाणी कन्व्हेयंसचे बिल आले होते परंतु बिल्डरांच्या दबावामुळे सुमारे पाच वर्षे ते बिल मंजूर झाले नाही. नंतर 2007 च्या डिसेंबरमध्ये हे विधेयक या ठिकाणी मंजूर झाले. लाखो सदनिकाधारक जे सहकारी सोसायट्यांमध्ये राहतात त्यांचा छळ बिल्डरांनी गेली 20-25 वर्षे चालविला आहे आणि म्हणून ते बिल आल्यावर या ठिकाणी मंजूर झाले. सुध्दा 16 मार्च, 2007 रोजी जेव्हा या ठिकाणी चर्चा झाली त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी हे फार रेगाळत राहिले होते त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. 25 फेब्रुवारी, 2008 रोजी माननीय राष्ट्रपती महोदयांनी कन्व्हेयंस बिलावर सही करुन महाराष्ट्र शासनाकडे परत पाठविले. पण त्याची नियमावली गेले एक वर्ष झालेली नाही. परवा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एका विषयावरील आपल्या भाषणात आरोप केला की, ती नियमावली होऊ नये म्हणून सुमारे 500 कोटी रुपये मंत्रालयामध्ये दिले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

कारण त्यांचा एफएसआय शिल्लक आहे. या लक्षवेधीचे निवेदन संतापजनक आहे. यासंबंधी 23 जून, 2008 रोजी अधिसूचना काढण्यात आली आहे. माननीय राष्ट्रपती महोदयांनी शासनाकडे दि.25 फेब्रुवारी रोजी हे विधेयक पाठविल्यानंतर दिनांक 23 जून, 2008 पर्यंत अधिसूचना का काढण्यात आली नाही, कोणत्या बिल्डरचा किंवा बिल्डर लॉबीचा शासनावर दबाव होता ? यासबंधी नियमावली तयार करण्यासाठी दि.4 सप्टेंबर, 2008, दि.25.9.2009 व दि.30.9.2008 अशा वेगवेगळया दिवशी बैठका झालेल्या आहेत. तरी देखील गेले वर्षभर नियमावली का तयार करण्यात आली नाही ?

दुसरा प्रश्न असा आहे की, या निवेदनात शेवटी असे नमूद केले आहे की, "त्यानुसार नियमांना अंतिम स्वरुप देण्याची पुढील कार्यवाही यथाशीघ्र करण्यात येत आहे". सभापती महोदय, आपण मघाशी 'सत्तेचा माज' असा शब्द रेकॉर्डवर आला होता तो काढून टाकला आहे, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. तो शब्द बरोबर नव्हता. परंतु सर्वसाधारण माणसाच्या हिताचे बिल गेली 5 वर्षे शासनाने रखडवून ठेवले आहे. त्याबाबत या सरकारला तनाची नाही, मनाची तरी लाज आहे काय, ही नियमावली होऊ नये म्हणून शासनावर कोणाचा दबाव आहे काय ? नियमावली होऊ नये म्हणून बिल्डर मंत्रालयामध्ये लाखो रुपयांच्या थैल्या घेऊन फिरत आहेत. 10 खोल्यांच्या, 20 खोल्यांच्या छोटया छोटया सोसायटया आहेत त्यांना 20 वर्षे बिल्डर्स् छळत आहेत. त्या लोकांना बिल्डर्सच्या छळवणुकीतून सोडविणार आहात की नाही, मंत्रिमहोदयाबद्दल पूर्ण आदर ठेवून बोलतो. ही नियमावली का झाली नाही याची आपल्याला माहिती सुध्दा नसेल. राष्ट्रपती महोदयांनी सही करुन 1 वर्ष झाले आहे. 1 वर्ष झाल्यानंतरही ही नियमावली का तयार करण्यात आली नाही ? मागील डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये ही लक्षवेधी सूचना मांडली होती, आता पुन्हा सहा महिन्यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. म्हणून येत्या एक महिन्यात किंवा दोन महिन्यात ही नियमावली तयार करण्यात येईल असे आपण उत्तर द्याल काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती मांडली आहे. नियमावली तयार करण्यास उशीर झाला आहे.

श्री.दिवाकर रावते : मंत्रालयात बिल्डर 500 कोटी रुपये घेऊन फिरत आहेत ही वस्तुस्थिती मंत्रिमहोदयांना मान्य आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती मांडली आहे. परंतु मी शासनाची भूमिका मांडत आहे. बिल्डरने मंत्रालयात कोणाला पैसे दिल्याबाबतची तक्रार आलेली नाही किंवा शासनाच्या असे निदर्शनासही आलेले नाही. शासनाने याबाबत कार्यवाही केलेली आहे हे सन्माननीय सदस्यांनीच मान्य केलेले आहे. ही कार्यवाही करीत असताना याला उशीर का लागला असा त्यांनी प्रश्न विचारला आहे. ही नियमावली तयार करीत असताना महसूल विभाग, वन विभाग, सहकार विभाग, नगरविकास विभाग या तिन्ही खात्यांबरोबर चर्चा करुन नियम तयार करावयाचे होते. या बैठकीमध्ये ज्या काही सूचना आल्या होत्या त्या सहकार विभागाकडे पाठविल्या होत्या. परंतु सहकार विभागाकडूनही सूचना करण्यात आल्या आहेत. या सर्व सूचना एकत्रित करुन दिनांक 13.5.2009 रोजी विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविल्या आहेत. त्यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : 'काँग्रेस का हाथ, आम आदमी के साथ' अशी घोषणा देऊन या सरकारने सत्ता मिळविली. त्या इमारतींमध्ये सामान्य माणसे रहात आहेत, त्या लोकांना बिल्डर्स छळत आहेत. एखादी बिल्डिंग असेल तेथे 2000 किंवा 500 चौ.फू.जागा असेल तर कन्व्हेन्स डिड झ ाल्यानंतर जमिनीसह अभिहस्तांतरण करुन त्या सोसायटीच्या हातामध्ये ती इमारत द्यायची असते. कॉमन माणसांचा इतका छळ करुन वरुन येथे लवकरात लवकर करु असे सांगणार ? सभागृहात बोलताना एखादा असंसदीय शब्द आमच्या तोंडून गेला तर तो कामकाजातून काढून टाकला जातो, पण सभागृहाच्या बाहेर आम्ही अनेक शब्द वापरतो ते कोण काढून टाकणार ? लोकांनी या शासनाला निवडून दिल्यानंतर शासनाने लोकांची अधिक काम केली पाहिजेत. या शासनाने महागाई वाढविली, पापे केली, लोकांना छळले तरी सुध्दा आमच्या आपापसातल्या भांडणामुळे हे शासन पुन्हा सत्तेत आले. तेव्हा या शासनाने अधिक दक्ष राहिले पाहिजे. हे बिल 2005 साली आले होते. मी त्यावेळी आरोप केला होता की, मला 25 लाख रुपये देण्यासाठी एक माणूस येथे आला होता. त्याबाबत सभापतींनी चौकशी केली होती. हे विधेयक घेऊ नये यासाठी हा दबाव टाकला गेला होता, परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी व आम्ही ते विधेयक चर्चेसाठी घेतले होते. त्याचे नियम तयार करण्यासाठी एक वर्ष लागते ? श्री.मनुकुमार श्रीवास्तव यांनी मुंबईची वाट लावणारे, मराठी माणसांची वाट लावणारे बिल तयार केले ते केवळ दोन महिन्यामध्ये आणले गेले.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

नियम तयार करायला आपण वर्ष लावता ? सामान्य माणसे कन्व्हेअन्स करण्यासाठी तुमच्याकडे भिका-यासारखी याचना करतात. या लोकांना 187 टक्के टॅक्स द्यावा लागणार आहे, वॉटर बेनिफिट टॅक्स द्यावा लागणार आहे. लोकांना 100 रुपया ऐवजी 700-800 रुपये मेण्टेनन्स द्यावा लागत आहे. सामान्य माणसाला छळताना तुम्हाला काही वाटत नाही काय ? हे बिल ब्लॅकमेलिंग करायला आणलेले आहे काय ? या सामान्य माणसांबद्दल तुम्हाला सहानुभूती वाटली पाहिजे, कणव वाटली पाहिजे. तेव्हा ज्या अधिका-यांनी नियम करण्यासाठी एक वर्ष लावले त्या अधिका-यांना रात्रंदिवस बसवून नियम तयार करुन घेण्यात येतील काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या ठिकाणी सूचना केलेल्या आहेत. मी सांगू इच्छितो की, प्रशासकीय कामामध्ये वेळ लागतो. नियम बारकाईने तयार करण्यासाठी वेळ लागतो. ही सर्व प्रोसेस पूर्ण झालेली आहे. दोन महिन्याच्या आत, आचारसंहिता लागण्यापूर्वी याबाबतीत निर्णय होईल.

श्री. दिवाकर रावते : या संबंधीचे विधेयक आले होते त्यावेळी ते विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत मी एकट्याने सूचना केली होती. कारण या विधेयकामध्ये मोठी गुंतागुंत आहे. हे विधेयक पारित न करण्यासाठी 25 लाख रुपये देऊ केले जात होते असे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले. या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी त्यावेळी एकटा उभा होतो. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना उपसूचना मांडायला लावली. या उपसूचनेमुळे जी गुंतागुंत निर्माण झालेली आहे त्याबाबतीत मी दोन सचिवांकडे गेलो होतो. हा प्रश्न महसूल खात्याचा असल्यामुळे सहकार खात्याने त्यासंदर्भात कार्यवाही का करावी असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी मी तत्कालीन सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना विनंती केली होती की, हा महसूल विभागाचा प्रश्न असल्यामुळे तुम्ही त्याबाबतीत आश्वासन देऊ नका. सभापती महोदय, कोणत्याही कायद्याचे नियम झाल्यानंतर ते नियम समितीकडे चिकित्सेसाठी पाठविले जातात. नियम समितीमध्ये नियमांचा अभ्यास केला जातो, पडताळणी केली जाते आणि नियम समितीने ते नियम मान्य केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी होते. तेव्हा नियम समितीकडे हे नियम जाणे, नियम समितीने नियमांना मान्यता देणे आणि नंतर त्यांची अंमलबजावणी होणे, ह्या गोष्टी दोन महिन्यामध्ये पूर्ण होतील काय ? हा प्रश्न एवढा गुंतागुंतीचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

झालेला आहे की तो सुटणे कठीण झालेले आहे. तेव्हा दोन महिन्यामध्ये या नियमांची अंमलबजावणी करणार काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : हे नियम विधी व न्याय विभागाकडून आल्यानंतर ते अमलात येणार आहेत.

डॉ. दिवाकर रावते : हे नियम, नियम समितीकडे पाठवून ते मान्य करुन घ्यावे लागतात.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : नियम विधी व न्याय विभागाकडून आल्यानंतर कारवाई होईल.

श्री. दिवाकर रावते : बिल्डर 500 कोटी रुपये घेऊन फिरत आहेत असे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले. या बाबतीत सीआयडी चौकशी करण्यात येणार आहे काय ?

(उत्तर नाही)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुभद्रा कदम यांना माननीय उपसभापतींनी दिलेली मदत

डॉ. नीलम गो-हे : माझ्याकडे अशी माहिती प्राप्त झालेली आहे की, श्रीमती सुभद्रा कदम यांना विधानपरिषदेचे माननीय उपसभापती श्री. वसंतराव डावखरे यांनी 51 हजार रुपयाची मदत केलेली आहे. ते स्वत: भेट देण्यासाठी जाणार आहेत. याबद्दल मी माननीय उपसभापतींचे आभार मानते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई विद्यापीठाचे उप कुलसचिव श्री. प्रकाश गोसावी यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या अधिका-यांनी केलेली अटक

मु.शी. : मुंबई विद्यापीठाचे उप कुलसचिव श्री. प्रकाश गोसावी यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या अधिका-यांनी केलेली अटक यासंबंधी सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व केशवराव मानकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई विद्यापीठाचे उपकुलसचिव श्री. प्रकाश गोसावी यांना ठाणे जिल्ह्यातील बी.एड. कॉलेजच्या परवानगीसाठी रुपये चाळीस हजारांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २६ मे, २००९ रोजी अटक करणे, श्री. गोसावी यांच्या विरोधात यापूर्वी अफरातफरीच्या अनेक तक्रारी कुलगुरु डॉ.खोले यांच्याकडे आलेल्या असूनही कुलगुरु यांनी श्री. गोसावी यांच्यावर कारवाई करण्यास दिरंगाई करणे, श्री.गोसावी यांच्या आर्थिक अनियमिततेबाबत विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांनी सिनेट बैठकीत वारंवार तक्रारी करुनही विद्यापीठाने कारवाई न करणे, विद्यार्थी संघटना, प्राध्यापक संघटना, विद्यापीठाचे सिनेट सदस्य यांनी या प्रकरणात सी.बी.आय. चौकशीची मागणी केलेली असणे, तसेच विद्यापीठाच्या भ्रष्टाचार प्रकरणी अन्य उच्चपदस्थ अधिकारी सामील असल्याचा आरोप सदर संघटनांनी करणे, सदर प्रकरणात विद्यापीठातील सर्व उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाचे उप कुलसचिव श्री. प्रकाश गोसावी यांचे विरुध्द सिनेटमध्ये, सदस्यांनी तसेच विद्यार्थी संघटनेने विविध आरोप करुन देखील त्यांच्या विरुध्द शासनाकडून कारवाई का करण्यात आली नाही ? ॲन्टी करप्शनने त्यांना पैसे घेताना पकडेपर्यंत शासनाकडून कारवाई का केली गेली नाही? मुंबई विद्यापीठातील मान्यता म्हणजे ॲफिलिएशन देणाऱ्या विभागाचे प्रमुख श्री.गोसावी असताना मुंबईतील अनेक महाविद्यायातून विद्यापीठाला येणारी फी चे सुमारे दोन कोटी रुपये बाकी आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या समितीच्या बैठकांना श्री. गोसावी वारंवार मुद्दाम अनुपस्थित रहात असत. ते वारंवार अनुपस्थित रहात होते, त्या अनुषंगाने त्यांच्या विरुध्द शासनाकडून का कारवाई करण्यात आली नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, श्री.मधुकर चव्हाण यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर निवेदनातच दिले आहे. ही घटना घडली, त्याच्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई झाली आहे. प्राध्यापकांची किंवा विद्यार्थी संघटनेची तक्रारींची निवेदने विद्यापीठाला मिळालेले नव्हते. त्यामुळे त्यांचे विरुध्द कारवाई केली गेली नव्हती. परंतु ॲन्टीकरप्शन ब्यूरोच्या माध्यमातून त्यांना पकडले गेले. त्यानंतर त्यांचे विरुध्द निलंबनाची कारवाई देखील शासनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या संदर्भात एक सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. त्या समितीचा अहवाल एक महिन्यात येईल अशी अपेक्षा आहे. तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने त्यांचेवर पुढील कारवाई केली जाणार आहे. डीनच्या संदर्भात ॲकेडमिक कौन्सीलमध्ये वेगवेगळया वेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. आता हा जो निर्णय झाला आहे. निश्चितप्रकारे त्यांच्यावर ठोस कारवाई झालेली आहे. सभागृहात ॲफिलेशनच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे, त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, ॲफिलेशन किती दिवसात द्यावे यासंदर्भात सुध्दा खरे म्हटले तर विद्यापीठामध्ये अजून कुठलाही नियम नाही. कधी कधी वेगवेगळया कारणांनी, वेगवेगळया कमिटया करुन फस्ट व्हीजीट, सेकंड व्हीजीट करत करत उशीर होतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने निश्चितप्रकारे याबाबत काही ठोस कालावधीत ॲफिलिएशन काम नवीन महाविद्यालयाला उपलब्ध करुन देण्यात यावे अशा पध्दतीच्या सूचना सुध्दा राज्य शासनाच्या वतीने देण्यात येतील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी रोखून धरण्याची विधी व न्याय खात्याची नियमबाहय व बेकायदेशीर कृती

मु. शी. : राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी रोखून धरण्याची विधी व न्याय खात्याची नियमबाहय व बेकायदेशीर कृती यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर चव्हाण,नितीन गडकरी, विनोद तावडे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्याच्या विधानसभेत राज्य विधीमंडळाने मंजूर केलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी रोखून धरण्याच्या विधी व न्याय खात्याच्या नियमबाह्य व बेकायदेशीर कृती प्रकरणी यापूर्वी सभागृहात चर्चा होणे व त्यावर कार्यवाही सुरु असणे, विधीमंडळाने मंजूर केलेल्या सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ला मा.राज्यपाल महोदयांनी मंजूरी देऊन तो शासनाच्या राजपत्रात दिनांक २२ जानेवारी, २००४ रोजी प्रसिध्द करणे, सदर अध्यादेशामध्ये कलम ५ (१) अन्वये "पदोन्नतीमधील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर राहिल. " असे नमूद करण्यात येणे, कलम ३ व ४ अन्वये राज्यातील सर्व मागासवर्ग प्रवर्गासाठी राज्यातील लोकसेवा व पदांसाठी आरक्षण निर्धारित करणे, कलम २ (ट) अन्वये आरक्षण या संज्ञेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या सर्व प्रवर्गासाठी नमूद करण्यात आलेले असणे, त्यामुळे उपरोक्त, "ब" व "क" नुसार कलम ५ (१) अन्वये पदोन्नती मधील सर्व टप्प्यावर आरक्षण अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या सर्व प्रवर्गासाठी आरक्षित पदे राहणे, विधानसभा सदस्यांनी दिनांक १३ एप्रिल, २००९ रोजी लेखी पत्राद्वारे व त्याआधी गेली १ ते २ वर्ष संबंधित खात्याचे प्रधान सचिव, सचिव, मंत्री यांचेकडे सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ८ कलम ५ (१) अन्वये

२...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

निर्धारित करण्यात आलेले ४ (२) व २ (ट) नुसार इतर मागासवर्गाचे १९ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी गेल्या ४ ते ५ वर्षात का करण्यात आली नाही अशी वारंवार विचारणा करणे, सदर प्रकरणी लेखी पत्राद्वारे १९ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी अद्यापही का केली नाही,याचे उत्तर न मिळणे व तोंडीही त्यावर स्पष्टीकरण न मिळणे, दिनांक २२ जानेवारी, २००४ रोजी अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर होऊनही गेल्या ४ ते ५ वर्षापासून या राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांसाठी आरक्षित लोकसेवा मधील व पदांमधील रिक्त जागा भरण्यात न येणे, परिणामी राज्यातील या सर्व प्रवर्गातील हजारो होतकरु तरुण शासकीय नोकरीपासून वंचित राहणे, याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री.राणा जगजितसिंह पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधिमंडळाने केलेल्या कायद्याची अंमजबजावणी खरे म्हणजे कोणालाही रोखता येत नाही. या विधिमंडळात कायदा झाला. त्यास माननीय राज्यपालांनी मंजुरी दिली, असे असताना एखादा अधिकारी एखाद्या फाईलवर असे लिहितो की, त्या कायद्यातील एका कलमाची अंमलबजावणी करु नये. खरे म्हणजे अशा प्रकारचे लिहिण्याचे अधिकार अधिका-यांना कोणी दिले. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एखादा कायदा मंजूर केला, त्यावर माननीय राज्यपाल महोदयांची स्वाक्षरी झाली असताना एक अधिकारी त्या कायद्यातील एका कलमाची अंमजबजावणी करु नये असे लिहितात, ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की, इतर मागावर्गीयांना आरक्षणाचा लाभ पूर्वीपासून शासनाने दिलेला आहे. हे आरक्षण सेवेच्या पहिल्या टप्प्यापर्यंत होते. परंतु प्रत्येक टप्प्यावर इतर मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे यासंदर्भातील विधेयक पहिल्यांदा सन 2001 मध्ये आले. त्या विधेयकावर बरीच चर्चा झाली. ते विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे गेले आणि संयुक्त चिकित्सा समितीचा सुधारित अहवाल विधिमंडळात आला आणि 2003 च्या अधिवेशनात विधेयक मंजूर झाले व 2004 मध्ये माननीय माननीय राज्यपालांची स्वाक्षरी होऊन ते राजपत्रात प्रसिध्द झाले. त्या राजपत्राची प्रत माझ्याकडे आहे. हे राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर एस.सी.एस.टी.,व्ही.जे.एन.टी. या प्रवर्गाप्रमाणे पदोन्नतीच्या पहिल्या टप्प्यावर आरक्षण आहे, त्याप्रमाणे इतर मागासवर्गीयांना हे आरक्षण देण्यात यावे अशा प्रकारची तरतूद या कायद्याच्या कलम-5 (1) मध्ये तरतूद केलेली आह. या कायद्यातील कलम -5 (1) असे सांगते की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास पदोन्नतीव्दारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास त्यामध्ये शासनाकडून फेर फार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात आणण्याचे चालू राहतील.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रीय नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..... लक्षवेधी सूचना क्र.3....

अंमलात आणणे चालू राहतील असे स्पष्ट म्हटले आहे. पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर असेल असे राजपत्रात कलम 5(1) मध्ये म्हटले आहे. त्यानुसार 22 जानेवारी, 2004 पासून ओबीसींना प्रत्येक टप्प्यावर आरक्षणाचा लाभ व्हावयास पाहिजे होता. परंतु ओबीसींना प्रत्येक टप्प्यावर आरक्षणाचा लाभ देण्यासंबंधीचा कायदा विधीमंडळाने मंजूर करुनही कलम 5(1) ची अंमलबजावणी करताना एस.सी., एस.टी., एन.टी. या प्रवर्गाना प्रत्येक टप्प्यावर आरक्षणाचा लाभ देण्यचात यावा परंतु ओबीसी प्रवर्गाला हे आरक्षण पुढील आदेश होईपर्यंत देऊ नये अशाप्रकारचा शेरा विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी फाईलवर लिहिल्यामुळे 2004 पासून ओबीसी आणि एसबीसी प्रवर्गातील 19 लाख कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळणे बंद झाले. ही लक्षवेधी सूचना यासाठी आणली की, खालच्या सभागृहात याच विषयावर चर्चा झाली परंतु शासनाने कोणताही निर्णय जाहीर केला नाही. हा कायदा मंजूर झाला, त्यावर माननीय राज्यपालांनी सही केल्यानंतर कोण असा अधिकारी आहे, जो लिहितो की, ओबीसींना ही सवलत देऊ नये. का त्यांनी असे लिहिले? शासन याची चौकशी करणार आहे का? या सचिवांच्या एका ओळीच्या शेऱ्यामुळे राज्यातील ओबीसी आणि एसबीसी प्रवर्गातील 19 लाख कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिले, त्या सचिवांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार आहात का? कायद्यामध्ये ओबीसी प्रवर्गासाठी जी तरतूद केली आहे ती ताबडतोब लागू करण्याचे आदेश निर्गमित करण्याबाबत मंत्रीमहोदय सभागृहाला आश्वासन देतील काय?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या विषयाबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एक निवेदन केले होते. त्यांचे म्हणणे असे आहे की, कुठलीही न्यायालयीन अडचण नसेल तर अधिवेशन संपण्याच्या आत आदेश निर्गमित करण्यात येतील. त्यात कायदेशीर अडचण असेल तर न्यायालयात जाऊ असे त्यांनी खालच्या सभागृहात स्पष्ट म्हटले आहे आणि तोच शासनाचा स्टँड राहणार आहे.

श्री.दिवाकर रावते : विधीमंडळाने कायदा मंजूर केला, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ते निदर्शनास आणले आहे. ओबीसींना आरक्षण देण्याबाबत कायद्यात स्पष्ट तरतूद आहे. तरतूद करावी असे काही नाही. ओबीसी प्रवर्गाला 19 टक्के आरक्षण दिले आहे, इतर प्रवर्गांना दिलेले आरक्षण एकत्रित करता ते 52 टक्के इतके झाले आहे. 13 जून, 2009 रोजी मुद्दा उपस्थित केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

होता. महाराष्ट्र विधानसभेत शासनाने निवेदन केले की, कोणतीही कायदेशीर अडचण नसेल तर कारवाई सुरु करु. कायदेशीर अडचण म्हणजे न्यायालयीन स्थगिती आहे का? कायद्याच्या कलम 5(1) व (2) नुसार निर्गमित केलेल्या सर्व टप्प्यावरील पदोन्नतीबाबतच्या दि.25.4.2004 च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास अधिकाऱ्यांनी स्थगिती दिली. ही स्थगिती उच्च न्यायालयाने उठविली. मात्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुल्या प्रवर्गाची पदे पदोन्नतीने भरण्यास असलेली स्थगिती उठविली. सर्वात महत्वाचे म्हणजे विशेष मागास प्रवर्गाच्या पदोन्नतीमधील आरक्षणास उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून स्थगिती उठविण्यास सहमती दिली. निवेदनामध्ये शासनाने हे जाहीर केलेले असताना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेत शब्द दिला आहे, अडचण नसेल तर त्याप्रमाणे पदोन्नतीसाठी आरक्षण ताबडतोब सुरु करण्यात येईल. त्याची अंमलबजावणी करण्यात येईल हे केव्हा जाहीर करणार आहात?

3इ.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजीतसिंह पाटील : महोदय, शासनाचा जो स्टँड आहे तो मी ऑलरेडी सांगितलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या लक्षवेधीच्या संदर्भात कृपया आपण निदेश द्यावेत अशी आमची विनंती आहे. कारण 52 टक्के लोकांवर हा एक प्रकारे अन्याय आहे. आणि कायदा मंजूर करुन देखील कारण नसताना केवळ एका अधिकाऱ्याच्या अट्टाहासापोटी एवढ्या लोकांच्या पदोन्नती थांबविलेल्या आहेत. गेल्या चार वर्षांपासून मागासवर्गियांवर अन्याय होत आहे. या उत्तरात शासनानेच दिलेले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयाच्या अधीन राहून ही स्थगिती दिली आहे. मग निर्णय कशासाठी रोखलेला आहे हेच मला समजत नाही म्हणून आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. उद्या अधिवेशन संपत आहे म्हणून आजच या प्रश्नाची तड लागायला पाहिजे.

श्री. राणा जगजीतसिंह पाटील : रिझर्वेशन इन प्रमोशनसंबंधीचे 5 नंबरचे कलम मी वाचून दाखविले. त्यातील पहिला आणि दुसरा सब क्लॉज जो आहे ... It refers to Reservation in Promotion. It reads as under: "5(1) The reservation in promotion shall be at all stages of promotions. असे स्पष्ट म्हटले आहे आणि आपण जे बोलला 5 (2) reads as under: " On the date of coming into force of this Act, if any Government orders providing for reservation for any posts to be filled in by promotion, are in force, the same shall continue to be in force unless modified or revoked by Government." असा त्यामध्ये उल्लेख आहे. याच्या अधीन राहून .....

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हा उल्लेख जो वाचून दाखविला तो कशातील आहे ? विधेयकातील आहे की न्यायालयाचे निदेश आहेत ?

श्री. राणा जगजीतसिंह पाटील : मी विधेयकातील उल्लेख वाचून दाखविला.

श्री. दिवाकर रावते : मला वाटले होते की, न्यायालयीन आदेशाच्या संदर्भातील हा उल्लेख आहे. परंतु विधेयकातील उल्लेख मंत्री महोदयांनी वाचून दाखविला. वास्तविक सभागृहात मराठीतील विधेयक मंजूर झालेले असताना ते मंत्री महोदयांनी इंग्रजीतून का वाचून दाखविले ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जे निवेदन केलेले आहे त्यानुसार न्ययालयीन अडचण नसेल तर घोषणा करण्यात येईल. म्हणून माझी विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या स्वाक्षरीसह कायदा मंजूर झालेला असताना तसेच कोणाचेही ऑब्जेक्शन आलेले नसताना याबाबतची अमलबजावणी का थांबविण्यात आली आहे ? अशा प्रकारे वाट्टेल तसा अर्थ लावयाचा आणि विशेष मागास प्रवर्गाच्या लोकांवर अन्याय करणे योग्य आहे काय ?

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी असे विचारु इच्छितो की, शासनाला नेमके काय वाटत आहे ? तसेच यासंदर्भात मला वाटते की, ॲडव्होकेट जनरल यांचे मत शासनाने मागविले आहे काय ? असल्यास ते कधी येणार आहे ? कारण उद्या आपले सत्र संपत आहे. तसे नसेल तर त्यानुसार निदेश देता येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, उद्याच ॲडव्होकेट जनरल यांना सभागृहात बोलावून त्यांचे मत आजमावून घ्यावे.

श्री. राणा जगजीतसिंह पाटील : ॲडव्होकेट जनरल यांचे मत उद्या सकाळपर्यंत आपल्यापर्यंत पोहचविण्यात येईल.

उपसभापती: ॲडव्होकेट जनरल यांना सभागृहासमोर बोलाविण्याबाबत माननीय सभापतींशी चर्चा करुनच एवढा मोठा निर्णय घेतला पाहिजे.

<u>लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे ढकलण्याबाबत</u>

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे ढकलण्यात येत आहे.

यानंतर श्री. सरफरे ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून स्कायवॉक बांधण्याचा लावलेला सपाटा

मु. शी. : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून स्कायवॉक बांधण्याचा लावलेला सपाटा यासंबंधी सर्वश्री डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री किरण पावसकर,गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबईत तेथील परिस्थितीचा अथवा स्थानिक नागरिकांची मागणी नसतानांही उड्डाण पूल स्कायवॉक बांधण्याचा लावलेला सपाटा, सदर स्काय वॉकमुळे हजारो दुकानदार वंचित होणे, दुकानदारांनी दुकाने खरेदीसाठी कोटयावधी रुपयांची केलेली गुंतवणूक मंदीमुळे धंदा नसणे, परिणामी हजारो व्यापारी बेकारीच्या खाईत लोटणे, मुंबईतील नागरिकांची मागणी नसतांना व आवश्यकता नसताना मुंबई महानगर विकास प्राधिकरणाचे कोटयावधी रुपये खर्च करुन स्काय वॉक बांधण्याचा सुरु केलेला सपाटा, सदर अनावश्यक स्काय वॉकमुळे नागरिकांना व वाहनांना व रहदारीला होत असलेला अटकाव, कोटयावधी रुपयांचा अनावश्यक व अकालनीय खर्च सांताक्रुझ येथील स्थानिक जनतेचा विरोध असताना व लोकप्रतिनिधीना विश्वासात न घेता सुमारे २२ कोटी रुपये खर्चून १३ मीटर अस्तित्वात असलेल्या रस्त्यांवर ७ मीटर लांबीचा बांधण्यात आलेला स्काय वॉक, तसेच स्काय वॉकच्या नावाखाली कोटयावधी रुपयांची करण्यांत येत असलेली उघळपट्टी त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेतील विषयासंदर्भात मागील आठवडयात थोडी पुसटशी चर्चा झाली होती. फ्रिशमन प्रभू या कंपनीने स्काय वॉक बांधण्यासंबंधी अहवाल दिला होता. तो धाब्यावर बसवून 64 स्काय वॉक बांधण्याचे शासनाने ठरविले. लक्षवेधी सूचनेमध्ये ज्या काही गोष्टी विचारल्या आहेत त्या गोष्टींचा या निवदनामध्ये समावेश नाही. जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते कुठेही नाहीत. या लक्षवेधी सूचनेमध्ये म्हटले आहे की, "ये जा करणाऱ्या नागरिकांना देखील थोडयाफार प्रमाणात असुविधा होते. सदर अडचणींची सोडवणूक करण्यासाठी महापालिका नगरसेवक व अभियंते यांच्या समवेत वेळोवेळी प्रकल्प भेटी आयोजित करुन स्थानिक दुकानदार,फेरिवाले नागरिक इत्यादींच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे".अशाप्रकारे कोणतीही गोष्ट झालेली नाही. किंवा स्थानिक पदाधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधींना कोणत्याही प्रकारे लक्षात घ्ेतले नाही, त्यांच्याबरोबर चर्चा केली नाही. माझ्याबाबत प्रश्न असा आहे की, सांताक्रुझ येथील स्काय वॉक बांधण्यासाठी 20 कोटी रुपये दिले आणि त्या स्काय वॉकचे डिझाईन करण्यासाठी 2 कोटी रुपये दिले. अशाप्रकारे सर्व स्काय वॉक बांधण्यासाठी पैसे दिले काय? 24 जून रोजी बांद्रा येथील स्काय वॉकचे उद्घाटन झाले. त्यानंतर आजपर्यंत त्या पादचारी पूलावरुन किती लोकांनी ये-जा केली याची आकडेवारी आपल्याजवळ आहे काय? या स्काय वॉकला 13 कोटी रुपये खर्च अपेक्षित असतांना 18 कोटी 47 लाख रुपये खर्च कसा झाला? तिसरा प्रश्न असा की, मे महिन्यापर्यंत सर्व स्काय वॉकचे बांधकाम पूर्ण होणे अत्यंत आवश्यक होते. माझ्या माहितीप्रमाणे 16 स्काय वॉकचे बांधकाम केलेले नाही, त्यांची कामे अर्धवट केली आहेत. त्यामध्ये जे कुणी ठेकेदार असतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांच्याकडून दंड वसूल करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबईमध्ये वहातुकीची कोंडी होत होती आणि लोकांची सुध्दा असुविधा होत होती. विशेषत: रेल्वे स्टेशनमधून बाहेर पडल्यानंतर अनेक लोकांना आपल्या इच्छीत स्थळी जाण्याकरिता स्काय वॉकची निर्मिती केली. सभापती महोदय, सांताक्रुझ (पश्चिम) येथे स्कॉय वॉकचे बांधकाम करण्यापूर्वी अनेक लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्या भागातील नगरसेवक श्री. मोहन लोकेगावकर आणि मी स्वत: त्या भागात रहात आहे. तसेच, त्या भागामधील आमदार श्री. अशोक जाधव यांच्याबरोबर सुध्दा चर्चा करण्यात आली नाही. त्यामुळे मंत्रिमहोदय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

याठिकाणी चुकीचे सांगत आहेत. ज्यावेळी आम्ही रिप्रेझेंटेशन घेऊन गेलो त्यावेळी श्री. रत्नाकर गायकवाड यांनी माफी मागितली. त्यामुळे लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा केली असे कसे म्हणता येईल? चर्चा न करता त्यांनी पाईल फौंडेशनचे काम सुरु करुन टाकले हे आपणास माहीत आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझ्याकडील माहितीप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. अशोक जाधव यांच्याबरोबर ऑगस्ट, ऑक्टोबर व नोव्हेंबर 2008 मध्ये चर्चा केलेली आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्याबरोबर 22 व 31 जानेवारी रोजी चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे् तेथील नगरसेवक श्री. मोहन लोकेगावकर यांच्याबरोबर 2009 मध्ये चर्चा केली आहे. अशाप्रकारे लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा केलेली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

सभापती महोदय, या स्काय वॉकचे 61 टक्के काम पूर्ण झालेले आहे. फाऊंडेशनचे काम आणि फॅब्रिकेशनचे काम काही प्रमाणात शिल्लक आहे. वास्तविक पाहता हे काम शिल्लक का राहिले ? तर सन्माननीय शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरेसाहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांनी सांगितले की, एम.एम.आर.डी.ए.च्या अनेक कामांमुळे मुंबईमध्ये पावसाळयात पाणी साठण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही सगळी कामे, फाऊंडेशनची कामे थांबविण्यात आली आहेत.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पावसाळयापूर्वी कामे थांबविण्यात यावीत याचा अर्थ माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांचे म्हणणे असे होते की, तुम्ही केवळ फाऊंडेशन करण्यासाठी नुसते खड्डे खोदून ठेवले तर तेथे पाणी साचेल. पण याचा अर्थ तुम्ही त्यांच्या सांगण्याचा उपयोग करुन कामे करणार नाही, त्यामध्ये दिरंगाई दाखवणार आणि त्याचे नाव पुढे करणार, हे धंदे कशासाठी करीत आहात?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझ्या बोलण्यामध्ये राजकीय अभिनिवेष अजिबात नव्हता. माझे म्हणणे क्लिअर होते.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

उपसभापती : त्यांचा म्हणण्याचा उद्देश असा होता की, दरम्यानच्या काळात या स्काय वॉकचे जे सगळे ठेकेदार आहेत, त्यांना त्यांचे फाऊंडेशन एम.एम.आर.डी.ए.मधून मंजूर करावयाचे आहे. हे तुमच्या लक्षात आले काय ? मी नंतर याबाबतीत माननीय मंत्री महोदयांना माहिती देणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदय जे काही म्हणाले, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी असे म्हटलेले आहे की, ज्या स्काय वॉकचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत करीत आहेत, त्याचे 60 टक्के काम झालेले आहे. सर्व पिलर्स्चे काम झालेले आहे. थोडे फाऊंडेशनचे काम शिल्लक राहिलेले आहे. तसेच आता ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

सगळयाच स्काय वॉकचे, ज्याचे फाऊंडेशनचे काम शिल्लक राहिलेले आहे, ती सगळी कामे थांबविण्यात आलेली आहेत. कारण मुंबईत पावसाळयामध्ये पाणी तुंबण्याची शक्यता आहे अशी भीती मुंबई महानगरपालिकेने आणि सन्माननीय शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धवजी ठाकरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या बरोबर बैठक झाली, त्यामध्ये व्यक्त केली आहे. त्यामुळे . . . .

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

मी चुकीचे बोलत आहे काय ? त्या दिवसापासून माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले आहे की, स्काय वॉकच्या ठिकाणी फाऊंडेशनची जी कामे सुरु आहेत, ती थांबविण्यात यावीत. कारण त्यामुळे पाणी तुंबण्याची शक्यता आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी हे सहज सांगितलेले नाही. स्काय वॉकची कामे थांबली, फाऊंडेशनची कामे थांबली आणि याचे कारण सांगताना त्यांनी शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांच्यावर हेत्वारोप केलेला आहे. शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली की, पावसाळयापूर्वी कामे अपूर्ण राहून पाणी तुंबू नये म्हणून ती थांबवली. खरे म्हणजे यापूर्वीच ही कामे थांबलेली आहे आणि शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांचे बोलणे म्हणजे फांदीवर पक्षी बसण्याची आणि ती तुटण्याची वेळ एकच झाली. तुम्ही अकार्यक्षम आहात, तुमचे डिस-क्रेडीट शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांच्या नावावर कशासाठी जमा करीत आहात ? त्यांनी जे जनरल स्वरुपाचे स्टेटमेंट केले, त्याचा उपयोग येथे कशासाठी करीत आहात ? हा हेत्वारोप आहे आणि तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

उपसभापती : याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना कुठे काही वावगे बोललेले आहेत असे मला वाटत नाही. मी तुम्हाला गमतीने सांगतो की, आपण ज्या आवेशाने बोलण्यासाठी उभे राहिलात, तर शिवसेनेच कार्याध्यक्ष श्री.उद्धवजी ठाकरे सुध्दा लोकांच्या कामासाठी गेले होते. पुढच्या निवडणुकीसाठी अजून तुमची युतीच्या संदर्भातील बोलणी सुरु व्हावयाची आहेत. त्याच्या अगोदर याचा प्लॅटफॉर्म नको. आपल्याला माझ्या शुभेच्छा आहेत. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर नीट पूर्ण होऊ द्यावे.

. . . .3 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमच्या युतीचा प्रश्न नाही. आता शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांचा मुद्दा बाजूला ठेवा. माझा मुद्दा समजून घ्यावा. या सदनाचा सदस्य नसलेल्या एका सन्माननीय व्यक्तीवर हेत्वारोप करणे की, मुंबईतील स्काय वॉकची कामे का थांबली? तर माननीय शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री.उद्धव ठाकरे यांनी मागणी केली म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना दिली. त्यामुळे ही कामे थांबलेली आहेत. अशा प्रकारे सरकारने उत्तर देणे योग्य आहे काय ? त्यांच्या नावावर बिल फाडणे बरोबर आहे काय ? असा हेत्वारोप करणे बरोबर आहे काय ?

यानंतर श्री.बरवड . .. .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, काम का बंद पडले ? म्हणून सांगितले की, आता ते काम थांबविण्यात आले आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, काम करावयाचे नाही असे त्यांनी सांगितले असे वाक्य माननीय मंत्रिमहोदय आताही बोलले. माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर जी बैठक घेतली त्या बैठकीला सुदैवाने मी उपस्थित होतो. त्यांनी एवढेच सांगितले की, जर भयंकर पाऊस पडला आणि हे ढिगारे आपण वेळेवर उचलले नाही आणि हे काम असे चालू ठेऊन खड्डे तसेच राहिले तर ते योग्य होणार नाही म्हणून हे काम आपण तातडीने करावे. काम थांबवा असे त्यांनी म्हटलेले नाही. त्यांनी काम थांबवा असे सांगितल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. आपण काम पूर्ण करु शकत नाही आणि लोकांना मुंबईमध्ये त्रास होईल म्हणून यामध्ये लक्ष घालावे असे त्यांनी सांगितले. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी काम थांबवतो असे सांगितले.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. त्या ठिकाणी असेच झाले. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत साहेबांच्या ज्या बैठका झालेल्या आहेत आणि माझ्याकडे जी माहिती आहे...

श्री. नितीन गडकरी : त्याच्या आधीपासून काम बंद आहे. श्री. उद्धवजी ठाकरे यांचे नाव सांगून काम बंद करुन टाकले.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा जो स्काय वॉक आहे किंवा इतर जे स्काय वॉक आता एमएमआरडीएने घेतलेले आहेत त्यामध्ये फिशरमन प्रभू यांनी सुचविलेले जे स्काय वॉक आहेत आणि त्यांनी सुचविलेल्यापैकी योग्य नसणारे जे स्काय वॉक आहेत त्या योग्य नसणाऱ्या स्काय वॉक पैकी हा सांताक्रुझचा स्काय वॉक आहे. त्यांची अशी मागणी होती की, एका बाजूने जर स्काय वॉक काढला तर तेथील जे दुकानदार वगैरे आहेत त्यांचा व्यापार होणार नाही. अशा त्यांच्या तक्रारी होत्या. हे सर्व बघितल्यानंतर रस्त्याच्या मधून या स्काय वॉकच्या उभारणीचे काम सुरु झाले. जवळजवळ ताशी साडेपाच हजार लोक त्या रेल्वे स्टेशनमधून बाहेर पडतात. हे सगळे लोक येतात तसेच त्या ठिकाणी गाड्या उभ्या असतात, टॅक्सी उभ्या असतात. वाहतुकीची कोंडी असते. सगळे लोक स्काय वॉकवरुनच जातील असे काही म्हणता येत नाही. कोणाला कोणती वस्तू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

लागली तर ते खरेदी करतील. त्या ठिकाणी जिने ठेवलेले आहेत. त्या ठिकाणी 60 टक्के काम पूर्ण झालेले आहे. सन्मानयीय सदस्य श्री. सावंत साहेबांना मी सांगेन की, एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना घेऊन पुन्हा त्या जागेवर जाऊ आणि त्या ठिकाणी काही सूचना करता आली तर आपण त्यामध्ये थोडी दुरुस्ती करता आली तर करु.

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या लक्षवेधी सूचनेव्दारे महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित केला. मंत्रिमहोदय शेवटी जे बोलले त्यामुळे मी बोलण्यासाठी उभा राहिलो. एमएमआरडीएमध्ये मी गेले 16 वर्षे आहे. एमएमआरडीएच्या स्काय वॉकच्या संदर्भामध्ये आमच्या बैठकीमध्ये बऱ्याच वेळा चर्चा झाली. काही ठिकाणी अनश्चितपणे अनावश्यक स्काय वॉक झालेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. ज्या ठिकाणी योग्य वाटत नाही त्यासंदर्भात मला असे वाटते की, त्या ठिकाणचे जे लोकप्रतिनिधी असतील, बाकीचे लोक असतील त्यांनी त्यासंदर्भात जर काही तक्रारी मांडल्या किंवा आपले म्हणणे मांडले तर त्यांचे म्हणणे देखील आपण ग्राह्य धरुन यासंदर्भात ठोस कार्यवाही व्हावयास पाहिजे.

मी आपल्याला आणखी एक महत्वाचा मुद्दा सांगतो. एमएमआरडीएकडून हल्ली स्काय वॉक, निर्मल सुलभ शौचालय या सगळ्या ज्या काही योजना चालू आहेत त्याबाबत मी आपल्याला या आसनावर बसून 100 टक्के सांगू इच्छितो की, यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालू आहे. मी आपल्याला उदाहरण देईन. दोन दिवसांपूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले. मी स्वत: श्री. रत्नाकर गायकवाड यांच्याशी बोललो आणि आमच्या महापालिका आयुक्तांनाही पत्र लिहिले. निर्मल सुलभ शौचालयाच्या बाबतीत पर सिट त्यांनी काही तरी ठरविले आहे. ते एनजीओला द्यावयाचे कबूल केले. त्यांनी ठेकेदार कोण नेमावेत याबाबत कधीही मी स्वत: गेल्या 18 वर्षाच्या कारकिर्दीत कोणत्याही महापालिकेत किंवा कोणत्याही यंत्रणेत हस्तक्षेप केलेला नाही. परंतु गांभीर्याने दोन दिवसांपूर्वीच माझ्याकडे तक्रारी आल्या. हे सर्व पैसे प्रथम कॉर्पोरेशनकडे वर्ग केले जातात आणि ते लोक कॉन्ट्रॅक्टर नेमतात. मी आपल्याला या ठिकाणी पुराव्यानिशी सांगू इच्छितो की, जर 32 लाख रुपयांचे एखादे युनिट असेल तर हे ठेकेदार पलीकडच्या कॉन्ट्रॅक्टरला सबलेट करावयाचे, त्याला फक्त 16 लाख रुपये द्यावयाचे आणि वरचे 10 लाख, 15 लाख रुपये यांनी परस्पर खावयाचे असा प्रकार होतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

यामध्ये फारच मोठे रॅकेट आहे. ठाण्यामध्येच आहे असे नाही. यासंबंधी मी श्री.रत्नाकर गायकवाड यांच्याकडे तक्रार केलेली आहे. याबाबत माझ्याकडे जे पुरावे आहेत ते मंत्रिमहोदयांकडे मी देतो. या कामांमुळे शासनाच्या व जनतेच्या पैशाचा अपव्यय मोठया प्रमाणात होत आहे, अशाप्रकारे जनतेच्या व शासनाच्या पैशांच्या योजना प्रामाणिकपणे राबवाव्यात नाही तर त्या राबविण्याचे थांबवावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण दोन महत्वाच्या सूचना केल्या आहेत. आपण असे म्हणालात की या कामांमध्ये भ्रष्टाचार चालू आहे. यासंबंधी कोणत्याही स्तरावरुन चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे. दुस-या सूचनेबाबत मी सांगू इच्छितो की, अनेक ठिकाणी स्कायवॉकची बांधणी चालली आहे, त्यापैकी कामे एमएमआडीएमार्फत तर काही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत चालू आहेत. त्या कामांची चौकशी यानिमित्ताने केली जाईल. आपल्याजवळ पुरावा म्हणून जे काही असेल ते आपण माझ्याकडे द्यावे त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक बाब स्पष्ट करु इच्छितो की, शिवसेना कार्याध्यक्ष माननीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनी असे म्हटले आहे की, स्काय वॉकच्या कामांमुळे अनेक ठिकाणी मातीचे ढिगारे साचलेले दिसतात, त्यामुळे पावसाळयामध्ये अनेक ठिकाणी पावसाचे पाणी तुंबण्याची शक्यता आहे. पावसाळयात पाणी कोठेही साचू नये असे एवढयापुरते त्यांचे म्हणणे मर्यादित होते. त्यांचा स्कायवॉकला विरोध नाही.

श्री.हसन मुश्रीफ : त्यांनी स्कायवॉकला विरोध केलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ D/

पृ.शी.: देवनार पशुवधगृहातील मांस निर्यातीमुळे महानगरपालिकेला होत असलेला तोटा

मु.शी.: देवनार पशुवधगृहातील मांस निर्यातीमुळे महानगरपालिकेला होत असलेला तोटा यासंबंधी श्री.चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : टाळंबा प्रकल्पाचे काम गेली 10 वर्षे अत्यंत धिम्या गतीने सुरु असणे

मु. शी. : टाळंबा प्रकल्पाचे काम गेली 10 वर्षे अत्यंत धिम्या गतीने सुरु असणे यासंबंधी सर्वश्री राजन तेली, सुभाष चव्हाण, संजय दत्त, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाक्षक्षेत्र विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्याला वरदान ठरणाऱ्या टाळंबा प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, टाळंबा प्रकल्प हा सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प असून सन 1982 मध्ये या प्रकल्पाला प्रशासकीय मंजूरी मिळालेली असणे, सन 1999 मध्ये प्रकल्पाच्या बांधकामासाठी प्रत्यक्षात निविदा काढून आर.एन.शेट्टी आणि कंपनी या बांधकाम कंपनीस टाळंबा प्रकल्पाचे बांधकाम करण्याचे काम देण्यात येणे, स्थानिक नागरीकांचा पाठींबा असूनही गेली 10 वर्षे या प्रकल्पाचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असणे, अद्यापपर्यंत या प्रकल्पाचे केवळ 8 % काम पूर्ण झाल्याचे निदर्शनास येणे, प्रकल्पाच्या बांधकामाची सन 1999 मध्ये 268 कोटी रुपयांची असलेली अंदाजित किंमत आज मितीस 10 वर्षाचा कालावधी उलटल्यामुळे 860 कोटी रुपयांवर पोहोचणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीही शासनास निवेदन देऊनही या प्रकल्पाचे काम पूर्ण न होणे, आर.एन.शेट्टी आणि कंपनीकडून अत्यंत धिम्या गतीने करण्यात येत असलेल्या कामाबाबत स्थानिक नागरीकात पसरलेला तीव्र असंतोष, याच कंपनीकडून अथवा एखाद्या नवीन कंपनीला काम देऊन प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत नागरीकांकडून व लोकप्रतिनिधीकडून होत असलेली मागणी, व त्याकडे शासन जाणीवपूर्वक करीत असलेले दुर्लक्ष व याबाबत शासनाकडून होत असलेली टाळाटाळ, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा व लाक्षक्षेत्र विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

5...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयातील टाळंबा हा मोठा पाटबंधारे प्रकल्प आहे. या प्रकल्पाला 1981 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यावेळी या प्रकल्पाची किंमत 72.38 कोटी होती. त्यानंतर 1999 मध्ये त्याची किंमत 388.19 कोटी झाली. आता या प्रकल्पाची किंमत 816.14 कोटी झाली आहे. या प्रकल्पाचे ठेकेदार काम करीत नाहीत. गेल्या 10 वर्षापासून धिम्या गतीने काम चालले आहे. या प्रकल्पामुळे कुडाळ व सावंतवाडी तालुक्यातील 17,000 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक मोठे प्रकल्प आहेत. या प्रकल्पाची एजन्सी रद्द केली जाईल का किंवा त्यांनी केलेल्या कामाचे पुनर्विलोकन करण्यासाठी समिती नेमली जाईल काय ? या कंत्राटदाराने राज्यात इतर ठिकाणी काम केले असेल तर त्याचीही चौकशी करावी. या ठेकेदाराचे काम करण्याची मन:स्थिती दिसत नाही. 1994 मध्ये कुळस आणि चापेलीमधील डॅमची 225 हेक्टर जागा पहिल्यांदाच मिळाली आहे. वन संज्ञेच्या अनुषंगाने 329.912 आणि 249 नांदेड मधील जागा अशी एकूण 675 हेक्टर जागा या ठेकेदाराला मिळाली आहे. परंतु त्याची काम करण्याची मानसिकता दिसत नाही. म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ही एजन्सी रद् करणार काय व त्याने इतर ठिकाणी केल्या कामांची चौकशी केली जाईल काय आणि हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील काय ? सिंधुदुर्ग जिल्हयात काही ठेकेदारांची बिले द्यावयाची आहेत, कोकणामध्ये अनेक ठेकेदार आहेत, त्यांची देयके शिल्लक असताना ते काम करीत आहेत. हा प्रकल्प कोकणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्याला न्याय देण्याच्या दृष्टीने ही एजन्सी रद्द करावी, ती केली जाईल काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ व सावंतवाडी तालुक्याच्या सिंचनाच्या दृष्टीने महत्वाचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाला विलंब होण्याचे कारण कंत्राटदार हे एकच कारण नाही. वन संवर्धन कायद्यामुळे हा प्रकल्प बाधित झाला होता. या प्रकल्पाला 1991 मध्ये मान्यता मिळाली होती. त्यानंतर जी खाजगी वन जमीन आहे त्याला वन संज्ञेचा कायदा लागू झाल्यामुळे या प्रकल्पाला उशीर झाला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विजय वडेट्टीवार....)

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, भूसंपादन करीत असताना येणा-या अडचणी निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांचा धरणाच्या कामाला होणारा विरोध, आणि वन संज्ञा या कारणांमुळे या प्रकल्पाच्या कामाला उशीर झालेला आहे. या प्रकल्पाच्या बाबतीत सर्व क्लिअरन्स झालेले आहेत. नेट प्रेझेण्ट व्हॅल्यू 56 कोटी रु. भरावयाची आहे. ही रक्कम तातडीने भरण्याच्या विचारात शासन आहे. तेव्हा एजन्सीमुळे हा प्रकल्प रखडला असे म्हणणे उचित होणार नाही. प्रकल्प रखडण्यामागची कारणे वेगवेगळी आहेत. हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या बाबतीत शासन सकारात्मक आहे. हा दोन तालुक्यातील महत्वाचा प्रकल्प असल्यामुळे याबाबतीत तातडीने पावले उचलण्यात येतील.

श्री. भास्करराव जाधव : प्रकल्पग्रस्तांचा विरोध आणि खाजगी जमिनीला लागलेल्या वनसंज्ञेमुळे या प्रकल्पाला विलंब झाला असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्यांनी दिलेले तोंडी उत्तर आणि वितरित करण्यात आलेले निवेदन यामध्ये विसंगती आहे. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, सन 2001मध्ये खाजगी क्षेत्राच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे पाठविल्यानंतर त्याला वनसंज्ञा लागू झाली. याचा अर्थ त्याआधी वनसंज्ञा लागू नव्हती. त्यामुळे प्रकल्प रखडण्यामध्ये वनसंज्ञेचे दिलेले कारण उचित नाही. सन 2002 ते 2007 या कालावधीत प्रकल्पग्रस्तांचा विरोध होता असेही माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. जर सन 2002 ते 2007 पर्यन्त प्रकल्पग्रस्तांचा विरोध होता तर मग या कालवधीत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या विचारात घेऊन त्या पूर्ण करण्याच्या बाबतीत कोणते प्रयत्न केले गेले ? त्यांच्या मागण्यांची पूर्तता करुन या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात का करण्यात आली नाही ?

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेला प्रश्न बरोबर आहे. 2001 साली धरणाच्या कामाला सुरुवात झाली. हा कोकणातील सर्वात मोठा प्रकल्प असल्यामुळे त्याला जास्त निधी मिळावयास पाहिजे होता. माननीय राज्यपालांचे अनुशेषाच्या संदर्भातील डायरेक्टीव्हज् मिळाल्यानंतर उर्वरित महाराष्ट्रामध्ये निधी कमी पडायला लागला आणि त्याचा परिणाम कोकण आणि खानदेशवर झाला. तेथील 2002 ते 2007 या कालावधीत काम होऊ शकले नाही. जमिनीच्या किंमतीच्या संदर्भात तसेच अन्य विविध प्रकारच्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अजित पवार...)

आहेत. त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या संदर्भात निधी ही गोष्ट महत्वाची ठरायची. परंतु जे प्रकल्प होत होते, गॉर्ज फिलिंगला आले होते त्यांना निधी देण्यात आला. त्यामुळे या प्रकल्पाचे 2002 ते 2007 या कालावधीत काम झाले नाही. या प्रकल्पावर 60 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. धरणावर पावणे एकोणीस कोटी रुपये आस्थापनेवर 21 कोटी रु. भूसंपादनावर 8.07 कोटी रुपये, इमारतीवर 3 कोटी रुपये याप्रमाणे खर्च झालेला आहे. या महिन्यामध्ये मंत्रिमंडळाची विशेष बैठक कोकणामध्ये होत आहे. त्या बैठकीमध्ये पाण्याच्या संदर्भात, धरणाच्या संदर्भात, जमिनीच्या संदर्भात चर्चा होणार आहे. दरवर्षीच्या तुलनेमध्ये कोकणाला यंदा पुरवणी मागण्यामध्ये चांगला निधी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी ठेकेदाराकडून काम काढून घ्या असे सांगितले.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

परंतु कॉन्ट्रॅक्टरने पहिले काम 22 कोटी रुपयांचे केलेले आहे, त्याचे बील देणे बाकी आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, 56 कोटी रुपये नेट प्रेझेंट व्हल्यू देणे बाकी आहे. भूसंपादनाचे शेतक-यांचे पैसे देणे बाकी आहे. त्या ठिकाणी मंत्रिमंडळाची विशेष बैठक होणार आहे त्यावेळी या प्रकल्पाला अधिक गती कशी देता येईल असा प्रयत्न आघाडी सरकारचा राहील. हा प्रकल्प ब-याच दिवसापासून मागे राहिला आहे. कोकणातील बरेचसे जलसिंचन प्रकल्प पूर्णत्वास आलेले आहेत. ज्या प्रकल्पांची कामे अपूर्ण आहेत, ती कामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. नजीकच्या काळात तेथे मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे, त्या बैठकीत कोकणासाठी लागणा-या निधी संदर्भातील महत्वाचा निर्णय मंत्रीमंडळ घेऊ पाहते आहे. या प्रकल्पाला लवकरच निधी मिळेल एवढे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना सांगू इच्छितो की, मधल्या काळामध्ये मे, 2010 पर्यंत त्या कॉन्ट्रॅक्टरला मुदतवाढ दिलेली आहे. त्यांना मुदतवाढ दिलेली असल्यामुळे मध्येच त्याच्याकडून काम काढून घेणे हे योग्य होणार नाही. उद्या कॉन्ट्रॅक्टर परत कोर्टात गेला तर पुन्हा शासनाला अडचणी निर्माण होऊ शकतात. म्हणून त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. कॉन्ट्रॅक्टरला तेथे काम करण्यासाठी अतिशय पोषक वातावरण आहे. काम करण्यास वातावरण पोषक असताना कॉन्ट्रॅक्टर मशिनरी देत नाही असे कधी झालेले नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी काही गोष्टी सांगितल्या. माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांनी देखील काही गोष्टी सांगितल्या. त्यांनी सांगितलेल्या माहितीच्या अनुषंगाने मी थोडासा खोलात जाऊन कोकण इरिगेशन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची माहिती घेतली. त्यांच्याकडून सगळा आढावा घेतला. या ठिकाणच्या कॉन्ट्रॅक्टरला पाठिशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु त्यात मला कॉन्ट्रॅक्टरचा काही दोष दिसून आला नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, ज्यावेळेस कॉन्ट्रॅक्टरच्या दिरंगाईमुळे प्रकल्प लांबतो असे लक्षात येईल त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. तेली साहेब आपण जे म्हणालात तसा विचार करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 1992 या वर्षात चाफेळी आणि कुडाळ मध्ये जमिनी संपादित केल्या गेल्या आहेत. 329 लाख रुपये सानुग्रह अनुदान महामंडळाने मंजूर केले आहे. ते अनुदान कधी वाटप करण्यात येणार आहे ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार :सभापती महोदय, आज या सभागृहात पूरक मागण्या चर्चेला आलेल्या आहेत. सभागृहाने त्या मागण्यांना मंजुरी दिल्यानंतर निधी उपलब्ध होईल. त्यावेळेस पहिल्यांदा कॉन्ट्रॅक्टरचे देयक देण्या अगोदर भूसंपादनाचे पैसे शेतक-यांना अग्रक्रमाने दिले जातील. त्यानंतरच कॉन्ट्रॅक्टरचे देयके दिले जातील. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी धरण कधी पूर्ण होईल अशी विचारणा केली. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, कोकणातील बहुतेक धरणे पूर्णत्वाच्या टप्प्यामध्ये आलेली आहेत. हे धरण मात्र 2015 पर्यंत पूर्ण करण्याचा शासनाचा मनोदय आहे आणि त्या प्रकल्पाला यापुढचा काळात निधी उपलब्ध करुन दिला जाईल. कोकणात मंत्रिमडळाची बैठक होईल, त्या बैठकीच्या दुस-या दिवशी कोकणासाठी काय काय दिले याची माहिती सर्वांना वृत्तपत्रात वाचावयास मिळेल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील अनेक टोलनाके अनधिकृत असणे

मु. शी. : राज्यातील अनेक टोलनाके अनधिकृत असणे यासंबंधी श्रीमती फौजिया खान,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यातील अनेक टोलनाके अनधिकृत असणे, त्यापैकीच औरंगाबाद,करमाड रोडवरील अनधिकृत टोलनाक्यावर वातुकदार व प्रवासी यांना त्रास होणे तथा टोलनाक्यांवर कोणतेही परवानापत्र रेकॉर्ड, पावती बुक नसणे, कर्मचा-यांची वागणूक उध्दट असणे, कर्मचा-यांना गणवेश नसणे, यासंदर्भात चौकशी केली असता कर्मचारी हातघाईवर येऊन प्रसंगी प्रवाश्यांना व वाहतुकीदारांना मारहाण करणे, रात्रौ प्रसंगी महिला प्रवाश्यांची चेष्टा-मस्करी करणे, परिणामी प्रवाशांमध्ये घबराट निर्माण होणे, याबाबत शासनाने टोलनाक्यावर कार्यवाही करुन तो रद्द करण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया."

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, हमारे राज्य में जो टोलनाके हैं उनकी वजह से सबसे बड़ी समस्या हम लोगों को है. जिनके पास लाल बत्ती की गाड़ी है उनको कोई समस्या नहीं है. लेकिन मैं बताना चाहूंगी कि इस राज्य में लगभग 370 आमदार और भी हैं. मैं कहना चाहती हूं कि माननीय आमदारों द्वारा अपना कार्ड दिखाये जाने के बाद भी माननीय आमदारों को बहुत अपमान सहन करना पड़ता है. उन टोलनाकों पर माननीय आमदारों के कार्ड को समझने वाला कोई व्यक्ति नहीं रहता है. मेरा कहना है कि क्या सरकार माननीय आमदारों की गाड़ी के लिए कोई ऐसा चिन्ह देने वाली है जिससे दूर से उन लोगों को मालूम पड़ सके कि वह गाड़ी माननीय आमदार की है. मेरा एक सवाल यह है कि उस टोलनाके की प्रोजेक्ट कॉस्ट क्या है, वह कांट्रेक्ट कितने का है और उसकी काल मर्यादा क्या है, इसके अलावा वहां से छोटी-बड़ी कितनी गाड़ियां गुजरती है, वहां से कितना प्रोफिट संबंधित व्यक्ति को होता है, इन सब बातों की जानकारी वहां दर्शायी जानी अपेक्षित है. इन सब चीजों की ट्रांसपेरेंसी अपेक्षित है. ये सब बातें वहां पर एक बोर्ड पर लिखी होनी चाहिएं. लेकिन उनमें से किसी भी बात का इंप्लीमेंटशन नहीं होता है. वहां पर जो कर्मचारी हैं उनके बारे में कोई कंडक्ट् रुल्स भी नहीं हैं. किसी तरह की आयडेंटिफिकेशन उनके पास नहीं है. वे कर्मचारी यूनिफार्म भी नहीं पहनते हैं और वहां पर अच्छी तरह से काम करने के लिए कोई ट्रेनिंग भी उनको नहीं दी जाती है. मुझे पूछना है कि वहां की व्यवस्था ठीक करने के लिए शसन क्या कदम उठाएगा ?

सभापति महादेय, मैंने यहां पर लक्षवेधी में औरंगाबाद के अंदर करमाड रोड पर बने टोलनाके के संबंध में सवाल किया है. उस सबंध में जो उत्तर दिया गया है उस उत्तर में बताया गया है कि उस पर एक्शन लिया गया है. इस माननीय सभागृह की सदस्या होने के नाते मैं कहना चाहती हूं कि कार्रवाई करने जैसा वहां पर कुछ भी नहीं हुआ है. वहां पर वही पहले वाला स्टाफ है, उन पर कोई एक्शन नहीं हुआ है. संबंधित कांट्रेक्टर को क्या समझ दी गयी, मुझे उस बारे में कुछ पता नहीं है. लेकिन वहां पर जो अपमानास्पद व्यवहार होता है, उससे ऐसा लगता है कि "दाल में कुछ काला है " मुझे कहना है कि क्या इस टोलनाके को ब्लैक लिस्ट किया जाएगा ?

यानंतर श्री. बोरले...

अशुद्धीत प्रत / शोधनेसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात त्यांनी माझ्याशी सुध्दा चर्चा केलेली आहे. त्यांनी मला सांगितले होते की, टोल नाक्यावर एका कर्मचा-याने माझ्याशी अरेरावीची भाषा केलेली आहे आणि त्यांच्यावर ताबडतोब सक्तीची कारवाई करण्यात यावी. शासनाने या बाबीची दखल घेतलेली आहे. खासदार, आमदार यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे. कारण ते वरिष्ठ सभागृहाचे सदस्य असल्यामुळे त्यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे यासंदर्भात आपण सक्तीच्या सूचना दिलेल्या आहेत. आम्ही तात्काळ अधीक्षक अभियंत्यामार्फत संबंधित ठेकेदाराला कळविले होते आणि त्या ठेकेदाराने राऊत नावाच्या मुलाला कामावरुन काढून टाकलेले आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, यह किसी एक कर्मचारी की बात नहीं हैं...

उपसभापती : पहले आप मंत्री महोदया का उत्तर पूरा होने दीजिए, उसके बाद आपको जो पूछना है, पूछिए. तुमचा मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे.

श्रीमती फौजिया खान : माननीय अध्यक्ष महोदय, किसी एक कर्मचारी की बात नहीं है. जो डायरेक्शन यह जवाब ले रहा है, वह सही नहीं है. यहां पर कॉमन और जनरल बात होनी चाहिए. मैं यहां पर किसी एक व्यक्ति की बात नहीं कर रही हूं. यह अपमापन सभी आमदारों को सहन करना पड़ता है.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, खासदारांचा, आमदारांचा उचित सन्मान झाला पाहिजे. ज्या कर्मचा-याने अरेरावीची भाषा केलेली आहे त्याला ठेकेदाराने कामावरुन काढून टाकलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितलेले आहे की, हा टोल नाका अनधिकृत आहे. परंतु मी असे सांगू इच्छिते की, हा टोल नाका अधिकृत असून तो सन 1999 पासून सुरु आहे. तेथील रेल्वे क्रॉसिंगचा जो पूल आहे तेथे हा टोल नाका आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी कॉन्ट्रॅक्टच्या एस्टीमेट कॉस्ट संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. कॉन्ट्रॅक्टची एस्टीमेट कॉस्ट अंदाजे 851 लाख रुपये आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मेरा कहना है कि टोलनाके से संबंधित सभी जानकारी वहां पर बोर्ड पर लिखी होनी चाहिए.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान से निवेदन करुंगी कि वह मुझे उनके सवालों का पूरा जवाब देने दें. उसके बाद उनको क्या पूछना है, वह पूछ सकती हैं. प्रश्न पूछने का उनको पूरा अधिकार है. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. दुसरा प्रश्न त्यांनी कॉन्ट्रॅक्टच्या अमाऊंट संदर्भात विचारला होता. कॉन्ट्रॅक्टची अमाऊंट 851 लाख रुपये आहे. दिनांक 25.04.2008 ते 22.04.2010 पर्यंत कॉन्ट्रॅक्टची मुदत आहे. 1999 पासून हा टोल नाका सुरु आहे. हा टोल नाका आर.ओ.बी.च्या रिकव्हरीसाठी आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी 4 प्रश्न विचारलेले आहेत. पहिल्या आणि दुस-या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. त्यांनी तिसरा प्रश्न रिकव्हरीच्या संदर्भात विचारलेला आहे. एका महिन्याला 37 लाख रुपयांच्या आसपास रिकव्हरी होते. तो ठेकेदार महिन्याला महामंडळाकडे रक्कम भरत असतो. कोणत्याही टोल नाक्यावर अशा सक्तीच्या सूचना म्हणजे माननीय आमदारांच्या ज्या गाडया आहेत गाडी क्रमांक आणि त्यासाठी वेगळे लेबल लावले जाईल. आमदार आणि त्यांचे गाडी क्रमांक म्हणजे जेणेकरुन पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची महामंडळाकडून दक्षता घेतली जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरे प्रश्नों का उत्तर मुझे नहीं मिला है. मंत्री महोदया का उत्तर सुनकर मेरा समाधान नहीं हुआ है.

यानंतर श्री.भोगले.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

लक्षवेधी सूचना क्रमांक-8....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय सदस्यांचे म्हणणे केवळ एका सदस्यांपुरते मर्यादित नसून सर्वच आमदारांबाबतचा हा प्रश्न आहे. याबाबत शासनाने निश्चित धोरण ठरविले पाहिजे. ज्यांची लायकी नाही असे कर्मचारी तेथे नेमले जातात. त्यांच्याकडून विधीमंडळ सदस्यांचे ओळखपत्र घेतले जाऊन ते उलटसुलट करुन तपासले जाते. त्यांना नीट वाचता येत नाही. ते ओळखपत्र घेऊन पर्यवेक्षकांकडे जातात. विधीमंडळ सदस्यांना तेथे सात-आठ मिनिटे थांबवून ठेवले जाते. त्यांना काही प्रश्न विचारला तर ते उलटसुलट माहिती देऊन आमदारांचा अवमान केला जातो. शासन याबाबत निश्चित धोरण ठरविणार आहे का? आमदार, खासदार यांची वाहने ओळखण्यासंबंधी त्यांच्या वाहनावर स्टिकर लावण्यात यावा अशी मागणी करुनही तो प्रश्न चार वर्षे प्रलंबित आहे. शासन निश्चित धोरण जाहीर करणार आहे काय?

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय आमदारांची वाहने असतील त्यांना वेगळे लेबल लावण्याबद्दल महामंडळाला कळविण्यात येईल. जे टोलनाके आहेत तेथील वसुली करण्यासाठी कर्मचारी, पर्यवेक्षक व अधिकारी यांची नियुक्ती केली जाते त्यांच्या चारित्र्याचा दाखला पोलिसांकडून घेतला पाहिजे अशा प्रकारच्या सूचना दिल्या आहेत. निविदेच्या अटी व शर्ती असतात त्यामध्ये प्रत्येक टोल नाक्यावर कर्मचारी, पर्यवेक्षक यांची नियुक्ती करावयाची असल्यास त्यांचा कामाचा अनुभव, वर्तणूक या गोष्टी पाहिल्या पाहिजेत याबद्दलच्या सूचना दिलेल्या आहेत. पथकर किंवा टोलनाक्यावर कर्मचाऱ्यांनी विशिष्ट प्रकारचा गणवेष धारण केला पाहिजे. त्यांचे स्वत:चे नाव प्रदर्शित करणारी पाटी त्यांनी शरीराच्या दर्शनी भागात लावली पाहिजे. जिथे जिथे महामंडळाचे टोलनाके आहेत तेथे या सूचना दिल्या आहेत. त्या सूचनांचे व्यवस्थित पालन होते की नाही हे पाहिले जाईल. पालन होत नसेल तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कालच्या वृत्तपत्रात एक बातमी आणि फोटो प्रदर्शित झाला होता. वांद्रे-वरळी सागरी सेतूची पाहणी करण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री, मंत्री गेले होते. त्या प्रत्येकांनी डोक्यावर हेल्मेट घातले होते. उद्घाटन होण्यापूर्वी हेल्मेट घातले असल्यामुळे आम्हाला शंका आहे की, त्या पुलाच्या कामात काही गडबड झालेली आहे का?

(उत्तर देण्यात आले नाही)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-8....

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले ते अतिशय अपुरे आहे. आमदारांना जे पासेस दिले आहेत ते पासेस टोलनाक्यावर स्वीकारले जात नाहीत. महाड येथील टोलनाका हा अनधिकृतपणे सुरु आहे. तेथे टोल वसूल करुनही पावती दिली जात नाही. बीपीटी रस्त्यावर मध्यंतरी एक अनधिकृत टोलनाका सुरु करण्यात आला होता. अशा अनधिकृत टोलनाक्यामुळे एक-एक कि.मी.अंतरापर्यंत वाहनांची रांग लागते. याबाबत मंत्रीमहोदय स्पष्टीकरण करणार आहेत का?

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याबाबत तात्काळ चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

(नंतर 3एल.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : मला हवे तसे उत्तर नको तर योग्य असेच उत्तर पाहिजे. मैं पूछ रही हूं कि यहां पर एक टोलनाके का विवरण मंत्री महोदया ने दिया है. लेकिन वह कांट्रेक्ट कितने का है और उस पर कितना खर्च किय गया, यह सब जानकारी हर टोलनाके पर डिसप्ले होनी चाहिए. लेकिन उस बात पर अमल नहीं हो रहा है. जो लोग अमल नहीं कर रहे हैं उन पर कार्रवाई होनी चाहिए. मुझे पूछना है कि शासन क्या कार्रवाई करेगा ?

डॉ. विमल मुंदडा : वहां पर जानकारी डिसप्ले की जाती है. यदि किसी जगह पर जानकारी डिसप्ले नहीं की गयी तो उस पर कार्रवाई की जाएगी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सेतू सुविधा केंद्रांची स्थापना होऊन देखील जनतेला हेलपाटे मारावे लागणे

मु. शी. : सेतू सुविधा केंद्रांची स्थापना होऊन देखील जनतेला हेलपाटे मारावे लागणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"जनतेची कामे जलदगतीने होण्याच्या दृष्टीने शासनाने तहसील कार्यालयात सेतू सुविधा निर्माण करुन दिली असताना मालवण तहसील (जि. सिंधुदुर्ग) कार्यायातील सेतू सुविधा केंद्रामार्फत जनतेला दाखलाव इतर कागदपत्रांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी दि. 11 जून, 2009 रोजी या कार्यालयाला टाळे ठोकले. शासनाने नागरिकांच्या सुविधेकरिता ही सोय करुनही जनतेचा त्रास कमी न होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये याबाबत निर्माण झालेला संताप, शासनाने केलेली सुविधा हीच असुविधा झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी तेथील नागरिकांनी कली आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मेंढरे चराईसाठी घेऊन गेलेल्या मेंढपाळांवर झालेले खुनी हल्ले

मु. शी. : मेंढरे चराईसाठी घेऊन गेलेल्या मेंढपाळांवर झालेले खुनी हल्ले याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.रमेश शेंडगे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात तसेच जळगाव जिल्हयातील यावल तालुक्यात वडोदा या गावी तसेच नंदूरबार या जिल्हयात आपल्या उपजिविकेसाठी मेंढरे चराईस घेऊन गेलेल्या मेंढपाळांवर मे, 2009 मध्ये झालेले खुनी हल्ले व पडलेले दरोडे, तसेच त्यांच्या कुटुंबियांवर झालेले अत्याचार व निर्घृण मारहाण, या दरोडयामध्ये त्याच्या जवळील सोन्याचांदीचे दागिने, रोकड व किमती चीजवस्तूची लुटमार करण्यात येणे, संबंधित जिल्हयांतील पडलेल्या या दरोडयांतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनामध्ये तक्रार नोंदवूनही त्याची दखल न घेण्यात येणे, अद्यापि वरील दरोडयामधील लुटारु व गुन्हेगार मोकाट असणे व त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे आपल्या उपजिविकेसाठी मेंढया चराईसाठी घेऊन जाणाऱ्या मेंढपाळ व धनगर समाजामध्ये पसरलेले तीव्र भीतीचे वातावरण, त्यामुळे त्यांच्या उपजिविकेच्या साधनांवर झालेला विपरीत परिणाम, शासनाबद्दल त्यांच्या मनात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, पोलीस व गुन्हेगार यांच्यात संगनमत आहे किंवा कसे याबद्दल मेंढपाळांमध्ये व्यक्त होत असलेली भावना, त्यांच्यात वाढीस लागलेली असुरक्षिततेची भावना व याबाबत शासनाने तातडीने केलेली कारवाई व शासनाची भूमिका."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड येथील क्रीडा संकुलात व्यवस्थापनाअभावी घडत असलेल्या विविध घटना

मु. शी. : बीड येथील क्रीडा संकुलात व्यवस्थापनाअभावी घडत असलेल्या विविध घटना याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"बीड येथील जिल्हा क्रिडा संकुलात गेल्या अनेक वर्षापासून व्यवस्थापना अभावी अनेक घटना घडत असणे, याच क्रिडा संकुलात काही दिवसांपूर्वी एका खेळाडूचा भरदिवसा खून झाला असून सदर समस्येवर अद्याप कोणतीच उपाययोजना न होणे, मात्र सद्य:स्थितीत अधिकाऱ्यांकडून स्वत:वरील जबाबदारी झटकण्यासाठी अप्रत्यक्षपणे सूचना करण्यात येणे, क्रिडा संकुलासाठी सहा सुरक्षा अधिकाऱ्यांची पदे मंजूर असतांना दोन सुरक्षा रक्षकांनी नोकरी सोडली असता नवीन पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून दिशाभूल करणे, यामुळे संकुलाच्या व्यवस्थापनावर अनिष्ट परिणाम होणे, तसेच अन्य सोई सुविधा अभावी खेळाडूंची गैरसोय होणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगराळ भागातील धनगरवाडीतील नागरिकांना अद्यापही अंध:कारमय जीवन जगावे लागणे

मु. शी. :कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगराळ भागातील धनगरवाडीतील नागरिकांना अद्यापही अंध:कारमय जीवन जगावे लागणे याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"कोल्हापूर हया डोंगराळ तालुक्याच्या जिल्हयातील दुर्गम डोंगराळ भागात वाडया वस्त्या वसलेल्या असणे, राधानगरी तालुक्यातील दुर्गम बोक्याचा धनगरवाडा गेली 60 वर्षे अंध:कारमय जीवन जगत असणे, वीज मिळावी म्हणून तसेच अंधारातून प्रकाशाकडे जावे म्हणून तेथील गावकऱ्यांनी सातत्याने आंदोलने करणे, तेथील तत्कालिन लोकप्रतिनिधींनी 20 वर्षे सातत्याने पाठपुरावा करुनही शासनाने त्याची अद्यापपर्यंत दखल न घेणे, परिणामी गोरगरीब जनतेला शासनाच्या या उदासीन धोरणामुळे अंधारातच रहावे लागणे, शासनाच्या या दुर्लक्षामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने लक्ष घालून जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता. "

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नवी मुंबईच्या सीबीडी परिसरात वाढलेली गुन्हेगारी

मु.शी : नवी मुंबईच्या सीबीडी परिसरात वाढलेली गुन्हेगारी याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष् उल्लेखाची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशष उल्लेखासंबधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, नवी मुंबई परिसरात विशेषत: सीबीडी बेलापूर परिसरामध्ये सतत खून, दरोडे तसेच मंगळसूत्र खेचण्याचे प्रकार होत आहेत, सीबीडीच्या परिसरामध्ये गुन्हेगारी मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. अलीकडेच दिनांक 17.4.2009 रोजी मी राहत असलेल्या ठिकाणी सीबीडी सेक्टर 3 मधील एकता अपार्टमेन्टमध्ये रात्रीच्या वेळी सशस्त्र दरोडा पडला होता. त्यामध्ये संजय लाड या तरुणाचा खून झाला होता. त्यावेळी त्याच्या घरातील संपूर्ण ऐवजसुध्दा दरोडेखोरांनी लटून नेला होता. मुंबई - पुणे महामार्गावर असलेले सीबीडी पोलीस स्टेशन संवेदनशील असून नागरिकांनी फोन केला असतांना वेळेवर पोलीस पोहोचले नाहीत.पोलिसांना गाडी नव्हती तसेच त्यांच्याकडे पुरेशी हत्यारे नव्हती. त्यांना गाडी नसल्यामुळे ते वेळेवर पोहोचले नाहीत. मयत व्यक्तीचा भाऊ जखमी झालेला असतांनासुध्दा.त्याने एका दरोडेखोराला पकडून ठेवले होते. त्याच्या कुटुंबात एकही व्यक्ती कमाविणारी नाही. त्याचे वडील वारले आहेत तसेच भाऊ वारलेला आहे. त्यांच्या कुटुंबात कमाविणारी एकही व्यक्ति राहिलेली नाही.त्याच्या पत्नीला दोन वर्षाची एक मुलगी असून ती पुन्हा गरोदर राहिलेली आहे.छोटा भाऊ आणि इतर अशा चार जणांचे कुटूंब चालविणे त्यांना अत्यंत अवघड झालेले तेव्हा मृत्युमुखी व्यक्तिच्या कुटुंबाला मदत करण्यासाठी मी हा विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे. ज्यांच्या घरात दरोडा पडला होता ती व्यक्ती मृत्यूमुखी पडलेली आहे तेव्हा त्यांच्या कुटुंबियांना जास्तीत जास्त मदत करावी अशी मी या निमित्ताने विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी . : पुण्यातील गणेशोत्सव मंडळावर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत

मु.शी : पुण्यातील गणेशोत्सव मंडळावर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत श्री.अरविंद सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, गेल्या वर्षी पुणे येथील गणोशोत्सवाच्या वेळी रस्त्यावर होर्डिग्ज लावणे, रस्त्यावर गेट तयार करणे वा ध्वनिक्षेपक लावणे या सारख्या लहान लहान गुन्हयासाठी पुण्यातील सर्व गणेशोत्सव मंडळावर कारवाई करण्यात आली होती यासबंधीचा विषय सदनामध्ये मांडण्यात आला होता त्यावेळी तत्कालिन गृह मंत्र्यांनी सभागृहात असे आश्वासन दिले होते की , हे सर्व गुन्हे मागे घेण्यात येतील. त्यानंतर सर्व गणेशोत्सव मंडळातील पदाधिका-यांना असे अपेक्षित होते की, आपल्यावर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे काढून टाकण्यात येतील .परंतु गणेशोत्सव मंडळावर दाखल करण्यात आलेले गुन्हे अजूनही सरकारने काढून घेतलेले नाहीत.यंदाचा गणेशोत्सव जवळ आलेला आहे. यानंतर पुन्हा अधिवेशन होणार नाही. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता लागू होईल. या गणेशोत्सव मंडळावरील गुन्हे काढून टाकण्यात येतील असे आश्वासन गेल्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी दिले होते त्याप्रमाणे गुन्हे काढून टाकावेत अशी मी विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, पंधरा मिनिटांची सुट्टी देण्यात यावी.

उपसभापती : मघाशी मी पंधरा मिनिटांची सुट्टी देणार होतो परंतु आपण अर्ध्या तासाची मागणी केली असल्यामुळे मी अर्ध्या तासाची सुट्टी दिली होती. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित करावयाची नाही..

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, 10 मिनिटे सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी. 4 वाजून 10 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(3.59 ते 4.10 पर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>मध्यंतरानंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती :सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत. आणि त्यावेळी जर कॅबिनेट मंत्री सभागृहात आले नाहीत तर मी दिवसभरासाठी सभागृहाचे कामकाज तहकूब करीन.

(4.13 ते 4.18 पर्यंत सभागृह स्थगित)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय उप सभापती

पृ.शी.: (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XIII OF 2009.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2010."

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 13 - दिनांक 31 मार्च 2010 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उपसभापती : आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदंयाना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतो आजच पूर्ण करावयाचे आहे.

विविध मत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या

उपसभापती : आता खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1) ग्रामविकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एल-2, एल-3 एल-5, एल-5ए, एल-7, झेड डी -4
2) जलसंपदा (कृष्णा खेरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3, वाय-2
3) गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1, बी-4, बी-5, बी-9
4) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-5, टी-6
5) ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-6, के-11
6) वने मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-7, सी-10
7) कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-4

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

8) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1, आर-2, आर-3

9) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डी-4, डी-5, डी-6, डी-9, डी-10, डी-11

10) उच्च व तंत्रिशिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एस-1, एस-2, एस-4, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6, डब्ल्यू-8

11) रोजगार हमी योजना आणि महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ओ-3, एक्स-1

12) अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2

13) पुनर्वसन व मदतकार्य, भूकंप पुनर्वसन, क्रीडा व युवक कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक सी-5, ई-3

--

.3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथम मला पृष्ठ क्रमांक 25 वरील बाब क्रमांक 32 आणि 35 बाबत बोलावयाचे आहे. माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. यामध्ये मुंबईतील दहशतवादी कृत्यांच्या विरोधात कार्यवाही करताना जखमी झालेले पोलीस अधिकारी/व्यक्ती यांना नुकसानभरपाई देण्याकरिता पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु त्याचबरोबर बोरीबंदर स्टेशनवर 54 निरपराध नागरिक त्यांचा कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसताना या दहशतवादी हल्ल्यामध्ये बळी पडले. या दहशतवादी हल्ल्याच्या बाबतीत डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये चर्चा झाली. अशा या अतिशय दुर्दैवी आणि भयानक प्रसंगाच्या बाबतीत सगळा महाराष्ट्र या प्रसंगात एक आहे हे दाखविण्यासाठी कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेश न आणता, कोणतेही राजकारण न आणता चांगली चर्चा केली. त्यावेळी मी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये सूचना केली होती. सन्माननीय पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला. त्यांना जागा मिळाल्या, त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था झाली आणि ते करणे आवश्यक होते. त्यांनी त्या ठिकाणी एक प्रकारचा पराक्रम केला होता आणि ते शहीद झाले होते. परंतु ज्यांचा कोणत्याही प्रकारचा दोष नाही असे अनेक निरपराध नागरिक बोरीबंदर स्टेशनवर तसेच अन्य ठिकाणी दुर्दैवाने या दहशतवादी हल्ल्यामध्ये बळी पडले. त्यावेळी मी सांगितले होते की, निदान शासनाने गावागावात त्यांचे पत्ते शोधून काढावेत. त्यांच्या डेड बॉडीज सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, जे.जे. हॉस्पिटल तसेच अन्य दोन तीन रुग्णालयांमध्ये शवागारात जागा नाही म्हणून अन्य ठिकाणी नेल्या जात आहेत. याचा अर्थ शासनाकडे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सोडून अन्य लोकांचे पत्ते होते. त्यावेळी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केली होती की, जिल्हाधिकारी असतील, तहसीलदार असतील, त्यांच्यामार्फत त्या लोकांच्या घरी जाऊन त्यांची काय स्थिती आहे, त्यांच्या घरातील कोण व्यक्ती या हल्ल्यामध्ये गेली याची माहिती घेतली पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या बाजूच्या गावातील दोन मुले आपल्या मामाला भेटण्यासाठी आली होती आणि मामा त्यांना सोडायला आला होता. ती आठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण .....

वर्षाची मुलगी आणि तिचा 10 वर्षाचा भाऊ यांचे हातात हात घालून असलेले शब सेंट जॉर्जेस हॉस्पिटलच्या शवागारात होते. यामध्ये भावनात्मक परिस्थिती असताना शासनाच्या कर्तव्याचाही प्रश्न आहे. खरे म्हणजे देशातील नागरिकांच्या सुरक्षिततेची आमची जबाबदारी आहे. त्या ठिकाणी राजकारण बाजूला ठेऊ. त्यावेळी कोणाचा गुन्हा झाला वगैरे बाबत प्रधान समितीच्या अहवालावर चर्चा होईल त्यावेळी बोलू.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

त्या चर्चेची संधी देईल किंवा नाही याबद्दल शंका आहे. उद्या वंदे मातरम् म्हणताना तो अहवाल सादर होईल असे वाटते. त्या लोकांचा काय दोष होता. त्यांना सुध्दा नुकसान भरपाई दिली पाहिजे. 1993 साली मुंबई शहरामध्ये दुर्दैवी दंगल झाल्यानंतर, बाबरी मशिदीचा ढाचा पडल्यानंतर बेहराम पाडयामध्ये पोलिसांच्या बंदुका हिसकावून घेतल्या. हे मी म्हणत नाही तर न्यायालयीन चौकशीमध्ये ही माहिती समोर आलेली आहे. दंगल रोखण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात जे बळी पडले त्यांना 2-2 लाख रुपये दिले गेले. विद्ध्वंसक प्रवृत्तीच्या लोकांनी जमावासह पोलिसांवर हल्ला केला. अशावेळी त्या लोकांना किती मदत द्यावयाची ते शासन ठरविते. काहींच्या मुलांना नोकरी दिली आहे. त्यावेळच्या घटनेत 54 लोक मारले गेले, त्यामध्ये कोणाच्या घरातील कर्ता पुरुष गेला असेल, एखाद्याच्या घरातील मुलगा गेला असेल, त्या लोकांकडे शासन म्हणून पाहिले आहे काय, म्हणून मी शब्द वापरतो की, शासन संवेदना हरवून बसले तर राज्यच करु शकणार नाही. म्हणून ज्यांच्या घरातील व्यक्ती गेलेली असते त्यांच्या कुटुंबियांना लाख रुपये, दोन लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी किंवा त्यांच्या घरातील सदस्याला नोकरी द्यावी, पैसे जरी दिले तरी त्यांच्या घरातील माणूस परत येणार नाही, हे सत्य आहे. पण या सूचनेचा शासनाने अवश्य विचार करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आपल्यामार्फत विद्यमान सन्माननीय गृहमंत्र्यांना निदर्शनास एक बाब आणू इच्छितो. मागील वेळी गृह खात्यावर चर्चा झाली असताना तत्कालीन गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी 2005 साली पोलिसांच्या पदांचा आढावा घेताना सभागृहात माहिती देताना असे सांगितले होते की, 1960 सालच्या निकषांवर महाराष्ट्रात पोलीस कार्यरत आहेत. 1960 साली राज्याची लोकसंख्या साडेसहा ते सात कोटी असेल. आता ती लोकसंख्या 10 कोटीपर्यंत गेलेली आहे. 2005 साली सभागृहात सांगितले होते की, 1960 च्या निकषानुसार राज्यात 55,105 पदे भरणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी 2006 सालापासून 2011 पर्यंत दरवर्षी 11 हजार पदे याप्रमाणे 55 हजार पदे भरण्याचा निर्णय घेतला. आजच पोलिसांची भरती केली आहे ती 1960 सालच्या निकषानुसार केलेली आहे. त्यावेळी महाराष्ट्राची लोकसंख्या साधारणपणे 7 लाख असेल आणि

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.मधुकर चव्हाण....

मुंबईची लोकसंख्या 48 किंवा 49 लाख इतकी असेल. या मुद्याचाही विचार होणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकाची सुरुवात झालेली असल्यामुळे यामध्ये आणखी 5 कोटी 72 लाखांची भर पडेल असे दिसते. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये एका पोलिसावर 801 नागरिकांची जबाबदारी येते, देशातील पोलिसांवर 700 नागरिकांची आहे, तामिळनाडूमध्ये 632 नागरिकांची आहे. अगदी मागासलेल्या देशाचे मी उदाहरण देईन, दक्षिण आफ्रिकेमध्ये एका पोलिसावर 361 नागरिकांची जबाबदारी आहे. हे यानिमित्ताने लक्षात घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पोलिसांच्या गृहनिर्माण योजनेची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. निदान सेवेच्या कालखंडात तरी त्यांना चांगले सर्व्हंट क्वार्टर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व ग्राहक संरक्षण विभागाच्या पान क्रमांक 249, बाब क्रमांक 231 वर मी बोलतो. सार्वजनिक वितरण यंत्रणेमध्ये सहभाग असलेल्या शासकीय अधिका-यांसाठी प्रशिक्षण देणे यासाठी ही मागणी केली आहे. शासनाच्यावतीने वेळोवेळी उत्तर दिलेले आहे. सुमारे या राज्यात 3.5 लाख बांगलादेशीय नागरिक आहेत. बांगलादेशीय नागरिकांपैकी राज्यात 1 लाख लोकांना रेशन कार्डे दिलेली आहेत. परवाच्या विशेष कार्यकारी अधिका-यांच्या यादीत काही बांगलादेशीय नागरिक आलेले आहेत. ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. राज्यात परप्रांतातून येणाऱ्या नागरिकांबाबत आम्ही बोलतो की, मुंबई शहर किती परप्रांतीय लोकांचा बोजा उचलणार ? वादासाठी आपण गृहित धरु की, निदान ते लोक आपल्या देशातील तरी नागरिक आहेत, कोणी बिहारमधील असेल, कोणी कर्नाटकमधून आलेला असेल, पण हे बांगलादेशातून आल्याचे वेळोवेळी सिध्द झालेले आहे. याठिकाणी पंचमस्तंभीयांच्या देशविरोधी कारवाया करणा-या दहशतवाद्यांना जे मदत करण्यास निघाले आहेत ते येथीलच आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:30

(श्री. मधुकर चव्हाण...)

अन्न व नागरी पुरवठा खात्यामार्फत रिचेकिंगची मोहीमहाती घ्यावी. एक-दीड बांगलादेशीय नागरिकांना मतदार करुन घेण्यात आलेले आहे. कोणतेही पुरावे नसताना त्यांना रेशनिंग कार्डे देण्यात आलेली आहेत. मग हे लोक झोपड्या नियमित करण्याच्या आणि अन्य वेगवेगळया मागण्या करतात. माझी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या पुरवणी मागण्यांवर केवळ दोन मिनिटामध्ये त्यांनी उत्तर देऊन नये. या बांगलादेशीय नागरिकांना हुसकावून लावा, तसेच कोणताही पुरावा नसताना त्यांना ज्यांनी रेशनिंग कार्डे दिली त्या अधिका-याला केवळ निलंबित न करता त्यांनी केलेले हे काम राष्ट्रद्रोही असल्यामुळे त्यांना चारभिंतीच्या आड जेलमध्ये पाठवा अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक पोलीस आयुक्तांच्या बदली बाबत

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत. मला एका गंभीर विषयाकडे त्यांचे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्या काही दिवसापासून नाशिकच्या आयुक्तांची केलेली बदली, या पूर्वी त्यांनी केलेले कामकाज, त्यांच्या बद्दल जनमानसामध्ये निर्माण झालेली विश्वासार्हता, ह्या गोष्टी एका बाजूला असताना अचानकपणे त्यांची नाशिकहून बदली करण्यात आल्यामुळे नाशिकमध्ये जनक्षोभ उसळला आणि त्याचे पडसाद सगळीकडे उमटू लागले. मी ज्यावेळी नाशिक शहराची माहिती घेतली त्यावेळी याबाबतीत जनतेच्या अपेक्षा आणि भावना वेगळया आहेत. तेथील लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीला लागेल की काय अशी चिंता निर्माण झालेली आहे. याबाबतीत जी काही वस्तुस्थिती असेल त्याला अनुसरुन सद्याचे जे पोलीस आयुक्त त्या ठिकाणी कार्यरत आहेत त्यांना अजून संधी द्यावी आणि शासनाने आपल्य निर्णयाला स्थगिती द्यावी अशी मी आपल्या मार्फत गृहमंत्र्यांना विनंती करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पुणे आणि नाशिक येथील दोन्ही घटनांसबंधी आम्ही नियम 289 अन्वये सूचना दिली होती. आम्ही माननीय सभापतींना भेटून या विषयाच्या संदर्भात आम्हाला दोन मिनिटे बालू द्यावे अशी विनंती केली होती. आता सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नाशिकची घटना थोडक्यत सांगितली. नाशिकमध्ये मोठा प्रक्षोभ निर्माण झालेला आहे. नाशिकचे पोलीस आयुक्त श्री. मिश्रा यांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी असे वक्तव्य केले होते की त्यांनी बदली मागितली होती म्हणून त्यांना केंद्र शासनाच्या सेवेत पाठवित आहे. या सर्व गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे. कारण बाहेर वेगळा समज आहे. जेव्हा नाशिकच्या पोलीस आयुक्तांना याबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी, अशा प्रकारची कोणतीही विनंती केलेली नाही, असे सांगितले. मधल्या काळात घडलेल्या घटनांची सर्व चर्चा झालेली आहे. त्या घटनांच्या संदर्भात दोषी असलेल्या राजकीय पक्षाच्या मंडळींना तडीपार केले. याचे समर्थनकरण्या ऐवजी त्यांची बदली करण्यात आली. काल पासून मुंबई नाशिक हायवे 5-6 तास बंद होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या बदलीच्या निषेधार्थ राजकीय पक्षाचे नाही तर नाशिक शहरातील डॉक्टर्स, वकील अशी मंडळी रस्त्यावर उतरली होती. या जनक्षोभाची मंत्री महोदयांनी दखल घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

दुसरी घटना अशी की, पुण्यामध्ये काँग्रेस भवन आहे. त्याठिकाणी महात्मा गांधी राहिले होते. त्याठिकाणी श्री. नातू नावाच्या प्राध्यापकांना बळजबरीने नेऊन त्यांना पिस्तूल दाखवून धमकी दिली गेली होती.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही आम्हाला जमीन द्या. त्यांच्या अकाऊंटला जबरदस्तीने पैसे जमा केले गेले. त्या अकाऊंटमधून त्यांनी एक नवा पैसा काढलेला नाही. कुठल्याही खरेदी खताचा व्यवहार होण्या अगोदर त्यांच्या बँकेत पैसे जमा झाले. नाशिक आणि पुणे शहरात जमीन माफिया तयार झाले आहेत. त्यांना मोक्का लावा. माननीय पोलीस आयुक्त श्री.शर्मा यांना सुध्दा मोका लावला. त्यांच्यावर पूर्वी कोणते गुन्हे नसताना मोक्का लावण्यात आला. जसा त्यांना मोक्का लावला तसा यांना देखील मोक्का लावावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. कर्नाटकी नावाचे बिल्डर या सगळयांचे त्यांच्यावर बंधन आहे. त्याचेवर बेलेबल आफेन्स दाखल केला आहे. यासंदर्भात कार्यवाही करावी अशीही मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. वसंत पवार : सभापती महोदय, 91 लोकांना तडीपारीच्या नोटीसा दिल्या आहेत. 30 प्रकरणे ए.सी.पी.यांच्याकडे चौकशीसाठी गेली आहेत. डी.सी.पी.कडून 31 लोकांना नोटीसा जारी केल्या गेलेल्या आहेत. याबाबतीत ताबडतोबीने निर्णय होणे गरजेचे आह.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे प्रथम ऐकून घ्यावे. त्यानंतर त्यांना काही उपप्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी विचारावेत. प्रत्येक उप प्रश्नाला मी उत्तर देण्यास तयार आहे. या ठिकाणी मी श्री. व्ही.डी.मिश्रा यांच्या बाबतीत सभागृहाला माहिती करुन देऊ इच्छितो. केंद्रीय नियुक्ती बाबत ऑफर लिस्ट 2008 महासंचालक कार्यालयाने दिनांक 31डिसेंबर, 2007 रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले. यामध्ये श्री. मिश्रा यांच्या नावाचा समावेश होता. केंद्र शासनाला दिनांक 16 एप्रिल, 2008 रोजी ऑफर लिस्ट बाबत कळविण्यात आले आह. सन 2008 च्या ऑफर लिस्टमध्ये श्रीमती प्रज्ञा सरवदे, भारतीय पोलीस सेवा, या पोलीस उप महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी, सेबी, मुंबई येथे विशेष कार्य अधिकारी या पदावर गेल्या आहेत. दरम्यानच्या काळामध्ये श्री. व्ही.डी.मिश्रा, यांनी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस, यांना दिलेले पत्र माझ्याकडे आहे. ते पत्र मी सभागृहात वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "With reference to above subject, I am submitting my personal Bio-Data (Annexure-1) for central deputation for further necessary action. However, I had given willingness in central deputation for the year 2008.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

But, now the academic year of my son is going to start in June, 2008. In view of the above, it is not possible for me to go on deputation in the current year. The willingness given by me earlier may kindly consider for the next academic year i.e. for 2009 only." त्यांनी असे कळविले आहे की, 2009 साली माझा प्रतिनियुक्तीचा कालावधी घ्यावा आणि त्याप्रमाणे फाईल प्रोसेस झाली. त्या फाईलचा निष्कर्ष अंतिम निघाला. विभागानेच माझ्याकडे प्रस्ताव पाठविला की, यांना प्रतिनियुक्तीवर पाठविणे आवश्यक आह. कारण राज्य सरकारमध्ये अडचण अशी आहे की, केंद्रीय प्रतिनियुक्तीचा कोटा 52 अधिका-यांचा आहे. पण आतापर्यंत फक्त 18 अधिकारी प्रत्यक्षात प्रतिनियुक्तीवर आहेत. महाराष्ट्रातून केंद्र सरकारच्या पदावंर जाण्यासाठी अधिकारी इच्छूक होत नाही किंवा संमती कळवावयाची. सोयीचे पद मिळाले नाही तर संमती कळवावयाची नाही. सोयीचे पद मिळाले नाही तर जावयाचे नाही. दोन, तीन महिने गेले नाही तर आपोआप डिबार होण्याची प्रोसेस होते. तथापि गेले दोन दिवसापासून नाशिक शहराच्या बाबतीत प्रसार माध्यमातून चर्चा चालू आहे. त्यासंबंधीची शासनाने गांभीर्याने दखल घेतलेली आहे. नाशिक जिल्हयाचे पालक मंत्री आणि राज्याचे उप मख्यमंत्री श्री.छगन भुजबळ साहेब यांनी मला सकाळी बोलावून नाशिक शहराबाबतची परिस्थिती सांगितली.

यानंतर श्री. बोरले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

त्यांनी मला सांगितले की, नाशिककरांची अशी इच्छा आहे की, श्री.मिश्रा यांना नाशिक येथेच ठेवावे. त्याच बरोबर माननीय राज्यमंत्री श्रीमती शोभा बच्छाव नाशिक शहरातील आहेत. त्यांनी आणि सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी नाशिककरांच्या भावना माझ्या कानावर घातलेल्या आहेत. त्यामुळे आपण श्री.व्ही.डी.मिश्रा यांची तेथून बदली केलेली असली तरी त्याला मी तात्पुरती स्थगिती देत आहे आणि श्री.व्ही.डी.मिश्रा त्या ठिकाणी काम करतील. मला नाशिककरांचे अभिनंदन केले पाहिजे की, मोठया प्रमाणात एका चांगल्या अधिका-याच्या पाठीमागे राहतांना मला नाशिककरांच्या हेही लक्षात आणून देणे आवश्यक आहे की, गेल्या 3 महिन्यात ज्या वेगवेगळया घटना झाल्या त्यावेळी ताबडतोब बदली करा अशी पत्रकारांपासून अनेकांनी माझ्याकडे वेळोवेळी मागणी केली होती. परंतु त्याचा आणि याचा काही संबंध नाही. आज, काल आणि परवा नाशिककरांना जे वाटते ते महत्वाचे आहे. म्हणून त्यांच्या बदलीला माननीय पालकमंत्री श्री.छगन भुजबळ साहेब, माननीय राज्यमंत्री श्रीमती शोभाताई बच्छाव आणि सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य यांनी केलेल्या सूचनेवरुन त्यांना आज तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. सभापती महोदय, पुण्याचा जो उल्लेख आहे ती बातमी मी प्रसार माध्यमातून बघितलेली आहे. त्यासंदर्भात ॲक्शन घेण्याच्या सूचना सी.पी. यांना देण्यात येतील. सभापती महोदय, पुण्याची जी घटना घडली त्या घटनेसंदर्भात सखोल चौकशी करावी. शेवटी त्यांचा मुलगा सैन्यामध्ये काम करीत आहे आणि सैन्यामध्ये ज्यांच्या घरातील मुले जात आहेत त्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे आणि ती काळजी पुणे पोलिसांकडून निश्चितपणे घेतली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एका वर्षापासून श्री.नातू यांची पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी तक्रार घेतली नाही. काल सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे आणि इतर लोक तेथे गेले. त्यावेळी तक्रार नोंदविण्यात आली. त्यांचे असे म्हणणे आहे की, माझा मुलगा सैन्यामध्ये आहे आणि मी सैन्य दलामध्ये माझा मुलगा दिल्यानंतर एका वर्षापासून मला पोलीस स्टेशनमध्ये हेलपाटे मारावे लागत आहेत. त्या अधिका-यांच्या संदर्भात आपण चौकशी करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी अशी सूचना देतो की, सी.पी. यांनी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, त्यांनी आयुक्तांना पत्र दिले होते. ते पत्र आयुक्तांच्या कार्यालयातून पोलीस स्टेशनमध्ये जाण्यासाठी 3 महिने लागले. त्यानंतर पोलीस स्टेशनचे अधिकारी असे म्हणतात की, तक्रारी आलेल्या नाहीत. पोलीस स्टेशनकडून लोकांना फोन केले जातात. अशा प्रकारे जे गुन्हेगार माफिया पद्धतीचे काम करीत आहेत शासन त्यांना मोक्का लावणार आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, रिपिटेड गुन्ह्यांचे प्रमाण किती आहे हे पाहिल्याशिवाय त्यांना मोक्का लावता येईल की, नाही हे मला सांगता येणार नाही. कारण त्यांनी किती गुन्हे केलेले आहेत हे बघावे लागेल. परंतु एवढे नक्की की, त्यांच्या तक्रारी वेळेवर का नोंदविल्या गेल्या नाहीत, संबंधितांना का बोलाविले गेले नाही याची तपासणी करुन संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.हेमंत टकले)

पृ.शी./ मु.शी.: सन 2009-10 च्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.29, पृष्ठ क्रमांक 24 यावर माझे मत व्यक्त करणार आहे. मूळ मागणी ही आपत्तीतून सुटका या विषयावर आहे. मी अतिशय गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राच्या बाहेर लोकांना फसविण्याचे प्रयोग मोठया प्रमाणावर सुरु आहेत. गुजरातमध्ये श्री.जडेजा यांने हजारो लोकांना फसविले. अशाच प्रकारे लोकांना फसविण्याचा प्रयोग सध्या ए.आय.एम. लिमोझिन्स (इंडिया) लिमिटेड, 1310, 13 वा मजला, हेमकुंड, चेंबूर नेहरु पॅलेस, दिल्ली-19 या नावाची कंपनी सध्या मुंबईमध्ये कार्यरत आहे. लोकांना कारच्या नावावर पैसे वसूल करणे, एक लाख रुपये द्या. एक लाख रुपयाच्या मोबदल्यात तुम्हाला 10 हजार रुपये महिना व्याजासह आम्ही देतो अशा प्रकारची योजना या कंपनीने जाहीर केलेली आहे.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांना मी लेखी पत्र दिले. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, मुंबईमधील हजारो लोकांची फसवणूक करणाऱ्या या कंपनीवर महाराष्ट्र शासनाने कारवाई करावी. मुंबईमध्ये जे हजारो लोक फसविले जात आहेत त्यांना वाचविण्याचे कार्य शासनाने करावे अशी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-34, पृष्ठ क्रमांक 25 वर महाराष्ट्र शासनाने राज्यातील होमगार्डना द्यावयाचे अंशत: अनुदान 15 रुपयांवरुन 40 रुपये इतके वाढविले आहे. महाराष्ट्रामध्ये गृहरक्षकांची अनेक दिवसांपासून अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत. त्यातील एक मागणी ही त्यांना कायमस्वरुपी शासन सेवेमध्ये सामावून घ्यावे ही आहे. कर्नाटक सरकारने अशा प्रकारच्या गृहरक्षकांना होमगार्ड म्हणून सेवेत सामावून घेतले आहे. महाराष्ट्रातील गृहरक्षकांना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्यास मान्यता द्यावी, म्हणजे त्यांची अस्थिरता संपुष्टात येईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक-65, पृष्ठ क्रमांक 52 वर बेलवांडी, जि.अहमदनगर येथे चित्ता बचाव केंद्र स्थापन करण्यासाठी तरतूद केलेली आहे. चित्त्यांना वाचविले पाहिजे हे निश्चित आहे. महाराष्ट्रामध्ये बोडके झालेले डोंगर आहेत, त्यांनाही वाचविले पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की, डोंगर दत्तक योजना राबवून एक एक डोंगर ग्रामपंचायतीकडे सोपवावा, जेणेकरुन ग्रामपंचायतीमार्फत त्या डोंगरावर वृक्ष लागवड केली तर वनराई वाढेल आणि पर्यावरणाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. अशा वृक्ष लागवड करणाऱ्या ग्रामपंचायतींना शासनाने विशेष अनुदान द्यावे. म्हणजे एक प्रकारे या बोडक्या डोंगराचा विकास होऊन ती वृक्षराजीने नटतील आणि पर्यावरणाचा बचाव व विस्तार करता येईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 169, पृष्ठ क्रमांक 202 वर विदर्भातील प्रशासकीय मान्यता दिलेल्या लघुपाटबंधारे योजनांची यादी दिलेली आहे. तीन वर्षापूर्वी बीड मतदार संघातील टुकूर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या टुकूर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. या प्रकल्पामुळे बीड मतदारसंघातील 15 गावातील सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे. लोकांना पाण्याचे जे दुर्भिक्ष्य जाणवते, पाणी टंचाई जाणवते ती या प्रकल्पामुळे दूर होणार आहे. सन्माननीय राज्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, 3 वर्षापूर्वी प्रशासकीय

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

मान्यता देऊनही अद्याप काम सुरु झालेले नाही. गावातील काही लोकांचा या प्रकल्पाला विरोध आहे. हा टुकूर प्रकल्प 19 ते 20 गावांचे भवितव्य घडविणार आहे. या टुकूर प्रकल्पाचे काम ताबडतोब सुरु करण्यात यावे आणि त्या भागातील लोकांना जाणवणारे पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्याचा प्रयत्न करावा एवढी विनंती करुन आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभाग, पृष्ठ क्रमांक 53, बाब क्रमांक 66 अन्वये राखून ठेवलेल्या योजनांतर्गत नियतव्ययातून खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. चंद्रपूर व गडचिरोली हे जिल्हे वनाने व्याप्त आहेत. तेथील वन्यजीवांचे संरक्षण होत नाही. वन्यजीवांच्या दृष्टीने पाणी आणि चाऱ्याची टंचाई जाणवते. शासनाने यासाठी बजेटमध्ये तरतूद करावी. जंगल परिसरात पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधांचा अभाव असून रस्त्यांची सोय नाही. यासाठी माननीय वनमंत्र्यांनी पर्यटक विभागाशी संपर्क साधून ताडोबा जंगलापर्यंत अधिकाधिक पर्यटक यावेत म्हणून सोयी सवलती निर्माण करण्यासाठी बजेटमध्ये तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग, बाब क्रमांक 291, पृष्ठ क्रमांक 387 वर राज्यातील ग्रामीण कुटुंबकल्याण केंद्र व आरोग्य उपकेंद्रांसाठी तरतूद करण्यात आली आहे. चंद्रपूर शहरात 200 खाटांचे महिला रुग्णालय शासनाने मंजूर केले. परंतु त्यासाठी बजेटमध्ये तरतूद केलेली नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी सभेमध्ये ही घोषणा केली होती.

3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

माझी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, या रुग्णालयासाठी 200 बेड मान्य करुन तशी बजेटमध्ये तरतूद करावी.

यानंतर बाब क्र. 87, पृ.क्र.100 - चंद्रपूर शहर हे नक्षलग्रस्त भागालगतचे एक औद्योगिक शहर असून तेथील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. चंद्रपूर नगरपरिषदेची सध्याची परिस्थिती तितकीशी चांगली नसल्याने रस्ते व वाहतुकीसाठी ते स्वत: खर्च करु शकत नाही. या ठिकाणी रेल्वे लाईनवर ओव्हर ब्रिजची अत्यंत आवश्यकता आहे. कारण रहदारीतील रस्त्यावर रेल्वेलाईनजवळ ब्रिज नसल्याने रेल्वेचे गेट दोन-तीन तास बंद असते. तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. विलासराव देशमुख यांनी या ब्रिजसाठी नगरपरिषदेला 40 टक्के रेल्वे आणि महाराष्ट्र शासनाकडून 60 टक्के इतकी रक्कम देण्याचे सुतोवाच केले होते. त्या 25 कोटीमधून 10 कोटी रेल्वे देणार आणि उर्वरित रकमेपैकी खनिज विकास निधीतून 5 कोटी विशेष योजनेतून मंजूर करावे व या ब्रिजचे काम ताबडतोबीने हाती घ्यावे, अशा तीन चार मागण्यांचा शासनाने विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पान क्र. 405, बाब क्र. 301 च्या अनुषंगाने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आदिवासी आश्रमशाळांबाबतची ही योजना आहे. परंतु आज राज्यातील आश्रमशाळांची परिस्थिती काय आहे, अशा आश्रमशाळांसाठी मुबलक प्रमाणात निधी प्रस्तावित केला तरी देखील बांधकाम कुठल्या प्रकारचे असते हे थोडक्यात उदाहरणासह मी दाखवून देण्यास तयार आहे.

महोदय, शहापूर तालुक्यातील डोळखांब या ठिकाणी शासकीय आश्रमशाळा बांधण्याचे काम चालू आहे. या आश्रमशाळेचे बांधकाम 28 मे, 2008 रोजी सुरु झाले असून त्या कामाची मुदत एक वर्षाची म्हणजेच 28 मे, 2009 पर्यंत होती. परंतु या तारखेपर्यंत हे बांधकाम पूर्ण झालेले नाही. आज या आश्रमशाळेचे पिल्लर्स आणि सिमेंटचे काम बघितले तर पुढच्या पावसाळ्यापर्यंत टिकेल की नाही याची शंका आहे. बांधकामाची रेती सुध्दा मातीमिश्रीत आणि कच्च्या वीटा हा सर्व भार कसा सहन करणार हा सर्वात मोठा प्रश्न आहे. ज्यावेळेस आपण आश्रमशाळा बांधतो त्यावेळेस आश्रमशाळेत पिण्याच्या पाण्याची सोय करणे अत्यंत आवश्यक असते. परंतु राज्यात जवळपास 90 टक्के आश्रमशाळांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टाक्या बांधलेल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्री महोदयांच्या भागात मी देखील फिरलो आहे. वाडा-मोखाडा सारख्या आदिवासी भागात जरा जाऊन पहावे. तेथे कुठेही पिण्याच्या पाण्यासाठी टाक्यांची व्यवस्था केलेली नाही. शासन मात्र या ठिकाणी सांगत असते की, सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टाक्यांची कामे चालू आहेत, जलकुंभ निर्माण केले आहेत अशा घोषणा केल्या जातात पण प्रत्यक्षात कुठेही पिण्याच्या पाण्याची सोय नाही. तीच अवस्था न्हाणीघरांची आहे. आज 75 ते 80 टक्के आश्रमशाळांतील मुलींना नदीवर जाऊन आंघोळ करावी लागते. शौचालयांची परिस्थिती सुध्दा त्याहून वेगळी नाही. उघड्यावरच या मुलींना प्रात:र्विधी आटोपावे लागतात. शासन मात्र हगणदारी मुक्त गांव योजना राबवित असल्याचे जाहीर करते परंतु आदिवासी आश्रमशाळांच्या बाबतीत असा न्याय का याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, आपण असे म्हटले आहे की, दारिद्रय रेषेखालील लोकांना गॅसचे मोफत वाटप केले जाईल. त्यामुळे आपण आतापर्यंत किती आदिवासींना मोफत गॅस उपलब्ध करुन दिलेले आहेत त्याची माहिती सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे. मोखाडा येथे आदिवासींच्या 22 वस्त्या आहेत त्यांना सुध्दा अद्यापर्यंत गॅस उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तसेच मेळघाट येथील आदिवासींना अजूनपर्यंत गॅसचे वाटप झालेले नाही. हे शासन केवळ घोषणा करण्याचे काम करते परंतु प्रत्यक्षात मात्र काहीही काम करीत नाही.

सभापती महोदय, या शासनाने आदिवासी मुलींना हवाई सुंदरी केले जाईल अशी घोषणा केली होती परंतु आपण आता पर्यंत किती आदिवासी मुलींना हवाई सुंदरीचे प्रशिक्षण देऊन नोकरी दिलेली आहे याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. हवाई सुंदरीचे प्रशिक्षण द्यावयाचे असेल तर त्या मुली कमीतकमी सायन्समधून 12 वी ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असते. या गोष्टी त्यांना अभ्यासक्रमात शिकवल्या नाहीत तर त्या हवाई सुंदरीचे प्रशिक्षण कसे काय पूर्ण करु शकतील याचा आपण कधी विचार केलेला आहे काय ? हे शासन केवळ घोषणा करण्याचे काम करीत आहे. आदिवासी गरीब लोकांनी हवाई सुंदरीच्या प्रशिक्षणासाठी 65-65 हजार रुपये आपल्या खिशातून भरले परंतु अद्याप या आदिवासी मुलींना हवाई सुंदरी होता आलेले नाही तसेच त्यांना नोकरी देखील मिळालेली नाही ही शोकांतिका आहे. हे शासन केवळ संवग लोकप्रियतेची घोषणा करण्याचेच काम करीत असते. त्यामुळे शासनाने आदिवासींच्या जिवाशी खेळू नये अशी माझी शासनाला हात जोडून विनंती आहे.

सभापती महोदय, आदिवासींच्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान दिले जाते. आज महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या नावाखाली स्वयंसेवी संस्था निर्माण झालेल्या आहेत परंतु यातील निम्म्याहून अधिक संस्था बोगस आहेत. या संस्था केवळ कागदावरच आहेत. किशोर वयीन मुलींना आरोग्य प्रशिक्षण कसे द्यावयाचे यासाठी या संस्था आहे. 4-5 आश्रमशाळेतील मुलांना एकत्र करुन त्यांना किशोरवयीन आरोग्य शिक्षण दिले जाते थोडक्यात म्हणजे लैंगिक शिक्षण दिले जाते. परंतु ज्या मुलांना एक वेळचे जेवन मिळत नाही त्यांना लैंगिक शिक्षण देऊन आपण काय साधणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, या मुलांना गणवेष मिळत नाही, पुस्तके मिळत नाहीत, या मुलांना जी लोखंडी पेटी दिली जाते तिची साईज सुध्दा कमी करण्यात आलेली असून पत्र्याची कॉलिटी सुध्दा निकृष्ठ आहे. या मुलांना वेळेवर दप्तर देखील मिळत नाही. मग आपण या संस्थांना कशासाठी अनुदान देता?

सभापती महोदय, दुसरे असे की, आपण ज्या मुलांसाठी स्वयंसेवी आरोग्य केंद्राची स्थापना केलेली आहे. कोठे तरी अशा प्रकारचा बोर्ड लावला जातो की, "या ठिकाणी रक्त तपासणी करुन मिळेल" परंतु त्या ठिकाणी खरोखरच रक्त तपासणी होते का ? याची सुध्दा तपासणी करण्याची आवश्यकता आहे. या शासनाला कोणता कार्यक्रम कधी राबवायचा याची काहीही माहिती नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय संवेदनशील आहेत याची आम्हाला कल्पना आहे. त्यामुळे त्यांनी या स्वयंसेवी संस्थाच्या नाकात वेसन घालण्याची आवश्यकता आहे एवढेच मला या मुद्याच्या संदर्भात बोलावयाचे आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 297, पृष्ठ क्रमांक 393 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. हाफकीन इंस्टिट्युटला सहाय्यक अनुदान म्हणून 66 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याच सभागृहामध्ये 50 कोटी रुपये हाफकीन इंस्टिट्युटला देऊन तिला आत्मनिर्भर केले जाईल अशा प्रकारची घोषणा करण्यात आली होती.

सभापती महोदय, मी जे महत्वाचे मुद्दे मांडत आहे त्याची नोंद कोणी घेत आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आता कोणता मुद्दा मांडलेला आहे त्याची माहिती येथे उपस्थित असलेल्या कोणत्याही मंत्र्यांनी द्यावी. कारण येथे बसलेले कोणतेही मंत्री मुद्दे लिहून घेतांना दिसत नाहीत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे मुद्दे लिहून घेत आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी असा मुद्दा मांडला आहे की, हाफकीन इंस्टिट्युटला आत्मनिर्भर बनविण्यासाठी 50 कोटी रुपये दिले जातील अशी घोषणा करण्यात आली होती.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्या मुद्याची नोंद घेतल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की,सन्माननीय सदस्यांकडून भाषण करीत असतांना जे मुदे उपस्थित केले जातात त्याची नोंद मंत्रिमंडळातील उपस्थित मंत्री महोदय लिहून घेत असतात.आता ज्या पध्दतीने परीक्षा घेण्याची पध्दत अवलंबविलेली आहे ती यापुढे अवलंबविली जाता कामा नये.सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांच्या सद्सद्विवेकबुध्दीचा मान ठेवावा.

श्री.मधुकर चव्हाण :सभापती महोदय, हाफकिन इन्स्टिटयूटमधून वेगवेगळया प्रकारच्या लसीचे उत्पादन केले जात होते परंतु आता ते बंद करण्यात आले आहे. त्या प्रोडक्शनचे जे निकष ठरविण्यात आले होते त्या निकषाप्रमाणें प्रोडक्शन नव्हते म्हणून लस उत्पादन करण्याचे काम बंद करण्यात आले आहे.माननीय मंत्री महोदयांनी आताच असे सांगितले आहे की, आम्ही मुद्दे लिहून घेंत आहोत परंतु हा मुद्दा आम्ही 2005 सालापासून सतत मांडत आहोत. माननीय सदस्यानी वा मंत्र्यांनी ही बाब हसण्यावरी नेता कामा नये . हाफकिन इन्स्टिटयूटमधून लस विकत न घेता इतर महाग कंपनीकडून विकत घेतले जाते. उत्तर देत असतांना आमच्या लक्षात या सर्व बाबी येतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हाफकिन इन्स्टिटयुटला सहाय्यक अनुदान दिले जाते . हाफकिन इन्स्टिटयुटला शासनाला जर खरोखर आत्मनिर्भर बनवावयाचे असेल तर त्या ठिकाणी जी औषधे बनविले जातात त्याची ऑर्डर महाराष्ट्र शासनाकडून मिळणे अत्यंत आवश्यक आहे.जर शासनाने ऑर्डर दिली नसेल तर हाफकिन इन्स्टिटयूट औषधे कशी बनविल ? हाफकिन इन्स्टिटयूशनचे दुसरे अंग अजिंठा फॉर्मा आहे असे म्हटले जाते आणि ते सुध्दा आता बंद पडलेले आहे. हाफकिन इन्स्टिटयूशन लस आणि इतर औषधेसुध्दा तयार करीत असते परंतु त्यांच्याकडून कोणत्याही औषधाचा स्टॉक मागवला जात नाही म्हणनूच राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण खात्याला आणि आरोग्य खात्याला असे बंधन घातले पाहिजे की, हाफकिन इन्स्टिटयूट कडून जी औषधे बनविले जातात ती औषधे त्यांच्याकडूनच घेतली पाहिजेत.

सभापती महोदय, सेट जॉर्जेस हॉस्पिटल, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, जे.जे. हॉस्पिटल यांना निधी देण्यात आला आहे. परंतु या सर्व वैद्यकीय महाविद्यालयाची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. गेल्या अर्थसंकल्पात आंबेजोगाई वैद्यकीय महाविद्यालयास 9 कोटी रुपये देण्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रस्तावित केले आहे असे गेल्या अर्थसंकल्पाच्या भाषणात माननीय वित्त मंत्र्यांनी म्हटले होते. त्या संदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयांना पत्र देऊन असे विचारले होते की, आपल्याला 9 कोटी रुपये मिळिाले आहेत काय ? तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की 9 कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये सागितले असतांना अजूनही पैसे देण्यात आलेले नाहीत. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे.जेजे.हॉस्पिटलमध्ये डोळयांच्या वॉर्डच्या वर एक कोठडी बनविण्यात येत आहे.परवा श्रीमती सुभद्रा कदम यांना पहाण्यासाठी गेलो असतांना मी मुद्दाम तेथे जाऊन आलो होतो.जे.जे .हॉस्पिटल ही एक हेरिटेज इमारत असून तेथील डोळयाच्या वॉर्डच्या वरती कसाबसाठी बुलेट प्रुफ कोठडी तयार करण्यात येत आहे.ही कोठडी कशासाठी बनविण्यात येत आहे ? असे मी तेथील
अधिका-यांना विचारला असता त्यांनी असे सांगितले की ,याबाबतीत आम्हाला काहीही माहिती नाही. जे.जे. हॉस्पिटलचा एरिया अत्यंत संवेदनशील आहे. त्या ठिकाणी कसाबला राहण्यासाठी कोठडी बनविण्यासाठी सळया व इतर साहित्य आणले गेले आहे. त्या ठिकाणी कसाबला राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे की त्याच्या नंतर अन्य अंतारराष्ट्रीय कीर्तिचे गुन्हेगार असतील त्यांनाही तेथे आणून ठेवले जाणार आहे हे मला माहीत नाही.

श्री.सुरेश शेट्टी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. हाफकिन संबंधीचा मुद्दा मघाशी सन्माननीय डॉ.दीपक सावंत यांनी मांडला होता. चुकीचे रेकॉर्डवर राहता कामा नये म्हणून मी सांगू इच्छितो की, हाफकिन फॉर्मास्युटिकल इन्स्टिटयुशन वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत न येता अन्न व प्रशासन विभागाच्या अंतर्गत येते.

श्री.मधुकर चव्हाण : ती आपली सामूहिक जबाबदारी आहे.

डॉ.दीपक सावंत : आपण ती सामूहिक जबाबदारी घेत आहात ना ? अन्न व औषध प्रशासन विभागाचे कोण मंत्री उपस्थित आहे.? माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की आपण डॉक्टरांचे संरक्षण करु शकत नाही म्हणून प्रोटेक्शन ॲक्ट आणत आहोत परंतु तेथे कसाबला सांरक्षण देण्यासाठी मात्र बुलेट प्रुफ कोठडी तयार करण्यात येत आहे.

नतर श्री.सरफरे

s

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, ज्या विभागामध्ये डोळयांचे ऑपरेशन होते त्याठिकाणी थोडेसे जरी इन्फेक्शन झालेतरी त्या रुग्णाचा डोळा निकामी होऊ शकतो. त्यामुळे आज त्या ठिकाणी रेती आणि शिगा इत्यादी बांधकाम साहित्य आणून टाकले जात असल्यामुळे धूळीचे प्रमाण वाढत आहे. तसेच, त्याठिकाणी कसाबला ठेवण्यात आल्यानंतर त्याच्यावर हल्ला झाला तर त्यामध्ये जे.जे. हॉस्पिटलमधील अनेक निरपराध लोक मरतील. त्यामुळे आपण हा अट्टाहास कशासाठी धरीत आहात? याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रँगिंगचे प्रकार मोठया प्रमाणावर होत आहेत. त्याकरिता वैद्यकीय संचालक आणि मंत्रिमहोदयांनी कोणती उपाय योजना केली आहे. कारण दरवर्षी अनेक रँगिगचे प्रकार होत असल्याचे आपल्या कानावर येत आहे त्याची आपण माहिती घ्यावी.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी शासनाकडे मागणी करीत आहे. या ठिकाणी अर्थसंकल्पामध्ये कॅन्सर हॉस्पिटल प्रस्तावित करण्यात आले आहे. आज मुंबईमध्ये टाटा कॅन्सर हॉस्पिटलवर मोठया प्रमाणात कॅन्सर रुग्णांचा भार पडत आहे. या हॉस्पिटलमध्ये तीन ते चार महिन्यापूर्वी अपॉईंटमेंट घेऊन सुध्दा ती मिळत नाही. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, जे.जे. हॉस्पिटलच्या परिसरामध्ये 48 एकर जागा मोकळी आहे, ही जागा आपल्याला कॅन्सर हॉस्पिटलकरिता वापरता येईल. आज त्याठिकाणी दोन-तीन इमारत वापरात नाहीत. त्या इमारतींचा सुध्दा विचार करण्यात आला आणि कॅन्सर हॉस्पिटलसाठी आपण तरतूद केली तर कॅन्सर पिडीत लोक आपल्याला दुवा देतील. तेव्हा मुंबईमध्ये टाटा कॅन्सर हॉस्पिटलबरोबर दुसरे कॅन्सर हॉस्पिटल झाले पाहिजे अशी मी या पुरवणी मागण्यांव्दारे मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 387 वरील बाब क्रमांक 291 मध्ये "राज्यातील ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्र व आरोग्य उप केंद्रासाठी तरतूद करणे" याकरिता मागणी करण्यात आली आहे.आज राज्यामध्ये 10 हजार आरोग्य उपकेंद्राचा अनुशेष आहे. त्याकरिता आपल्याकडे एनआरएचएमतर्फे लाखो-करोडो रुपये येतात. त्या रकमेमधून आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम होत नाही.त्यामुळे ग्रामीण रुग्णालयांचा अनुशेष आहे, प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अनुशेष आहे. आपल्या राज्यात रुग्णालयांमध्ये किती खाटा असाव्यात याचे निकष आहेत.परंतु त्यामध्ये सुध्दा अनुशेष वाढला आहे. या शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागातील कोणत्याही प्रकारचा अनुशेष गेल्या वर्षभरात पूर्ण केला नाही. त्याचप्रमाणे प्रजनन व बाल आरोग्यासाठी आलेला निधी परत गेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. दीपक सावंत...

दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आज जीवनदायी योजनेबाबत विचार केला तर या योजनेंतर्गत गेल्या वर्षभरामध्ये केवळ 2 हजार शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे हे शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. या योजनेकरिता फक्त 10 कोटी रुपये खर्च झाले आहेत. तेव्हा या योजनेसाठी कमीत कमी 50 कोटींचा निधी ठेवणे आवश्यक आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांना या योजनेचा फायदा घेता यावा याकरिता सिंगल विंडो सिस्टीम ताबडतोब अंमलात आणून लोकांना या सुविधा पुरविण्यात याव्यात. आणि जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेत असतांना मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 28 कडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. याठिक्राणी समुद्रस्तरीय सुरक्षेकरिता 18 मच्छिमार होडया भाडयाने घेण्याचा खर्च भागविण्यासाठी 3 कोटी 65 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मागणीच्या निमित्ताने मी मच्छिमारांच्या मुलांना प्रशिक्षण व रोजगार द्यावा अशी यापूर्वी मागणी केली होती. त्याकरिता 39 लाख 3 हजाराची तरतूद करण्यात आली. आज होमगार्डना प्रतिदिनी 15 रुपये मिळत होते ते आता 40 रुपये करण्यात आले आहेत. ते सुध्दा वेळेवर मिळत नाहीत. 40 रुपये प्रतिदिनी मजूरी मिळणे ही बाब हास्यास्पद वाटते. आज एक पाण्याची बाटली आणि वडा पाव खायला घेतला तरी त्यासाठी 40 रुपये लागतात. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, त्यांना 40 रुपये प्रतिदिनी देण्याऐवजी कमीत कमी 80 ते 100 रुपये देण्यात यावेत. जेणेकरुन त्यांचा एक दिवसाचा गुजारा तरी होऊ शकेल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . ..

सभापती महोदय, बाब क्र.80, पान क्र.40 बाबत सांगावयाचे आहे. मत्स्यव्यवसाया करता कर्ज देण्यासाठी 18 कोटी 83 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे.ही तरतूद थोडी वाढविण्यता यावी. कारण आता बोटीच्या बांधणीचा खर्च सुध्दा प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे. त्यानुसार जे कर्ज दिले जाते, त्याच्या रकमेमध्ये वाढ करण्यात यावी.

सभापती महोदय, पान क्र.517 वरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर नवी मुंबई, बेलापूर येथे ऐतिहासिक पूरातन किल्ला आहे. त्या किल्ल्यामध्ये गोवधर्नी मातेचे मंदिर देखील आहे. सदर किल्ल्याचे संवर्धन आणि दुरुस्ती करण्यासाठी सिडकोच्या माध्यमातून काम सुरु केले असून, त्यासाठी साडेचार कोटी खर्च येणार आहे. त्यामुळे या किल्ल्याचे संवर्धन आणि जतन तर होईलच.तसेच तेथील देवळाच्या दुरुस्तीचे देखील काम होईल. पण ही पुरातन ऐतिहासिक वास्तू आहे, त्या किल्ल्याची आणि गोवर्धनी मातेच्या मंदिराची पर्यटन स्थळामध्ये नोंद करण्यात यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.धन्यवाद.

. . . .3 झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात सांगावयाचे आहे. यामध्ये सार्वजनिक वाचनालयाचा मुद्दा आहे, त्यातील बाब क्र.376 यामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा जो मुद्दा आहे, ज्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू कराव्यात अशा प्रकारची मागणी करण्यात आली आहे. यासाठी आपण माजी सन्माननीय सदस्य श्री.व्यंकप्पा पत्की यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल सादर करुन बरीच वर्षे झालेली आहे. या समितीच्या शिफारशी लागू कराव्यात असा या सगळया कर्मचाऱ्यांचा आग्रह आहे आणि शासन वाचनालयांना देत असलेल्या वेतन अनुदानातून संचालनालयातर्फे कर्मचाऱ्यांच्या नावाने स्वतंत्र धनादेश काढण्यात यावेत. जसे आपण शाळेच्या नावाने धनादेश न काढता, शिक्षकांच्या नावाने धनादेश काढतो. त्याप्रमाणे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या नावाने थेट धनादेश काढले तर ते कर्मचाऱ्यांपर्यंत थेट पोहोचू शकतील. सगळयात महत्वाचे म्हणजे आपण ग्रंथालयासाठी अनुदान देतो. सध्या अशी पध्दत आहे की, अगोदर त्यांनी खर्च करावा आणि मग त्यांना ते अनुदान मिळते. याऐवजी अगोदरच आपण त्यांना ठरलेले अनुदान दिले तर चांगली पुस्तके लोकांपर्यंत पोहोचू शकतील. विशेषत: दूरदर्शन आणि गोष्टींचा प्रभाव वाढला असल्याने सध्या वाचन संस्कृती कमी होत चालली आहे. अशा वेळी ग्रंथालये अधिक बळकट करणे आणि तेथील कर्मचारी वर्ग बळकट करणे हे अत्यावश्यक आहे आणि तरच आपण वाचन संस्कृती जीवंत ठेऊ शकतो याचा विचार माननीय मंत्री महोदय करतील असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर बाब क्र.403 मध्ये रायगड किल्ल्यावर एम.टी.डी.सी.चे डॉरमेटरी आहेत,त्यांच्या रुम्स् आहेत. पूर्वी श्री.शेवडे नावाच्या गृहस्थांकडून चालविले जात असे. पण काही महिन्यापूर्वी श्री.गोयल गुप्ता टुरिझमने याचे टेंडर मिळविलेले आहे. पूर्वी डॉरमेटरीसाठी 50 रुपये होते, ते आता 250 पर व्यक्ती केलेले आहे आणि खोलीसाठी 200 रुपये होते, ते आता 900 रुपये केलेले आहेत. तेथे 40 रुपये थाळी होती, ती आता 75 रुपये केलेली आहे आणि रायगडावर लोक छत्रपती शिवरायांकडून प्रेरणा घेण्यासाठी जात असतात. ते पर्यटन वेगळे आहे आणि हे पर्यटन वेगळे आहे, त्यामुळे तुम्ही जर गणपतीपुळे प्रमाणे जर येथे रेट घ्यावयास लागलात तर ते बरोबर नाही. तेथे असणारा मराठी माणूस, त्याचा चालणारा व्यवसाय यासाठी जो रेट लावला जात होता, त्यातून एम.टी.डी.सी.ला पैसे मिळत होते.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशासकीय मत / शासकीय नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. संजय केळकर)

श्री. विनोद तावडे ....

त्या ठिकाणी जे शिवप्रेमी जातात त्यांची खऱ्या अर्थाने लूट होते. त्या ठिकाणी ए.सी.रुमसाठी, डिलक्स रुमसाठी 1200 रुपये, 900 रुपये, 1400 रुपये याप्रमाणे रेट आहेत. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले तर हा जो विषय सातत्याने या ठिकाणी मांडतो त्याला न्याय मिळेल.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागामध्ये आपण फी माफीच्या ज्या विविध घोषणा बजेटमध्ये केल्या जातात, अनुसूचित जाती जमातीचे विद्यार्थी असतील त्यांच्या बाबतीतील जी फी उच्च व तंत्रशिक्षण महाविद्यालयांकडे सरकारकडून यावयास पाहिजे ती परत मिळली नाही. तंत्रशिक्षण विभागाचे असे म्हणणे आहे की, हे समाजकल्याण विभागाकडे आहे. परंतु तंत्रशिक्षण खात्याचा जी.आर. आणि समाजकल्याण खात्याचा जी.आर. यामधील तफावत दूर करावयास पाहिजे. समाजकल्याण खात्याकडून शिष्यवृत्ती मिळविताना प्रत्येक महाविद्यालयाला काही ना काही दक्षिणा चढविल्याशिवाय मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्रिमहोदयांना याची पूर्ण जाणीव आहे. म्हणून या विभागामध्ये एका ठराविक तारखेच्या आत आम्ही सगळा बॅकलॉग पूर्ण करु असा निर्धार तंत्रशिक्षण खात्याने व्यक्त केला तर आपण जी घोषणा करता त्यातून आपल्या ताकदीवर चालणाऱ्या संस्था बंद पडतील अशी अवस्था आहे म्हणून याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी ऊहापोह केला तर अधिक उपयोगी ठरेल.

सभापती महोदय, यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 347 बाबत मला बोलावयाचे आहे. आपण मुंबई विद्यापीठामध्ये सक्रीय होता. आज त्या ठिकाणी काय अवस्था आहे हे आपण पाहता. मुंबई विद्यापीठामध्ये एक्झाम कंट्रोलर हा पी.ए.टी. चा विद्यार्थी आहे. मुळात कंट्रोलर म्हणून नेमावयाचे असेल तर 13 वर्षाचा अनुभव पाहिजे. त्यांनी ज्या ज्या ठिकाणी काम केले तो अनुभव त्यांच्या बाबतीत दाखविण्यात आला. दुसऱ्या दोन व्यक्ती आलेल्या होत्या आणि त्यांना सिनियर लेक्चर पदाचा 13 वर्षाचा अनुभव होता परंतु त्यांना बाजूला सारले गेले. मुंबई विद्यापीठाला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्राचे जे पैसे आले ते कोठे खर्च करण्यात आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे .....

याची चौकशी सरकारने केली पाहिजे. कारण मुंबई विद्यापीठामध्ये प्रचंड अनागोंदी आहे. कॉलेजला जे ॲफिलिएशन दिले जाते त्याची गेल्या कित्येक वर्षाची कोट्यवधी रुपयांची अफिलिएशन फी वसूल केलेली नाही. गोसावीच्या प्रकरणातून ती बाब बाहेर आली. त्यावेळी परीक्षा खात्यातील गोंधळाची माहिती सिनेट सदस्य देण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी ती बाब त्यांच्यावरच उलटविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे मुंबई विद्यापीठामध्ये चाललेल्या या गोंधळाची सर्वंकष चौकशी केली पाहिजे. माननीय राज्यमंत्री मुंबई विद्यापीठात नेमके काय चालले आहे याची अधिक संवेदनशीलपणे चौकशी करावी आणि ते करतील अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बजेट सादर करीत असताना आदिवासी विभागाच्या बाबतीत अतिशय चांगली घोषणा झाली त्यामुळे मी खुश होतो. त्या दिवशी माझ्याबरोबर संबंधित खात्याचे मंत्री होते. खावटी कर्ज रद्द करण्यात आले परंतु खावटी कर्ज रद्द करताना खावटी कर्जाची योजनाही रद्द केली.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, चुकीचे रेकार्ड होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, खावटी कर्ज योजना शासनाने बंद केलेली नाही आणि शासन ती योजना बंद करण्याच्या विचारात नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. नवले यांना सांगू इच्छितो की, आपल्या बाजूला किनवट तालुका आहे. तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले. म्हणून मी हा विषय उपस्थित केला. त्यावर सरकारने स्पष्टीकरण करणे आवश्यक होते. आज ही बाब स्पष्ट झाली तर आदिवासी भागामध्ये अतिशय चांगला मेसेज जाईल. परंतु या पध्दतीची चर्चा मराठवाडा आणि विदर्भ विभागातील आदिवासी भागामध्ये होती. वर्तमानपत्रामध्ये मोठया प्रमाणावर ते प्रसिध्द झाले. पाच सात दिवसात सरकार त्याबाबत स्वयंस्फुर्तपणे स्पष्टीकरण देईल अशी अपेक्षा होती परंतु तसे स्पष्टीकरण न आल्यामुळे या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी हा मुद्दा मांडलेला आहे. खावटी कर्ज म्हणजे काय तर रोजच्या खाण्यासाठी जो तांदूळ वगैरे लागतो त्यासंदर्भात ते आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ती योजना बंद होणार असेल तर स्वाभाविकपणे त्या आदिवासी समाजमध्ये प्रचंड प्रतिक्रिया उमटणार आहे.

सभापती महोदय, गृह विभागावर बोलताना मी काही मुद्दे मांडणार आहे. मुंबईत अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात श्री.करकरे, श्री.कामटे शहीद झाले त्यावेळी मंत्रिमहोदयांनी त्यांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपये देण्याची घोषणा केली. अशाप्रकारची कोणतीही घोषणा करीत असताना ती मनापासून केली पाहिजे. ज्यांच्या कुटुंबियांना शासन मदत करणार आहे ती प्रत्यक्षात त्यांना मिळते काय हे सुध्दा पाहिले पाहिजे. दुर्दैवाने श्री.करकरे आणि श्री.कामटे यांच्या कुटुंबियांनी सांगितले की, शासनाने केलेली घोषणा शब्दश: योग्य आहे काय, शासनाने घोषणा केल्याप्रमाणे पैसा दिला काय तर, नाही. 25 लाखांची घोषणा करीत असताना त्यात 15 लाख रुपये सेवा शर्तीचे अधिक 10 लाख असे 25 लाख रुपये आहेत. संवेदनशील माहोलमध्ये माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय गृहमंत्री घोषणा करतात. त्यावेळी अशाप्रकारे मदतीची घोषणा करीत असताना त्यामध्ये संदिग्धता असू नये. सेवा शर्तीची जी काही रक्कम मिळेल त्याच्या व्यतिरिक्त 25 लाख रुपये द्यावेत. सेवा शर्तीची जी रक्कम असेल ती आणि विशेष बक्षिस मिळेल ते वेगळे दिले पाहिजे. कारण त्यांनी देशासाठी बलिदान केलेले असते. त्यासाठी दिला जाणारा हा पैसा आहे. परंतु त्यांना हा पैसा देताना आकडयांची जगलरी केली जाते. त्याबाबत उत्तर देताना टोलवाटोलवी केली जाते. त्यामुळे अशा शहिदांच्या कुटुंबियांना पाठपुरावा करण्याची वेळ येते. श्री.कामटे यांच्या पत्नीला त्यांच्या पतीच्या बलिदानाची चौकशी करावयाची आहे, त्या स्वत: व्यक्तिश: चौकशी करीत आहेत. पण शासन त्यांना माहिती देत नाही. त्यामुळे त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितल्यावर आयुक्तांकडून त्यांना माहिती मिळाली. म्हणजे अशा संवेदशनशील प्रश्नाबाबत विभागाचे अधिकारी असे वागत असतील आणि शहिदांच्या कुटुंबियांविषयी अशी भावना असेल तर ते अतिशय आक्षेपार्ह आहे. हे अधिकारी असे का वागतात ते समजणे आवश्यक आहे. माझ्या मते विभागाचे मंत्री घोषणा करतात त्याचे अनुकरण पुढे अधिकारी करतात.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे...

त्यातून त्यांना ही लाईन मिळते. एखादा अधिकारी शहीद झाल्यानंतर त्याच्या कुटुंबियांना मदत देण्याची घोषणा करीत असताना त्यात स्पष्टता असावयास पाहिजे की, त्यांना देय असलेली ही रक्कम असेल आणि शासनाच्यावतीने एवढी रक्कम मदत म्हणून दिली जाईल.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी वेगळा मुद्दा मांडत आहे, या विषयाचे शब्द नाजूक आहेत, हा मुद्दा मी मांडू का नाही असा विचार करीत आहे. पण हा मुद्दा व्यवहारिक आहे. ज्यावेळी एखाद्याच्या घरातील सदस्य दंगलीमध्ये शहीद होतो, त्याबद्दल त्यांच्या कुटुंबियांना मदत दिली जाते त्याचे दोन भाग होतात. काही वेळेला ती मदत त्या व्यक्तीच्या पत्नीला मिळते. अनेक कुटुंबात ही परिस्थिती आहे, काही ठिकाणी थोडया प्रमाणात फरक असेल. अनेकदा शहीद झालेल्या व्यक्तीवर त्याचे आई-वडील अवलंबून असल्याचे दिसून येते. अशा वेळी कुटुंबियांना मिळणारी मदत केवळ पत्नीला मिळाली तर त्या आई-वडिलांचे काय असा प्रश्न निर्माण होतो. एखाद्या शहीद व्यक्तीच्या आई-वडिलांना संपूर्ण मदत मिळाली तर त्याच्या पत्नीचे व मुलांचे काय असा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीमुळे काही वेळा आई-वडील किंवा पत्नी सफर झाल्याचे मी प्रत्यक्षात पाहिले आहेत. अशा परिस्थितीत काही तरी मार्ग काढला पाहिजे. त्याबाबत जाहीरपणे चर्चा न करता मार्ग काढला पाहिजे असे नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केस टू केस अशा प्रकरणांचा अभ्यास करुन, पाठपुरवा करुन तसेच जे डिपेण्डण्ट आहेत त्यांच्या संदर्भातील कायद्याचा अभ्यास करुन मदत देताना नियमामध्ये काही तरी बदल करावा लागेल अन्यथा ज्याच्या कुटुंबीयांना मदत देण्यात आली त्या कुटुंबातील कोणी तरी त्या लाभा पासून वंचित राहील. या संदर्भात गृह खात्याने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदरणीय दुग्धव्यवसाय मंत्री महोदयांना मी आरे वरळीच्या प्रश्नासंबंधी प्रत्यक्ष भेटून सांगितलेले आहे. त्यासंदर्भात काय पाठपुरावा झाला याची मला माहिती नाही. वरळी-बांद्रा हा सागरी मार्ग झाल्यामुळे आरे वरळी येथील जागेला मागणी आलेली आहे. एका जाहिरात कंपनीने ती जागा मागितली व आपल्या खात्याच्या सचिवांनी ती जागा त्या कंपनीला देऊन टाकली. त्यापूर्वीच्या सचिवांनी त्या जागेबाबत टेंडर काढावे असे लिहिले होते. तरीही तेथे नव्याने आलेल्या सचिवांनी टेंडर न काढता ती जमीन परस्पर देऊन टाकली. परस्पर अशी जागा दिली असेल तर ते उचित नाही आणि कोणी कोर्टामध्ये गेले तर ते प्रकरण कोर्टात दोन वर्षे हिंअरिंगमध्ये राहील. तेव्हा मी उपस्थित केलेल्या दोन मुद्यांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

गृह विभागाच्या पान क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 26 मध्ये साधनसामग्री खरेदीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस हे जनतेचे रक्षक आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाचे तास आपण ठरविले पाहिजेत. तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी 8-8 दिवसानी त्यांच्या आरोग्याची तपासणी होईल अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. त्यांच्या भत्त्यामध्ये वाढ झाली पाहिजे. पोलीस स्टेशनच्या बाजूला एक चांगले उपाहारगृह असले पाहिजे. उपाहारगृहाची सोय नसल्यामुळे त्यांना वडा-पाव सारखे तेलकट पदार्थ खावे लागतात.परिणामी त्यांच्या प्रकृतीच्या समस्या निर्माण होतात. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अे.आर.अंतुले यांच्या काळात पोलिसांचे गणवेश बदलून त्यांना चांगले गणवेश देण्यात आले. परंतु होमगार्डसना देण्यात येणारे गणवेश हे निकृष्ट दर्जाचे असतात. त्यांना चांगले गणवेश देण्यात यावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

गृह विभागाच्या पान क्रमांक 28 व 29 वरील बाब क्रमांक 43, 44, 45 आणि 46 संबंधी मी बोलू इच्छितो. दिवसेंदिवस कैद्यांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ होत चालली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्याला जास्तीत जास्त जेल बांधण्याची गरज आहे. असे जेल बांधून त्यामध्ये राजकीय लोकांसाठी वेगळा कक्ष, सर्वसामान्य गुन्हेगारासाठी वेगळा कक्ष नक्षलवाद्यांसाठी वेगळा कक्ष असे वेगवेगळे कक्ष निर्माण करावेत. तसेच गुन्हेगारांच्या प्रकृतीनुसार त्यांना कामे द्यावीत. उदा. जे सुदृढ असतील त्यांना मेहनतीचे काम द्यावे, जे शिक्षित असतील त्यांना बौध्दिक काम द्यावे. जेथे जेल असेल तेथेच बाजूला 30-40 एकर जागा उपलब्ध झाली तर ह्या गोष्टी करता येऊ शकतील.

जलसंपदा विभागाच्या पान क्रमांक 200 वरील बाब क्रमांक 166 मध्ये लहान पाटबंधारे प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

...नंतर श्री. गिते.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, लहान पाटबंधा-यांच्या कामासाठी शासनाने मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, मी सिंधुदूर्ग जिल्हयातील असून माझे मूळ गाव घामापूर आहे.त्या ठिकाणी शिवकालीन तलाव आहे. तेथे शिवकालीन कालवे देखील तयार करण्यात आले आहेत. या शिवकालीन तलावाच्या खोलीकरण करणे, तसेच कालव्यांची दुरुस्ती करणे व या कामांसाठी निधीची उपलब्धता करुन देणे यासंदर्भात माननीय जलसंपदा राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी आपल्या दालनात बैठक आयोजित केली होती. या शिवकालीन तलावाची आणि कालव्यांची कामे कशा प्रकारे करण्यात येतील या अनुषंगाने मी, मुख्य अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी तेथे तीन दिवस पाहणी केली. त्या ठिकाणी तलावाचा गाळ काढणे, त्याची दुरुस्ती करणे तसेच कालव्यांच्या कामांची दुरुस्ती करुन त्यातून पाण्याचा प्रवाह शेतक-यांच्या शेतापर्यंत कसा जाईल यासंबंधीचा अभ्यास करुन त्या सर्व कामांचा एक सविस्तर आराखडा तयार करुन त्या कामांचे अंदाजपत्रक देखील तयार करण्यात आले आहे. परंतु हा प्रस्ताव अजून शासन स्तरावर प्रलंबित आहे. सदर काम हाती घ्यावे म्हणून मी माननीय जलसंपदा मत्री श्री.अजितदादा पाटील यांना देखील भेटलो. त्यांनी मला आश्वासन दिले होते की, या अर्थसंकल्पात या कामासाठी निश्चितपणे तरतूद करण्यात येईल. माननीय जलसंपदा मंत्री हे डॉयनॉमिक मंत्री आहेत. ते आश्वासन देतात, त्या आश्वासनाची ते पूर्णपणे अंमलबजावणी करतात. परंतु मंत्रालयातील जलसंपदा विभागात बससेले अधिकारी अशा विकास कामात अडथळा आणतात. त्या अधिका-यांमुळे हे काम कदाचित या अर्थसंकल्पात आले नसेल असे मला वाटते.

श्री.अजित पवार : सदर काम कोकण पॅकेजमध्ये घेतो.

श्री.सुभाष चव्हाण: सभापती महोदय, मी ग्रामविकास विभागाशी संबंधित मागणी संदर्भात बोलणार आहे. केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून इंदिरा आवास घरकूल योजना राबाविण्यात येते. आमच्या सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये मागासवर्गीय पात्र लाभार्थी मिळत नाही, त्यामुळे या योजनेचा पैसा खर्च होत नाही. त्यामुळे या योजनेची तरतूद मागावर्गीयांच्या इतर विकासाच्या कामावर खर्च करण्यासंबंधी विशेष बाब म्हणून शासनाने परवानगी द्यावी अशी मी या मागणीच्या निमित्ताने विनंती करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, आता मी पर्यटन विभागाची बाब क्रमांक 408 च्या अनुषंगाने माझे विचार व्यक्त करीत आहे. या मागणी अंतर्गत इको टुरिझमसाठी तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सिंधुदूर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा आहे. परंतु पर्यटनाच्या बाबतीत अद्याप कोणत्याही प्रकारच्या सोयी-सुविधा शासनाने निर्माण करुन दिलेल्या नाहीत. या ठिकाणी परदेशी पर्यटक मोठया प्रमाणात येतात, त्यांना चांगल्या दर्जाची हॉटेल्स नाहीत, परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सिंधुदूर्ग जिल्हयात विमानतळ होण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या ठिकाणी या सोयी नसल्यामुळे परदेशी पर्यटक येण्यास उत्सुक नसतात. सिंधुदूर्ग जिल्हयात समुद्र किनारा देखील मोठा लाभलेला आहे. त्या ठिकाणचे निसर्ग सौदर्य खूपच चांगले आहे. परंतु पर्यटनासाठी आवश्यक असण्या-या सर्व सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध द्याव्यात व त्यासाठी मोठया प्रमाणात तरतूद देखील उपलब्ध करुन द्यावी अशी माझी शासनास विनंती आहे. या ठिकाणी विमानतळ होणार आहे अशी घोषणा केली गेली आहे, परंतु त्यासाठी अजून जमीन संपादनाचे काम झालेले नाही. त्यामुळे विमातळाच्या कामाच्या टेंडरची तारीख देखील अजून निश्चित होत नाही. महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चांगल्या प्रकारचे विमानतळे उभारली आहेत. औद्योगिक विकास महामंडळाकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे सिंधुदूर्ग जिल्हयातील माननीय श्री. नारायण राणे हे उद्योग मंत्री आहेत. त्यांनी "चिपी" येथे विमानतळ लवकर व्हावे म्हणून प्रयत्न करावेत अशी माझी त्यांना खास आग्रहाची विनंती आहे. पर्यटक आकर्षित व्हावेत म्हणून तेथे पर्यटनाचा मोठया प्रमाणात विकास करण्याची आवश्यकता आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील घामापूर तलावाचा विकास करुन तेथे पर्यटकांसाठी एम.टी.डी.सी.चे टेंथ बांधले आहेत, सदरहू टेंथचे उदघाटन माननीय पर्यटन राज्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी व पालक मंत्री यांच्या हस्ते दिनांक 25 मे, 2007 रोजी करण्यात आले आहे. परंतु हे टेंथ पर्यटकांसाठी अजूनही खुले करण्यात आलेले नाही. पर्यटकांसाठी हे टेंथ तातडीने सुरु करावेत. या जिल्हयात पर्यटन क्षेत्र मोठया प्रमाणात आहेत, परंतु त्यांचा पाहिजे तसा विकास केला जात नाही. तो विकास तातडीने केला तर पर्यटकांच्या माध्यमातून पर्यटन विभागास चांगल्या प्रकारे आर्थिक उत्पन्न मिळू शकते. एक तर शासनाकडून पर्यटन विभागास अतिशय कमी प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. तेथील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

पर्यटन क्षेत्राचा विकास केला तर पर्यटकांच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न पर्यटन विभागास मिळू शकते, म्हणून तेथे पर्यटनाच्या दृष्टीकानातून सर्व सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

सभापती महोदय, दिनांक 24 जून, 2009 रोजी सिंधुदूर्ग येथे मंत्रिमंडळाची बैठक होत आहे. ही ऐतिहासिक बैठक ठरणार आहे. या कोकण विभागात मंत्रिमंडळाची ती पहिलीच बैठक होणार आहे. मंत्रिमंडळाच्या या बैठकीमुळे कोकणवासीयांना फार माठा आधार मिळणार आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील पर्यटन जिल्हयातील विकास करण्यासाठी कोकणासाठी जाहीर करण्यात येणा-या पॅकेजमध्ये 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यातयावी अशा प्रकारची शासनास विनंती करतो आणि आणि मला बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल आभार मानतो व यासंदर्भातील माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. बोरले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर माझे मनोगत व्यक्त करण्यसाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या बाब क्रमांक 301, पृष्ठ क्रमांक 415 वर मी बोलणार आहे. या ठिकाणी 68 नवीन माध्यमिक शाळा आणि या शाळांमध्ये 190 तुकडया सुरु करण्यासाठी ही पुरवणी मागणी आलेली आहे. आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी नवीन माध्यमिक शाळा सुरु होणे, ज्या शाळांमध्ये अधिक वर्गांची आवश्कता आहे त्या शाळांमध्ये या तुकडया सुरु होणे ही अत्यंत निकडीची बाब आहे. आदिवासी विभागाने हा अत्यंत चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु फक्त तुकडया किंवा शाळा वाढवून हा प्रश्न सुटणार नाही. आज आदिवासी विभागामार्फत ज्या शाळा सुरु आहेत त्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आश्रमशाळांच्या संदर्भात बरेच मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सभापती महोदय, आपल्या समवेत मी ब-याच आश्रमशाळांना भेट दिलेली आहे. 300-400 विद्यार्थी ज्या आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेतात त्या आश्रमशाळांमध्ये त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची, पिण्याच्या पाण्याची, स्वच्छता गृहांची सोय नाही. मुलींसाठी स्नानगृहाची सोय नाही, अशी अवस्था या आश्रमशाळांमध्ये आहे. शिक्षण घेणारे निवासी विद्यार्थी हे आदिवासी विद्यार्थी आहेत. ते अनुसूचित जनजातीचे विद्यार्थी आहेत म्हणून ज्या शाळा सुरु आहेत त्या शाळांना चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. शासकीय आश्रमशाळांबरोबर खाजगी संस्थांनी चालविलेल्या अनुदानित आश्रमशाळा या विभागात आहेत. या शाळालांना शासनाकडून जे अनुदान मिळते ते वेळेवर देण्याची आवश्यकता आहे. शासनाने अनुदान मंजूर केलेले आहे. शासनाने त्या शाळांना अनुदानाचा पहिला टप्पा दिला, दुसरा टप्पा दिला. परंतु शेवटच्या टप्प्याचे अनुदान द्यावयाचे आहे. 2008-09 मध्ये त्यांना देय असलेले वेतनेत्तर अनुदान होते त्यापैकी त्यांना 50 टक्के अनुदान मिळाले. परंतु 50 टक्के अनुदान रोखून ठेवलेले आहे. मी अप्पर आयुक्त श्री.करवंदे यांना भेटलो आणि आश्रमशाळांचा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, आमच्याकडे ग्रँट उपलब्ध नाही, शासनाकडून अनुदान मिळालेले नाही. शासनाने या शाळांचे 50 टक्के अनुदान रोखून ठेवलेले आहे. सभापती महोदय, आजपासून शाळा सुरु झालेल्या आहेत. या संस्था शाळा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले साहित्य किंवा इतर सुविधा सुटीमध्ये प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न करीत असतात. शाळांना 50 टक्के रोखून धरलेले अनुदान न मिळाल्यामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये याचा खुलासा करावा.

सभापती महोदय, अनुदानित आश्रमशाळा आणि शासकीय आश्रमशाळा यांच्या स्टाफिंग पॅटर्नमध्ये मोठया प्रमाणावर तफावत आहे. ज्या पद्धतीचे काम आश्रमशाळा आणि शासकीय आश्रमशाळांमध्ये असते त्याच प्रकारचे काम अनुदानित आश्रमशाळांमध्ये होत असते. त्यांच्यामध्ये स्टाफिंग पॅटर्न असल्यामुळे अनुदानित आश्रमशाळांना कर्मचारी वर्ग कमी पडत आहे. त्यांना सुध्दा आश्रमशाळांप्रमाणे कर्मचारी वर्ग देण्याची आवश्कता आहे. आपण एका बाजूला बेरोजगारी आहे असे म्हणतो. लोकांना नोक-या मिळत नाहीत. 3-4 हजार रुपये देऊन नोक-या मिळविण्यासाठी प्रयत्न करतात, ही वस्तुस्थिती आहे. मला आश्चर्य वाटते की, आदिवासी विभागामध्ये यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद नाही. ठाणे जिल्हयातील अनेक प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक 12 रुपये घड्याळी तासावर काम करतात. अनेक वेळा हा विषय सभागृहामध्ये उपस्थित करुन माननीय मंत्री महोदयांना विनंती करुन सुध्दा आदिवासी विकास विभागाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आता सर्व शिक्षक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. त्या शिक्षकांचे असे म्हणणे आहे की, एक तर आम्हाला सेवेत सामावून घ्या, आमच्या अनुदानामध्ये वाढ करा किंवा आम्हाला काढून तरी टाका. त्या शिक्षकांना 12 रुपये घडयाळी तासाप्रमाणे पैसे दिले जातात. त्यांना महिन्याला 1500 ते 1600 रुपये मिळतात.

यानंतर श्री.भोगले .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

त्यांच्याकडून पूर्णवेळ काम करुन घेतात आणि 1500 रुपयांवर हे सर्व शिक्षक आपले कुटुंब चालवितात ही अत्यंत दुर्भाग्याची गोष्ट आहे. आदिवासी विभागाने घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित सेवेत सामावून घ्यावे किंवा क्वालिफाईड शिक्षकांची नियुक्ती करावी अन्यथा किमान या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 347 अन्वये कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. कर्मचारी आवश्यक आहेत तेथे नियुक्त केलेच पाहिजेत. उच्च व शिक्षण विभागाचा हा विषय असला तरी शालेय शिक्षण विभागात एक नवे पद निर्माण झाले तरी मानधनावर मान्यता मिळते. अन्य विभागांमध्ये नियमित वेतनश्रेणीवर पदांची निर्मिती होते. त्या पदांसाठी पुरवणी मागणीमध्ये निधी मंजूर होतो. त्याच धर्तीवर शालेय शिक्षण विभागाचा देखील विचार व्हावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 348 अन्वये प्रशिक्षण संस्था सुरु करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. या प्रशिक्षण संस्था कोणत्या ठिकाणी सुरु करणार आहात, त्यांचे स्वरुप काय आहे याची शासनाने माहिती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 351 नुसार या राज्यामध्ये 10 आदर्श महाविद्यालये निर्माण करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. ही 10 आदर्श महाविद्यालये कोणत्या भागामध्ये सुरु करणार आहात? ही मॉडेल महाविद्यालये असणार आहेत. ती कोणत्या जिल्हयामध्ये, कोणत्या तालुक्यांमध्ये आणि कशा पध्दतीने सुरु करणार आहात याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 354 अन्वये भारतीय प्रशासन सेवेच्या 4 प्रशिक्षण केंद्रांसाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. 4 प्रशिक्षण केंद्रे कोणत्या तालुक्यामध्ये किंवा जिल्हयामध्ये सुरु होणार आहेत? शहरी भागामध्ये विद्यार्थ्यांची सोय असू शकते. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये सुध्दा खूप चांगले पोटेन्शियल आहे, क्षमता त्यांच्यामध्ये आहे. केवळ त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणून ठाणे किंवा अन्य आदिवासी भागातील ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे केंद्र सुरु होऊ शकेल काय याचाही शासनाने विचार करणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 357 अन्वये आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी किंवा फी सवलत देण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. फी प्रतिपूर्ती करण्यासाठी योजना असली तरी खऱ्याअर्थाने आर्थिकदृष्टया कमकुवत किंवा आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या पालकांजवळ प्रवेश घेताना पैसे नसतात. म्हणून प्रतिपूर्ती नंतर करण्याऐवजी प्रवेश घेताना महाविद्यालयांना आदेश दिले, जसे एस.सी., एस.टी., एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये अशा सूचना शासनाने महाविद्यालयांना दिल्या त्याच पध्दतीने या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांकडून, आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना सुध्दा प्रवेश घेताना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये असे शासनाने आदेश दिले तर खऱ्याअर्थाने त्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल. या संदर्भात शासनाने आदेश देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, राज्य शासनाने खूप चांगल्याप्रकारे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्या शाखा असली पाहिजे. किमान एक तरी अनुदानित महाविद्यालय असले पाहिजे हा खूप चांगला निर्णय आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी ज्या ज्या जिल्हयांमध्ये कॉलेज सुरु झाले, तालुक्यातील ग्रामीण भागात एकही कॉलेज नव्हते, अशी काही महाविद्यालये होती ती शहरी भागामध्ये सुरु झालेली आहेत. अनेक संस्थांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी, गोरगरिबांच्या मुलांसाठी, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी महाविद्यालये, उच्च शिक्षणाची सोय सुरु केली. पण तालुक्यामध्ये किमान एक तरी अनुदानित महाविद्यालय असले पाहिजे हे जे शासनाचे धोरण आहे त्यामध्ये शहरी भागातील कॉलेजचा विचार न करता ग्रामीण भागामध्ये एखादे तरी कॉलेज आहे का हा निकष लावला तर खऱ्याअर्थाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जी महाविद्यालये संस्थांनी त्या भागात सुरु केली त्यांना अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. शासनाकडून सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकेल.

सभापती महोदय, आपल्याच मतदारसंघातील कल्याणपासून 15-16 कि.मी.अंतरावरील गोविले गावी महाविद्यालय सुरु आहे. कल्याणमध्ये अनुदानित महाविद्यालये, कल्याण विभागातील ग्रामीण भागातील महाविद्यालयांना कोणतेही अनुदान मिळत नाही. रायगड जिल्हयातील तळे येथे महाविद्यालय सुरु आहे. विनाअनुदानित तत्वावर तुकड्यांना मान्यता आहे. परंतु त्यांचाही अनुदानाचा प्रश्न सुटलेला नाही.

4जी.1.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

आदर्श महाविद्यालय, कुळगांव (बदलापूर) या महाविद्यालयला 10 वर्षापूर्वी मान्यता मिळालेली आहे. ग्रामीण भागातील कॉलेज म्हणून खास बाब म्हणून दोन दोन वर्ग सुरु झालेले आहेत पण फक्त एकाच वर्गाला अनुदान मिळते व दुसऱ्या वर्गाला मात्र मिळत नाही, तो निर्णय अद्यापही प्रलंबित आहे. या शासनाने महाविद्यालयांच्याअनुदानासंबंधी तसेच तुकड्यांच्या अनुदानाचे प्रश्न मार्गी लावावेत अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात बोलत असताना मी प्रामुख्याने बाब क्र. 288, पृ.क्र. 383 च्या संदर्भात बोलत असताना अनेक वेळा चर्चिल्या गेलेल्या पोहनेर, ता. परळी, जि.बीड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे गोदावरीच्या पाण्याने दरवर्षी वेढले जाते. त्या ठिकाणी जमीन उपलब्ध करुन देखील पीएचसी बांधण्याची कार्यवाही अद्यापही झालेली नाही, त्याकडे मंत्री महोदयांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे शिरसाळा, ता. परळी, जि.बीड येथील पीएचसी कर्मचाऱ्यांची निवासस्थाने राहण्यासारखी नाहीत. माननीय आरोग्य मंत्र्यांनी या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची व्यवस्था ताबडतोबीने करणे गरजेचे आहे.

यानंतर बीड जिल्ह्यातील गोरक्षनाथ टेकडी हे पर्यटन स्थळ म्हणून मान्य करण्यात आलेले असून अद्यापही निधीची व्यवस्था करण्यात आली नाही, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा.

यानंतर कारागृहांमध्ये राज्यात फार मोठ्या प्रमाणात महिला आहेत. त्यांच्या बरॅक्समध्ये सुखसोईच्या दृष्टीने तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण महिला जन्मजात आरोपी नसतात परंतु एकदा कारागृहात गेल्यानंतर तिला समाज स्वीकारत नाही म्हणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने योजना तयार करावी. अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गृह विभागाच्या पृ.क्र. 24, बाब क्र. 24 व 25 च्या अनुषंगाने पुणे येथील श्री. नातू यांच्या माध्यमातून माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. माननीय गृह मंत्री तसेच माननीय राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत. वास्तविक गृह विभागावर सन्माननीय सदस्यांनी सभागृहात कमीच बोलावे अशीच त्यांची इच्छा असते. परंतु आमची अपेक्षा अशी असते की, काही प्रश्नांना न्याय मिळावा म्हणून गेली दोन वर्षे पोलीस सुधारणा हा विषय प्रलंबित आहे त्यासाठी अजुनही निधीची तरतूद केल्याचे दिसत नाही, त्याबाबत मंत्री महोदयांनी विचार करणे आवश्यक आहे.

यानंतर नगर जिल्ह्यातील पाथर्डी या तालुक्यात कोठेवाडी या गावात पोलीस चौकी सुरु करण्यासंबंधीची मागणी आम्ही नेहमी मांडत आहोत. आता देखील 30 एप्रिल, 2009 रोजी नगर जिल्ह्यातील या कोठेवाडी गावात दरोडेखोरांनी मारहाण करुन दागिने चोरले. यासंदर्भात सातत्याने फिक्स पॉइंटची मागणी होती व ती माजी गृहमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी मान्य केली होती. प्रत्यखात मात्र झालेले नाही. तीन गृहमंत्री बदलून गेले परंतु कोठेवाडीला पोलीस स्टेशन मिळाले नाही. तसेच बऱ्याच ठिकाणी दरोडाविरोधी पथक असणे आवश्यक आहे. कारण दरोडा झाल्यानंतरच पोलीस नेहमी येतात. मागील काळात जसे दुष्काळग्रस्त, आपद्ग्रस्त त्याच धर्तीवर दरोडेग्रस्त जिल्हा म्हणून बीड,नगर आणि नाशिक जिल्ह्यांना घोषित करावे, अशी माझी मागणी आहे.

ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, पृ.क्र.240, बाब क्र. 206 च्या अनुषंगाने बचत गटांचा महासंघ करण्यासंबंधीचा उल्लेख येथे केला आहे. बचत गटांचा महासंघ करणे ही चांगली बाब आहे परंतु अनुभव पाहिले तर ज्यावेळी बचत गटांचा महासंघ करण्यास शासन सुरुवात करते त्यावेळी आपल्याच विभागांमध्ये समन्वय दिसत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

आदिवासी विभागाचे बचत गट निराळे, ग्रामविकास विभागाचे बचत गट निराळे, अनुसूचित जातींचे बचत गट वेगळे, अल्पसंख्याक धर्मियांचे बचत गट वेगळे आहेत त्यामुळे मला तरी असे वाटते की, शासनाने अगोदर अंतर्गत बचतगट महासंघ करावा आणि मग इतर बचत गटांना त्यामध्ये जोडून घ्यावे. जे स्वयंसेवी संस्थांचे बचतगट आहेत ते स्वयंसहाय्य गट आहेत. त्या प्रत्येकाला कर्ज पाहिजे अशातला काही भाग नाही. बचत गटाने कर्ज बाजारी व्हावे हा काही यामागचा हेतू नाही. त्यामुळे जे बचत गट स्वत:च्या पायावर उभे आहेत व पूरक उत्पन्न म्हणून बचत गटाकडे बघता आहेत अशा बचत गटांना, बचत गट महासंघात आणणे आवश्यक आहे हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, सर्व बचत गटांना बचत गट महासंघात आणण्याचा आग्रह धरु नये हे मला या निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते. दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, बचत गट करतांना सरकारच्या योजनेत काही बचत गटात 10 सदस्य असावेत आणि काही बचत गटात 20 सदस्य असावेत असे असते. परंतु अधिकारीच त्या 20 सदस्यांना तोडून 10-10 सदस्यांचे बचत गट कागदोपत्री दाखवतात. असे करतांना आपण अनुदान मिळवण्यासाठी त्या बचत गटामध्ये फूट पाडण्याचे काम केले जाते. बचत गट ही जी चळवळ आहे तिला राजकीय स्वरुप देण्यापेक्षा त्यांचे सामाजिक काम आहे हे लक्षात घेऊन बचत गट महासंघाचे काम सरकारी अधिका-यांनी करण्यापेक्षा तेथील सामाजिक संस्थांवर सोपवले तर ते बचत गट चांगल्या प्रकारे काम करु शकतील. बचत गट महासंघ तालुका स्तरावर कसा करणार त्याची कार्यपध्दती निश्चित झाली पाहिजे हे मला येथे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, बचत गटांना 4 टक्के दराने कर्ज देण्याच्या संदर्भात शासनाने आक्टोबर महिन्यात जीआर काढलेला आहे. ही घोषणा निश्चितपणे चांगली आहे. परंतु ऑक्टोबर ,2008 पासून एकाही बचत गटाला 4 टक्के व्याजाने कर्ज मिळू शकलेले नाही याचे कारण नाबार्ड कडून त्या संदर्भात स्पष्ट सूचना आल्या नव्हत्या असे श्री उमेशचंद्र सरंगी यांचे उत्तर रेकॉर्डवर आहे. जे बचत गट जिल्हा मध्यवर्ती बँकेशी संबंधित नाहीत त्यांना राष्ट्रीयकृत बँकातून 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध होत नाही. किंबहुना कोणत्याही बचत गटाला 4 टक्के व्याज दराने कर्ज मिळालेले नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

शासन यासंदर्भात जे वेगवेगळे आश्वासने देते त्या आश्वासनांची किती अंमलबजावणी झालेली आहे हे बघणे जरुरीचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 218 मध्ये महिला बचत गटांसाठी स्थायी विक्री केंद्रांची घोषणा करण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने "अस्तित्व" नावाने बचत गटासाठी विक्री केंद्र सरु करणार आहोत असे दोन वर्षापूर्वी जाहीर केले. अजून पर्यंत त्याचा फायदा एकही बचतगटाला मिळालेला नाही. यासंदर्भातील कार्यपध्दती सूचविण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेवर टाकण्यात आलेली आहे. गेल्या आठ दिवसापूर्वी त्या ठिकाणी काही वस्तू आलेल्या आहेत अशी आम्हाला माहिती मिळाली म्हणून आम्ही त्या ठिकाणी गेलो परंतु त्या ठिकाणी संपूर्ण चीनी बनावटीच्या वस्तूंचे 200-250 मोठे खोके पडलेले होते. प्रत्येक बॉक्सवर मेड इन चायना असे लिहिले होते. त्या ठिकाणी महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तू नसून त्या ठिकाणी चायनामध्ये तयार केलेल्या इम्पोर्ट वस्तू आढळून आल्या होत्या. आपण स्थायी विक्री केंद्राच्या संदर्भात बोलतो परंतु स्थानिक पातळीवरील बचत गटाने उत्पादित केलेल्या वस्तूच त्या ठिकाणी ठेवणे बंधनकारक केले नाही तर त्या ठिकाणी मोठे व्यापारी येऊन बचत गटांना बाजूला ठेवतील, 2-4 बचत गटांना हाताशी धरुन त्यांच्या नावाने कारभार चालवतील आणि खरे बचत गट कायम स्वरुपी रस्त्यावरच राहतील. दुसरे असे की, प्रदर्शन भरविण्यासाठी आपण बचत गटांना जिल्हयाच्या ठीक-ठिकाणी घेऊन जातो. 365 दिवसापैकी किती दिवस या बचत गटांना रोजगार मिळतो आणि त्यासाठी तुमच्या अधिका-याचा खर्च किती होतो याचा तुम्ही कधी जमा-खर्च काढला आहे काय ? बचत गटाच्या महिला ज्या पध्दतीने कष्ट करतात त्या पध्दतीत त्यांना पैसे मिळतात काय याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. उद्घाटनाचे समारंभ आणि समारोप समारंभ याच्या प्रसिध्दीसाठी किती खर्च होतो याचा सुध्दा ताळमेळ घालण्याची गरज आहे. स्थायी विक्री केंद्र उभे केले जातात यासंदर्भात मला असे सूचवावयाचे आहे की, स्थायी विक्री केंद्राचा निम्मा भाग हा कायम स्वरुपी रोटेशन पध्दतीने ज्या बचतगटांना पाहिजे असेल त्यांना प्रदर्शनासाठी खुला असावा आणि निम्मा भाग कायम स्वरुपी दुकाने बचत गटासाठी ठेऊ शकता. मी तर असे सुचवीन की, राजकारण न

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

आणता सर्व पक्षांच्या महिला आघाडया आणि स्वयंसेवी संस्था या सगळयांना तुम्ही बचत गटामध्ये सामावून घ्या. आज तुम्ही सत्तेवर आहात उद्या दुसरे सत्तेवर येतील परंतु बचत गटामध्ये राजकारण आणू नये हे मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, महिला आणि बालविकास विभागासाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु महिला बालविकास विभागाला दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. स्त्रीचे स्थान समाजामध्ये दुय्यम आहे, जीवंत स्त्रियांना जाळले जाते किंवा त्यांना मारहाण केली जाते. महिला बाल विकास विभाग असल्यामुळे तसे तुम्हाला करता येत नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम

गो-हे ...

तसे तुम्हाला करता येत नाही. परंतु महिला व बाल कल्याण विभागाकडे पुरेसे अधिकारी नाहीत तसेच कौटुंबिक संरक्षण अधिका-यांची नेमणूक करण्यासाठी पुरेसा निधी नाही. केन्द्र सरकारने कौटुंबिक संरक्षण कायदा केला असून त्या बाबतीत मोठया प्रमाणावर वर्तमानपत्रात जाहिराती दिल्या जातात. त्याकरिता महाराष्ट्रात ठिकठिकाणी अधिकारी निर्देशित केलेले आहेत. परंतु कौटुंबिक संरक्षण कायद्यानुसार, त्यांनी न्याय मिळवून दिला आहे किवा नाही याची शासनाने पहाणी करावी. शासनाच्या विभागामध्ये कौटुंबिक संरक्षण अधिका-याचे पद दिसून येत नाही.

सभापती महोदय, यान्तर मला महाराष्ट्र राज्य महिला आयोगा संबंधी बोलावयाचे आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ काही प्रमाणात सक्षम असल्याचे दिसून येते. त्यांच्याकडे बचत गट तयार करण्याची कामे दिलेली असतात. त्यामुळे ते सक्षम आहेत. मी सुध्दा महिला आर्थिक विकास महामंडळाची अध्यक्षा होते. त्यामुळे हया महामंडळाचे काम चांगल्या प्रकारे चालले आहे याची मला कल्पना आहे. हे महामंडळ स्वत:चे पैसे स्वत: उभे करु शकतात. म्हणून ते चांगल्या प्रकारे चालले आहे. परंतु राज्य महिला आयोगामध्ये तीन पदे एका पक्षाची आणि तीन पदे दुस-या पक्षाची आहेत. त्या ठिकाणी पक्षीय राजकारण आणता कामा नये. परतु मला खेदाने नमूद करावयाचे आहे की, राज्य महिला आयोगातील तीन पदे गेल्या पाच वर्षापासून रिक्त आहेत. माझ्या माहिती प्रमाण, कॉग्रेसच्या कोटयातील तीन पदे भरण्यात आलेली आहेत. परंतु राष्ट्रवादी पक्षाच्या कोटयातील तीन पदे अजूनही भरण्यात आलेली नाहीत. राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून महिलांना एक चांगले व्यासपीठ प्राप्त झालेले आहे. त्या ठिकाणी प्रत्येक जिल्हयात हजारो महिला काम करीत आहेत. अहिल्याबाई होळकर पुरस्कार देत असतांना शासनाला चांगल्या महिलांची नावे सापडत नाहीत .त्यामुळे गेल्या पाच वर्षापासून शासनाने हे पुरस्कार दिलेले नाहीत. ज्यांची नावे सुचविण्यात आली होती, त्यांच्या बाबतीत तक्रारी करण्यात आल्या होत्या असेही सांगण्यात आले. सरकारच्या कोटयातील तीन सदस्यांची पदे गेल्या पाच वर्षापासून रिक्त ठेवल्याबद्दल मला खेद होत आहे. महिला आयोगाची साक्ष महिलांचे हक्क व कल्याण समितीने घेतली होती त्यावेळी त्यांनी सांगितले की 72 लाख रुपयांचे भाडे शा्सनाने आम्हाला दिलेल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ...

नाही. त्यामुळे आम्हाला ही जागा रिकामी करुन द्यावी लागेल. महिला आयोगातील अधिका-यांच्या काही जागा रिक्त आहेत. त्यातील निम्या जागा भरण्यात आलेल्या आहेत तर निम्या जागा अजूनही रिक्त आहेत. राज्य महिला आयोगाला कोणताही दर्जा देण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे कोणताही अधिकारी त्यांना महत्व देत नाही. जेव्हा शासन धोरण जाहीर करीत असते, तेव्हा शासनच राज्य महिला आयोगाला किंमत देणार नसेल तर समाजामध्ये राज्य महिला आयोगाला कोणते स्थान राहणार आहे ? राज्य महिला आयोगातील तीन पदे गेल्या पाच वर्षापासून रिक्त असतांना हा आयोग कसे काम करील याबाबतीत शासनाला काहीही खंत वाटली नाही काय ? महिला सक्षमीकरणाच्या बाबातीत शासन वारंवार घोष्णा करीत असते

सभापती महोदय, या ठिकाणी मी आपल्याला औरंगाबाद येथे काल घडलेल्या घटनेचे उदाहरण देते. तेथील मानसी देशपांडे नावाच्या मुलीवर बलात्कार करुन तिला मारुन टाकण्यात आले होते. त्या ठिकाणचे राज्य महिला आयोग जर क्रियाशील असते तर अशा घटना घडल्यानंतर कोणी तरी जाऊन मदत केली असती. सन्माननीय मंत्री डॉ.शोभा बच्छाव ज्यावेळी महिलांचे हक्क कल्याण समितीच्या समिती प्रमुख होत्या, त्यावेळी राज्य महिला आयोगाची साक्ष घेण्यात आली होती. राज्य महिला आयोगातील त्रृटी दाखविण्यासाठी या समितीने साक्ष घेतली नव्हती तर राज्य महिला आयोगाला कोणत्या प्रकारची मदत देता येईल यासाठी आम्ही ही साक्ष घेतली होती. सान्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती फौजिया खान तसेच विधान सभेच्या सन्माननीय सदस्या त्या समितीवर होत्या. त्यावेळी आमची अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली होती. सगळयांना असे वाटते की, महिला एकत्र आल्या नंतर भांडणे होतील. परंतु तशा प्रकारे तेथे काहीही घडले नाही. उलट या समितीने चांगल्या प्रकारच्या साक्षी घेतल्या आणि माननीय मुख्यमंत्र्यांकडे त्या संबंधी शिफारससुध्दा केल्या. त्यांना याबाबतीत माहिती दिली. परंतु त्यांनी महिला आयोगाला भेटण्याससुध्दा वेळ दिला नाही. महिला व बाल कल्याण मंत्रीसुध्दा महिला आयोगाकडे लक्ष देत नाहीत. महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रजनी सातव यांनी असे सांगितले

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम

गो-हे ...

होते की, आम्हाला दोन कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा. परंतु या मागण्यांमध्ये राज्य महिला आयोगाला 50 लाख रुपयंपेक्षा जास्त निधी दिला जात नाही. अशा परिस्थितीत महिलांना हिंसाचाराच्या संदर्भात महिला आयोगाकडून कसा न्याय मिळेल ? या सर्व बाबींचा शासनाने विचार करण्याची आज गरज आहे.

सभापती महोदय, महिला बाल कल्याण विभाग ज्या मंत्र्याकडे नाही, त्या मंत्र्यांचीसुध्दा ही जबाबदारी आहे. त्यांच्या विभागामध्ये महिला विकासाचे जे विषय आहेत, त्यांच्यासाठी त्यांनी निधीचा वापर व्यवस्थितपणे करावयास पाहिजे. आपण फक्त महिला व बाल कल्याण विभागाकडून न्यायाची अपेक्षा न ठेवता आपल्या विभागात हा खर्च योग्य प्रकारे कसा होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. महिला व बाल कल्याण विभागाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्याचा विचार होईल अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागातील बाब क्रमांक 357 संबंधी मला बोलावयाचे आहे. या पूरक मागणीमध्ये सहाय्यक अनुदान देण्यात आलेले आहे. ही चांगली गोष्ट आहे. परंतु माझी अशी अपेक्षा होती की, रॅगिंग विरोधी कमिटया प्रत्येक शिक्षण विभागात झाल्या पहिजेत, असे उच्च न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. लातूरमध्ये एका मुलीचा रॅगिगमुळे मृत्यू झाला आहे. अनेक शहरामध्ये रॅगिंगमुळे मुले आत्महत्या करीत असल्याचे प्रकार सतत घडत आहेत. उच्च न्यायालयाने निदेश दिल्या नंतरसुध्दा रॅगिंग विरोधी कमिटया स्थापन करण्यासंबंधी विद्यापीठाला प्रशिक्षण वा मार्गदर्शन केले जात नसेल तर पुन्हा जून जुलै महिन्यात हेच प्रकार होतील. ज्या प्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्याप्रमाणे रॅगिंगमुळे मुले मृत्यूमुखी पडत आहेत. असे प्रकार राज्यात सुरुच राहतील. या गोष्टी महाराष्ट्र राज्याला शोभादायक नाहीत,या गोष्टीकडे लक्ष वेधून मी माझे भाषण संपविते. जय महाराष्ट्र.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत पत्र / शोधनीयाही नाही

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता याठिकाणी उभा आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 291 आणि पृष्ठ क्रमांक 387 च्या अनुषंगाने मी याठिकाणी सांगू इच्छितो की, पुणे हे शहर महानगरीच्या दिशेने वाढत चालले आहे. पुणे शहर आणि जिल्हा मिळून फक्त एकच ससून हॉस्पिटल या शहरामध्ये सुरुवातीपासून आहे. या विधीमंडळामध्ये आणि शासनाकडे इतर ठिकाणी हॉस्पिटल बांधण्यासाठी आपण अनेक वेळा मागणी केली आहे. पुण्याच्या बिबवेवाडीच्या परिसरामध्ये ईएसआय हॉस्पिटलची इमारत अनेक वर्षापासून तयार होऊन धूळ खात पडलेली आहे. त्याठिकाणी शासनाच्या वतीने हॉस्पिटलच्या सर्व सुविधा निर्माण करण्यात आल्या पाहिजेत. याबाबत या सभागृहामध्ये अनेक वेळा मागणी करुन सुध्दा ती पूर्ण करण्यात आली नाही. तेव्हा या बाबतीत शासनाने तातडीने पावले उचलणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांचा तुटवडा आहे तो सुध्दा दूर होणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पुणे येथे जी रुग्णालये सुरु आहेत त्या रुग्णालयांच्या अंतर्गत येणारी जी रुग्णालये असतील त्याठिकाणी पोस्ट मार्टेम करण्याची सुविधा निर्माण करण्याकरिता कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आली नाही. याबाबतच्या प्रस्तावाला गृह विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने मान्यता देऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे. आज केवळ पुण्याच्या ससून हॉस्पिटल आणि पिंपरी-चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलमध्ये पोस्ट मार्टेमची व्यवस्था आहे. त्यामुळे अनेक लोकांना 12 ते 24 तास ताटकळत रहावे लागते. आणि म्हणून या दु:खाच्या प्रसंगी ही तांत्रिक बाब शासनाने दुरुस्त करावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पान क्र. 16, बी-1 मध्ये शहर पोलीस आस्थापनांच्या बाबतीत सांगितले पाहिजे की, मुंबई व नागपूर या शहराच्या ठिकाणी पोलीस कर्मचारी किंवा वहातूक पोलीस कर्मचारी यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. परंतु आमच्या पुणे शहराचे दुर्दैव असे की, या बाबतीत आमच्यावर कां अन्याय केला जात आहे हे मला समजत नाही?. या संदर्भात सन्माननीय गृहमंत्रिमहोदयांबरोबर मी अनेक वेळा चर्चा केली. व त्यांनी मला आश्वासन दिले. माझी आपणास विनंती आहे की. पुण्यामध्ये जो अपूरा कर्मचारी आहे. त्या कर्मचाऱ्यांची लवकरात लवकर वाढ करावी आणि त्यासाठी प्रयत्न करावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ D/ MAP/

श्री. मोहन जोशी...

त्याचबरोबर गृह विभागाच्या पान क्र. 20 व बाब क्रमांक 20 बाबत सांगू इच्छितो की, पुणे शहरामध्ये पोलिसांकरिता बांधलेल्या जुन्या वसाहती आहेत. प्रामुख्याने स्वारगेट पोलीस लाईन किंवा सोमवार पेठ पोलीस लाईनच्या ठिकाणी जुन्या इमारती अनेक वर्षापासून अतिशय पडक्या अवस्थेत असून त्या घरामधून पाण्याची गळती होत आहे. अशी अतिशय वाईट अवस्था असतांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्यांना सुविधा दिल्या जात नाहीत. माझी यासंबंधी आपणास विनंती आहे की, या सभागृहाच्या माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सिडकोमध्ये पोलीस वसाहत तयार केली त्याप्रमाणे एफएसआय वाढवून बीओटी तत्वावर पुण्यातील अनेक मोकळया जागांवर पोलिसांकरिता वसाहती बांधल्यातर अनेक कर्मचाऱ्यांकरिता राहण्याची सोय उपलब्ध होईल. त्याकडे आपण लक्ष देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, गृह विभागाशी संबंधित अनेक मुद्दे याठिकाणी वेळेअभावी मला मांडता आले नाहीत.परंतु यापूर्वी माननीय गृहमंत्र्यांबरोबर त्या संदर्भात दोन-तीन वेळा बैठक घेऊन चर्चा केली आहे. त्या बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता लवकर करावी एवढी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. विधानमंडळाच्या तिनही अधिवेशन काळात सर्व प्रकारचे अहवाल व विवरण पत्रके आणि पुस्तके टपाल खणाव्दारे किंवा अर्थसंकल्पीय बॅगव्दारे सर्व सदस्यांना देण्यात येतात. बऱ्याच वेळा पुस्तके व इतर विवरणपत्रे सदस्यांना संकलीत करणे व घेऊन जाणे अशक्य होते. बऱ्याच बाबी सदस्यांना थेट नको असताना संकलित करावे लागणे. छपाई व हाताळणीचा प्रचंड खर्च शासनाला सोसावा लागणे. त्यापेक्षा पुस्तकांऐवजी सर्व प्रकरणांची सीडी पुरविण्यात आल्यास सदस्यांना हाताळणेही सोईचे होईल व संग्रही ठेवून हवी ती माहिती घेता येईल. सभापती महोदय, अशाप्रकारे जर आपण सीडी पुरविली तर शासनाचा स्टेशनरीवरील खर्च कमी होईल. तसेच, अर्थसंकल्पीय प्रकाशने नंतर रद्दी म्हणून बाजारात विकली जातात. तेव्हा हा पैश्याचा अपव्यय टाळण्यासाठी सर्व माननीय सदस्यांना अर्थसंकल्पविषयक सर्व बाबींच्या सीडी पुरविण्यात याव्यात अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

(यांनतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2009-2010 च्या खर्चाच्या पुरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्र.30,पान क्र.24 यामध्ये गुप्तवार्ता विभागासंबंधात मागणी केलेली आहे. ज्याप्रमाणे महानगरांमध्ये आणि नगरांमध्ये लोकसंख्या वाढत चालली आहे, त्याप्रमाणे गुन्ह्यांचे प्रमाण देखील वाढत आहे. याठिकाणी अगोदर गुन्हे घडतात आणि त्याबाबत नंतर माहिती मिळते अशी स्थिती झाली आहे. या गुप्तवार्ता विभागामध्ये महाविद्यालयीन तरुणांना आवाहन करुन मोठया प्रमाणावर त्यांचा भरणा करु शकलो, त्यासाठी त्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देऊ शकलो, त्यांना आवश्यक असणारी साधने उपलब्ध करुन दिली तर गुन्हे घडण्यापूर्वी माहिती गोळा करण्याचे प्रमाण वाढेल. त्यामुळे गुप्तवार्ता विभागामध्ये या बाबतीत विचार करुन काही ना काही निधीची तरतूद करण्याची गरज आहे. तसेच पाच वर्षापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये श्री.संजयकुमार नावाचे डी.एस.पी.असताना त्यांनी अशाच प्रकारे तेथील स्थानिक तरुणांना आवाहन करुन रात्रीच्या वेळेस दक्षता पथके सुरु केली होती. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये रात्रीच्या गुन्ह्यांमध्ये खूप घट झाली होती. पंरतु सध्या शासनाकडे निधीची कमतरता आहे असे वारंवार सांगितले जाते आणि त्यामुळे आपल्याला सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या गोष्टी करणे आवश्यक आहेत, त्या करता येत नाहीत. त्यामुळे मोठया संख्येने असलेला महाविद्यालयीन तरुणांची सुरक्षेच्या विषयामध्ये आणि गुन्ह्यांची पूर्व माहिती मिळण्यामध्ये मदत होऊ शकते. त्यामुळे या गुप्तवार्ता विभागामध्ये तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि त्यांना साधने उपलब्ध करुन देण्यासाठी योजना करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.85, पान क्र.93 यामध्ये क्रीडा विभागाच्या बाबतीत मागणी केली आहे.यावेळी पुणे येथे व्हॉलीबॉलच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणार आहेत, त्यासाठी 75 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. क्रीडा विभागामध्ये नवीन-नवीन प्रकारच्या तरतुदींबाबत घोषणा होते. परंतु दोन वर्षापूर्वी गुवाहटी येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील एकूण 46 खेळाडूंना सुवर्णपदके मिळाली होती.याबद्दल आपण त्यांना जी बक्षिसे जाहीर केली होती, ती दोन वर्षापासून मिळालेली नाहीत.एक वर्षापूर्वी पुणे येथे युवा राष्ट्रकूल स्पर्धा झाली, त्यावेळी श्री.वीरधवल खाडे नावाच्या तरुण अशा जलतरणपटूला सहा सुवर्णपदके मिळाली,पण त्याची बक्षिसाची रक्कम देखील अजूनपर्यंत मिळालेली नाही. त्यामुळे आपण क्रीडा विभागामध्ये नवीन-नवीन अनुदानाच्या घोषणा ....

. . . .4 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील . . ..

करतो. पण त्याची पूर्तता करीत नाही.त्यामुळे दोन वर्षापासून गुवाहटी येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांची बक्षिसे आणि एक वर्षापूर्वी पुणे येथे झालेल्या युवा राष्ट्रकूल स्पर्धांची बक्षिसे यासाठी पुरेशी तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पान क्र.313 बाबत सांगावयाचे आहे. कोल्हापूर जिल्हयामध्ये पंचगंगा नदीमध्ये होणाऱ्या प्रदूषणाबाबत शनिवारी अर्ध्या तासाची चर्चा होती. पण ती या आठवडयामध्ये दोन वेळा पुढे ढकलण्यात आली. जगामध्ये ज्या दूषित नद्या आहेत, त्यातील पहिल्या दहा नद्यांमध्ये पंचगंगा नदीचा क्रमाक लागतो. अशाच प्रकारे महाराष्ट्रामधील अनेक नद्या या त्या-त्या भागातील साखर कारखाने, इतर कारखाने आणि मोठया प्रमाणात वाढत जाणारी लोकवस्ती यामुळे प्रदूषित होत आहेत. अशा प्रकारे नद्यांचे प्रदूषण थांबावे यासाठी त्या-त्या शहरांमध्ये अतिशय लहान प्रकारची योजना करावी लागते. जसे कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीतील प्रदूषण थांबवावयाचे असेल तर केवळ 73 कोटी रुपयांच्या योजनेची आवश्यकता आहे आणि गेले पाच वर्षे हा विषय रेंगाळत पडलेला आहे. मला असे वाटते की, महाराष्ट्रातील नद्या आणि त्यामध्ये होणारे प्रदूषण यासाठी सुध्दा काही ना काही तरतूद करण्याची आवश्यकता आहे एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, मैं पूरक मांगों का समर्थन करने के लिए खड़ी हूँ. उच्च व तंत्र शिक्षण विभाग से संबंधित बाब क्रमांक 354 के संबंध में मैं कहना चाहती हूँ कि आर्थिक दृष्टि से पिछड़े हुए विद्यार्थियों के लिए ई.बी.सी. की सहूलियत और शिष्यवृत्ति मिलती है. मैं एक गंभीर मुद्दे की तरफ इस डिपार्टमेंट का ध्यान आकर्षित करना चाहती हूँ कि अल्पसंख्यक समाज के जो विद्यार्थी ई.बी.सी. की सवलत के पात्र हैं और उनमें मेरिट भी है, उनको यह कहकर ई.बी.सी. की सवलत से वंचित किया जाता है कि आप अल्पसंख्यक समाज से हो और आपको अल्पसंख्यक विकास मंत्रालय की शिष्यवृत्ति मिलती है. यह शिष्यवृत्ति बहुत कम है और पूरे राज्य में 1200 विद्यार्थियों को भी यह सवलत नहीं मिलती है. उच्च व तंत्र शिक्षण विभाग को इस पर गंभीरता से विचार करने की आवश्यकता है, ताकि अल्पसंख्यक समाज के विद्यार्थी जो ई.बी.सी. की सहूलियत के पात्र है, उनके ऊपर अन्याय न हो और उनको ई.बी.सी. की सहूलियत दी जाए.

सभापति महोदय, पुनर्वसन व मदत कार्य विभाग की बाब क्रमांक 61 के संदर्भ में मैं यह कहना चाहती हूँ कि 1984 के दंगल में मरे हुए लोगों के वारिसों की पेंशन के लिए शासन ने 6 लाख रुपए का प्रावधान किया है. शासन का यह कदम स्वागत योग्य है. लेकिन दिनांक 6 जनवरी 2007 को परभणी जिले के मानवत तालुका में दंगल हुए, उसमें 37 मासूम लोगों की दुकानों का नुकसान हुआ और कुछ लोग जख्मी भी हुए थे. इसमें जिन गरीब टपरी वाले, हाथगाड़ी वाले तथा छोटे दुकानदारों का नुकसान हुआ है, उनका पुलिस, तलाठी एवं प्रशासन की तरफ से पंचनामा किया गया है. स्थानीय तहसीलदार की तरफ से नुकसानधारकों को नुकसान भरपाई देने का आश्वासन दिया गया था. इन नुकसान धारकों के संसार आज बहुत खस्ता हालत में हैं और इन्हें आज तक नुकसान भरपाई नहीं मिली है. ये प्रस्ताव पुनर्वसन विभाग के पास प्रलंबित है. शासन की तरफ से जल्दी से जल्दी इन दुकानदारों को भरपाई मिले, ऐसा मेरा कहना है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 57 वन विभाग से संबंधित है. मैं माननीय वन मंत्री से कहना चाहती हूँ कि वे मेरी बात ध्यान से सुनें और उस पर गौर करने के बाद आप उत्तर भी दीजिए. जंगली डुक्कर का प्रश्न बहुत गंभीर हो गया है. आज कितने लोग जंगली डुक्कर को मार रहे हैं ? शासन इनको मारने के लिए कमीशन देता है. वही लोग बार बार कमीशन ले रहे

. . . 4L 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

हैं और शासन की तिजोरी खाली हो रही है. मंत्री महोदय ने आदेश निकलवाया है कि जंगली डुक्कर को शूट कर सकते हैं. लेकिन इन डुक्करों को कौन शूट करेगा, शेतकरी के पास हथियारों के लाइसेंस नहीं है. वे इनको नहीं मार सकते, इसलिए मेरा सुझाव है कि आप अपने डिपार्टमेंट का हर जिले के लिए एक दल बनाइए, उनको ट्रेनिंग दीजिए और वे लोग यह कार्य करें. मेरी शासन से मांग है कि इस पर गंभीरता से अमल किया जाए.

सभापति महोदय, वन विभाग के बारे में 2-3 मिनट और बोलना चाहती हूँ. हिरन जानवरों की लिस्ट में शिड्यूल 1 में आता है. हिरन की वजह से लोगों को जो तकलीफ हो रही है, इसलिए उनको पकड़ने के लिए योजना बनाई गई है, जिसके अन्तर्गत लाइट एंड सर्च मेथड अपनाया गया है. रात के समय हिरन की आँखों पर सर्च लाइट डालते हैं, जिससे वह भागकर जाल में फंस जाता है और उसे पकड़ लिया जाता है. इनको कारंजा सेन्चुरी में ले जाते हैं, जो कि खुद ओवर-फ्लो हो रही है. यह तो उस तरह से हुआ जैसे कि किसी अधिकारी को दंड देना होता है तो उसे दूसरी जगह पर भेज देते हैं. मेरा कहना यह है कि यह जानवर शिड्यूल 1 में आता है और अगर किसी मंत्री ने हिरन को मारा तो उसका मंत्री पद चला जाता है. हिरन को मारना एक गंभीर अपराध है. हिरन को भगाकर पकड़ने का जो काम हो रहा है, वह बहुत गलत है. इससे कई हिरनों की हार्ट अटॅक से मृत्यु हो जाती है और कई हिरन खड्डे में गिर जाते हैं. हिरन को पकड़ने का यह तरीका फौरन बंद किया जाए. 15 साल पहले गांव वाले हिरन को पकड़ने के लिए इसी प्रकार का तरीका इस्तेमाल करते थे, इसलिए हिरन की "Close to extinction" जैसी स्थिति आ गई थी. हिरन को मारने का बड़ा गुन्हा हो रहा है, इसलिए इस प्रिमिटिव मेथड को तुरन्त रोका जाए.

. . . . भाषण जारी, M -1

अशुधारित प्रत/शुद्धिपत्र नहीं

. . . श्रीमती फौजिया खान जारी

सभापति महोदय, सभापति महोदय 1975 में महाराष्ट्र प्राईवेट फोरेस्ट एक्वीजीशन एक्ट आया, जिसके चलते प्राईवेट जमीन रिजर्व फोरेस्ट के लिए एक्वायर की गई और नोटिस निकलते ही यह प्राईवेट जमीन फोरेस्ट की जमीन हो जाती है. इसकी म्यूटेशन एन्ट्री नहीं की गई और 7X12 पर सरकार या फोरेस्ट की बजाय मूल मालिक का ही नाम रह गया. उस मालिक ने यह जमीन किसी दूसरे व्यक्ति को बेच दी, दूसरे व्यक्ति ने किसी तीसरे व्यक्ति को वह जमीन बेच दी और उसने किसी और व्यक्ति को वह जमीन बेच दी. इस तरह पूरी बोरीवली और लोणावाला की जमीन बिक गई. लोणावाला में यह जमीन कई सेलिब्रिटीज को बेच दी, उदाहरण के तौर पर अभिषेक बच्चन को यह जमीन बेच दी गई. यह बहुत ही एक्सपेंसिव जमीन है. उस समय वहां के डी.सी.एफ., कन्जरवेटर्स ने कोई एक्शन नहीं लिया और यह मॅटर सुप्रिम कोर्ट में चला गया. सुप्रिम कोर्ट ने 8 मई को आदेश पारित किया कि एक स्पेशल इन्वेस्टिगेटिंग टीम बनाई जाए और पुणे की आजू बाजू की सभी जमीन घोटले का इन्वेस्टिगेशन किया जाए.

सभापति महोदय, लेकिन यह घोटाला केवल पुणे तक ही सीमित नहीं है. ठाणे, मुंबई, रायगढ, कोल्हापुर और रत्नागिरी के फोरेस्ट सर्कल में भी ऐसे घोटाले हुए हैं. मेरा महाराष्ट्र शासन से प्रश्न है कि एस.आई.टी. को पुणे तक सीमित न रखते हुए क्या मुंबई, ठाणे, रायगढ, रत्नागिरी और कोल्हापुर सर्कल के लिए भी एस.आई.टी. बनाई जाएगी ? और अगर नहीं तो आप मुंबई, ठाणे, रायगढ, रत्नागिरी और कोल्हापुर सर्कल के लिए एस.आई.टी. क्यों नहीं बनाएंगे, इसका उत्तर मैं माननीय मंत्री महोदय से अपेक्षित करती हूँ.

सभापति महोदय, मैं सिम्बोसिस कॉलेज ऑफ मेनेजमेंट, पुणे का एक उदाहरण देना चाहती हूँ. सरकार ने इस संस्था को लगभग 4 एकड़ जमीन 16 रुपए प्रति एकड़ के हिसाब से कुछ स्पेसिफिक कंडीशन्स के साथ लीज पर दी थी. जैसे कि यह जमीन सिर्फ प्लांटेशन के लिए इस्तेमाल होगी. इस प्राइम जमीन पर, इस अमूल्य जमीन पर मेनेजमेंट ने सभी कंडीशन्स तोड़कर वहां पर पार्किंग स्पेस, फ्लोरिंग और आर.सी.सी. स्ट्रक्चर इत्यादि बना दिए. इसलिए वन विभाग ने इंडियन फोरेस्ट एक्ट के अन्तर्गत गुन्हा रजिस्टर किया, क्योंकि यह रिजर्व फोरेस्ट था, जिसके लिए एक्ट के अनुसार 3 साल की सजा है. लेकिन तत्कालीन डी.एफ.ओ. राजेन्द्र मंगरुलकर, जिनका ऑफिस सिम्बोसिस की जमीन के बिल्कुल सामने है, उनकी नाक के

. . . 4M2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

नीचे है, बिल्कुल उनकी नजर के सामने है, इन्होंने अपने बेटे का एडमीशन सिम्बोसिस कॉलेज में एम.बी.ए. के लिए मेनेजमेंट कोटा में करा लिया. यह बात हम सब लोग जानते हैं कि इस एडमीशन के लिए एक बड़ा डोनेशन रेट 25-30 लाख रु. है. दूसरे डी.एफ.ओ. श्री. अनुराग चतुर्वेदी ने भी ऐसा ही किया. प्रिन्सिपल सी.सी.एफ. श्री. डी.के. सिंह ने भी अपने भांजे, भतीजों के 4 एडमीशन करा लिए, जबकि सामान्य परिस्थिति में इनको एक बच्चे के एडमीशन के लिए 25-30 लाख रुपए डोनेशन के रुप में देने पड़ते.

सभापति महोदय, सन् 2006 में वहां के आर.एफ.ओ. ने ऑफेंस बुक किया, नए डी.सी.एफ. ने नोटिस जारी किया. उन्होंने लिखा कि मार्केट रेट से नया लीज रेंट किया जाए, जो कि हर साल 7 करोड़ 86 लाख रुपए होगा. इस प्रकार से नई लीज बनाई जाए. इस प्रकार सरकार को वार्षिक 7 करोड़ 86 लाख रुपए मिलने चाहिए. लेकिन जो राजेंद्र मंगरुलकर वहां डी.एफ.ओ. हुआ करते थे, वे अब मंत्रालय में फोरेस्ट डिपार्टमेंट में ज्वॉइंट सेक्रेटरी है. उन्होंने डी.एफ.ओ., पुणे को लिखकर भेजा कि कोई ज्युडिशियल एक्शन न लिया जाए. जबकि ऐसा तो कोई प्रोवीजन ही नहीं है. इसलिए मेरी सरकार से मांग है कि राजेंद्र मंगरुलकर और अनुराग चतुर्वेदी पर ए.सी.बी. की इन्क्वायरी करवाई जाए कि क्या इनके बच्चों ने सिम्बोसिस कॉलेज से एम.बी.ए. किया है और इनके पास कितनी संपत्ति है. श्री. मंगरुलकर 5 साल पुणे में डी.एस.एफ. थे, 5 साल ठाणे में डी.एस.एफ. थे और अब मंत्रालय में ज्वॉइंट सेक्रेटरी हैं. क्या ए.सी.बी. से इस बात की जांच कराई जाएगी कि इन्होंने पुणे और ठाणे में कितनी सम्पत्ति जमा की है. क्या एस.आई.टी. का स्कोप मुंबई, ठाणे, रायगढ़, रत्नागिरी और कोल्हापुर सर्कल तक बढ़ाया जाएगा. मैं सभागृह को यह जानकारी देना चाहती हूँ कि सिम्बोसिस कॉलेज के मालिक और डायरेक्टर श्री. मजूमदार को भारत सरकार ने बड़े बड़े अवार्ड दिए हैं, जबकि इनके खिलाफ क्रिमिनल केस रजिस्टर हैं.

सभापति महोदय, यह बात तो बड़े शहरों की हुई, लेकिन दूसरे पिछड़े विभागों में भी ट्रायबल एक्ट का जिस तरह से मिस-यूज हो रहा है, वह परिस्थिति को चिंताजनक बना रहा है. इस एक्ट का उद्देश्य यह था कि जो आदिवासी सदियों से उस जगह पर रह रहे हैं, उनके उत्पादन का फायदा उनको मिले. लेकिन देखा यह जा रहा है कि कुछ राजकीय शक्तियों के

. . . 4M3

. . . . श्रीमती फौजिया खान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रोटेक्शन में बड़े पैमाने पर अतिक्रमण किया जा रहा है और फोरेस्ट ऑफिसर उनके खिलाफ कार्रवाई नहीं कर रहे हैं. यहां पर एक बारीक लूप होल है. फोरेस्ट ऑफिसर अपनी रिपोर्ट में लिख देते हैं कि अतिक्रमण किया गया है, लेकिन इंडियन फोरेस्ट एक्ट में अतिक्रमण का कोई सेक्शन ही नहीं है. मेरा प्रश्न है कि ये अधिकारी किस सेक्शन के अन्तर्गत अतिक्रमण का ऑफेंस बुक करते हैं? और इस प्रकार से ऑफेंस बुक करने के बाद में अतिक्रमण को नियमित करने का स्कोप छोड़ देते हैं. मेरा कहना यह है कि अतिक्रमण करने से पहले ट्रेसपासिंग होती है, जिसकी सजा 3 साल है, कल्टीवेशन किया तो फिर उसकी सजा 3 साल है. घास काटना, पेड़ काटना और आग लगाने के लिए अलग अलग सेक्शन के अन्तर्गत ऑफेंस बुक करके एक्शन लिया जाए तो अतिक्रमण रुक सकता है. मेरी वन मंत्री से मांग है कि इस प्रकार के अतिक्रमण को तुरन्त रोका जाए. वन हमारे लिए महत्वपूर्ण संपत्ति हैं और हमारी साँसों के लिए आवश्यक हैं, आगे आने वाली पीढ़ी के लिए वन का संरक्षण करना बहुत जरुरी है. वनों पर अतिक्रमण की वजह से मौसम बदल रहा है और इन सारी बातों को रोकना वन मंत्री के हाथ में है. दोषी व्यक्तियों के खिलाफ कड़ी से कड़ी कार्रवाई की जाए, इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ.

. . . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर श्री.अरविंद सावंत यांचे मराठी भाषण

अशुधारित प्रत / परिशिष्ठ नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : तालिका सभापती महोदय,मी सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी उभा आहे.

तालिका सभापती महोदय, गृह विभागाच्या पृ.क्र. 24 आणि 25 वरील बाब क्रमांक 31 ते 34 च्या संदर्भात मी बोलू इच्छितो. मघाशी आपण नाशिकच्या संदर्भातील विषय सदनामध्ये उपस्थित केला. त्यानंतर मी पुण्याच्या घटनेचा उल्लेख केला. पुण्याच्या घटनेसंदर्भात माननीय गृह मंत्र्यांनी शिताफीने उत्तर देण्याचे टाळले. मी या ठिकाणी पुनश्च मागणी करीत आहे की, ज्याप्रमाणे नाशिकच्या प्रश्नासंबंधी तातडीने निर्णय घेण्यात आला त्याप्रमाणे पुण्याच्या प्रश्नासंबंधीही घेण्याची आवश्यकता आहे. आताच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीयाताई खान यांनी वन खात्याच्या जमिनीवर कशा प्रकारे अतिक्रमण केले जाते हे सांगितले. पुण्यामध्ये भूमाफियांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. मघाशी मी या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांना सांगितले होते. पुणे शहरातील काँग्रेस भवनाला ऐतिहासिक महत्व आहे. तेथे महात्मा गांधी राहिले होते. त्या काँग्रेस भवनाच्या इमारतीमध्ये एका नगरसेवकाने एका नातू नावाच्या कुटुंबीयांना बोलावले आणि त्यांच्यावर पिस्तूल रोखून जमिनीच्या खरेदी खतावर त्यांची सही घेतली. त्या नातूचा मुलगा सैन्यात आहे, त्या नातूची तेथे जमीन आहे. त्या जमिनीवर त्यांनी बाग फुलविली आहे. ती जमीन तू मला दे असे पिस्तूल रोखून नातूंना धमकावण्यात आले. खरेदी खतावर सही घेतल्यानंतर त्यांच्या खात्यामध्ये 1 कोटी रु. जमा करण्यात आले. परंतु त्या सद्गृहस्थांनी त्यातील एकाही पैशाला हात लावला नाही. ते गृहस्थ सतत पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार करीत आहेत. त्यांनी मार्च मध्ये तक्रार केली, ती पोलीस स्टेशनला तीन महिन्यांनी पोहोचली. ज्याने श्री. नातूंना धमकी दिली त्या व्यक्तीचे नाव दीपक मानकर असे असून ते काँग्रेसचे नगरसेवक आहेत. अशा प्रकारचे प्रचंड मोठे माफिया पुण्यामध्ये आहेत. म्हणून या माफियांवर सक्त कारवाई करावी अशी या निमित्ताने मागणी करीत आहे. या लोकांना मोक्का लावा अशी मागणी केल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, त्यांच्यावर यापूर्वीचे गुन्हे किती आहेत ते पाहिल्यानंतर त्यानुसार कारवाई केली जाईल. सभापती महोदय, या माफियांवर गुन्हे दाखल करण्याची या शासनाची काय हिंमत आहे? पोलीस स्टेशनला गरिबांच्या तक्रारी नोंदवून घेण्याची पोलिसांची काय हिंमत आहे ? गरिबांच्या तक्रारी घेण्याचे कोणाचे धारिष्टय होत नाही, त्यांच्या तक्रारी घेतल्या जात नाहीत. तत्कालीन पोलीस आयुक्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...

रणजित शर्मा यांना मोक्का लावण्यात आला होता. मग त्या आयुक्तांवर पूर्वीचे कोणकोणते गुन्हे दाखल होते त्याची माहिती या सदनाला तरी समजू द्या. त्यांचे पूर्वीचे गुन्हे गृहीत धरुन त्यांना मोक्का लावला.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)

श्री. अरविंद सावंत...

त्यांना मोक्का लावताना कोणते गुन्हे पाहिले नाहीत. या गुन्हेगारांना मोक्का लावताना यापूर्वी त्यांच्यावर कोणते गुन्हे आहेत असे आपण विचारीत आहात ? या लोकांच्या विरुध्द तक्रार करण्याचे धारिष्ठ कोणाला होणार नाही. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करतो. ज्या पोलीस अधिका-यांनी या गोष्टीची दखल घेतली नाही, त्या पोलीस अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्याची मागणी करतो. त्यानंतर नातू कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणी करतो. त्या नातू कुटुंबियाचे काय होईल याचे आम्हाला भयच वाटते.

सभापती महोदया, एका नगरसेवकाने मुंबई-पुणे रस्त्यावरील लोणावळा येथील वळणावर सिंहगड इन्स्टीटयूट दिसते. त्या ठिकाणी प्रचंड मोठी इमारत बांधली आहे. ती जमीन वन खात्याची आहे. या जमिनीच्या बाबतीत वन खात्याने कार्यवाही केली. मी माननीय मंत्री महोदयांना गेल्या चार वर्षापासून सांगतो आहे की, वन खात्याने कार्यवाही केली, कोर्टाने आदेश दिले की, सदर जमिनीवरील यापुढचे बांधकाम थांबवा. तुम्हाला आणि कोर्टाला कोण विचारतो ? तुमच्या छातडयावर बसून त्यांनी वन जमिनीवर मोठी इमारत बांधली आहे. आमचे काय करावयाचे असेल ते करा. वन मंत्री त्याचे काही करु शकत नाही. वन खात्याचे अधिकारी काही ॲक्शन घेऊ शकत नाही. त्या इमारतीच्या परिसरात सगळया व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. मी या निमित्ताने मागणी करतो की, वनरोपणाचे भरभक्कम कार्यक्रम सांगता. हे भरभक्कम कार्यक्रम कुठे राबविता? आपण हा कार्यक्रम खरोखरच चांगल्या पध्दतीने राबविला तर बेरोजगारांना रोजगार मिळू शकतो. विधिमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीच्या तुमच्या वन केंद्रास आम्ही भेट दिली होती. किती रोपे तुम्ही तयार केली ? त्यातील किती रोपांची लागवड केली ? त्यातील किती रोपांचे संवर्धन केले? यासंदर्भातील सारे पैसे वाया जातात ? हजारो रोपे लावली, त्यानंतर ती उद्ध्वस्त झाली. पुन्हा पैसे खाण्यास वन अधिकारी मोकळे होतात. यासंबंधीचा अहवाल सभागृहासमोर आणावा. सन्माननीय सदस्यांना विचारतो की, तुम्हाला वनाची लागवड झालेली कुठे दिसून आली आहेत काय ? "जंगल में मोर नाचा किसी ने नही देखा." अशी वन विभागाची अवस्था आहे. तुम्हाला वनाची लागवड कुठेही दिसून येणार नाही. वन लागवडीसाठी मोठया प्रमाणात तरतूद केली जाते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

परंतु तिचा विनियोग बरोबर होत नाही. माझी अशी मागणी आहे की, आपल्याकडे बेरोजगार मुले भरपूर आहेत. त्या प्रत्येकाला एकेका वृक्षाची लागवड करुन द्यावी आणि त्या वृक्षांचे संगोपन, जतन करण्याचे काम त्यांच्याकडे सोपवा. त्यासाठी त्याला रोजगार द्यावा. त्या मुलांना सांगा की, तू वृक्षांचे जतन आणि संगोपन करावे, तुला त्याचे पैसे मिळतील. आदिवासी पट्टयात हा प्रयोग यशस्वी करता येईल. मोखाडा, नंदुरबार तालुक्यात तोरणमाळ हे थंड हवेचे ठिकाण आहे. तेथे अशा प्रकारचे प्रयोग यशस्वी होऊ शकतील. ताडोबाला जाताना पहा, रस्त्याच्या बाजुने सारी झाडे मुळापासून तोडण्यात आलेली दिसतील. महाराष्ट्रात सागाच्या लाकडाची मोठया प्रमाणात चोरी होते. परंतु याकडे वन विभागाचे लक्ष नाही ही वस्तुस्थिती आहे. माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते हे पंढरपूरचे वारकरी आहेत. विठोबा रायांचे ते भक्त आहेत. ते आता पालखीसाठी जातील. " वृक्षवल्ली आम्हा सगे सोयरे वन चरी" की वन चोरी. वन चरी आहे की, वन चोरी आहे ते एकदा ठरवून टाका. संत तुकारामाच्या अभंगाची ती ओळ आपणास बदलावयाची असेल तर ती बदलून टाका. परंतु ती वन चरी आहे की वन चोरी आहे हे आम्हाला एकदा कळू द्या. या राज्यात मोठया प्रमाणात वृक्षवल्ली वाढवावी.

सभापती महोदया, पान क्रमांक 184 आणि 185, बाब क्रमांक 153 व 155 ही लहान, मध्यम व मोठे पाटबंधा-यांची बांधकामे या संदर्भातील आहेत. सभापती महोदया, आपण कोकणातील आहात. तेथे प्रचंड पाऊस पडतो. पाणी वाया जाते आहे. त्या ठिकाणच्या वैशिष्ठी आणि सावित्री या नद्या वर्षाच्या 365 दिवस वहात आहेत. आज सकाळी टाळंबा प्रकल्पाची चर्चा सभागृहात झाली. त्या चर्चेत माननीय पाटबंधारे मंत्र्यांनी सांगितले की, तो प्रकल्प 2015 साली पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

यानंतर श्री. बोरले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

आणि त्या चर्चेमध्ये सांगितले की, 2015 साली पूर्ण होईल अशी अपेक्षा करतो. आमची लाकडे वर जातील तेव्हा झाले तरी आमचे नशीब आहे. सभापती महोदय, महत्वाचा मुद्दा असा आहे की, शासन जे पैसे खर्च करणार आहे त्यामध्ये वशीष्टी नदी, सावित्री नदी अशा अन्य नद्याचा विचार करावा लागणार आहे. सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, मापदंड बदलणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडयातील जमीन सपाट असते. तेथे मोठया प्रमाणावर लागवडीसाठी भुपृष्ठ उपलब्ध असतो. ज्यावेळी पाटबंधारे विभागाचा विषय चर्चेला येतो त्यावेळी सिंचनाचा विषय उपस्थित होतो. आम्ही एखादा छोटा बंधारा किंवा धरण बांधले तर त्या धरणामध्ये उपलब्ध होणारे पाणी, त्याला येणारा खर्च आणि ओलिताखाली येणारी जमीन याचा विचार करतांना कोकणामध्ये कमी जमीन उपलब्ध होते. कारण कोकणामध्ये डोंगरी पट्टा आहे. म्हणून आज जे निकष आहेत त्या निकषांमुळे कोणातील छोटया बंधा-यांसाठी पैसे उपलब्ध करुन देता येत नाहीत. म्हणून शासनाने हे मापदंड बदलण्याची आवश्यकता आहे. आदिवासी किंवा डोंगरी पट्टयाचे मापदंड लावावेत, अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, मी एक छोटा बंधारा बांधावयास सांगितले होते. मला विचारण्यात आले की, तेथे किती जमीन आहे ? मी सांगितले 250 हेक्टर जमीन आहे. त्यांनी सांगितले की, होणार नाही. 250 हेक्टरपेक्षा जास्त जमीन पाहिजे. म्हणजे ती 250 हेक्टर जमीन कधीही ओलिताखाली येणार नाही. यासाठी आपण काही करणार आहात की नाही ? मी सभागृहामध्ये मापदंड बदलण्याचा विषय, निकष बदलण्याचा विषय सातत्याने मांडत असतो. कोकणातील मापदंड आणि निकष बदलले तर कोकणातील सिंचनाची कामे होऊ शकतील आणि निसर्गाने उपलब्ध केलेले पाणी आपल्याला वापरता येईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 178 मध्ये कामगार विभागाच्या अंतर्गत कामगार आयुक्तांच्या विविध कार्यालयांच्या संगणकीकरणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आपण संगणकीकरण जरुर करावे. आपण घरगुती कामगारांना स्मार्ट कार्ड देणार आहात. कामगार आयुक्तांच्या कार्यालयामध्ये किती केसेस पेंडिंग आहेत याची कामगार आयुक्तांना कल्पना आहे काय ? केंद्र शासनाकडे रिजनल लेबर कमिशनर आहेत. आपण नोटीस सर केली तर रिजनल लेबर कमिशनर स्वत: त्यामध्ये रिकन्सिलिएशनचा प्रयत्न करतात. आपल्याकडे कामगार आयुक्तांच्या कार्यालयातून किती प्रकरणे कन्सिलिएशनमध्ये निघाली याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. कदाचित

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

कामगार आयुक्तांवर प्रचंड दडपण असेल. एवढे प्रचंड काम आहे की, वर्षानुवर्षे केसेस पेंडिंग आहेत. आपण कामगार आयुक्तांच्या विविध कार्यालयांचे संगणकीकरण करीत आहात तेव्हा कामगारांना न्याय देण्याची भूमिका सुध्दा घ्यावी, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्र.190 मध्ये परदेशात/परकीय देशात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्या कामगारांसाठी प्रस्थाव पूर्ण प्रशिक्षणाकरिता तरतूद व बाब क्र.191 मध्ये महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्थेतील विद्यमान ग्रंथालय सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु त्या ग्रंथालयांचा किती वापर होतो ? त्या ग्रंथालयातील पुस्तके कोणत्या कारखान्यांमध्ये जातात, त्यांचे किती कामगार तुमच्या श्रमविज्ञान परिषदेमध्ये येतात ? ती माणसे काहीच करीत नाही असे मी म्हणत नाही. परंतु तरी सुध्दा यासंदर्भात शासनाने अहवाल सादर करावा. आज सर्व्हिस इंडस्ट्री यापासून दूर आहे. त्या सर्व्हिस इंडस्ट्रीमधील कामगारांना कोणतेच संरक्षण नाही. यापुढे निर्माण होणा-या एस.ई.झेड.मध्ये तर संरक्षण नसणार आहे. कारण एस.ई.झेड. म्हणजे स्वायत्त संस्थान आहे. त्यांना शासनाचे कोणतेच कायदे लागू नाहीत. त्या कर्मचा-यांनी युनियन करायची नाही, मागण्या करायच्या नाहीत, तेथील कर्मचा-यांना 8 तासाच्या कामाचा संदर्भ नाही. त्यांना 14-14 तास राबवून घेतले जाते. त्यांना जरी पगार दिले जात असले तरी त्यांना काही संरक्षण आहे काय ? आज ही सर्व तरुण मुले-मुली कॉल सेंटरमध्ये काम करतात. रात्री नऊ-दहा वाजता त्यांची डयुटी सुरु होते. ते 12 ते 14 तास कॉम्पयुटरवर काम करीत असतात. या वयामध्ये त्यांच्या डोळयावर येणारा ताण, त्यांच्या डोळयावर होणारा परिणाम, त्यांच्या शरीरावर होणारा परिणाम याचा विचार केला जात नाही. त्यांना 8 तास डयुटी नाही. त्यांना कोणाकडे तक्रारही करता येत नाही. त्यांना छोटया-छोटया अटी घातलेल्या आहेत की, तुम्हाला युनियन करता येणार नाही. सभापती महोदय, हा एस.ई.झेड. सारखा प्रकार आहे. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही सर्व्हिस इंडस्ट्रीमध्ये युनियन दिसणार नाही. त्यांचे कॉन्ट्रॅक्ट केली जातात. आम्ही तुम्हाला उत्तम पगार देऊ. त्यांचे असे काही ऊसाचे चिपाड करतात की, त्यामुळे तयांना तरुण वयामध्ये काही महत्वाकांक्षी काम करावयाचे असेल तर ते करता येणार नाही. त्यांचे मोठया प्रमाणावर खच्चीकरण सुरु आहे. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष घालावे, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.भोगले .....

अशुद्धीत मत / शोधनासाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

सभापती महोदया, बाब क्रमांक 216 व 218 संबंधी बोलत असताना मी दोन महत्वाच्या गोष्टी सांगू इच्छितो. महिला स्वयंसहाय्यित बचत गटांना आधार देण्यासाठी शासनाने 7 टक्के व्याज दराने कर्जासाठी तरतूद केली आहे. जोरदार घोषणा शासनाने केली होती की, 4 टक्के व्याज दराने महिला बचत गटांना कर्ज देऊ. काय झाले त्याचे? 4 टक्क्याचे 7 टक्के कसे झाले? महिला बचत गटांना फसविण्याचे काम जोरात सुरु आहे. 7 टक्के व्याज दराने किती कर्ज देता? 50 हजार रुपयांपर्यंत. 50 हजार रुपयांपर्यंतच्या कर्जात काय व्यवसाय करणार? ते कर्ज फेडल्यानंतर, त्याची परतफेड केली तर पुढील वेळी 1 लाखापर्यंत कर्ज देऊ. गरीब महिला 10 ते 15 रुपये रोज बचत करुन गट तयार करतात. त्यांना कर्ज देताना 50 हजारापर्यंतच कर्ज देता. 50 हजार रुपयांत कोणता व्यवसाय करणार आणि 10 ते 20 महिला एकत्र येऊन 50 हजार रुपयांच्या कर्जातून किती उत्पन्न मिळविणार आणि ते 20 कुटुंबांमध्ये कसे वाटणार? किमान 5 लाख रुपये दिले तर समजू शकतो, काहीतरी उद्योग उभा करता येईल. 20 सदस्य म्हणजे 20 कुटुंबे त्या गटात सामील असतात. 50 हजाराच्या कर्जातून काय उत्पन्न मिळविणार आणि मिळणारे उत्पन्न कसे वाटणार? 5 लाख रुपयांपर्यंत 4 टक्के व्याज दराने कर्ज द्यावे अशी मी मागणी करतो, तरच त्या बचत गटांचे संवर्धन होईल आणि ख-याअर्थाने सर्वसामान्य कुटुंबांना मदत होईल असे मला वाटते.

सभापती महोदया, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्रमांक 306 अन्वये आदिवासी विभागासाठी 26 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी स्वत: मंत्रीमहोदयांच्या सोबत यायला तयार आहे. या सगळ्या मागण्या एकत्रित केल्या तरी बोलायला हरकत नाही. यामध्ये सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे तो आदिवासी आश्रमशाळा आणि आदिवासी शाळांचा आहे. त्या विभागामध्ये मी सातत्याने जातो. आता 10 वीपर्यंतच्या शाळा आहेत तेथील मुलींच्या शौचालयांना दरवाजे नाहीत. लाज नाही वाटत का आम्हाला? आमच्या मुलींच्या स्वच्छतागृहांना दरवाजे नाहीत. तेथे पाणी उपलब्ध नाही, न्हाणीघर उपलब्ध नाही. वसतिगृहामध्ये त्यांनी रहायचे. एवढा निधी शासन देते, पैशाची कमतरता नाही. पैशाबाबत आमची तक्रार नाही. आलेल्या निधीचे वितरण आणि उपयोग होतो का याची कोणी तपासणी करतो की नाही? कोण अधिकारी आहेत? जे या बाबीकडे दुर्लक्ष करतात. किमान आमच्या मुलींकडे तरी बघणार आहात की नाही? तेथे पाण्याची सोय नाही,

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

स्नानगृह नाही. स्वच्छतागृहाची अवस्था तर अतिशय वाईट आहे. मोखाडा तालुक्यातील अनेक शाळांमध्ये ही अवस्था आहे. थेट नाशिकपर्यंतच्या वसतिगृहांची अवस्था काय आहे? शासनाने मंजूर केलेल्या निधीचे काय होते? कोण अधिकारी आहेत? याचा कधी तरी आढावा घेतला जातो की नाही?

सभापती महोदया, बाब क्रमांक 315 अन्वये एकत्रित जंगल विकास कार्यक्रमासाठी तरतूद केली आहे. जंगलांचा किती विकास केला हे कधी तरी मंत्रीमहोदयांनी सभागृहाला सांगावे. जंगलात आगी कशा लागतात हेही सांगावे. आगीच्या संदर्भात मी यापूर्वी एकदा सभागृहात सांगितले होते की, एसओएस क्रमांक द्या. अजूनही दिला नाही. टोल फ्री नंबर द्या.

श्री.बबनराव पाचपुते : (जागेवर बसून) दिला आहे. 134 नंबर आहे. आता वर्ष झाले.

श्री.अरविंद सावंत : तुम्ही हे उत्तरात सांगा. सभापती महोदया, बाब क्रमांक 347 बाबत बोलत असताना या सदनामध्ये पुण्यातील बोगस कॉलेजांची एक सूची मी तत्कालीन उच्चशिक्षण मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकडे दिली होती. त्यांनी सदनात सांगितले होते की, या सर्व कॉलेजांची 3 महिन्यात चौकशी करतो आणि सभागृहासमोर अहवाल सादर करतो. पुणे शहरात विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्याचा उद्योग या कॉलेजांकडून सुरु आहे. भरमसाठ खाजगी कॉलेजे सुरु झाली आहेत. कोण कोण काय करीत आहे? रशियातील मेडिकल कॉलेज काढतात, तेथे मुलांना प्रॅक्टिस करण्याचा अधिकार नाही. सन्माननीय उच्चशिक्षण राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत, मी तत्कालीन उच्चशिक्षण मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकडे जी सूची दिली होती, आजतागायत त्याची चौकशी का झाली नाही? पुण्यामध्ये जी बोगस कॉलेजे आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार आणि कधी करणार एवढेच सांगावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मैं केवल 2-3 मुद्दों के बारे में अपने विचार रखूंगा. बाब क्रमांक 177 के बारे में मैं कहना चाहता हूँ कि बंद उद्योगों के बारे में पूरक मांगणी या नियमित बजट में कोई प्रावधान नहीं है. हमारे प्रदेश में जो स्मॉल स्केल इन्डस्ट्री, मीडियम स्केल इन्डस्ट्री बंद हो गई हैं, उनको पुन: जीवित करने की योजना बनानी चाहिए. यह बात मैंने पहले भी सभागृह के सामने रखी है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 178 श्रम मंत्रालय के संबंध में है. श्रम मंत्रालय का काम बहुत बढ़ गया है. श्रम मंत्रालय के पास मोलकरिन से संबंधित काम है, सुरक्षा बोर्ड और सुरक्षा गार्ड से संबंधित काम है और अन्य दूसरे कामों को देखते हुए इन्सपेक्टर्स की संख्या बहुत कम है. श्रम मंत्रालय में बहुत सारी वेकेन्सी हैं, इनको तुरन्त भरना चाहिए. इसके अतिरिक्त पदों की संख्या और भी बढ़ानी चाहिए. हमारे प्रदेश में एस.ई.जेड. में आई.टी. सेन्टर्स हैं, कॉल सेन्टर्स है, लेकिन इनके बारे में लेबर लॉ लागू नहीं होते हैं और श्रम मंत्रालय का दखल नहीं होता है. इन लोगों से 12-12 घंटे काम कराया जाता है. यह बात ठीक है कि इनको पैसा मिलता है, लेकिन इनका शोषण हो रहा है. इस बारे में सरकार को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 410 से 414 तक अल्पसंख्यक विकास विभाग के बारे में हैं. इस विभाग को पिछले साल आपने 167 करोड़ रुपए दिए थे और इस साल भी आपने कुछ प्रावधान किया है. आपने मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल को 50 करोड़ रुपए दिए थे, यह पैसा खर्च नहीं हो पाया है, इस बारे में सरकार को ध्यान देना चाहिए. मेरी शासन से मांग है कि अल्पसंख्यकों के विकास के लिए जब तक आप हॅड वाइज पैसा नहीं देगे, तब तक उनको सीधे तौर पर फायदा नहीं पहुँचेगा. शासन की महिला बचत गट के अन्तर्गत जो योजना है, उसमें से कुछ रिजर्वेशन अल्पसंख्यक समाज की महिलाओं के लिए होना चाहिए. अल्पसंख्यक समाज में मुसलमानों के साथ साथ सिंधी, पारसी और अन्य समाज के लोग भी शामिल हैं, उनके लिए भी रिजर्वेशन होना चाहिए. मैं यह मांग करता हूँ कि अल्पसंख्यक विकास विभाग में फंड का एलोकेशन हॅड वाइज करना चाहिए. मैं पूरक मांगों का समर्थन करते हुए अपना भाषण खत्म करता हूँ. धन्यवाद.

. . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर 4R 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आदिवासी विकास विभागाच्या पृ.क्र.439, बाब क्र. 322 च्या संदर्भात विशेषकरुन ग्रामोद्योग आणि लघुउद्योग मला अशी सूचना करावयाची आहे की, आदिवासी जनता वेगवेगळ्या पध्दतीने कलाकुसरीच्या वस्तू बनविण्यात मुळातच हुशार असतात. बांबू, काठ्या तसेच जंगलातील लाकूड यापासून अनेक कलाकुसरीच्या व शोभेच्या वस्तू ते बनवितात. मला वाटते की, आदिवासी कुटुंबांमध्ये जन्मलेल्या बहुतांशी लोकांच्या अंगी हा गूण उपजतच असतो. ते ज्या वस्तू बनवितात त्या वस्तुंना तालुका स्तरावर विकाण्यासाठी आणतात तेव्हा जाणकार व्यावसायिक त्यांच्याकडिल वस्तू कवडीमोलाने विकत घेतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर...

आणि त्याच वस्तू मोठया बाजारात म्हणजे नागपूर, मुंबई, पणे यासारख्या ठिकाणी चढया भावात विकून भरपूर नफा कमवित असतात. आदिवासी बांधवांनी तयार केलेल्या कला कुसरीच्या वस्तूंना ग्रामोद्योगाच्या माध्यमातून बाजार पेठ उपलब्ध करुन, स्टॉल उपलब्ध करुन दिले तर आदिवासी बांधव आपला माल डायरेक्ट ग्राहकांना विकू शकतील व जास्त नफा मिळवू शकतील.

सभापती महोदया, दुसरी गोष्ट अशी की, कला कुसरीचे काम करणारे जे आदिवासी आहेत त्यांना कमी व्याजाने पैसे उपलब्ध करुन दिले तर हे आदिवासी बांधव आपल्या वस्तू चांगल्या प्रमाणात आणि मोठया प्रमाणात निर्माण करु शकतील. आदिवासींनी तयार केलेल्या वस्तू जर लघू उद्योग संस्था चालवत असतील तर अशा संस्थांची वाढ करण्याची आवश्यकता आहे. माझी विनंती आहे की, शासनाने अशा संस्था वाढविण्यासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे. शासनाने आदिवासींच्या ग्रामोद्योग आणि लघुउद्योगासाठी 47.58 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. ही जी तरतूद केलेली आहे ती फार तोकडी आहे. यासंदर्भात माझी शासनाला विनंती आहे की, आदिवासींसाठी जी तरतूद केलेली आहे ती फार नगण्य आहे त्यामुळे यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. आज आदिवासी बांधब जंगलामधून मध गोळा करण्याचे काम करीत असतात. या आदिवासी बांधवाकडून तेथील व्यापारी 10 ते 15 रुपये प्रती किलो या दराने मध विकत घेतात व हेच मध नंतर तालुक्याच्या किंवा जिल्हयाच्या ठिकाणी आणून 125-150 रुपये प्रती किलो या दराने विकून 10-10 पट नफा कमावतात. त्यामुळे शासनाने आदिवासींसाठी जी 47.58 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे त्या तरतूदीमध्ये वाढ करावी अशी माझी हात जोडून विनंती आहे.

सभापती महोदया, आदिवासी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, चांगले जेवण मिळावे म्हणून शासनाने आदिवासी विभागासाठी कोटी कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सामान्य माणसाला एवढे मोठे आकडे वाचता येणार नाहीत एवढी मोठी तरतूद आदिवासी विभागासाठी करण्यात आलेली आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर...

सभापती महोदया, मी बाब क्रमांक 312, पृष्ठ क्रमांक 427 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. आदिवासी मुलांना चांगल्या प्रकारचा पोषण आहार मिळावा यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आलेली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना तेल, साबण, कंगवा तसेच जीवनावश्यक सर्व गोष्टींसाठी भरपूर निधी दिला जातो परंतु शाळा संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि अधिकारी यांच्या खिशातच यातील अनेक वस्तू जातात परिणामी विद्यार्थ्यांना निकृष्ट अन्न मिळते, त्यांना ज्या काही वस्तू मिळतात त्या निकृष्ट प्रकारच्या मिळतात. आदिवासी विद्यार्थ्यांना निकृष्ट अन्न मिळते. या विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तू देखील मिळत नाहीत. शासनाच्या तिजोरीतून निघालेली रक्कम झिरपत -झिरपत नव्हे तर फुटत -फुटत विद्यार्थ्यांपर्यंत जाते, गरजेइतकी ती पोहचत देखील नाही. याला माझ्यामते प्रशासकीय अधिकारी अधिक जबाबदार आहेत. शासनाने सर्व शालेय पोषण आहाराची जबाबदारी ग्रामपातळीवर असलेल्या समितीकडे नेमून व या समितीचा अध्यक्ष हा सरपंच असेल, मुख्याध्यापक सचिव असेल व या दोघांवर विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराची जबाबदारी दिली तर पोषण आहार आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत चांगल्या प्रकारे पोहचू शकेल. तसेच ग्राम समितीवरही नियंत्रण समिती असावी जेणेकरुन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचा आहार मिळू शकेल.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर ..

सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घ्यावे अशीच राज्य शासनाची भूमिका आहे. त्याचबरोबर तुम्हा आम्हा सर्वांचीसुध्दा हीच भूमिका आहे. त्यासाठी आदिवासी कुटुंबातील व्यक्तिला अधिक पैसे मिळाले तर ती व्यक्ती स्वत:च्या मुलाला चांगल्या प्रकारे शिकवू शकेल ही भावना लक्षात घेऊन आदिवासी व्यक्ती ज्या काही वस्तू तयार करते त्याला योग्य किंमत दिली तर त्याला अधिक पेसे मिळतील तसेच त्याचे मागासलेपण दूर होऊ शकेल तेव्हा या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, यानतर मला पर्यटन व सास्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 409 पान नंबर 517 सबंधी बोलावयाचे आहे. पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणी मुलभूत सुविधासाठी शासनाने अनुदान दिले आहे. या निमित्ताने मला शासनाला असे सांगावयाचे आहे की विदर्भात अनेक पर्यटनाची ठिकाणे आहेत. त्या ठिकाणी निसर्गाची विविधता आहे. ताडोबा जंगल, पेंच प्रकल्प, रामटेक,चिखलदरा व मेळघाट जंगल,चंद्रपूर जिल्हयातील जंगलानी नटलेला भाग अशा अनेक ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्यास वाव आहे परंतु अजूनही त्या भागात पर्यटनाचा अनुशेष शिल्लक आहे. त्या ठिकाणी परदेशी पर्यटकांनी आकर्षित व्हावे यासाठी शासनाने कोणती पावले टाकलेली आहेत ? सिंधुदूर्ग जिल्हा ज्या प्रमाण पर्यटक जिल्हा म्हणून विकसित करण्याचे घोषित झालेले आहे. त्याप्रमाणे विदर्भातील अकरा जिल्हये सुध्दा पर्यटक जिल्हे म्हणून घोषित करण्यात यावे तसेच त्यासाठी पुरेसा निधी देण्यात यावा आणि पर्यटनासाठी नवीन टेक्नॉलॉजीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या बाजूला मध्य प्रदेश असून त्या ठिकाणी आपल्या राज्यातील अनेक पर्यटक तेथील पर्यटन स्थळाला भेट देण्याकरिता आनंदाने जातात. त्या भागातील रेस्ट हाऊस आणि पर्यटन स्थळाचा ते आनंद लुटत असतात त्याचबराबर छत्तीसगड मध्ये सुध्दा पर्यटनाचा मोठया प्रमाणावर विकास झालेला आहे परंतु महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ या भागात त्याप्रमाणात विकास झालेला नाही. मराठवाडा आणि विदर्भात एम.टी.डी.सी.ने जी पर्यटन क्षेत्रे विकसित केलेली आहेत ती पाहण्यासाठी मात्र कोणीही येत नाहीत. माझी या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की विदर्भातील पर्यटनाचा अनुशेष त्वरित दूर करावा.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर ..

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 402 ते 404 पान नंबर 514 सबंधी बोलावयाचे आहे. आतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी या पूरक मागणीमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर या ठिकाणी चित्रपट निर्मिती केली जाते मात्र विदर्भामध्ये चित्रपट निर्मितीच्या बाबतीतसुध्दा मोठा अनुशेष आहे. विदर्भामध्ये शेगाव येथे गजानन महाराजाची समाधी , सेवाग्राम येथे महात्मा गांधी आश्रम, तसेच पवनार येथे विनोबा भावे यांचा आश्रम. मोझरी येथे तुकडोजी महाराजांची समाधी, नागपूर येथे हेडगेवार स्मारक, रामटेक येथे कालिदास स्मारक, नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दीक्षा भूमी, तसेच नागपूर येथे ताजुद्दीन बाबाचा दर्जा अशी सर्व धर्मियाची स्फूर्तिस्थाने असून त्याचा चित्रपटात उपयोग करुन घेण्यासाठी विदर्भात चित्रनगरी स्थापन करण्यासाठी पुरेशी तरतूद करावी अशी मी या पूरक मागण्यांवरील चर्चेच्यानिमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर साव्रजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाची बाब क्रमांक 291 पान नंबर 387 सबंधी मला बोलावयाचे आहे. कुटुंब कल्याण आणि आरोग्य केन्द्रासाठी सहाय्यक अनुदानाची तरतूद या पूरक मागणीमध्ये करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर डॉ.आनंदीबाई जोशी यांच्या स्मृति प्रीत्यर्थ गौरवपुरस्कार शासनाने दिलेला आहे त्याबद्दल डॉ.विमल मुंदडा यांचे मी अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे राज्यातील चांगल्या प्रकारची सेवा देणा-या परिचारिका शोधून काढून "फलॉरेन नाईटीगेल" गौरव पुरस्कार देऊन त्यांनाही सन्मानित करण्यात यावे. ज्यांनी सेवाव्रत घेऊन रुग्णांची चांगली सेवा केलेली आहे अशा परिचारिकांचा सन्मान करावा व त्यांना गौरव पुरस्कार देण्यात यावा अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. अशा प्रकारे त्यांचा गौरव करण्यात आला तर त्यांना आपल्या कामात अधिक रस वाटेल व येथून पुढच्या काळातसुध्दा त्या अधिक चांगल्या प्रकारे सेवा करु शकतील.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाचे लक्ष एका मुद्याकडे वेधावयाचे आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागामध्ये अनेक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर्स काम करण्यासाठी जाण्यास तयार होत नाहीत. या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये पुरेशी औषधे नसतात, परिचारिका नसतात तसेच उपकरणेही नसतात त्यामुळे तेथे जाण्यास डॉक्टर्स तयार होत नाहीत त्यामुळे त्या भागातील रुग्णाला खाजगी डॉक्टरांकडे जाण्याची सुध्दा सोय नसते.

नंतर श्री.सरफरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अशोक मानकर...

सभापती महोदय, फक्त के.ई.एम. रुग्णालयामध्ये लहान मुलांच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, जे.जे. हॉस्पिटल, आणि सायन हॉस्पिटलमध्ये लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी वेगवेगळे वॉर्ड विकसित करण्यात यावेत. आज प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 30 टक्के औषधांचा पुरवठा केला जातो. तो कोटा वाढवून 50 टक्के करण्यात यावा. जेणेकरुन तेथील लोकांना वेळेवर औषधे मिळतील. त्याचप्रमाणे शहरामधील परिचारिका खेडयामध्ये जात नाहीत. त्यांच्याकरिता आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत. त्यांना चांगल्या प्रकारची निवासस्थाने दिली पाहिजेत, त्यांना संरक्षण दिले पाहिजे. आज सुविधांअभावी बेवारशासारखे त्या निवासस्थानांमध्ये त्यांना रहावे लागत आहे. त्याचप्रमाणे तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी देण्यात आलेल्या निवासस्थानांमध्ये सर्व सुविधांचा अभाव असतो. त्यामुळे शहरामधील डॉक्टर आज खेडेगावामध्ये आपली वैद्यकीय सेवा देण्यासाठी जात नाहीत. त्यांच्याकरिता शासनाने सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभागाच्या पान क्रमांक 82 व बाब क्रमांक 76, 77 व 78 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आज राज्यातील 70 टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून आहे. शेती धंद्याबरोबर त्याला पशुधन हा जोड धंदा आहे. परंतु आज बाजारामध्ये जनावरांकरिता सरकी ढेप,सुग्रास हे पशुखाद्य उपलब्ध असते. परंतु त्याचे भाव खूप जास्त असतात. सरकी ढेप हे खाद्य टाकाऊ पदार्थापासून तयार केले जाते. त्याचप्रमाणे् सुग्रास हे खाद्य देखील अशाच पध्दतीने निर्माण केले जाते. परंतु या पशुखाद्याचे भाव कमी करावे. मुख्य म्हणजे जनावरे ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने आवश्यक अशी बाब असून त्यांचे भाव निर्धारित करावे. हे प्राणी मूक गरीब बिचारे असल्यामुळे ते आपले दु:ख कुणाला सांगू शकत नाही. त्यामुळे आमच्या सारख्या बोलक्या प्राण्यांकडून ते वदवून घेतात.

सभापती महोदय, दुग्ध विकास सोसायटयांमध्ये ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी असतात, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रतिनिधी असतात, सोसायटयांचे प्रतिनिधी असतात, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर असतात. परंतु राज्यातील दूध सोसायटयांचे प्रतिनिधी मध्यवर्ती सहकारी बँकेवर नसतात हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असो किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असो त्यांच्या माध्यमातून जनावरांसाठी सुध्दा कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. परंतु त्याठिकाणी तांत्रिकदृष्टया काम करणारे एक्सपर्ट सदस्य नसल्यामुळे अनेकदा कर्ज उपलब्ध

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/ D/ MAP/

श्री. अशोक मानकर...

चुकीच्या ठिकाणी करुन दिले जाते त्यामुळे बँकेला फटका होतो. त्यामुळे दूध सहकारी सोसायटयांच्या सदस्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राज्य सहकारी बॅकेवर घेण्यात यावे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, मी शेवटचा वीजेच्या भार नियमनाबाबतचा भेडसावणारा मुद्दा मांडतो विदर्भामध्ये सर्वात जास्त वीजेची निर्मिती होत असते. आणि सर्वात जास्त अंधार विदर्भामध्ये असतो त्यामुळे आम्हाला दु:ख वाटते. जास्तीत जास्त वीज निर्माण होऊन सुध्दा विदर्भात अंधार जास्त असल्यामुळे आम्हाला दुख होत आहे. माझी विनंती आहे की, विदर्भामध्ये खूप वीज निर्माण होते त्यातील 10 टक्के इतकीच वीज विदर्भासाठी राखून ठेवली जाते त्यापेक्षा जास्त वीज राखून ठेवली तर काही प्रमाणात आमचा अंधार कमी होऊ शकेल, म्हणून माझ्या या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : सर्व सन्माननीय सदस्यांनी एकदम बोलू नये. एका सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्यामार्फत शासनाकडून एक गोष्ट जाणून घ्यावयाची आहे. आता मला अशी माहिती मिळाली आहे की, सर्व टी.व्ही.चॅनेल्स्वरुन अशी बातमी दाखविण्यात येत आहे की, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये प्रधान समितीच्या रिपोर्टवरुन भांडणे झाली आहेत. श्री.अनामी रॉय यांना क्लिन चीट दिली, श्री.गफूर यांना दोषी धरण्यात आले यावरुन वादविवाद झाला. अमुक-तमूक झाले अशा प्रकारची टी.व्ही.वर ब्रेकींग न्यूज सुरु आहे.सुदैवाने याठिकाणी माननीय गृहराज्य मंत्री उपस्थित आहेत. आज सकाळी "टाईम्स ऑफ इंडिया" या वर्तमानपत्रामध्ये देखील आम्ही वाचले. तसेच आता टी.व्ही.वर जे सुरु आहे, त्यावरुन हा अहवाल सदनामध्ये येण्यापूर्वी फुटला आहे असे म्हणावयाचे काय ? हा अहवाल फुटला असेल तर तसे सांगावे. म्हणजे नक्की काय झाले आहे ? सभागृह सुरु आहे म्हणून ही चिंता येथे व्यक्त केली आहे. सर्व चॅनेल्स्वर ब्रेकींग न्यूज सुरु आहे. सभापती महोदया, त्यामुळे आपण सरकारला याबाबतीत निवेदन करण्यास सांगितले तर बरे होईल अशी आमची विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने सांगितले पाहिजे की, चॅनल्स्वर जे काही सुरु आहे, ते बरोबर नाही. बाहेर अतिशय गोंधळ सुरु आहे. हा महत्वाचा विषय असून, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती महोदय, हा विषय महत्वाचा आहे आणि याठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री देखील उपस्थित आहेत. त्याबाबतीत नेमके काय झाले आहे ते सदनासमोर आले पाहिजे.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, जर माननीय गृह राज्यमंत्र्यांना याबाबतीत काही माहिती असेल तर ते सांगतील.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मंत्रीमंडळामध्ये चर्चा झालेली आहे. पण ती चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. मात्र ही चर्चा पूर्ण करण्यात येईल आणि मग सभागृहामध्ये हा अहवाल सादर करण्यात येणार आहे. याविषयी जी काही बातमी असेल, त्याबाबत खुलासा करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, या विषयाच्या संबंधात मंत्रीमंडळामध्ये भांडणे झाली आहेत काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, या विषयावर मंत्रीमंडळामध्ये चर्चा झालेली आहे. परंतु तेथे भांडणे झाली ही गोष्ट चुकीची आहे.

तालिका सभापती : हे सगळे काय सुरु आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, अतिशय प्रामाणिकपणे . . . .

तालिका सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी भाषण सुरु करावे. त्यांना फक्त दहा मिनिटांचा वेळ दिलेला आहे, त्यापेक्षा जास्त वेळ बोलावयाचे नाही आणि फक्त मुद्यापुरतेच भाषण करावे. बाकी कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी बोलू नये.

. . . .4 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी याठिकाणी सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बोलत आहे.

सभापती महोदया, ग्रामविकास विभागाच्या पान क्र.140, बाब क्र.216 मध्ये प्रकल्प संचालकांमार्फत कोसरगाव येथे बचत गटांना, महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी 4 लाख 37 हजार रुपये खर्च करण्यात आले आणि त्यासाठी राजकीय व्यासपीठ वापरण्यात आले. परंतु त्यावेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना बोलविण्यात आले नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींचा अवमान झालेला आहे.मी या अवमानाबद्दल हक्कभंगाचा प्रस्ताव सादर करणार आहे. त्याचप्रमाणे जे प्रकल्प संचालक आहेत, त्यांचा धान्य घोटाळयामध्ये आणि निर्मल टूरच्या घोटाळयामध्येही समावेश होता. अशा प्रकल्प संचालकांवर कारवाई करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे, हे सदनामध्ये सांगण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे ग्रामविकास विभागाच्या संबंधातील भारत निर्माण योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची कामे, तसेच जल स्वराज्य योजनेमधून देखील पाणी पुरठवठयाची कामे घेतली जातात. परंतु आमदार व खासदार निधीतून दोन ते अडीच लाखापर्यंत विहिरींची कामे केली जातात, असे असले तरी भारत निर्माण योजनेमध्ये मात्र विहिरींच्या कामांसाठी पाच ते पंधरा लाख रुपयांचा खर्च होतो, तरी देखील ही कामे अपूर्ण रहातात अशी स्थिती आहे. या विहिरींच्या कामासाठी ग्राम पंचायतीकडून 90 टक्के रकमेची उचल केली जाते. पण ही कामे पूर्ण होत नाहीत आणि लोकांना पाणी मिळत नाही अशा तक्रारी सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी ऐकावयास मिळतील.

सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या बाब क्र.406, पान क्र.515 बाबत सांगावयाचे आहे. मराठी भाषेतील साहित्य पुरस्कार देण्यासाठी सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवणी भाषा साता समुद्रापलिकडे नेणाऱ्या कै.मच्छिंद्र कांबळी यांच्या नावाने मालवणी कला अकादमी त्यांच्या गावामध्ये सुरु करावी अशी सातत्याने मागणी करण्यात येत आहे. त्यांच्या गावामध्ये कला अकादमी सुरु करुन लोकांना मालवणी भाषेचे ज्ञान होण्यासाठी त्या भाषेतील विविध नाटकांचे प्रयोग करण्यात यावेत. जेणेकरुन मालवणीसारखी गोड भाषा लोकांना कळेल अशी मला मागणी करावयाची आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखीपाठ नाही

श्री. परशुराम उपरकर .....

सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. केंद्र शासनाने देशात एकमेव असा सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केलेला आहे. त्या ठिकाणी टाटा कंसल्टंसीने जी पर्यटन स्थळे निवडलेली आहेत ती स्थळे विकसित न करता स्मशानभूमीकडे जाणाऱ्या पायवाटा, देवळाकडे जाणाऱ्या पायवाटा, रस्त्यांचे 200 मीटरचे डांबरीकरण अशा कामांकडे निधी वळवून खर्च केला जातो. गेल्या वर्षी अडीच कोटी रुपये अशा प्रकारे नियोजनाअभावी ठिकठिकाणी पसरले. अनेक पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटन सुविधा केंद्रे काढली. वेंगुर्ला येथे पर्यटन केंद्र काढले पण त्या केंद्राकडे जाण्यासाठी रस्ताच नाही. अशी जी पर्यटन केंद्रे काढलेली आहेत त्याकडे शासनाने लक्ष केंद्रित करावे. शिवाजी महाराजांचे एकमेव मंदिर सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. ते मंदिर खऱ्या अर्थाने जीर्ण झालेले आहे. ते मंदिर दुरुस्त करुन सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर ज्या किल्ल्याच्या नावावरुन सिंधुदुर्ग जिल्हा झालेला आहे तो किल्ला ढासळत चाललेला आहे. त्याकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. समुद्रातील एकमेव असलेला हा किल्ला बघण्यासाठी पर्यटक येतात परंतु त्या किल्ल्यामध्ये अंतर्गत सुविधा नाहीत.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : सन्माननीय सदस्यांचा वेळ संपलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया पाच-पाच मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदया, एका प्रश्नाला उत्तर देत असताना पर्यटन मंत्र्यांनी सांगितले की, ज्या अंतर्गत जमिनी आहेत त्या पुरातत्व खात्याकडे आहेत. मी सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग किल्ल्यातील जमिनी खाजगी मालकांकडे आहेत. त्या ठिकाणी मुतारी, सुलभ शौचालय इत्यादी सुविधा देण्याची गरज आहे. खार भूमीच्या संदर्भात सांगावयाचे तर शेतीचे समुद्रापासून रक्षण करण्यासाठी बंधारे बांधलेले आहेत त्यापैकी अनेक बंधारे जीर्ण झालेले आहेत. त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनाने पावले उचलावीत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 182 वरील बाब क्रमांक 158 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 11 प्रकल्प निधी अभावी मागे पडलेले आहेत. एका एका प्रकल्पाची किंमत दुप्पट, तिप्पट झालेली आहे. ओटोवचा एक गोटी रुपयांचा प्रकल्प 25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/

श्री. परशुराम उपरकर .....

कोटीपर्यंत गेलेला आहे. या प्रकल्पासाठी निधी देण्यात यावा. देवधरचा प्रकल्प 90 टक्के पूर्ण झालेला आहे. त्या प्रकल्पासाठी पांढऱ्या पुस्तकामध्ये साडेबावीस कोटी रुपयांची तरतूद केली होती परंतु प्रत्यक्षात फक्त 9 कोटी रुपये देण्यात आले. त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण करुन कालव्यामार्फत शेतीला पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करावी अशी मी विनंती करतो. जिल्हा परिषदेमार्फत नौका पुरविणे यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत तरी चालतात. त्या ठिकाणी नौका देण्यात याव्यात व त्याबाबतीत तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया यानंतर मला पृष्ठ क्रमांक 24 वरील बाब क्रमांक 31 बाबत बोलावयाचे आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये निवडणुका आल्या की अनेक हत्या होतात तसेच माणसे बेपत्ता होण्याचे प्रकार घडतात. रमेश गोवेकर प्रकरण सी.बी.आय.कडे गेलेले आहे. परंतु त्यांना सुध्दा तपास लागलेला नाही. सत्यजित भिसे यांच्या प्रकरणाच्या बाबतीत तपास लागला परंतु सर्व आरोपी सुटले. त्या ठिकाणी जणू काही खून झालाच नाही असे दाखविण्याचा हा प्रकार आहे. अंकुश राणे यांचे प्रकरण आठ दिवसात सी.आय.डी.कडे वर्ग केले. परवा कळणे येथे एक प्रकार घडला. एका पोलीस अधिकाऱ्याने महिलेचा विनयभंग केला. त्याबद्दल येत्या 24 तारखेच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये त्या ठिकाणच्या महिलानी आत्मदहनाची नोटीस दिलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

त्यामुळे तेथील पोलीस निरीक्षक श्री.नंदकुमार देशमुख आणि पोलीस उपअधीक्षक श्री.साळुंखे यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, कोकणातील अनेक उद्योग बंद पडले आहेत. सध्या 90 टक्के युनिट्स बंद आहेत. परंतु अनेक ठिकाणी एमआयडीसीच्या नावाखाली जागा संपादित केलेल्या आहेत. देवळी, चिपीच्या बाजूला असलेली जागा संपादित केलेली आहे. 33 हेक्टर जागेच्या रेकॉर्डवर पेन्सिलने लिहिलेले आहे. ते खोडून संबंधित शेतक-यांना त्यांची जागा परत मिळाली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, वन विभागाच्या पान क्रमांक 52, बाब क्रमांक 64 वर बोलतो. अंजिवडे गावामध्ये जवळजवळ वन क्षेत्रातील 300 झाडे तोडली आहेत. त्यासाठी केवळ 10 हजार रुपयांचा दंड करण्यात आला. अशाप्रकारे तेथील वन जमिनीची वाट लावण्यात आली आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या पुरवणी मागणीवर मी बोलतो. कोकणातील आरोग्य विभागातील अनुशेष भरुन काढण्यासाठी ही तरतूद केली आहे. कोकणातील आरोग्य सुविधांवर वारंवार बोलावे लागते. सिंधुदुर्ग जिल्हयातील एक उपजिल्हा रुग्णालय आणि एक जिल्हा रुग्णालय आहे, त्याठिकाणी डॉक्टरांची कमतरता आहे. अनेक ठिकाणी सुविधा नसल्यामुळे लोक खाजगी डॉक्टरकडे जावे लागते. काही वेळा कोल्हापूर किंवा गोव्याला जावे लागते. अशा वेळी गंभीर आजार असलेल्या रुग्ण तेथे पोहोचेपर्यंत मध्येच दगावतो. त्यामुळे मालवण येथील रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिला जावा आणि त्यासाठी आवश्यक तेवढी तरतूद करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्र.84, बाब क्रमांक 80 वर मी बोलतो. मत्स्यव्यवसाय या विषयावर मी सातत्याने सूचना केलेली आहे की, शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करावा. सभागृहात याबाबत वारंवार प्रश्न उपस्थित करुनही शासनावर त्याचा काहीही परिणाम होत नाही. कोकणात अनेक लोक या व्यवसायात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

रावते यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सन्माननीय मत्स्यव्यवसाय विभागाच्या मंत्री महोदयांना निवेदन देण्यासाठी गेलो होतो. सिंधुदुर्ग जिल्हयात 9016 लोकांना दरमहा 2 हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा विषय आहे. त्याबाबतचा प्रस्ताव आला आहे असे सांगण्यात येते. परंतु हा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्यावर तातडीने निर्णय घेण्यात यावा. दिनांक 24 रोजी सिंधुदुर्ग जिल्हयात होणा-या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोकणासाठी पॅकेज जाहीर केले जाईल असे सांगण्यात येते. त्या बैठकीत कोकणासाठी फार तर 500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले जाईल आणि तेवढया रकमेतून कोकणाचा अनुशेष भरुन निघणार नाही. हे पॅकेज निवडणुकीवर डोळा ठेवून दिले जाईल. शासनाला खरोखर कोकणाचा अनुशेष भरुन काढावयाचा असेल तर 5 वर्षामध्ये सर्व अपूर्ण कामांसाठी जास्तीत जास्त निधी देऊन हा अनुशेष भरुन काढावा.

सभापती महोदय, यानंतर उच्च शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्र.473, बाब क्र.361 वर बोलणार आहे. शासनाने अनेकदा सांगितले आहे की, मालवण आयटीआयसाठी पुरेस शिक्षक देण्यात येतील. तेथे नळ कारागीर शिकणा-या मुलांना इंटेरिअर डिझाईनचा कोर्स शिकवितात. त्यामुळे मुले आयटीआयमध्ये जात नाहीत. त्याचप्रमाणे 1981 पासून आयटीआयमध्ये शिकणा-या मुलांना 40 रुपये स्टायपेण्ड मिळते, त्यात वाढ करण्याची मागणी केलेली आहे, त्याप्रमाणे शासनाने तरतूद करावी अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

--

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, प्रत्येक वक्त्याने आपले भाषण 5 ते 7 मिनिटांमध्ये संपवावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांच्या विषयी असलेल्या नियमामध्ये पहिला दिवस व दुसरा दिवस असे म्हटलेले आहे. त्यामध्ये वेळेचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

NTK/ D/ MAP/

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर मी बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23, बाब क्रमांक 28 वर मी बोलतो. समुद्रतरीय सुरक्षेकरिता 18 मच्छिमार होडया भाडयाने घेण्यासाठी 3 कोटी 65 लाखांची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, सागरी किना-याच्या संरक्षणासाठी बोटी घेण्यासाठी 3.65 कोटीची तरतूद केलेली आहे. जे ट्रालर्स आहेत ते जुने असून त्यांचा वेग मर्यादित आहे, ते ट्रॉलर्स वेगाने पळणार नाहीत. तेव्हा ही जी तरतूद करण्यात आलेली आहे त्यामधून अत्याधुनिक आणि वेगवान अशा स्पीड बोटी घ्याव्यात.

सभापती महोदय, तंटामुक्ती मोहीमे अंतर्गत 39.10 कोटीची तरतूद केलेली आहे. आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयाचे एस.पी. श्री. सिसवे यांनी तंटामुक्ती मोहीमेअंतर्गत बक्षिस देण्यासाठी बैठक बोलावली. त्या बैठकीला त्या जिल्हयातील आमदार येऊन बसलेले असताना देखील ते एस.पी. फोन वरुन बैठकीला आमदार उपस्थित झाले आहेत की नाहीत यासंबंधीची माहिती घेत होते. तेव्हा त्या समितीचे जे सचिव आहेत त्यांना याबाबतीत सूचना द्याव्यात. तंटामुक्ती गाव कार्यक्रम अतिशय चांगला आहे. परंतु विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य निवडणुकीच्या काळात पोलीस आणि खून यांचा एक सारखा उल्लेख करीत असतात. माझी अशी विनंती आहे की जे काही गुन्हे घडलेले असतील त्याची माहिती सदनाला मिळाली पाहिजे. मग ती रमेश गोवेकर यांच्या संबंधातील माहिती असो अथवा अंकुश राणे यांच्या संबंधातील माहिती असो. त्याबाबतची माहिती मिळाली पाहिजे. परंतु मी येथे सांगू इच्छितो की, विरोधी पक्षाचे लोक या बाबतीत नाटक करतात. निवडणुका आल्या की नेहमी ते हा मुद्दा उपस्थित करतात. सीबीआय चौकशी पेक्षा दुसरी कोणती चौकशी आहे काय ? या संदर्भात जे काही आरोप करण्यात येतात त्याबाबत चौकशी होऊन दूध का दूध पानी का पानी होऊ द्या.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी काही आक्षेपार्ह विधान केले असेल तर ते तपासून काढून टाकण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : तालिका सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी मालवण मधून पोटनिवडणुक लढविली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे हे त्यांच्या विरोधात निवडणुकीला उभे होते. त्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे कार्यकर्ते श्री. रमेश गोवेकर अचानक गायब झाले. त्यांची मिसिंग केस झाली. ती केस

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

सीबीआयकडे देण्यात आली. आजतागायत त्या केसचा निकाल लागलेला नाही. श्री.रमेश गोवेकर हे हयात आहेत की नाहीत, त्यांचा मृत्यू झालेला आहे काय हे अजूनही समजत नाही. असे असताना सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी त्यांचा कै. गोवेकर असा उल्लेख केला. याचा अर्थ श्री. गोवेकर यांच्या बाबत त्यांना माहीत आहे. तेव्हा श्री. गोवेकर यांचा मृत्यू झाला असेल तर तो कसा झाला हे सन्माननीय सदस्यांना माहीत असेल...

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, हा विषय आजच्या कार्यक्रमपत्रिकेत नसल्यामुळे श्री. रमेश गोवेकर यांचा नावाचा करण्यात आलेला उल्लेख रेकॉर्डमधून काढून टाकला जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदया, कोणतीही निवडणूक असली तर विरोधी पक्षाचे लोक श्री.रमेश गोवेकर यांचे नाव घेऊन नेहमी राजकारण करतात. सध्या विरोधी पक्षाच्या सदस्यांकडे मुद्देच राहिलेले नसल्यामुळे ते वारंवार हा मुद्दा सभागृहात उपस्थित करतात. राजकीय भांडवल करण्यासाठी श्री.गोवेकर यांचा नावाचा ते उल्लेख करीत असतात.

(गोंधळ)

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : श्री. रमेश गोवेकर यांच्या नावाचा कोणीही सदस्यांनी कृपया उल्लेख करु नये. ज्या सदस्यांनी त्यांचा नावाचा उल्लेख केलेला आहे, तो उल्लेख मी रेकॉर्डमधून काढण्यासंबंधीचे आदेश दिलेले आहेत.

(गोंधळ)

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य बोलत असतात, त्यावेळी त्यांचे म्हणणे आम्ही अतिशय शांतपणे ऐकून घेत असतो. त्यांच्या भाषणात आम्ही कधीही अडथळा आणत नाही. आमचे सदस्य ज्यावेळी बोलण्यासाठी उभे राहतात, त्यावेळी विरोधी पक्षाचे सदस्य त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्या भाषणात वारंवार अडथळा आणतात. हे सार्वभौम सभागृह आहे. हे सभागृह भांडण करण्याचे व्यासपीठ नाही.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : सन्माननीय सदस्यांनी मागण्यांच्या अनुषंगानेच आपापली मते मांडावीत.

श्री. राजन तेली : श्री. रमेश गावेकर हे मिसिंग आहेत की त्यांचा मृत्यू झाला आहे या विषयी सी.बी.आय.मार्फत चौकशी करण्यात येत आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, सी.बी.आय. पेक्षा दुसरी कोणती मोठी यंत्रणा असेल त्यांच्या माध्यमातून देखील या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व या प्रकरणाची माहिती आपल्या माध्यमातून सभागृहासमोर ठेवावी.

(गोंधळ)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री. तेली हे रमेश गोवेकरांना कैलासवासी कसे काय म्हणता आहेत. ते मरण पावले आहेत याची सन्माननीय सदस्यांना माहिती असावी, त्यामुळेच ते कदाचित त्याना कैलासवासी असे संबोधत आहेत.

(गोंधळ)

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : कृपया सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी. या मुद्याच्या बाबतीत मी कोणाचे ऐकून घेणार नाही. मी ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी देईन, त्यांनी मागणीच्या अनुषंगानेच बोलावे. कोणीही सदस्यांनी विषयांतर करु नये. श्री. रमेश गोवेकर यांचा ज्या ज्या सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. तो उल्लेख मी रेकॉर्डवरुन काढून टाकलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

यानंतर श्री. बोरले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 21 ते 50 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

(सत्ताधारी पक्षाचे काही सनमाननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली बोलत आहेत. त्यांना अजून काही मुद्दे मांडायचे आहेत. त्यांच्यावर अन्याय होऊ नये. त्यांना त्यांचे मुद्दे मांडण्याची संधी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे आपण खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल आपण आपले भाषण सुरु करावे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी एका गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. गृह विभागाची परिस्थिती काय आहे ते मी सांगणार आहे. बाकीच्या लोकांचा काय अनुभव आहे हे मला माहिती नाही. सभापती महोदय, विषय गंभीर आहे. मी 8 तारखेला रात्री 1.30 वाजता बीड जिल्हयातील पाटोदा तालुक्यातील नगर रस्त्यावरुन जात होतो. रात्री 1.30 वाजता माझ्या गाडीवर दरोडेखोरांनी दगडफेक केली. माझे नशीब बलवत्तर म्हणून मी वाचलो. सभापती महोदय, काय झाले ? जेथे दगडफेक झाली तेथून मी अर्ध्या किलोमीटर पुढे गेल्यानंतर 8 लोक रस्त्यावर बसलेले होते. मी माझ्या जवळची बंदूक काढली तेव्हा ते म्हणाले की, आम्हाला गोळी मारु नका. आम्ही पोलीस आहोत. त्यांच्यामधील एक माणूस पोलिसांच्या ड्रेसमध्ये होता. म्हणून मी शांत झालो आणि त्यांना विचारले की, तिकडे अर्ध्या किलोमीटरवर रात्री 9.00 ते 1.30 वाजेपर्यंत प्रत्येक वाहनधारकाला मारहाण केली जात आहे. तुम्ही तिकडे का जात नाही ? त्यांनी सांगितले की, आमच्या गाडीमध्ये डिझेल नाही. (..अडथळा..) सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा साहेब, मी एक कार्यकता आहे. आम्हाला कोणत्याही वेळी रस्त्याने जावे लागते. रस्त्यावरील कार्यकर्त्याला रस्त्यावर रहावे लागते. हा प्रसंग तुमच्यावर सुध्दा येऊ शकतो. आपण माझे म्हणणे ऐकावे. माझ्या गाडीवर दगडफेक झाल्यानंतर पुढे अर्ध्या किलोमीटरवर मला 8 पोलीस भेटले. मी बंदूक काढली तेव्हा त्यांनी मला सांगितले की, आम्ही पोलीस आहोत. मी त्यांना विचारले की, तुम्ही तिकडे का जात नाही ? त्यांनी मला सांगितले की, आमच्याकडे कोणतेही शस्त्र नाही, आमच्या गाडीमध्ये डिझेल नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पूरवणी मागण्यांच्या माध्यमातून आम्ही शासनाच्या उणिवा सांगण्याचा प्रयत्न करतो. त्या उणिवा सुधारण्याकरिता आम्ही काय करणार आहोत, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल तुमच्या अब्रुचे धिंडवडे काढत आहेत आणि तुम्ही टाळया वाजवित आहात. हे शासन आहे काय ? शासनाला गांभीर्य नाही काय ? सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मांडलेला विषय वेगळा होता. त्यावेळी आपण जे करण्याचा प्रयत्न केला ते दुर्दैवी आहे. मी रात्री प्रवास करतो आणि दिवसा काम करतो.

यानंतर श्री.भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आपल्यातील कोण रात्री प्रवास करीत नाही? सगळेच करतात. सभापती महोदय, एवढा टिंगलीचा विषय करायचा? सन्माननीय सदस्य स्वत:चे अनुभव सांगत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे म्हणाले की, या सदनामध्ये बोलणारे आमदार खरे बोलत असतात. मग सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल जे सांगत आहेत ते खरे असेल तर एवढी दुर्दशा तुमची आणि आमची सर्वांचीच झालेली आहे. आता काही शिल्लक राहिलेले नाही. कृपा करुन हा विषय गंमतीचा करु नये.

श्री.पाशा पटेल : मी अत्यंत गंभीर आणि जबाबदारीने बोलत आहे. या संदर्भात पोलीस तक्रार केली. पोलीस नियंत्रण कक्षात 100 नंबरवर मी ज्यावेळी फोन केला तेव्हा मला नियंत्रण कक्षातून सांगण्यात आले की, तेथे आमचे पथक आहे. जर पथक बिगर शस्त्राचे आणि बिगर इंधनाचे असेल तर आता कोणाला सांगायचे. ते म्हणाले की, तुम्ही पहा. जिल्हा पोलीस प्रमुखांचा फोन नंबर घेतला आणि त्या नंबरवर अर्धातास प्रयत्न करुनही कोणी तो फोन घ्यायला तयार नाही. पाऊण तासानंतर जिल्हा पोलीस प्रमुखांनी माझ्या मोबाईलवर उत्तर दिले. वह बोला कि बहुत पहले भेज दिया. मैने कहा कि हां, वहां हैं. लेकिन तमाशा देख रहे हैं. अशा स्थितीत मी पाटोदा पोलीस स्टेशनवर तक्रार करावयास गेलो. अर्धातास कोणी तक्रार घेण्यास तयार नाही. ज्या दिवशी तक्रार केली त्या दिवसापासून आजपर्यंत त्या पोलीस स्टेशनकडून किंवा जिल्हा पोलीस मुख्यालयातून तुम्हाला घेराव घालणारे लोक कोण होते किंवा तो दरोडेखोरीचा प्रकार होता का नक्की कोणता प्रकार होता याबाबत काहीही कळविण्यात आलेले नाही. साधा फोन सुध्दा केला नाही. हा प्रश्न मी या सभागृहात उपस्थित केला नसता तर पुन्हा पाच वर्षात हा प्रश्न पुढे आला नसता. माझ्यासारख्या सभागृहाच्या एका सदस्याबाबत असे घडते तर रात्री 9 ते 1.30 वाजेपर्यंत त्या रस्त्यावर मार खाणाऱ्यांची अवस्था काय होत असावी? मी तेथील गावकऱ्यांशी चर्चा केली. त्यांना विचारले हा काय प्रकार आहे? ते म्हणाले की, हे आमच्या नशिबी रोजचेच आहे. रोज असे घडत असेल आणि माझ्यासारख्या सदस्याबाबत असा प्रसंग घडल्यानंतर सुध्दा पोलिसांना थोडा तरी शहाणपणा आला पाहिजे होता, तो अजून आलेला नाही. आमच्यासारख्याची अशी अवस्था असेल तर या राज्यातील सामान्य माणसांची काय अवस्था असेल याचा तुम्ही सर्वांनीच विचार करणे गरजेचे आहे. एवढी गंभीर परिस्थिती या राज्याची असताना, माझे स्वत:चे उदाहरण सांगत असताना काय नाटक सभागृहात चालू आहे? तुम्ही कसे वागता याची रोज एक बातमी पेपरमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

छापून येत आहे. तुमचे सदस्य काय करतात हे पेपरमध्ये छापून येते. मग मी हे सांगत असताना माझा आवाज बंद करायचा प्रयत्न होत असेल तर मी जाऊ द्या, महाराष्ट्रातील जनता माझे बोलणे ऐकू लागली आहे. तुमचा बंदोबस्त झाल्याशिवाय राहणार नाही. लोक तुमचा बंदोबस्त केल्याशिवाय राहणार नाहीत.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब याठिकाणी मांडली आहे, त्यांच्यावर कशाप्रकारे पोलिसांचा अत्याचार झाला, निश्चितपणे पोलिसांकडून त्यांची अत्यंत गैरसोय झाली, दरोडेखोरांनी त्यांना घेरले, त्यावेळी सुरक्षा मिळाली नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. निश्चितपणे राज्य सरकार याची नोंद घेईल आणि त्यांना सुरक्षा प्रदान करेल.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, बाब क्रमांक 410 ते 414, पृष्ठ क्रमांक 521 ते 522 वर बोलत असताना अल्पसंख्याक समाजासाठी खूप काही योजना दाखविण्यात आल्या आहेत. एक गोष्ट माझ्या निदर्शनास आली आहे. बजेटमध्ये पैसे आहेत, पैसे देऊन उपयोग काय? तो निधी खर्च झाला पाहिजे. अल्पसंख्यांकांच्या शाळांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रक्कम ठेवण्यात आली आहे. गेले आर्थिक वर्ष संपले. नवीन आर्थिक वर्ष सुरु झाले आहे.

5सी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल.....

कुठल्याही संस्थेला एकही रुपया देण्यात आलेला नाही, ही गंभीर बाब आहे. अशा प्रकारे एक नव्हे तर 1760 गोष्टी मी सांगू शकेन. परंतु एक बाब नमुन्यादाखल निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, बीड जिल्ह्यातील 47821 विद्यार्थ्यांनी प्रत्येक अर्जाला 500 रुपये खर्च करुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले परंतु फक्त 810 मुलांनाच शिष्यवृत्ती मिळाली. असे असेल तर शासन कशाला अशा योजना राबवून लोकांना मुख्य बनविते हेच मला समजत नाही. म्हणून ज्या गोष्टी आपण जाहीर केल्या त्या किमान पदरात द्या परंतु ते न देता केवळ दाबण्याचेच काम सुरु केले आहे, ते योग्य नाही.

महोदय, बाब क्र. 399 च्या अनुषंगाने रोजगार हमी योजनेच्या बाबतीत मला अशी गोष्ट निदर्शनास आणावयाची आहे की, देव धानोरा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद.....

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्याविषयी माझ्या मनात नितांत आदर आहे. माझी एकच विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना फक्त चारच मिनिटे बोलले तरी वेळ संपल्याची बेल वाजवून आपण त्यांना खाली बसायला भाग पाडले. परंतु सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना बोलून दहा मिनिटे होऊन गेली. ही पध्दत बरोबर नाही. अशा प्रकारे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना जास्त वेळ आणि सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना कमी वेळ ही पध्दत बरोबर नाही, असे मी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री. अरविंद सावंत : महोदय, हा आपला एकप्रकारे अवमान आहे. कारण आपण एकदा रुलिंग दिल्यानंतर असे बोलणे योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या सभागृहात जे सत्तारुढ आहेत त्यांनी आपल्याला सहकार्य करावयाचे आहे. मग कोण दोन-तीन अथवा दहा-पंधरा मिनिटे बोलणार असा कुठेही नियम नाही. एकदा माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतर तो आपण स्वीकारुन अमलात आणला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल : महोदय, माझ्या बोलण्यात व्यत्यय आला नसता तर कदाचित आतापर्यंत माझे भाषण संपलेही असते. तरी देखील मी अर्ध्या मिनिटातच माझे बोलणे संपविणार आहे. देव-धानोरा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथील 125 मजुरांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काम मिळावे म्हणून अर्ज केले व त्यासाठी आवश्यक असलेले चार नंबरचे फॉर्म सुध्दा भरले परंतु त्यांना काम मिळाले नाही. सहा महिने उलटून गेले तरी देखील या मजुरांना रोजगार उपलब्ध करुन दिला नाही अशा अधिकाऱ्यांवर जरब बसविण्यासाठी हे शासन त्यांना शिक्षा देणार काय ? अशा प्रकारे ज्या पध्दतीने हे सर्व चालले आहे त्याचा विचार करावा व या मजुरांना न्याय मिळवून द्यावा अशी विनंती करतो व मी केलेल्या सुचनांचा शासनाने विचार करावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,मघाशी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांचे काही मुद्दे मांडावयाचे राहिले असतील असे वाटते. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना पुन्हा बोलू द्यावे अशी काही सदस्यांनी विनंती केली आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांना पुन्हा बोलू द्यावे अशी विनंती आहे. मला वाटते माझे मुद्दे मांडल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना मुद्दे मांडण्याची संधी द्यावी.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकदा सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडल्यानंतर त्यांना परत बोलण्याची संधी दिली तर ती चुकीची प्रथा पडेल. चुकीच्या प्रथा आपण पाडून नये एवढेच मला हरकतीच्या मुद्याद्वारे सांगावयाचे आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी आपले विचार पाच मिनिटात पूर्ण करावेत.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावर बोलतांना जर सरकारचा कारभार चांगला असता तर मला पाच मिनिटे सुध्दा बोलण्याची गरज नव्हती. माझे मुद्दे पाच मिनिटात संपतील असे वाटत नाही.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 513, बाब क्रमांक 402 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मराठी चित्रपटांच्या संदर्भात बजेटमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे की, "माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर चित्रपट काढण्यासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे." मी शासनाला विचारु इच्छितो की, आजपर्यंत मराठी चित्रपटांना जे काही पैसे देण्यात येतात त्यामध्ये 30 लाख रुये अनुदान दिले जाते व ते सुध्दा दुस-या चित्रपटासाठी दिले जाते. अगोदर 15 लक्ष रुपये अनुदान दिले जात होते आता ते वाढविण्यात आलेले आहे. पण अशा पध्दतीने एका मराठी चित्रपटासाठी 3 कोटी रुपये देणे योग्य आहे काय ? यापूर्वी शिवाजी महारज, साने गुरुजी, संत रामदास, तुकाराम महाराज यांच्या जीवनावर चित्रपट काढण्यासाठी एवढया मोठा प्रमाणात अनुदान देण्यात आले होते काय ? जर या चित्रपटासाठी 3 कोटी रुपये अनुदान दिले जाणार असेल तर महाराष्ट्रात अनेक महान पुरुष होऊन गेलेले आहेत त्यांच्यावर जर चित्रपट काढला तर त्यांना सुध्दा 3 कोटी रुपये देण्याची तरतूद भविष्यात केली जाणार आहे काय ?

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 512, बाब क्रमांक 400, पर्यटनावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आज एमटीडीसीची अवस्था पाहण्यासारखी आहे. महाराष्ट्र राज्यात पर्यटनाद्वारे आपणमहसूला मिळवू शकत नाही अशी स्थिती आहे. पण आपल्या बाजूला असलेले गोवा, मध्यप्रदेश आणि केरळ ही राज्ये पर्यटनाद्वारे आपले राज्य चालवत आहेत. गोव्या सारखे राज्य हे पर्यटनावर चालते आहे. या राज्यांनी पर्यटनाद्वारे जनतेला रोजगार मिळवून दिलेला आहे. या राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याला पर्यटनाच्या विकासासाठी भरभरुन दिलेले आहे. त्याचा आपण उपयोग करु शकत नाही. पर्यटनाच्या माध्यमातून ज्या सुविधा एमटीडीसीने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्या पुरवणी मागण्यांमुळे महाराष्ट्रातील सर्व पर्यटन स्थळे चांगली होतील, लोक पर्यटनासाठी येऊ शकतील, पर्यटकांना आवश्यक असलेल्या सुविधा आपण देऊ शकू असे कोणतीही तरतूद पर्यटनाच्यासंदर्भात बजेटमध्ये करण्यात आलेली नाही. फक्त पर्यटन म्हणून विभाग चालविण्यासाठी असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. एमटीडीसी सारखे महामंडळ ठेवायचे आणि पर्यटनाला आम्ही चालना देतो असे सांगावयाचे हे काही ठीक नाही. एमटीडीसीच्या अंतर्गत जेवढे प्रकल्प राबविण्यात आले मग तो प्रकल्प रेल्वेसाठी असेल, तीर्थक्षेत्रासाठी असेल हे सगळे प्रोजेक्ट फेल्यूअर झालेले आहेत. पर्यटक महाराष्ट्रात येतात असे वाटत नाही. पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला काही महसूल मिळतो असे कोणतेही उद्दिष्ट दिसत नाही.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 222, बाब क्रमांक 182 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. घरगुती कामगारांसाठी स्मार्टकार्ड तसेच घरगुती असंघटित कामगारांसाठी जनश्री विमा योजना शासनाने लागू केलेली आहे त्याबद्दल शासनाचे धन्यवाद. पण मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणतो. या राजधानीत असलेले कामगार हे सर्व कंत्राटी पध्दतीवरील आहेत. पर्मनंट कामगार प्रत्येक आस्थापनेत आपण किती ठेवणार आहात ? मग ती आस्थापना सरकारी असो, निम सरकारी असो, किंवा खाजगी असो. या सर्व आस्थापनामध्ये लक्ष दिले तर आपल्याला असे आढळून येईल की, एका फॅक्टरीत 100 कामगार असतील तर त्या ठिकाणी 80 कामगार हे कंत्राटी पध्दतीवरील असतील तर 20

...3..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

कामगार पर्मनंट असतील असे आपल्याला दिसून येईल. आपण घरेलू कामगारांना आणि असंघटित असलेल्या कामगारांना सुविधा देता पण जे औद्योगिक नगरी घडवतात, देश घडवतात त्या कामगारांना आपण वंचित ठेवत आहात. आपण हॉस्पिटलमध्ये जा, एअरपोर्टवर जा कोणत्याही कंत्राटी कामगारांला कोणतीही सुविधा मिळत नाही. त्यांना सुविधा तर सोडा परंतु 3-4 वर्ष टेम्पररी कामगारांने काम केल्यानंतर त्याला काढून टाकले जाते त्या कामगाराला नियमानुसार त्याची ग्रच्युईटी मिळावयास पाहिजे ती सुध्दा मिळत नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

त्यासाठी सरकार काय करणार आहे ? सरकारी, निम सरकारी आणि खाजगी संस्थांच्या बाबतीत मी आताच सांगितलेले आहे. परंतु मंत्रालयामध्ये वर्षानुवर्षे कंत्राटी कामगार काम करीत आहेत. त्यांनाही कायम केले जात नाही. प्रत्येक अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य याबाबतीत मुद्दे मांडत आहेत. अधिवेशनाच्या काळात ज्या कंत्राटी कामगारांना कामावर घेण्यात येते, ते वर्षानुवर्षे याच पध्दतीने काम करीत आहेत. किती वर्षे काम केल्यानंतर या कामगारांना कायम करण्यात येणार आहे ? किती वर्षे काम केल्यानंतर त्याला कायम कामगारांच्या सर्व सुविधा देण्यात येणार आहेत ? चार - पाच वर्षे काम केल्यानंतर आणि आठ दहा वर्षे झाल्यानंतर त्याला कोणत्याही सुविधा न देता सरकार त्याला घरी पाठविणार आणि सेवा निवृत्तीचे कोण्तेही फायदे न देता त्याला धरी बसविण्यात येणार आहे. कामगारांच्या बाबतीत सांगावयाचे म्हण्जे महाराष्ट्रात जवळजवळ 80 टक्के कामगार कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. शासन कंत्राटदारावर ठोस कारवाई करीत नाही, त्याबाबतीत योग्य तो कायदा आणि नियम करीत नाही. म्हणून सर्व कंत्राटदार मालकांनी या पध्दतीचा फायदा उचलला आहे. त्यामुळे यासबंधी त्वरित कायदा आणि नियम करावयास पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर पान नंबर 223, बाब क्रमांक 186 व 187 संबंधी मला बोलावयाचे आहे. बाल कामगारांच्या पालकांचे पुनरुज्जीवन आणि बाल कामगार प्रथा काढून टाकण्यासबंधी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र हा बाल कामगार मुक्त आहे, असे वारंवार माननीय मंत्री महोदयांकडून सांगण्यात येते. राज्य शासनाला असे वाटते की, आपले राज्य बाल कामगार मुक्त असले पाहिजे. परंतु अजूनही अनेक कंपन्यामध्ये आणि कारखान्यामध्ये बाल कामगार काम करतांना आढळून येतात. त्या ठिकाणी बालकामगार काम करीत असल्याचे दिसून आल्यानंतर संबंधित मालुकाला 20 हजार रुपये दंड केला जातो. या दंडापोटी 35 लाख रुपये आतापर्यंत जमा झालेले आहेत. परंतु त्याचा उल्लेख या जमाखर्चात कोठेही करण्यात आलेला नाही. बालकामगारांना काम देण्यात येऊ नये, असा कायदा आहे. पंरतु अनेक कारखान्यांत बालकामगार काम करीत असतात. जेव्हा एखाद्या कारखान्यात अपघात होऊन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

बालकामगाराचा मृत्यू होतो, तेव्हा शासनाला जाग येत असते. अशा प्रकारे अजून किती कारखान्यातून बाल कामगारांचे मुडदे आपण बाहेर काढणार आहात ? आणि त्याच्यावर 20 हजार रुपये ठेवणार आहात ? बालकामगाराला कारखान्यात काम दिल्याबद्दल कामगाराला 20 हजार रुपये दंड केला जातो आणि 20 हजार रुपयांचा दंड भरुन मालक मात्र सुटून जातो. या प्रकरणात आयुक्तावर वा कारखाना निरीक्षकावर कोणत्याही प्रकारची केस होत नाही. सांगली मध्ये, शिर्डीमध्ये ,मुंबईतील धारावीमध्ये वा जळगाव जिल्हयातील पारोळा येथील सावित्री फायर वर्क्समध्ये घडलेल्या घटनेमध्ये अनेक बालकामगार मृत्यूमुखी पडलेले आहेत. त्या प्रकरणी मालकांना फक्त 20 हजार रुपयाचा दंड केला जातो. तेव्हा अशा प्रकारे फक्त दंड करुन भागणार नाही तर मालकाला जास्तीत जास्त शिक्षा दिली गेली पाहिजे. एखादा मालक रस्त्यावरुन वेगात गाडी चालवत असातांना त्याच्या गाडीखाली कोणी व्यक्ती आली व ती जर मरण पावली तर त्या मालकावर मनुष्य वधाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली जाते. परंतु त्याच मालकाने त्याच्या कारखान्यात बाल कामगारांना कामावर ठेवले व तेथे अपघात होऊन त्याचा मृत्यू झाला तर त्यांना मात्र दंड भरुन सोडून देण्यात येते. तेव्हा याही बाबतीत विचार करण्याची गरज आहे, असे मला सांगावयाचे आहे . अशा प्रकारे जर बाल कामगारांचा मृत्यू झाला तर सबंधित मालकाला कडक शिक्षा करण्यासाठी कायद्यात तरतूद करण्यात आली पाहिजे. प्रत्येक अधिवेशनामध्ये अशा प्रकारच्या घडलेल्या घटनेमध्ये किती बालकामगार मरण पावले याची आम्ही फक्त संख्या देत असतो. परंतु या प्रकारास जबाबदार असलेल्या मालकाला मात्र काहीही कारवाई केली जात नाही. आजची लहान मुले ही उद्याचा देश घडविणारी आहेत असे पंतप्रधान त्यांच्या भाषणात सांगत असतात.

" जय जवान, जय किसान "आणि "जय कामगार" अशी घोषणा केली जाते. परंतु त्या घोषणेलासुध्दा हरताळ फासण्यात आलेला आहे. तेव्हा बालकामगार प्रथेवर ठोसपणे कारवाई करण्यात आली पाहिजे आणि त्यासाठी कडक नियम तयार करण्यात आले पाहिजे.

सभापतीमहोदय यानंतर बाब क्रमांक 190 पान नंबर 224 संबंधी मला बोलावयाचे आहे. परदेशात स्थलांतर करणा-या कामगारांना प्रस्ताव पूर्व प्रशिक्षण देण्यासाठी 75 लाख रुपयाची

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

तरतूद करण्यात आली आहे. आपल्या देशात आणि राज्यात जे हायली स्कील्ड, सेमी स्कील्ड कामगार आहेत ते सर्व कामगार परदेशात निघून जातात. त्यांना परदेशात जाण्यासाठी जे प्रशिक्षण लागणार आहे, त्याकरता 75 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा अर्थ आपल्या देशातील चांगले कामगार परदेशात जावे यासाठी शासन सपोर्ट करीत आहे. जे परदेशात कामगार गेलेले आहेत आणि त्यांचे कंत्राट संपल्यानंतर चार पाच वर्षा नंतर ते पुन्हा आपल्या शहरात येत असतील तर त्यांच्या प्रशिक्षणासाठी किंवा त्यांचा फायदा राज्याला होण्यासाठी काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय ? मेरिटवर आलेले डॉक्टर्स, इंजिनिअर्स ,आय.टी. क्षेत्रातील तज्ज्ञ परदेशात जातात. त्यांच्यावरील शिक्षणाचा खर्च राज्य सरकार करते आणि ते मात्र परदेशात जाऊन, दुसऱ्या देशाची सेवा करीत असातात. तेव्हा यासाठी शासन ठोस उपाययोजना करणार आहे किंवा नाही ?

नंतर श्रीसरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावस्कर...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 228 व बाब क्रमांक 204 मध्ये चितळे डिस्टिलरीज लिमिटेडच्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनासाठी शासनाने 80 लाख रुपयांची तरतूद केली आहे. त्याकरिता पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ 80 लाख रुपये देणार आहे. राज्यामध्ये अशाप्रकारच्या किती डिस्टिलरीज बंद आहेत? किती कंपन्या बंद आहेत? त्यामधील कर्मचाऱ्यांना आपण मदत करणार काय? या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विचार करीत असतांना आपण एनआरसीच्या कर्मचाऱ्यांचा सुध्दा विचार करणार काय? आज मुंबई शहरामध्ये अनेक कंपन्या बंद झाल्या आहेत. चितळे डिस्टिलरीचे खाजगीकरण केले जाणार आहे. त्या कंपनीचे खाजगीकरण झाल्यानंतर पुन्हा आपण त्यांना 80 लाखांची तरतूद करीत आहात. अशाप्रकारे आपण मदतीचे धोरण अवलंबिणार असाल तर ज्या पुष्कळ कंपन्या बंद झाल्या आहेत त्यांचे खाजगीकरण करण्यात येऊन तेथील कर्मचाऱ्यांचे ग्रॅज्युईटी, निवृत्ती वेतन इत्यादी अंशदान त्यांना मिळाले नाही. त्या सुविधा त्यांना देणार काय? आणि त्यासाठी पैशाची व्यवस्था करणार काय?

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 245 आणि बाब क्रमांक 227 मध्ये नदीमधून प्रवाशांची ने-आण करण्यासाठी नौका खरेदी करण्याकरिता जिल्हा परिषदांना अनुदान देण्यासाठी 3 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अशा किती नद्यातून नौकांव्दारे प्रवासी वहातूक केली जाणार आहे, याची टक्केवारी काय आहे? प्रवासी नौकेचा वापर करुन कोणकोणत्या नदीमधून प्रवास केला जाणार आहे? याकरिता तुटपुंजा निधी देण्यापक्षा नदीवर पूल बांधण्याचे काम कां केले जात नाही? किती जिल्हा परिषदांकडे नौका खरेदीचा हा प्रस्ताव आहे? राज्यात अशा लहान मोठया नद्या किती आहेत? अशा नद्यांमधून नौकेव्दारे प्रवासी वहातूक करण्यासाठी खर्च करणार असाल तर त्याचबरोबर वाळूची तस्करी काही नदीमधून होत आहे. त्याचप्रमाणे नौकेमधून प्रवास करीत असतांना जे अपघात होतात त्याविषयी आपण काय उपाय योजना करणार आहात? जे लोक वाळू घेऊन जातात त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा महसूल न घेता पुष्कळशा नदीमधून वाळू काढण्यास दिली जाते. त्यापासून पर्यावरणाचे होणारे दुष्परिणाम आपण थांबविणार काय? या वाळूच्या तस्करीमध्ये मोठ मोठे पदाधिकारी व अधिकारी यांची हातमिळवणी सुरु आहे. त्याचप्रमाणे तलाठी, मंडल अधिकारी, तहसिलदार यांच्याबरोबर काही अधिकारीदेखील सामील असतील तर त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय? असा प्रश्न उपस्थित करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ D/

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मांडण्यात आलेल्या सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता उभा आहे. महसूल व वन विभागाच्या विभागाच्या बाब क्र. 64 व पृष्ठ क्रमांक 52 मध्ये वन विभागासाठी तरतूद करीत असतांना राज्यामध्ये वन विभागाच्या ज्या जमिनी आहेत. त्या शेळी-मेंढीचा व्यवसाय करणाऱ्या मेंढपाळांना चराऊ कुरणे म्हणून या जमिनी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. आज राज्यामध्ये चराऊ कुरणे उपलब्ध नसल्यामुळे मेंढपाळाचा व्यवसाय लोप पावत चालला आहे. याकरिता या जमिनीचा लाभ त्यांना मिळाला पाहिजे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी पाच वर्षापूर्वी जी जुनी जंगले आहेत ती मेंढपाळांना चराऊ कुरणे म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले होते. परंतु त्यावर अद्यापपावेतो कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, पशुसवंर्धन विभागाची बाब क्रमांक 69 पृष्ठ क्रमांक 73 च्या अनुषंगाने मी याठिकाणी सूचना करु इच्छितो की, माननीय पंतप्रधान पॅकेज योजनेंतर्गत महाराष्ट्र पशुधन विकास महामंडाळाव्दारे विदर्भामध्ये गाई व म्हशींचे वाटप केले गेले. त्या योजनेंतर्गत शेळया व मेंढयाचे वाटप झाले पाहिजे व त्यासाठी शासनाने निधी दिला पाहिजे. आपल्या खात्याच्या अंतर्गत अहिल्या देवी शेळी मेंढी विकास महामंडळाला एक रुपयांचा सुध्दा निधी देण्यात आलेला नाही. त्यामुळे या महामंडळावर अवलंबून असणाऱ्या मेंढपाळ व शेतकरी, धनगर समाजामध्ये असंतोषाचे वातावरण व अन्यायाची भावना निर्माण झाली आहे. म्हणून या महामंडळाला निधी देण्यात यावा

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याकरिता सिंचनाचा निधी सुध्दा वाढवून देण्यात यावा. सद्या 17 टक्के सिंचन निधी दिला जातो तो 40 टक्के पर्यंत वाढवून देण्यात यावा. व त्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय,सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांमधील बाब क्रमांक 85 व बाब क्रमांक 93 मध्ये शिव छत्रपती क्रीडा संकुल, पुणे यांच्या विकासासाठी पुरवणी मागणी करण्यात आली आहे. परंतु खऱ्या अर्थाने आज युवक मंडळे असो किंवा विद्यार्थी मित्र मंडळे असो त्या ठिकाणी खरोखरच क्रीडा क्षेत्र म्हणून विकसित झाले पाहिजे. या क्रीडा कलेचा विकास शालेय जीवनापासून झाला पाहिजे. या अनुषंगाने भविष्य काळात ठोस निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शाळेमध्ये इयत्ता पहिली पासून 5 वी पर्यंत आणि इयत्ता 5 वीपासून दहावीपर्यंत वर्गासाठी किमान एक क्रीडा शिक्षक सक्तीने नियुक्त केला पाहिजे. त्यासाठी शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 223 व पान क्रमांक 243 मध्ये मराठवाडयातील अवर्षणग्रस्त तालुके आहेत. त्यासाठी कोल्हापूर बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली आहे. सभापती महोदय, आपणास ज्ञात आहे की, जे जे कोल्हापूरी बंधारे बांधले आहेत त्यांना गेट बसविण्यात आले आहेत. परंतु त्या गेटमधून होणाऱ्या गळतीमुळे पाणी वाया जात आहे.त्यासाठी मराठवाडयातील अवषर्णग्रस्त तालुक्यातील कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे करण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मराठवाडयातील जनता सातत्याने मागणी करीत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

यासाठी शासनाने मोठया प्रमाणात तरतूद केल्याबद्दल मी अभिनंदन करतो. परंतु केवळ तरतूद करुन चालणार नाही, तर पुढच्या काळामध्ये के.टी.वेअर पध्दतीचे बंधारे व्यवस्थितपणे चालण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ज्या प्रमाणे आपण पाणी वाटप संस्थांची संरचना करतो, त्याच पध्दतीने गेट बसविणे आणि पाऊस सुरु झाल्यानंतर ते काढून घेणे व पाऊस संपल्यानंतर ते पुन्हा बसविणे अशा प्रकारची यंत्रणा संबंधित कार्यालयाकडून झाली पाहिजे अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, याठिकाणी बाब क्र.231, पान क्र.249 यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी मागणी केलेली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही गरीबांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे साधन आहे. अशा वेळी आपण वर्तमानपत्रांमध्ये वाचतो की, रेशन कार्ड देण्यामध्ये घोटाळे होत आहेत. याबाबतीत सदनामध्ये देखील अनेक वेळा चर्चा झालेली आहे. म्हणून भविष्य काळा-मध्ये रेशन कार्ड कॉम्प्युटराईज मिळाले पाहिजे आणि यासाठी पुढच्या काळामध्ये धडक कार्यक्रम हाती घ्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.289, पान क्र.384 यामध्ये उप जिल्हा रुग्णालयामध्ये 20 खाटांचे ट्रॉमा केअर केंद्र, 20 खाटांचे इन्सेन्टीव्ह केअर युनिट इ.साठी मागणी सादर करण्यात आली आहे. तुम्ही-आम्ही सर्वजण ग्रामीण भागामध्ये काम करतो. ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. आपण जर तेथील अवस्था पाहिली तर असे दिसून येईल की, तेथे जर एखादा रुग्ण गेला, तर त्याठिकाणी डॉक्टर हजर नसतात. जर डॉक्टर हजर असतील तर असे सांगितले जाते की, माझ्या क्लिनिकमध्ये या आणि मग तेथे खाजगी स्वरुपामध्ये उपचार केले जातात. या रुग्णालयांमध्ये डॉक्टर हजर रहावेत यासाठी त्यांच्यासाठी खर्च करुन जी निवासस्थाने बांधलेली आहेत, तेथे त्यांनी राहिले पाहिजे, त्यांनी दुसरीकडे प्रॅक्टीस करता कामा नये अशा प्रकारचा कायदा करावयास पाहिजे. तसेच या डॉक्टरांचे पगार देखील चांगल्या प्रकारे वाढविले पाहिजेत.

सभापती महोदय बाब क्र.325, पान क्र.436 याठिकाणी आदिवासी आश्रमशाळांसाठी मागणी करण्यात आली आहे. याबद्दल मी माननीय आदिवासी विकास मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. पण आदिवासी आश्रमशाळांना अनुदान देताना एक जाचक अट टाकण्यात आली आह की, तेथे ....

. . . .5जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किमान 20 टक्के आदिवासी मुले असावयास पाहिजेत. खरे म्हणजे आदिवासी आश्रम शाळांना मुळातच आदिवासी भागात परवानगी दिली जाते. त्यामुळे अशा प्रकारची जाचक अट टाकणे म्हणजे आदिवासी विद्यार्थ्यांवर, तेथील शिक्षकांवर अन्याय करण्यासारखे आहे. तसेच तेथील संस्था चालकांवर देखील अन्याय करण्यासारखे आह. अशा प्रकारची अट असता कामा नये. त्यामुळे आदिवासी भागातील सर्व आश्रमशाळांना अनुदान दिले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.349, पान क्र.468 याबाबत सांगावयाचे तर न्याय सहाय्यक विज्ञान संस्था/न्याय सहाय्यक विज्ञान महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण महाराष्ट्रामध्ये न्याय सहाय्यक विज्ञान संस्था/न्याय सहाय्यक विज्ञान महाविद्यालय नव्याने स्थापन करीत आहोत. या निमित्ताने डी.एन.ए.तपासणी सारखे अनेक विषय उपस्थित होणार आहेत. शासन आता अशा प्रकारचे नवीन महाविद्यालय उघडणार असले तरी, अशा प्रकारची महाविद्यालये सुरु करण्यासाठी खाजगी संस्थांना मान्यता देता कामा नये अशा प्रकारचा निर्णय देखील घ्यावा लागणार आहे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्र.357, पान क्र.472 मध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 50 टक्क्यांची फी सवलत जाहीर केली आहे आणि त्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे. डी.एड., बी.एड.च्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू नाही. परंतु हा देखील व्यावसायिक अभ्यासक्रमच आहे.त्यामुळे या विद्यार्थ्यांना देखील प्रतिपूर्तीची सवलत असावयास पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.361, पान क्र.473 यामध्ये शासनाने तंत्र विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो की, आज राज्यात अशा प्रकारे तंत्र विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याची गरज होती. ही मागणी अनेक दिवसांनी पूर्ण होत आहे. परंतु ते विद्यापीठ मराठवाडयामध्ये म्हणजे मराठवाडयाची राजधानी असलेल्या औरंगाबाद येथे स्थापन केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.363, पान क्र.474 यामध्ये शासनाने आदर्श व्यावसायिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण आदर्श व्यावसायिक शाळा म्हणजे काय ? याचे देखील आम्हाला ज्ञान झाले पाहिजे आणि अशा प्रकारे आदर्श व्यावसायिक शाळेची गरज असेल तर प्रत्येक विभागामध्ये या शाळा निर्माण केल्या पाहिजेत.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशोधित मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ...

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 480 वरील बाब क्रमांक 380 बाबत बोलू इच्छितो. आय.टी.आय. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील सुविधा सुधारण्यासाठी या ठिकाणी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. परंतु आय.टी.आय.चे जे विद्यार्थी आहेत त्यामध्ये गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेतात त्यांच्या मानधनामध्ये सुध्दा वाढ केली पाहिजे. त्यांना जे विद्यावेतन दिले जाते त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. आज जे दर आहेत ते 25 वर्षापूर्वीचे आहेत. त्या दरामध्ये वाढ केली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 492 वरील बाब क्रमांक 390 बाबत बोलू इच्छितो. भिक्षेकरी गृहासाठी अतिरिक्त अनुदान देण्याच्या संदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आली आहे. भिक्षेकरी गृहे आपण कोठे स्थापन करणार, कोणाला देणार याबाबतीत माहिती या ठिकाणी आम्हाला मिळणे गरजेचे आहे. आता आपण सगळीकडे पाहतो की, प्रत्येक तालुक्यातील गावागावांमध्ये बालसदन आणि बालगृहांच्या पाट्या बघावयास मिळतात. अनेक ठिकाणी बालगृह आणि बालसदन सुरु झाले आहेत पण त्या ठिकाणी मुले आहेत की नाही हे बघून त्यांना मान्यता दिली आहे काय या विषयी आम्हाला या ठिकाणी ज्ञान होणे गरजेचे आहे. म्हणून भविष्य काळामध्ये बालसदन आणि बालगृह देत असताना शासनाला एक पॅटर्न ठरविण्याची गरज आहे, एक मास्टर प्लॅन करण्याची गरज आहे. तो सुध्दा करण्यात यावा आणि त्यानुसारच बालसदन आणि बालगृहाला मान्यता देण्यात यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 24 वरील बाब क्र. 30 बाबत बोलणार आहे. यामध्ये पोलिसांसाठी साधनसामग्री खरेदी करण्यासाठी 5 कोटी 53 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, उत्तर महाराष्ट्रातील पाचोरा तालुक्यातील हडसन आणि अंमळनेर तालुक्यातील वावडे, धरणगाव तालुक्यातील साळवा, यावल तालुक्यातील वडोदा, नरडाणा, भडगाव तसेच औरंगाबाद तालुक्यातील सोयगाव या ठिकाणी 30 मार्च ते 1 मे पर्यंत मेंढपाळांच्या पालांवर जवळजवळ 7 दरोडे पडले. जे मेंढपाळ आहेत ते स्वत:ची कच्चीबच्ची घेऊन पोटाची खळगी भरण्यासाठी रानावनामध्ये पाल टाकून राहतात त्यांच्या त्या पालांवर दरोडे पडण्याचे प्रकार सतत सुरु आहेत. या समाजाच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्यामध्ये पोलीस यंत्रणा सपशेल अपयशी ठरलेली आहे. या समाजाची अशी मागणी आहे की, पोलीस त्याचे संरक्षण करु शकत नाही म्हणून निदान आम्हाला शस्त्रपुरवठा करावा. आपण जी साधनसामग्री विकत घेण्यासाठी तरतूद केलेली आहे त्याच्यामध्ये त्यांना आपण लायसन्स देऊन शस्त्रपुरवठा करणार का याबाबत सांगावे. त्यांना आपण शस्त्रपुरवठा करावा अशी माझी मागणी आहे. नाही तर या महाराष्ट्रामध्ये मेंढपाळ जमात पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्यावर दरोडे पडतच आहेत तसेच त्यांच्या आयाबहिणींची इज्जत लुटली जात आहे. त्यांचे सोने लुटले जात आहे. त्यांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण या सरकारने करावे त्यासाठी त्यांना शस्त्रपुरवठा सुध्दा करावा, त्यांना लायसन्स द्यावे अशी मागणी मी या ठिकाणी करीत आहे. गेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये एका पोलीस अधिकाऱ्याला निलंबित करण्याची घोषणा गृह राज्यमंत्री श्री. नितीन राऊत यांनी केली होती. वलगाव पोलीस स्टेशनचे अधिकारी श्री. इंगळे यांना त्याच अधिवेशनामध्ये टॉयलेटमध्ये गळफास लावून एका धनगराचा बळी गेला त्याबद्दल निलंबित करण्याची घोषणा केली पण आजतागायत त्या पोलीस अधिकाऱ्याला निलंबित केलेले नाही. आपण त्यांना ताबडतोब निलंबित करणार काय ? तसेच आपला आदेश ज्यांनी डवलला त्या अधिकाऱ्यावर सुध्दा आपण कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/ KGS/ MAP/

श्री. प्रकाश शेंडगे ....

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 69 बाबत बोलावयाचे आहे. पशुसंवर्धन खात्याच्या अंतर्गत शेळीमेंढी विकास महामंडळ आहे. त्या महामंडळासाठी प्रत्येक अधिवेशनात निधी मागतो. माननीय श्री. आर.आर. पाटील प्रत्येक ठिकाणी मिळावे घेऊन 25 कोटी रुपये, 100 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. हसन मुश्रीफ यांनी सुध्दा 50 कोटी रुपये जाहीर केले. अशा प्रकारे एकूण 195 कोटी रुपयांच्या घोषणा झाल्या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

गेल्या अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पामध्ये 25 वर्षानंतर एक ओळ लिहिली की, शेळी मेंढी महामंडळाला मागेल तेवढा निधी देण्यात येईल, निधी कमी पडून दिला जाणार नाही. पण अद्याप एक फुटका पैसा सुध्दा या महामंडळाला दिलेला नाही. ही अतिशय चिंताजनक बाब आहे, शासन पैसा देणार नसेल तर तसे स्पष्ट सांगावे, पण अर्थसंकल्पात अशी ओळ लिहून या समाजाची फसवणूक करु नका. आतापर्यंत एकाही धनगराचा विकास झालेला नाही. त्यांचा विकास करण्यासाठी निधी कधी देणार ते सांगावे अशी मी मागणी करतो. शेळी मेंढी गट वाटपात भयंकर भ्रष्टाचार झाला त्यासाठी गोरख मेघ समिती नेमली गेली, पण आजतागायत कोणावरही कारवाई झालेली नाही. या समितीने सर्व संचालक मंडळाला दोषी धरलेले आहे. एकाही संचालकाविरुध्द शासनाने कारवाई केलेली नाही, माझी मागणी आहे की, सर्व दोषी संचालकांना ताबडतोब अटक करावी आणि त्यांच्यावर कारवाई करावी.

सभापती महोदय, दुग्धव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 79, बाब क्र.74 वर बोलतो. मिरज मध्ये चांगली डेअरी आहे. या डेअरीसाठी 50 कोटी रुपये खर्च करुन ती अत्याधुनिक केली होती. मागील दोन अधिवेशनामध्ये मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, ती डेअरी बंद करण्याचा शासनाचा विचार नाही. सांगली जिल्हयात दुधाचा महापूर असताना आज ही डेअरी बंद झाली आहे. 50 कोटींची मशिनरी सडत चालली आहे. मागास भागाचा विकास करणारी डेअरी पुन्हा चालू करणार आहे का की पुन्हा ही डेअरी दूध संघाच्या घशात घालण्याचा प्रयत्न केला जात आहे याचे स्पष्टीकरण करण्यात यावे अशी विनंती करतो. कवठेमहांकाळ दूध संघावर 15 वर्षे प्रशासकीय कारभार सुरु आहे. जे लोक यामध्ये दोषी आहेत त्यांचेच प्रशासकीय मंडळ 15 कार्यरत आहे. निवडणूक नाही, काही नाही. मी दोन अधिवेशनामध्ये मागणी केली आहे, याबाबत सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.मदन पाटील यांना माहिती आहे. या प्रशासकीय मंडळाचा कारभार बिनधास्तपणे कोणत्याही नियंत्रणाशिवाय चालू आहे. माझी सन्माननीय दुग्धव्यवसाय मंत्र्यांकडे मागणी आहे की, हे प्रशासकीय मंडळ ताबडतोब बरखास्त करुन तेथे निवडणूक घ्यावी आणि दोषी असणा-यांविरुध्द कारवाई करावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

सभापती महोदय, यानंतर मत्स्यव्यवसाय या विषयावर बोलतो. वरळी-वांद्रे सागरी सेतूचे उद्घाटन होणार आहे. कोळी समाजाने आंदोलन केले म्हणून 500 कोटींचे काम 1600 कोटींपर्यंत पोहोचले. त्याचा लाभ त्या कंत्राटदाराला झाला आहे. आम्हाला कोळी बांधवांचे हित जपावयाचे आहे असे कारण सांगितले गेले. परवा एक कोळी बांधव म्हणाला की, लवकरच या पुलाचे उद्घाटन होणार आहे. पण सुरु होणा-या वाहतुकीच्या प्रदूषणामुळे, आवाजामुळे कोळी बांधवांचा पारंपारिक व्यवसाय अडचणीत येणार आहे. आमचे काय होणार आहे असा प्रश्न त्या कोळी बांधवांना पडला आहे. माझी सन्माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या सर्व कुटुंबाचे पुनर्वसन केले पाहिजे, त्यासाठी 100-200 कोटी रुपये खर्च केले पाहिजेत. शासनाने त्या कंत्राटदाराला 1600 कोटी रुपये दिले आहेत, अशा परिस्थितीत कोळी बांधवांच्या पुनर्वसनासाठी 200 कोटी रुपये खर्च करावेत, त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नोकरीत घ्यावे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, गोडया पाण्यातील मासेमारीचा ठेका धनदांडग्यांना देण्याचे काम सध्या सुरु आहे. या महाराष्ट्रामध्ये पारंपारिक भोई समाज गोडया पाण्यातील मासेमारी करीत आलेला आहे. त्यामुळे हे ठेके भोई समाजालाच मिळाले पाहिजेत अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी कामगार विभागाच्या बाब क्रमांक 179, पान क्र.221 वर बोलतो. शासनाने 50 हजार नवीन सुरक्षा रक्षकांची भरती केली जाईल असे आश्वासन या सभागृहात दिले होते. परंतु सुरक्षा रक्षकांची भरती झालेली नाही. परराज्यातून लोक बिनदिक्कतपणे येथे येत आहेत. तेथील लाखो सुरक्षा रक्षक येथे कामावर आहेत. माझी सन्माननीय कामगार मंत्र्यांना विनंती आहे की, ताबडतोब 50 हजार सुरक्षा रक्षकांची भरती केली जावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 194, पान क्रमांक 225 वर बोलत आहे. शासनाने 70 कोटींची मागणी केली आहे. भटक्या विमुक्तांच्या वाडया वस्त्यांना वीज देण्याची मागणी यानिमित्ताने करीत आहे. येथे आपण लोडशेडिंगबद्दल बोलतो, परंतु त्यांच्या घरात 60 वर्षे अंधार आहे. सन्माननीय ऊर्जा मंत्री येथे सांगतात की, राजीव गांधी ग्रामीण विद्युत योजनमध्ये त्यांच्या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

गावांचे विद्युतीकरण केले जाईल. परंतु तेच तेच उत्तर दिले जात आहे. या वाडया वस्त्यांमध्ये कधी वीज दिली जाणार आहे, त्यांचा अंधार कधी दूर केला जाणार आहे ही माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उद्योग विभागाच्या मागणीवर बोलू इच्छितो. कवठेमहांकाळ या दुष्काळी तालुक्यामध्ये एमआयडीसी जाहीर करुन 20 वर्षे झाली आहेत. श्री.शिवाजीराव शेंडगे या खात्याचे मंत्री असताना त्यांनी एमआयडीसी जाहीर केली होती. आता त्या एमआयडीसीचे काय झाले ते समजत नाही. त्याबाबत कोणी बोलण्यास तयार नाही. या दुष्काळी भागात उद्योग आणण्यासाठी कवठेमहांकाळची एमआयडीसी ताबडतोब कार्यान्वित करावी अशी मी मागणी करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे...)

जलसंपदा विभागाच्या पृ.क्र. 182 वरील बाब क्रमांक 154 मध्ये मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ताकारी, म्हैसाळा,टेंभू हे प्रकल्प गेल्या दहा-दहा वर्षापासून निधी अभावी रखडलेले आहेत. माननीय वित्त मंत्र्यांनी अनुशेष संपल्याचे सांगितलेले आहे.तेव्हा ताकारी, म्हैसाळा, टेंभू या प्रकल्पासाठी भरीव तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

महसूल व वन विभागाच्या पृ.क्र.42 वरील बाब क्रमांक 51मध्ये वनीकरण व इतर योजनांसाठी 57.87 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, 19 वनक्षेत्रामध्ये चराईसाठी क्षेत्र उपलब्ध आहे. परंतु अजूनही पुणे, सोलापूर नगर सारख्या जिल्ह्यामध्ये "क" वर्ग वन उपलब्ध असताना ते चराईसाठी का उपलब्ध करुन दिले जात नाही ? ते क्षेत्र चाराईसाठी उपलब्ध करुन द्यावे अशी माझी मागणी आहे.

महसूल व वन विभागाच्या पृ.क्र. 47 वरील बाब क्रमांक 61 मध्ये दंगलीतील मृतांच्या नातेवाईकांना निवृत्तिवेतन देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, कोकणठाणे, ता. कोपरगाव जिल्हा अहमदनगर येथे जेव्हा पोलिसांनी जमावावर गोळीबार केला त्यावेळी रस्त्याच्या एका बाजूला असलेला मेंढपाळ दत्तात्रय पुंडलिक दैने हा ठार झाला. त्याच्या नातेवाईकांना फक्त 25 हजार रु. मदत देण्यात आली. दंगली अथवा अन्य घटनांमध्ये मृत्यू पावलेल्यांच्या नातेवाईकांना ज्या प्रमाणे मदत करण्यात येते तशी मदत दत्तात्रय पुंडिलिक दैने यांच्या नातेवाईकांना करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

पर्यटन विभागाच्या पृ.क्र.510 वरील बाबीमध्ये करण्यात आलेल्या तरतुदीच्याअनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सांगली जिल्ह्यातील दंडोबाचा डोंगर हे पर्यटन क्षेत्र असून या पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी गेल्या 20वर्षामध्ये एकही नया पैशाचीही तरतूद केलेली नाही. तेव्हा पर्यटन क्षेत्र म्हणून या दंडोबाच्या डोंगराचा विकास करण्यासाठी निधीची तरतूद करावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माझे म्हणणे थोडक्यात मांडणार आहे. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. रमेशचंद्र बंग यांचे मी मनापासून आभार मानतो. या सदनामध्ये मी, माझ्या रेशनिंग कार्डाचा निर्णय लागत नाही,असे सांगितल्यानंतर त्याच दिवशी मी घरी पोहोचेपर्यन्त रेशनिंग कार्ड येऊन पोहोचले होते. अशा कार्यक्षमतेने जर तुमचे सरकार चालले तर आम्हाला सरकारवर टीका करण्याचा प्रश्नच येणार नाही. परंतु मी सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांचेही अभिनंदन करतो. कारण त्यांनी आपल्या भाषणामध्ये हे सरकार कसे चालले आहे, या सरकारचा कारभार कसा गलथानपणाचा आहे ते सांगितले. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी हाफकिन इन्स्टिटयूट संबंधीचा मुद्दा उपस्थित केला. सर्पदंशावरील लस त्या ठिकाणी तयार केली जाते. त्या हाफकिन इन्स्टीटयूट संबंधी शासनाने काय निर्णय घेतलेला आहे याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. तसेच माहूर येथील रेणुकामाता मंदिराच्या ठिकाणी असलेल्या दुकानांचा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे. त्याबाबतीत काय निर्णय घेतलेला आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

सभापती महोदया, मी येथे बाब क्रमांकाचा उल्लेख करीत नाही. परंतु गृह खात्याच्या मागण्यांवर बोलत असताना आपण येथे काय बोलतो त्यापेक्षा जनता काय बोलते याला महत्व आहे. सभापती महोदय, आजच्या "लोकमत" या वृत्तपत्रामध्ये "डॉ. पद्मसिंह पाटील निर्दोष सुटतील"या मथळयाखाली बातमी छापून आलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात अटक झालेले डॉ. पद्मसिंह पाटील यांना राष्ट्रीय काँग्रेसने पाठीशी घातले असल्यामुळे ते निर्दोष सुटतील. जनतेलासुध्दा हे माहीत आहे. सीबीआयच्या बातमीच्या संदर्भात मी या सदनामध्ये बोललो होतो. ....

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शोधनेसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

तुम्ही जी चर्चा केली.....

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहाची प्रथा आणि परंपरा अशी आहे की, बाब क्रमांक सांगणे व त्यानंतर आपल्या भाषणाला सुरुवात करणे. सन्माननीय श्री.दिवाकर रावते यांच्या विषयी मला नितांत आदर आहे. त्यांनी कुठलीही बाब सांगितली नाही. ते कोणत्या बाबीवर बोलता आहेत याची आम्हाला माहिती मिळत नाही. मी आपल्या माध्यमातून त्यांना विनंती करतो की, त्यांनी बाब क्रमांक नमूद करुन भाषणास सुरुवात करावी. अन्यथा या अनिष्ट प्रथा सभागृहात सुरु होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बाब क्रमांक 32 पान क्रमांक 25 च्या अनुषंगाने मी बोलतो आहे. मी सुरुवातीलाच बोललो की, सभागृहाचा वेळ जाईल म्हणून मी बाब क्रमांकाचा उल्लेख करीत नाही. आजच्या "दै.लोकमत" या वृत्तपत्रात जे पत्र आले आहे मी या ठिकाणी वाचून दाखवितो आहे. मी माझे मत सांगत नाही. जनता आपल्याबद्दल काय म्हणते आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. त्या वृत्तपत्रातील पत्रात असे म्हटले आहे की, पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणात अटक झालेले डॉ.पद्मसिंह पाटील यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसने पाठिशी घातल्याचे पाहून आश्चर्य वाटले नाही. या प्रकरणाचा निकाल काय लागणार हे जनतेला सुध्दा माहित आहे. महाराष्ट्रातील पोलीस, सी.आय.डी.आणि सी.बी.आय. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या हातात आहे. डॉ. पद्मसिंह पाटील निर्दोष सुटतील यात शंका नाही असे वाटते. सत्यजित भिसे हत्ये प्रकरणानंतर श्री. नारायण राणे यांचा बंगला जाळला गेला. श्री. राणे यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केल्या नंतर या प्रकरणाला कलाटणी मिळून कॉंग्रेस, राष्ट्रवादीच्या संगनमताने बंगला जाळणारे व सत्यजित भिसेंचा खून करणारे निर्दोष सुटले. याचीच पुनरावृत्ती होऊन खासदार डॉ. पद्मसिंह पाटील निर्दोष सुटतील असे जनतेला वाटते. पत्र लिहिणा-याचे नाव श्री. अरुण पा.खटावकर असे आहे. हे पत्र अतिशय बोलके आहे. आपण काय म्हणतो ? कुठे बोलतो आहे ? कोणती हरकत घेतो ? आपण अंर्तमुख झाले पाहिजे. आपल्या कायदा व सुव्यवस्थेबद्दल भूमिका काय आहे याबाबतची माहिती जनतेला सांगणे आवश्यक आहे. मी जे बोलणार आहे, त्याला बाब क्रमांक नाही. या सभागृहात शासनाकडून सांगितले गेले होते की, सावकारी कायदा सभागृहासमोर आणला जाईल. परतु उद्याच्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. परंतु त्यासंबंधीचे विधेयक मला कामकाज पत्रिकेत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

दिसून आले नाही. सावकारी जाचामुळे अनेक ग्रामस्थ आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत सात ते आठ विधेयके दाखविण्यात आली आहेत. परंतु त्यात सावकारी प्रथा बंद करण्यासंबंधीचे विधेयक मला दिसून आले नाही. मी अतिशय खेदपूर्वक सांगतो की, झुणका भाकर केंद्राच्या बाबतीत या सभागृहात सतत चर्चा झाली आहे. हे अधिवेशन उद्या संपते आहे. त्यानंतर नवीन सरकार येईल. कोणाचे सरकार येईल ते मी सांगू शकत नाही. ते या सदनातील प्रश्न मांडू शकणार नाहीत. 750 जुनी झुणका भाकर केंद्रे चालू ठेवावीत. उर्वरित 4000 झुणका भाकर केंद्रे बचत गटाला देण्यात यावीत. यासंदर्भात मी बैठकीत विषय उपस्थित केला होता. परंतु त्याबाबतीतील कार्यवाही आम्हाला कळलेली नाही. ग्रामीण भागात जी झुणका भाकर केंद्रे चालू आहेत, ती तशीच चालू ठेवावीत. मुंबईतील झुणका भाकर केंद्राचा निर्णय घेतला गेलेला आहे. मुंबई सोडून इतरत्र ठिकाणच्या झुणका भाकर केंद्राच्या बाबतीत शासनाने त्वरीत निर्णय घ्यावा अशी विनंती करतो. या ठिकाणी मी स्नॅक बाईटच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे, त्याबाबतीत माननीय औषधीद्रव्ये विभागाच्या मंत्र्यांनी सभागृहात खुलासा करावा अशीही विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाची बाब क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 7 च्या अनुषंगाने मी माझे विचार व्यक्त करणार आहे. निवडणूक कर्मचारीवर्गास व मतमोजणी कर्मचारीवर्गास अतिरिक्त तरतूद निर्धारित करण्यात आली आहे. त्याची वितरण प्रणाली पारदर्शक व तप्तर स्वरुपाची असावी. संबंधित कर्मचा-यांपर्यंत ती रक्कम पोहोचत नाही. आमच्या शिक्षक वर्गास प्रत्येक निवडणुकीच्या वेळी राबवून घेण्यात येते, परंतु त्यांना मोबदला दिला जात नाही असा अनेक वेळेचा आम्हाला अनुभव आहे. यासंबंधी तक्रारी करुन सुध्दा निवडणूक अधिकारी वा जिल्हाधिकारी या गंभीर गोष्टीकडे लक्ष घालत नाही. वितरण व्यवस्था चांगली झाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 69 बियाण्याच्या मूळ वाणाचे जतनीकरण करणे ही कृषी विभागाची बाब आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे.....

ओरिजनल सिड्सचे जतन करण्याची तरतूद यामध्ये दिसून येत नाही. ती तरतूद होण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षण विभाग, पृष्ठ क्र.86 यामध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी तरतूद नाही. ती तरतूद करावयास पाहिजे. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, पृष्ठ क्रमांक 222, बाब क्र.182 शासनाने असंघटित कामगारांसाठी स्मार्ट कार्ड देण्याची कल्पना मांडलेली आहे. परंतु त्यासाठी तरतूद मात्र कमी केलेली आहे. बाब क्र.201, पृष्ठ क्र.227 गामोद्योग वसाहतीची कल्पना चांगली आहे, स्वागतार्ह आहे. परंतु या वसाहतींचे स्वरुप मात्र स्पष्ट नाही. ते स्पष्ट होण्याची आवश्यक आहे. बाब क्र.202 बलुतेदार संस्थांच्या सभासदांना वित्तीय सहाय्यासाठी तरतूद केलेली आहे. परंतु ज्या बलुतेदार संस्था आहेत त्या अतिशय भ्रष्टाचारयुक्त कारभार करतात आणि तो पैसा प्रत्यक्ष लाथार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. तेथे पारदर्शकता यावी, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.संजय केळकर)

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले बहुमोल विचार मांडले, मार्गदर्शन केले, चांगल्या सूचना मांडलेल्या आहेत. ग्राम विकास आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागावर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, सुभाष चव्हाण या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले बहुमोल विचार मांडलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी नौकांसाठी अनुदान देण्यापेक्षा नद्यांवर पूल बांधावे अशी सूचना केलेली आहे. राज्यातील मोठया जलाशयाच्या किना-यावरील गावातील प्रवाशांसाठी तसेच नदी किना-यावरील गावासाठी लाँच पुरविण्यासाठी अनुदान दिले जाते. नदीवर पूल बांधण्याचे काम सार्वजनिक विभागाशी संबंधित आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लाँच पुरविण्यासंबंधी सूचना केलेली आहे. सन 2009-10 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयासाठी ग्रामपंचायत विजयदुर्ग व ग्रामपंचायत मोंड करीता 20 आसन क्षमतेच्या दोन यांत्रिकी नौका उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे आणि त्यासाठी 8 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेले आहेत. सन 2007-08 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयासाठी एक लाँच खरेदी करण्यासाठी 15 लाख रुपये अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सदर लाँच आता कार्यान्वित झालेली आहे. ओसरगाव, तालुका कणकवली येथील महिला बचत गटांचा मेळावा डी.आर.डी.ए.ने आयोजित केला, असे त्यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, सदर मेळावा डी.आर.डी.ए.ने आयोजित केलेला नव्हता. शिक्षण प्रसारक मंडळ कणकवली यांनी सदरचा मेळावा आयोजित केला होता. मंडप, भोजण, पाणी इत्यादी खर्च संस्थेने केला होता. आमंत्रण देखील संस्थेनेच पाठविले होते. यातील मार्केटिंग प्रशिक्षण एका दिवसाचे असल्याने लाभ धारक वाटल्यावरुन, संस्थेच्या आमंत्रणावरुन सुमारे 7 हजार बचत गट सदस्यांना प्रशिक्षणासाठी पाठवून डी.आर.डी.ए.ने केवळ बस भाडे उपलब्ध करुन दिले होते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिद्धाराम म्हेत्रे.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आदिवासी विभागासाठी 26 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागण्यांवर चर्चा करतांना सांगितले. आदिवासी शाळांमध्ये दरवाजे नाहीत, असे त्यांनी सांगितले. परंतु हे वैयक्तिक लाभासाठी देण्यात आले होते. आश्रमशाळांमधील कामे आदिवासी विभागाशी संबंधित आहेत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी शासनाने बचत गटांचे फेडरेशन करण्याची गरज नाही असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु एस.जी.एस.वाय. अंतर्गत सुमारे दोन लाख बचत गट आहेत. त्यांचा आपसात समन्वय व्हावा, प्रशिक्षण व्हावे, एकमेकांच्या उत्पन्नाची माहिती व्हावी यासाठी बचत गटांचे फेडरेशन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार प्रथम 4 वर्षे आदिवासी विभागातील बचत गटांना शासनाकडून अनुदान देण्यात येईल. नंतर फेडरेशन स्वयंपूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यानी 4 ते 5 टक्के व्याज दराने कर्ज देणे आवश्यक आहे, अशी सूचना केलेली आहे. एस.जी.एस.वाय. ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून त्यांनी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यावर शासनाकडून अनुदान दिले जाते.

यानंतर श्री.भोगले .....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे.....

4 टक्के व्याज दराने दारिद्र्य रेषेखालील महिला बचत गटांना कर्ज देण्यासाठी अनुदान देण्याची योजना राज्य शासनाने सुरु केली आहे. विक्री केंद्रात चायनीज वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात असे सांगण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूच विक्री केंद्रात उपलब्ध असतात. तथापि माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चायनीज वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात का याची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल. महिला बचत गटांना 4 टक्के व्याज दराने कर्ज मिळाले नाही असा सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा मांडला होता. 2008-09 या वर्षात 30 मार्च, 2009 रोजी 10 कोटी रुपये डीआरडीएला वाटप करण्यात आले. व्याजाची रक्कम त्यांच्या खात्यावर घ्यायची आहे. त्यासाठी 2008-09 नियमित परतफेड केलेल्या गटांची यादी प्राप्त होणार आहे. बचत गटांना 10 कोटी रुपये त्यावेळी वितरित करण्यात आल्यानंतर लोकसभेची आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे अनुदान वितरित होऊ शकेले नाही. आता ते काम सुरु आहे. सभापती महोदय, ग्रामविकास विभागाच्या मागण्या क्रमांक 213, 216, 218, 219, 222, 225 व पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या मागण्या क्रमांक 397, 398 या सर्व मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला त्या सर्वांचे मी सर्वप्रथम आभार मानतो. खास करुन कोकणातील सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, विनोद तावडे, परशुराम उपरकर, किरण पावसकर, अरविंद सावंत यांनी कोकणातील पर्यटनासंबंधीचे प्रश्न याठिकाणी मांडले. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, लवकरच कोकणामध्ये कॅबिनेट बैठक घेणार आहोत. पर्यटनासाठी विशेष पॅकेज देणार आहोत. ज्याप्रमाणे विदर्भ आणि अमरावती विभागासाठी एक समिती नेमली होती त्या समितीच्या माध्यमातून त्या भागातील दोन्ही सभागृहाच्या आमदारांची बैठक घेऊन प्रत्येक आमदारांकडून प्रस्ताव मागवून घेतले. त्यांच्या सूचना मागविल्या. अमरावती आणि विदर्भात पर्यटनाचा विकास कशा पध्दतीने झाला पाहिजे या दृष्टीने प्रयत्न केले. लवकरच आपण कोकणातील दोन्ही सभागृहातील आमदारांची बैठक घेत आहोत. नवीन पॅकेजमध्ये कोणती विकासाची कामे घ्यावीत याबाबत तुमच्या सजेशन्स घेऊन त्या पॅकेजमध्ये इन्क्लूड करु. विदर्भ पर्यटनासाठी सन्माननीय सदस्य श्री.मानकर यांनी मुद्दा मांडला आहे. ताडोबा व पेंच येथील पर्यटनाचे काम वन विभागाला दिले असून विदर्भातील इतर मेगा प्रकल्पांचे प्रस्ताव तयार करुन ते केंद्र शासनाकडे पाठविले आहेत. लवकरच त्या प्रस्तावांना मान्यता मिळणार आहे. सभापती महोदय, आनंदाची बाब म्हणजे डेक्कन ओडिसी ही ट्रेन आता विदर्भात आणणार आहोत. ती ताडोबा आणि त्या भागात येणार आहे. वन विभागास केंद्र सरकारकडून पैसा येणार आहे आणि महाराष्ट्र शासन देखील विशेष तरतूद बजेटमध्ये करीत आहे. वाईल्ड लाईफ आणि इको टूरिझम प्रमोट करीत असताना विदर्भ आणि अमरावती विभागात जास्तीत जास्त इको टूरिझमला स्कोप आहे. त्यासाठी वन विभागाने पुढाकार घेतला आहे. लवकरच तेथे काम सुरु होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी बेलापूर किल्ल्यासंबंधीचा मुद्दा मांडला आहे. तो मुद्दा तपासून घेतला जाईल. स्टेट एएसआयकडे की सेंट्रल एएसआयकडे ही बाब आहे हे पाहून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी गुप्ता टूरिझम यांच्याकडून रायगड येथील रिसॉर्टसंबंधी आकारल्या जाणाऱ्या रक्कमेसंबंधीचा मुद्दा मांडला होता. ही बाब तपासून घेऊ. तेथे ज्या सुविधा पुरविल्या जातात त्या चांगल्या दर्जाच्या असतील तर 200 ते 900 रुपये चार्ज आकारतात ते जस्टीफाय राहील. परंतु ॲमेनिटीज उपलब्ध नसतील तर.....

नंतर 5एन.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

आपण त्यांना बोलावून त्यांच्यावर कारवाई करु. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी स्मशान भूमीसाठी पर्यटन विभागाकडून निधीची मागणी केली. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, पर्यटन विभागामार्फत स्मशान भूमीसाठी आपण पैसे देत नाही तसेच यापूर्वी सुध्दा असा निधी दिलेला नाही.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी रॅगिंगसंबधीचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, शासनाकडून प्रत्येक कुलगुरुंना 31 मार्च, 2009 रोजी पत्र पाठविण्यात आले असून त्या पत्राच्या माध्यमातून ज्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत त्या मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

कॅन्सर हॉस्पिटलच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सूचना केली त्या अनुषंगाने मी सदनाला माहिती देत आहे की, राज्यातील प्रत्येक रिजनमध्ये एक कॅन्सर हॉस्पिटल शासन उघडणार आहे. मुंबईतील टाटा हॉस्पिटलवर मोठ्या प्रमाणात लोड येतो म्हणून कामा या सरकारी हॉस्पिटलमध्ये कॅन्सरची ट्रिटमेंट मिळावी म्हणून माननीय केंद्रीय मंत्री श्री. मुरली देवरा यांनी 20 कोटीचा निधी पेट्रोलियम विभागातून दिलेला आहे. त्याची ऑलरेडी टेंडरिंग प्रोसेस झाली व त्यातून नवीन लिनियर एक्सीलेटर मशिन, एमआरआय मशिन नव्याने घेणार आहोत. या हॉस्पिटलमध्ये रेडियोथेरपी, केमोथेरपीची ट्रिटमेंट आपण देऊ शकतो. अशा प्रकारे प्रत्येक रिजनला असे कॅन्सर हॉस्पिटल स्टार्ट करणार आहोत. त्यात प्रामुख्याने औरंगाबाद येथे भूमीपुजन केले असून हॉस्पिटलच्या इमारतीचे काम सुरु झाले आहे. तसेच अंबेजोगाई येथील हॉस्पिटलसंबंधीचाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, या हॉस्पिटलसाठी ऑलरेडी 9-10 इक्विपमेंटओपीडी आणि इतर ट्रिटमेंट करता यावी त्यासाठी निधी मिळावा म्हणून या बजेटमध्ये तरतूद केली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात फी रिअम्बर्समेंटसंबंधी एस.सी., एस.टी. च्या विद्यार्थ्यांना 100 टक्के प्रोफेशनल कोर्ससाठी ज्याप्रमाणे फी रिअम्बर्स करण्यात येते त्याच धर्तीवर ओबीसीच्या विद्यार्थ्यांना देखील 50 टक्के फी रिअम्बर्समेंट करावी व त्यासाठी आदिवासी कल्याण मधून पैसे रिलीज करताना उशिर होतो. या अनुषंगाने मला असेही सांगावयाचे आहे तसेच माननीय आदिवासी विकास मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. म्हणून या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

वर्षी उच्च ॲकेडमिक वर्षापासून टेक्नीकल प्रॉब्लेम्स सॉर्ट आऊट करुन घेऊ.

त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी लायब्ररीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मुद्दा उपस्थित करताना सांगितले की, ग्रंथालयांमध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. परंतु ग्रंथालय हे आपले कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या बाबतीत असा निर्णय घेणे शक्य होणार नाही. तसेच मी याबाबत असे सांगू इच्छितो की, संपूर्ण देशात आपले राज्य हे एकच राज्य असे आहे की, जे 65 कोटी रुपये ग्रंथालयांना अनुदान देते. त्या रकमेत 50 टक्के रक्कम नवीन पुस्तके खरेदी करण्यासाठी आणि 50 टक्के रक्कम इतर खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच ऑनरेरियमसाठी खर्च होते. ही रक्कम गेल्या पाच वर्षात आपण दुप्पटीने वाढविलेली आहे. दरवर्षी ग्रंथालयांची मागणी येतच राहते. प्रत्येक अधिवेशनात काही ना काही तरी मागणी केली जाते. त्यात वेतनश्रेणी द्या अशीही मागणी होते. परंतु ग्रंथालयातील कर्मचारी हे सरकारी कर्मचारी नसल्याने त्यांना आपण अशा प्रकारे वेतनश्रेणी देऊ शकत नाही. तसेच फायनान्शियल इम्प्लीकेशन्स सोडून पत्की समितीने ज्या शिफारशी केल्या आहेत त्या आम्ही स्वीकारतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुरेश शेट्टी....

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी कसाबच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कसाबला प्रोटेक्शन देण्याचे आमचे काही इंटेन्शन नाही. जे. जे. हॉस्पिटलमध्ये जेल वॉर्ड आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून कन्व्हीक्टस तसेच आरोपी आहेत त्यांना जर रुग्णालयाची गरज लागली तर जे. जे. हॉस्पिटलमध्ये त्यांना भरती केले जाते. जे.जे. हॉस्पिटलमध्ये त्यासाठी जेल वॉर्ड असून तेथे ऑर्डिनरी कैद्यांसाठी त्याचा उपयोग केला जातो. परंतु जे हाय रिस्क पोटँशिल कन्व्हीक्टस् असतात, व्हीआयपी कन्व्हीक्टस् असतात त्यांच्यासाठी वेगळी हॉस्पिटलची व्यवस्था केलेली आहे. बॉम्ब ब्लास्टचे आरोपी तसेच जे मोठे गुन्हेगार असतात त्यांना संरक्षण देण्याची गरज असते. त्यांना आपण जनरल वॉर्डमध्ये ठेवू शकत नाही. म्हणून नवीन वॉर्डसाठी सिक्यूरीटी एजन्सीबरोबर चर्चा करुन 45 नवीन वॉर्ड स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मोठे कैदी महाराष्ट्रातून कोठूनही आले आणि त्यांना प्रोटेक्टीव्ह हॉस्पिटलमध्ये ठेवायचे असेल तर त्यासाठी आपण हा वॉर्ड बांधत आहोत.

सभापती महोदय, बोगस कॉलेजेसच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी उल्लेख केलेला आहे. ज्या रजिस्टर्ड संस्था नाहीत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये यासाठी आपण वर्तमानपत्रात जाहिरात देत असतो तसेच वेबसाईटवर सुध्दा यासंदर्भात माहिती दिली जाते. आपण स्पेसिफिक केसच्या संदर्भात माहिती दिली तर आम्ही संबंधितावर निश्चित कारवाई करु.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, जी बोगस कॉलेजेस आहेत त्यांची नावे तुम्ही दिली पाहिजे. ज्यांना मान्यता नाही अशा कॉलेजेसची आपण नावे दिली पाहिजेत.

डॉ.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, बोगस कॉलेजेसची नावे आमच्याकडे असती तर आम्ही त्यांच्यावर कारवाई केली असती. जी रेक्ग्नाईज्ड कॉलेजेस आहेत त्यांची यादी आम्ही वेबसाईटवर देऊ. सन्माननीय सदस्यांकडे स्पेसिफिक माहिती असेल तर ती त्यांनी द्यावी जेणेकरुन संबंधित कॉलेजेसवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, बोगस कॉलेजेसच्या संदर्भातील यादी मी सभागृहात दिलेली आहे. तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी तीन महिन्यात काय कारवाई केली याची माहिती सभागृहाला दिली जाईल असे सांगितले परंतु अजून पर्यंत ही माहिती मिळालेली नाही.

डॉ. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : माननीय सभापति महोदय, मॉयनारिटी कम्युनिटी से संबंधित इकॉनामिक वीकर सेक्शन के लोगों को मिलने वाली सुविधा रोकी जा रही है. उस बारे में संबंधित डायरेक्टर को लेटर लिखा जाएगा क्या ? उस बारे में माननीय मंत्री महोदय उत्तर नहीं दे रहे हैं. उन लोगों से कहा जाता है कि आपको तो मॉयनिरिटी वेल्फेयर डिपार्टमेंट से स्कॉलरशिप मिलती है

डॉ. सुरेश शेट्टी : ऐसा तो कुछ नहीं है.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, ऐसा हो रहा है.

डॉ. सुरेश शेट्टी : ठीक है, हम इंक्वायरी करेंगे और इस बारे में माननीय सदस्या को जानकारी दे देंगे तथा मदद करेंगे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी इबीसीच्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. एस.सी.साठीचे पैसे सोशल वेलफेअर क**डून** येत असतात आणि एस.टी.साठीचे पैसे ट्रायबल डिपार्टमेंटकडून येत असतात. त्याच प्रमाणे मायनॉरिटीजच्या इबीसीच्या विद्यार्थ्यांच्या पैसे मायनॉरीटी डिपार्टमेंट कडून येत असतात.

श्रीमती फौजिया खान : मेरिटवर इबीसीच्या सर्व विद्यार्थ्यांना सवलत मिळाली पाहिजे. अल्पसंख्यांक आहे म्हणून तुम्ही फॅसिलीटी का थांबवता ?

डॉ. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंदर्भात चौकशी करुन त्यासंदर्भातील माहिती सन्माननीय सदस्यांना दिली जाईल. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून त्यांना पुन्हा विनंती करतो की, त्यांनी उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि पर्यटन विभागाच्या मागण्यांना मान्यता द्यावी.

यानंतर श्री. गायकवाड...s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.शोभा बच्छाव (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) :सभापती महोदय, 2009-2010च्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दिन जव्हेरी, डॉ.दीपक सावंत, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री मोहन जोशी, अशोक मानकर, परशुराम उपरकर, विक्रम काळे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांनी चंद्रपूर येथे महिला रुग्णालय स्थापन करण्याच्या बाबतीत मागणी केली होती. ही बाब तपासून त्या संबंधीचा निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी खाटांच्या अनुशेषा बाबत तसेच जीवनदायी योजनेच्या संबंधी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छिते की, आपल्याकडे एकूण 769 प्राथमिक आरोग्य केन्द्रे असून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी 4 अतिरिक्त खाटा मंजूर करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे खाटांची संख्या वाढविण्यात आली असून त्यानुसार 3 हजार 71 खाटा उपलब्ध आहेत. त्याच बरोबर आपल्याकडे 6 हजार 323 उपकेन्द्रे असून त्या प्रत्येक ठिकाणी एक खाट आणि नंदूरबार, वाशिम, हिंगोली , गोदिया या ठिकाणी अतिरिक्त प्रत्येकी 100 खाटा उपलब्ध आहेत अशा प्रकारे एकूण 11 हजार 872 खाटांचा बॅकलॉग दूर करण्यात आला आहे . प्राथमिक केन्द्रे , उपकेन्द्रे , ग्रामीण रुग्णालये याचा भौतिक अनुशेष पूर्ण करण्यात आला आहे परंतु बाधकाम या वर्षी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. 2001 च्या जनगणनेनुसार आरोग्य संस्थाचा लोकसंख्येच्या आधारावर एक बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे आणि कॅबिनेट समोर त्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

सभापती महोदय जीवनदायी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे ही अत्यंत महत्वाची योजना आहे या योजनेच्या माध्यामातून दीड लाख रुपये हृदय विकारावरील शस्त्रक्रियेसाठी, किडनी ट्रान्सप्लान्टेशनसाठी तसेच कॅन्सरवरील रोग यासारख्या 5 मोठया आजारावरील उपचारासाठी देण्यात येतात .मागील वर्षी 5 हजार 331 रुग्णांना या योजनेचा लाभ देण्यात आला होता.आणि त्यासाठी 23 कोटी रुपये एकूण खर्च करण्यात आला आहे.2009-2010 सालासाठी 45 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. जीवनदायी योजनेतील कोणत्याही रुग्णासाठी निधी कमी पडणार नाही यासंबंधी मी आपल्याला निश्चितपणे ग्वाही देते आरसीच्या अंतर्गत सपूर्ण निधी हा दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार खर्च करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.शोभा बच्छाव ...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी शिरसाणा येथील प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी आणि निवास्थानासाठी निधी उपलब्ध करुन देण्या सबंधी मागणी केली होती त्यासाठी निश्चितपणे निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच पोहनेर प्राथमिक आरोग्य केन्द्राच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध होऊ शकत नसेल तर योग्य जागा शासकीय दराने विकत घेता येईल व ही बाब तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल त्याकरिता डीपीडीसी अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पुणे येथील इएसआयएस हॉस्पिटलसाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासबंधीचा प्रश्न उपस्थित कला होता त्याची दखल घेण्यात निश्चितपणे घेण्यात येईल व औंध येथे 300 खाटांचे जे सिव्हील हॉस्पिटल आहे तेथे पोस्ट मार्टेमची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे तसेच पुणे ग्रामीण रुग्णालयात सुध्दा ही सोय उपलब्ध आहे. वैद्यकीय अधिका-यांच्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, एकूण 7 हजार 281 वैद्यकीय अधिका-यांच्या जागा असून त्यापैकी 608 जागा रिक्त आहेत आणि जिल्हा आरोगय अधिकारी या संवर्गात एकूण 276 जागा असून त्यापैकी 111 जागा रिक्त आहेत.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा बच्छाव...

जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गामध्ये 611 जागांपैकी 361 जागा रिक्त आहेत. त्या जागा भरण्याबाबत महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे या जागा पदोन्नतीने भरण्यात येतील. माननीय सदस्य श्री. अशोक मानकर व माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील वैद्यकीय अधिकारी व अधिक्षकांच्या पदांसंदर्भात विचारणा केली होती. ही पदे लोकसेवा आयोगामार्फत व पदोन्नतीने भरण्यात येतात. मालवण येथे ग्रामीण उप जिल्हा रुग्णालय करण्यासंदर्भात आपण सूचना केली होती. त्या दिशेने निश्चितपणे कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या देखील विचारात घेतल्या जातील. सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 287, 288, 289, 290, 291, 292, 293, 294, 295, 296 अन्वये सादर केलेल्या एकूण 630 कोटी 68 लाख 8 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 231 वरील 10 लक्ष 80 हजार रुपयांची पुरवणी मागणी सभागृहाने मान्य करावी अशी विनंती करते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी बांगला देशींच्या बोगस रेशन कार्डबाबत विचारले होते. त्याचे उत्तर मिळाले नाही.

श्रीमती शोभा बच्छाव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी 1 लाख बांगलादेशींना रेशन कार्ड देण्यात आले असल्याचे म्हटले होते. त्याकरिता विशेष मोहिम राबवून व सर्व्हे करुन बोगस रेशन कार्ड रद्द करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत सांगितले होते. त्याबाबत 1 ऑक्टोबर 2005 पासून 31 ऑक्टोबर 2006 पर्यंत शिधापत्रिका धारकांकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहेत. तसेच, या मोहिमेमध्ये आतापर्यंत 45 लाख 29 हजार एवढया शिधापत्रिका रद्द केल्या आहेत. या रद्द करण्यात आलेल्या शिधापत्रिकेवरील केरोसीन व अन्नधान्य नियतन तात्काळ थांबविण्यात आले आहे. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना निश्चितपणे विचारात घेण्यात येतील. तेव्हा सभागृहाने या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करते व माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा, लाभ क्षेत्र विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या जल संपदा व लाभ क्षेत्र विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय सदस्य सर्वश्री सुरेश नवले, अरविंद सावंत,सुभाष चव्हाण, परशुराम उपरकर, प्रकाश शेंडगे, राजन तेली,विक्रम काळे इत्यादी अनेक माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. सुरुवातीला माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी कोकणातील लघु पाटबंधारे तलावांचे मापदंड बदलण्या संदर्भात मागणी केली. हे मापदंड बदलण्याकरिता मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली मापदंड समिती नेमली असून त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्या अहवालातील शिफारशींवर उच्चाधिकार समितीमध्ये कोकणातील लघु पाटबंधारे विभागाचे मापदंड काय असावेत? ही बाब विचाराधीन आहे. त्यामुळे त्याबाबत लवकरात लवकर निर्णय होईल असा मी आपणास विश्वास देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य प्राध्यापक श्री. सुरेश नवले यांनी बीड जिल्हयातील टुकर लघुपाटबंधारे प्रकल्प तीन वर्षापूर्वी मंजूर होऊन त्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे सांगितले आहे. सन 2009-10 या आर्थिक वर्षामध्ये या प्रकल्पाकरिता जवळपास 39 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मध्यंतरी प्रकल्पग्रस्तांकडून तीव्र विरोध झाल्यामुळे या प्रकल्पाचे काम थांबले होते. त्यामुळे या प्रकल्पासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देऊन कामाला सुरुवात करण्यात येईल असा मी माननीय सदस्यांना विश्वास देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील धामापूर येथील पेशवेकालीन तलावाच्या दुरुस्तीच्या कामासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. सदर तलावाच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकाचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. सदर अंदाजपत्रकाला मान्यता मिळाल्यानंतर त्याकरिता आर्थिक तरतूद केली जाईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी कवठेमहाकाळ तालुक्यातील सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत आपले विचार मांडले. त्याबाबत हे शासन पॉझिटीव्ह आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार . . . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर साहेबांनी देवधरा प्रकल्पाबाबत सांगितले आहे. यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही निश्चितपणे शासनाकडून केली जाईल. तसेच याठिकाणी इतरही सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी 2009-2010 च्या जलसंपदा विभागाच्या बाब क्र.153 ते 171 या पूरक मागण्यांना मान्यता द्यावी. धन्यवाद.

. . . .5 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, आज याठिकाणी 2009-2010 च्या पुरवधी मागण्यांवरील चर्चेमध्ये सर्वश्री.विनोद तावडे, अशोक मानकर, परशुराम उपरकर, राजन तेली, शेंडगेबंधू, श्रीमती मंदाताई म्हात्रे इ.सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्त्य व्यवसाय विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात विविध सूचना केल्या. आपल्याला याठिकाणी सांगितले पाहिजे की, एन.सी.डी.सी.साठी आपण जवळजवळ 47 कोटी 36 लाख रुपये मंजूर केलेले आहेत. यामध्ये आपण पणन, वाहतूक विक्री यासाठी 15 कोटी 15 लाख रुपये देत आहोत. त्यानंतर ट्रक, टेम्पो खरेदी करण्यासाठी अनुदान देण्याकरता, तसेच बर्फ कारखाने, इतर उद्योग, मच्छिमारांसाठी फीश फाईडर व वॉकी-टॉकी इ.घेण्यासाठी अनुदान दिले जाणार आहे.तसेच मच्छिमारांसाठी अत्याधुनिक सामुग्रीकरता दीड कोटी रुपयांची रक्कम मंजूर केलेली आहे.मराठवाडा पॅकेजमध्ये 4 कोटी 75 लाख रुपये मंजूर केलेले आहेत. तसेच कोळंबी बीज संकलन, मत्स्य बीज संकलन व गरीब मच्छिमारांसाठी, जे मत्स्य विक्री करतात, त्यांच्यासाठी 61 लाख रुपयांच्या शीतपेटया व सायकल देणार आहोत. सहकार संस्थांच्या भाग-भांडवलासाठी 80 लाख रुपये मंजूर केले आहेत. कोकणातील बंदर-जेट्या यांची कामे हाती घेतलेली आहेत.त्यासाठी आपण आठ कोटी रुपये मंजूर केले आहेत. जयगड बंदराचे काम आणि इतरही पर्यावरणाच्या संबंधातील कामे राहिलेली आहेत, त्या संदर्भातील प्रक्रिया सुरु आहे.कोचिवडे बंदर, केळवणे, राजापूरी, नवानगर, मिडबाम आणि इतर काही जेट्या आहेत. येथील कामे देखील हाती घेतलेली आहेत. ज्याठिकाणी पर्यावरणाच्या दृष्टीने कामे मागे राहिलेली आहेत, ती नंतर घेणार आहोत. तसेच कोकण पॅकेजमध्ये जेट्यांसंबंधी व मच्छिमारांसाठी आपल्याला जेवढा फायदा करुन घेता येईल, तेवढा करणार आहोत. मागील वर्षी जवळजवळ 31 कोटी 56 लाख रुपये देण्यात आले होते, त्याचे वाटप झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितले की, कोकण पॅकेजमध्ये जे भाग समाविष्ट झालेले नाहीत, त्यांच्या बाबतीत सुध्दा मंजुरी घेऊन, त्यांना देखील कोकण पॅकेजअंतर्गत निधी देऊ.

सभापती महोदय, डेअरी फार्मसाठी सहकार दूध संघांना 50 लाख रुपये देणार आहोत. तसेच डेअरी फार्मसाठी 100 गाई देणार आहोत. यासाठी त्यांना जास्तीतजास्त जेवढे अनुदान देता येईल, तेवढे देणार आहोत. तसेच गोरेगाव येथील पशुसंवर्धन खात्यामध्ये गुण नियंत्रण प्रयोगशाळा काढणार आहोत.त्यानंतर परिक्षणासाठी देखील प्रयोगशाळा काढणार आहोत. तसेच "लाल खुद्रुक"

. . . .5 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या रोगासाठी लसीकरणाचा देखील शोध घेण्यात आला आहे. त्यासाठी 17 कोटी 34 लाख रुपये मंजूर केले आहेत. मराठवाडा पॅकेजसाठी तरतूद केली आहे. तसेच उस्मानाबाद येथील शेळी प्रोजेक्टसाठी आपण जवळजवळ अडीच लाख रुपये मंजूर केले आहेत. तसेच शेळी प्रोजेक्टसाठी 100 टक्के अनुदान दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे आठ जिल्ह्यामध्ये संकरीकरणाचा प्रोजेक्ट हाती घेतलेला आहे. त्यासाठी जवळजवळ एक ते सव्वा कोटी रुपयांचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. तसेच पशु वैद्यकीय संस्था व दवाखान्यांसाठी 6 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच जैविक पदार्थ निर्मितीसाठी व विभागीय रोग अन्वेषणासाठी देखील आपण निधी मंजूर केलेला आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील ....

सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे बंधू यांनी शेळीमेंढी महामंडळाला आर्थिक सहाय्य देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. शेळीमेंढी महामंडळाला आपण आता ताबडतोब अर्थसहाय्य मंजूर करीत आहोत. त्यासाठी तरतूद केलेली नाही. त्यासंदर्भात खात्याचे आकडे येत आहेत. यावेळी ते करणार आहोत. सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 73 ते 80 अशा एकूण 101 कोटी 19 लाख रुपयांच्या 8 पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत (गृह, कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या गृह विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मौलिक विचार मांडले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, प्रकाश शेंडगे, डॉ. दीपक सावंत, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री विनोद तावडे, सुभाष चव्हाण, ॲड. उषा दराडे, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, परशुराम उपरकर आणि दिवाकर रावते साहेब या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी ट्रॉलर भाड्याने घेण्याच्या संदर्भात सांगितले. 750 किलोमीटरसाठी वेगवान बोटी शासनाने घ्याव्यात तसेच 26.11.2008 रोजी मुंबईत झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर या ठिकाणी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी साधनसामग्रीमधून धनगर समाजाला शस्त्र परवाने देण्यासंबंधीचा मुद्दा मांडला. मी सांगू इच्छितो की, सदर साधनसामग्रीमधून धनगर समाजाला शस्त्रे देता येणार नाहीत. कारण या ठिकाणी तशी तरतूद नाही. परंतु निश्चितपणे त्यांनी या ठिकाणी जी सूचना केली ती मी तपासून बघतो. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी कोळी मुलांना खास प्रशिक्षण देऊन त्यांना पोलीस सेवेत घेऊन सागर सुरक्षेसाठी तयार करण्याच्या यासंदर्भात सूचना केलेली आहे. ती सूचना स्वागतार्ह आहे. त्याबाबत मी विभागाला यासंबंधी माहिती कळवतो. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी एखाद्या घटनेत पोलीस अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबियांना मदत करताना योग्य प्रकारे मदतीची पूर्तता करावी अशी सूचना केलेली आहे. निश्चितपणे त्या सूचनेचे स्वागत करतो. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण साहेबांनी पोलिसांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, पोलीस ठाण्याच्या बाजूला योग्य उपहारगृह असावे अशी सूचना केलेली आहे. त्याबद्दल सुध्दा विचार करु. सर्व सन्माननीय सदस्यांनी जे विचार या ठिकाणी मांडले याची निश्चितपणे नोंद घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : बोरीबंदर स्टेशनला जे 52 लोक मृत्युमुखी पडले त्यांना काय देणार आहोत ? त्याची दखल आपण घेतलेली नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MAP/ KGS/ MMP/

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी बोरीबंदर येथे 52 लोक मृत्युमुखी पडले त्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्याबाबत सूचना केलेली आहे. ती बाब तपासून पाहण्यात येईल. सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 21 ते 35, बाब क्रमांक 41 ते 46 तसेच बाब क्रमांक 49 व 50 अशा एकूण 736 कोटी 23 लाख 53 हजार रुपयांच्या 23 पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर कामगार खात्याच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बाब क्रमांक 178 ते 192 आणि

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत....

बाब क्रमांक 207 अशा मागण्या आहेत. एकूण 22 कोटी 44 लाख 77 हजार एवढया रकमेच्या कामगार खात्याच्या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात फक्त सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी आपले विचार व्यक्त केले. बहुतेक विजेची परिस्थिती सुधारल्यामुळे अन्य सन्माननीय सदस्यांनी या विषयावर बोलले नसतील. येणा-या काळामध्ये वाडया वस्त्यांचे विद्युतीकरण केले जाईल. यावर्षी ग्रामीण भागाच्या विद्युतीकरणासाठी 60 कोटी 66 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच अनुसूचित जातीतील नवबौध्द वर्गातील घरगुती जोडण्यांसाठी 25 कोटींची तरतूद प्रस्तावित केली आहे. 40 हजार घरगुती जोडण्या द्यावयाच्या होत्या त्यापैकी 28159 घरगुती जोडण्यांना वीज पुरवठा केला आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत वाडया वस्त्यांचे विद्युतीकरण करण्याचे मागील वर्षी जाहीर केलेले आहे. त्याबाबत मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.सुनील देशमुख : शासनाने या सगळया गोष्टींसाठी 2 हजार कोटींचा नियतव्यय ठेवला आहे. त्यामध्ये सर्व योजनांचा अंतर्भाव केलेला आहे. सभापती महोदय, ऊर्जा खात्याच्या बाब क्रमांक 187 ते 191, 210 ते 212 वरील पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीत आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (आदिवासी विकास राज्यमंत्री) सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी व अन्य सन्माननीय सदस्यांनी मौलिक विचार मांडले आहेत, उपयुक्त सूचना केल्या आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व अन्य सन्माननीय सदस्यांच्या सूचनांबाबत मी सविस्तरपणे उत्तर देऊ शकतो, परंतु वेळेअभावी मी विस्ताराने उत्तर देऊन सभागृहाचा वेळ घेत नाही. मी सभागृहाला विनंती करतो की, बाब क्रमांक 301 ते 333 यावरील पुरवण्या मागण्या संमत कराव्यात...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही केलेल्या सूचनांचे काय झाले ते निदान पत्राद्वारे तरी आम्हाला कळवावे. आम्ही एवढया पोटतिडीकीने मुद्दे मांडतो त्याबाबत मंत्रिमहोदयांकडून आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मेळघाट व शहापूर येथे गॅस कनेक्शनचे वाटप केले जात नाही असा मुद्दा मांडला होता. मेळघाट तालुक्यामध्ये 2387 व शहापूर तालुक्यात 2054 गॅस कनेक्शनचे वाटप केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, तेथे बोगस वाटप झालेले आहे, तेथील मुलींच्या स्नानगृहांची व शौचालयांची स्थिती दयनीय आहे असे ते म्हणाले, परंतु तेथे तशी परिस्थिती नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. आम्ही आपल्याविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करु. त्यांनी आमच्याबरोबर त्या भागात यावे. मी आपल्याला वस्तुस्थिती दाखवितो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सन 2008-09 मध्ये 202 स्नानगृहांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे, 64 नवीन स्नानगृहांचे बांधकाम केलेले आहे, 249 शौचालयांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. 109 नवीन शौचालये बांधलेली आहेत. पिण्याच्या पाण्यांच्या योजनांची दुरुस्ती मोठ्या प्रमाणावर केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या काही त्रुट्या सांगितल्या त्या तपासून त्याबाबतीत पूर्तता करुन घेण्यात येईल. ज्या संस्था बोगस काम करीत असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल आणि त्यासंबंधीची माहिती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल. तेव्हा जलसंपदा, आदिवासी विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपूडकर (राजशिष्टाचार राज्यमंत्री) : सभापती महोदय, राजशिष्टाचार विभागाचे सह्यादी व नंदगिरी हे दोन अतिथीगृह आहेत. या राज्याचे अतिथीगृह व्यवस्थापन, सुरक्षा व अति अति महत्वाच्या आणि अति विशेष मान्यवर व्यक्तींच्या मुंबईच्या भेटीच्या वेळी त्यांचे व्यवस्थापन पाहाण्याकरिता कार्यरत असलेली बिनतारी संदेश यंत्रणा इत्यादीवरील खर्च भागविण्यासाठी बाब क्रमांक 3 मध्ये मागणी करण्यात आलेली असून ही मागणी मान्य करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, वनखात्याच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. सन 2009-2010 मध्ये वार्षिक योजनेला खात्याकडून मंजुरी मिळालेली आहे. सर्वसाधारणपणे राज्याची योजना 171.27 कोटी आणि केन्द्र पुरस्कृत योजना 21.68 कोटीची आहे. म्हणजे 192.95 कोटीची भरीव अशी तरतूद यावर्षी वन विभागाला मिळालेली आहे. वन खाते सुरु झाल्यापासून कधीही 15 किंवा 16 टक्क्यापेक्षा अधिक तरतूद मिळालेली नव्हती. या बजेटमध्ये चांगली तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो. सन 2009-2010मधील नियतव्यय 192.95 कोटी असून सन 2009 मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये 34.57 कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पामध्ये 158.68 कोटी इतका नियतव्यव मंजूर करण्यात आलेला आहे. वन विभागाच्या मागण्या क्रमांक 64 ते 67 या मंजूर करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव या सदनामध्ये आहे.

सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी, सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे व अन्य काही सन्माननीय सदस्यांनी वन विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत भाग घेऊन उपयुक्त अशा सूचना केल्या. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी बोडक्या डोंगरावर ग्रामपंचायतीला झाडे लावण्यास सांगावे अशा प्रकारची सूचना केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण 45 हजार गावे आहेत आणि त्यापैकी वनाच्या संदर्भातील गावे 15300 आहेत. यामध्ये आपण जे्एफएम कमिट्या मार्फत वन व्यवस्थापन योजना राबविली असून आज संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र हा संयुक्त वन व्यवस्थापन राबविण्यामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. 12575 गावामध्ये आपण संयुक्त वन व्यवस्थापन कमिट्या स्थापन केलेल्या आहेत. त्या कमिट्यांकडे वनाचे संरक्षण, संवर्धन आणि लागवड या गोष्टी` सोपविलेल्या आहेत. देखरेखीसाठी 26 लाख 98 हजार हेक्टर जमीन त्यांच्याकडे दिलेली आहे. या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यासाठीही मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. चांगल्या प्रकारचे रोपवन होण्याच्या संदर्भात या सर्व लोकांचे सहाय्य होणार आहे. माझे गाव माझे वन, अशा प्रकारचा एक संकल्प राबविण्यास सुरुवात झालेली आहे. यामध्ये स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून संत तुकाराम वनग्राम योजना महाराष्ट्रामध्ये चौथ्या वर्षी चांगल्या प्रकारे राबविली गेली

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. या योजनेमध्ये गावे भाग घेतात. त्यामुळे गावामध्ये वन आणि वनसंवर्धनाचे उत्कृष्ट असे नियोजन केले जात असल्याचा चांगला अनुभव आम्हाला आलेला आहे. जंगल वाचले पाहिजे आणि वाढले पाहिजे यासाठी केन्द्र सरकारने टेक्निकल इन्स्टिटयूट ऑफ डेहराडून या संस्थेला ट्री मॅपिंगचे काम दिलेले होते. 28 राज्याचे ट्री मॅपिंगचे काम पूर्ण झालेले असून या 28 राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य हे पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र हे जास्त झाडे असलेले राज्य आहे. रस्त्याकडील झाडे मोडलेली, तुटलेली आहेत अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते....

या ठिकाणी कोकणातील वनाच्या संदर्भातील उल्लेख केला गेला. त्या ठिकाणी फक्त आठ टक्के वन आहे. खाजगी वन क्षेत्र त्या ठिकाणी मोठे आहे. खाजगी डोंगरावर मोठया प्रमाणात वन आहे. तेथील वन वृक्षवल्लीने संपूर्णत: भरलेले आहे. त्या ठिकाणी कोणी वनाची तोड केली तर त्यासंदर्भात वन विभागाकडे तक्रारी येत असतात. त्या अनुषंगाने वन विभागाकडून योग्य ती कार्यवाही केली जाते. वनाची तोड होऊ नये यासाठी आवर्जून लक्ष देण्याचे शासनाने ठरविले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी यांनी सांगितले की, वनक्षेत्रातील वन्य प्राण्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय वन विभागाने उपलब्ध करुन दिली पाहिजे. वन क्षेत्रात पाणी साठविण्यासाठी रोजगार हमी योजनेतून मोठया प्रमाणात कामे हाती घेतलेली आहेत. लहान लहान बंधारे, सी.सी.टी.,के.टी.वेअर्स, पाझर तलाव ही कामे हाती घेतली आहेत. त्यामुळे पाणी साठविण्याची कामे आमच्या विभागाकडून करण्यात आली आहेत. जवळपास 250 ते 300 कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत. यापुढे 1 हजार कोटीपर्यंतची कामे वनक्षेत्रात करण्याचा आमचा मानस आहे. ताडोबा आणि बोरिवली वाघ्र प्रकल्पाच्या संदर्भात सूचना करण्यात आली आहे. त्यातही वन विभागाने चांगल्या प्रकारे लक्ष घातले आहे. देशात दहा अभयारण्ये आहेत त्यात महाराष्ट्रातील अभयारण्यांची नावे आलेली आहेत. या ठिकाणी वाघ्र प्रकल्पांत वाघांचे संवर्धन चांगल्या प्रकारे होत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या फौजिया खान यांनी ब-याच सूचना केलेल्या आहे. त्यांच्या सूचनांचा निश्चितपणे आदर करण्यात येईल. त्याचप्रमाणे रानडुक्कर आणि रोही या दोन प्राण्यांमुळे शिकार करण्याची परवागनी दिली आहे. परंतु ती कशी करावयाची, काय करावयाचे यासंदर्भातील अडचणी आहेत. त्या एकत्रितपणे बसून त्यासबंधात चर्चा करुन निर्णय घेऊ. मराठवाडयामध्ये हरणे पकडण्याचे काम सुरु आहे. तेथील लोकांची मागणी होती की, यावर्षी अर्थसंकल्पात 62 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. साडेतीन हजार एकरामध्ये ही सर्व हरणे एकत्र करुन त्यांचे संगोपन चांगल्या प्रकारे करणार आहोत. अशा प्रकारचा प्रकल्प औरंगाबाद येथे प्रथमच राबविला जातो आहे. सर्च आणि लाईट च्या माध्यमातून हरणांना पकडण्याचे काम होणार आहे. त्यात काही त्रुटी आहेत, त्यात निश्चितपणे सुधारणा करण्यात येईल. इतरही काही चांगल्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत, त्या सूचनांचा देखील गांभीर्याने विचार केला जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, हमने जो कंप्लेंट की है उस बारे में ए.सी.बी. के मार्फत इंक्वायरी होनी चाहिए, उस प्रश्न का उत्तर माननीय मंत्री महोदय नहीं दे रहे हैं.

श्री. बबनराव पाचपुते : सभापति महोदय, मेरा उत्तर अभी खत्म नहीं हुआ है. माननीय सदस्या ने बहुत अच्छे सुझाव दिए है, यह बात मैं बोल रहा हूं.

सभापती महोदय, या ठिकाणी पुण्याच्या वन जमिनीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला गेला त्या अनुषंगाने जरुर चौकशी करण्यात येईल. पुण्याच्याच वन जमिनीच्या बाबतीत चौकशी करुन चालणार नाही, महाराष्ट्रात इतरही ठिकाणी वन जमिनीची प्रकरणे आहेत त्यांची देखील चौकशी करण्याचा आम्ही विचार केलेला आहे. चौकशी करुन वन विभागाची जमीन परत मिळाली तर ती गोष्ट अतिशय चांगली आहे.

सभापती महोदय, खाजगी जमिनीच्या बाबतीत सेक्शन 35 (3) एकदा जाहीर झाला की, डीम्ड टू बी फॉरेस्ट अशा प्रकारे होऊन जाते. 1962 पर्यंत डिक्लीअर झाले आहे. त्यानंतर मात्र डिक्लीअर झालेले नाही. महसूलात ती जागा घेतली नाही तर 7/12 उता-यामध्ये नावे चढत नाहीत. अशा जमिनींचे हस्तांतरण पाच,पाच, सहा,सहा वेळा झाले आहे. 1 लाख 56 हजार हेक्टर जमीन आपण डिक्लीअर केली आहे. आता हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे सगळी जमीन वन विभागाने आपल्या ताब्यात घेतलेली आहे. या ठिकाणी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांना लेखी उत्तरे पाठविण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सिंहगड येथील वन जमिनीच्या बाबतीत चौकशी करण्याची सूचना केली आहे. त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : आंजिवडे येथील विना परवाना वृक्षतोड झाली आह, त्याबाबतीत मी सूचना केली आहे. त्या सूचनेबाबत कृपया मला उत्तर मिळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती, त्या सूचनेच्या निवेदनावर चर्चा करीत असताना त्यांच्या प्रश्नाचे मी उत्तर दिलेले आहे. जे.सी.पी. सोडता येतो काय अशा आशयाचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यास अनुसरुन मी सांगितले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सेक्शन 53 प्रमाणे त्यांनी त्यांचा अधिकार वापरुन सदर जे.सी.पी.सोडला आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत वेगळे सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी शेळी-मेढीसाठी चराई क्षेत्र मोठया प्रमाणात उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली आहे. महाराष्ट्रात 21 ठिकाणी शेळया-मेंढयांच्या चराईसाठी वनक्षेत्र राखून ठेवले आहे. वनक्षेत्रातील चराईच्या अनुषंगाने फी घेत होतो. परंतु आता फी घेतली जात नाही. आता फ्री पास केलेला आहे. यामध्ये एकूण 21 क्षेत्र आहेत. बुलढाणा,भंडारा, नागपूर, नांदेड, पश्चिम धुळे, उत्तर धुळे, सिरोंचा, अलापल्ली, गडचिरोली,चंद्रपूर, सावंतवाडी, सातारा, सांगली, अकोला, पुसद या ठिकाणी शेळया मेंढयांसाठी चराई क्षेत्र राखून ठेवले आहे. तसेच वन विभागामध्ये सुध्दा चराई क्षेत्र राखून ठेवलेले आहे....

सभापतीस्थानी माननीय सभापती

यानंतर श्री. बोरले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

आपण सांगित्याप्रमाणे तशा प्रकारची दखल घेतलेली आहे. मला याची कल्पना आहे की, माझे उत्तर जास्त वेळ चालले तर सभागृहाचा जास्त वेळ जाईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवार रावते यांना मी सांगू इच्छितो की, शासनाने एक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. साप चावून मरणा-यांची संख्या महाराष्ट्रात अर्ध्या लाखापेक्षा जास्त आहे आणि दंश होणा-यांची संख्या 3 लाखापर्यंत आहे. हे गरीब लोक आहेत. शेतकरी, शेतमजूर यांचा संबंध आहे. त्यांची नोंद होत नाही. एखादा अपघात होऊन त्यामध्ये एखाद्या माणसाचा मृत्यू झाला तर त्याची चर्चा होतो. एखाद्या ठिकाणी मोठा हादसा झाला तर त्याची चर्चा होते. परंतु साप चावून जे गरीब लोक मरतात त्याची चर्चा होत नाही. साप चावल्यामुळे मृत्यू झाला तर त्यांना प्रमाणपत्र मिळत नाही आणि प्रमाणपत्र मिळाले नाही तर त्यांना विम्याचे संरक्षण मिळत नाही. आता आपण यामध्ये सुसूत्रता आणलेली आहे. आपण सर्प मित्र तयार केलेल आहेत. त्यांचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यांना विम्याचे संरक्षण मिळेल. एम.बी.बी.एस. डॉटरने साप चावून त्या माणसाचा मृत्यू झालेला आहे असे प्रमाणपत्र न दिल्यामुळे त्याला विम्याचे संरक्षण मिळत नाही. यामध्ये आपण सुधारणा केलेली आहे. त्यामुळे याचा शेतक-यांना फायदा होईल. एकही साप मारायचा नाही आणि सापाने चावल्यानंतर एकाही माणसाला मरु द्यायचे नाही, अशा प्रकारचा संकल्प वन विभागाने केलेला आहे आणि यासाठी आम्ही संपूर्ण भारतात पहिली संस्था निर्माण केलेली आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय,.....

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे स्वत:ला धनगर समजून घेतात. त्यांच्याकडे किती शेळया, मेंढया आहेत ? तुम्हा दोघा भावांकडे शेळया, मेंढया तरी आहेत काय ? काय तुम्ही स्वत:ला धनगर समजून घेता. माझ्याकडे शेळया, मेंढया आहेत. तुमच्याकडे शेळया, मेंढया आहेत काय ? तुम्ही खाली बसा. तुम्ही फक्त भाषणे करता. भाषण करण्याच्या पलिकडे काही काम होत नाही. आपण शेळया, मेंढयांचे प्रश्न सोडविलेले आहेत. आपण शेळया, मेंढयांसाठी चरई क्षेत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. आपण त्यांच्याकडून एक पैसा सुध्दा घेत नाही. आपण शेळया, मेंढयांसाठी फुकट चराई क्षेत्र उपलब्ध करुन दिलेले आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, नगर जिल्हयामध्ये शेळया, मेंढयांसाठी चरई क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, नगर जिल्हयामध्ये शेळया-मेंढयांसाठी चराई क्षेत्र उपलब्ध करुन देता येत नाही. जेथे चरई क्षेत्र उपलब्ध करुन देता येते तेथे उपलब्ध करुन देता येईल आणि जेथे देता येत नाही तेथे देता येणार नाही, हे मी सांगितलेले आहे. सभापती महोदय, यांनी शेळया, मेंढयांचे भांडवल करु नये. त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी तुम्ही कोणते काम करणार आहात ? शेळया, मेंढयांमागे त्यांनी जायचे आणि यांनी मात्र सगळीकडे फिरायचे ? त्यांच्या हा व्यवसाय बंद करुन त्यांना दुसरा व्यवसाय उपलब्ध करुन दिला पाहिजे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आपण कोणती व्यवस्था करणार आहात ? त्यांनी कायम शेळया, मेंढया राखाव्यात आणि तुम्ही त्यांचे प्रश्न मांडावेत हे अजिबात बरोबर नाही. एक शेळी, मेंढी चारली तर 8 टनाचा रोलर फिरल्यानंतर जेवढी जमीन दाबली जात नाही तेवढी जमीन एका शेळीच्या किंवा मेंढीच्या खुराने दाबली जाते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शक्य तेवढी जमीन आम्ही उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यापेक्षा जास्त जमीन उपलब्ध करुन देता येणार नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माननीय वनमंत्री महोदय हरिभक्त परायण आहेत. माननीय वनमंत्री महोदयांचे हे तत्व असेल तर ते बरोबर नाही. एका शेळी, मेंढीचे वजन 3 ते 4 किलो असते आणि माननीय मंत्री महोदय म्हणतात की, शेळया, मेंढयांमुळे जमीन कडक होते.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांच्याविषयी मला आदर आहे. त्यांच्या वडिलांनी आणि मी खालच्या सभागृहामध्ये एकत्र काम केलेले आहे. त्यांचे विचार महत्वाचे आहेत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, धनगर समाजाने मत दिल्यामुळे माननीय श्री.शरद पवार साहेब निवडून आलेले आहेत.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे अतिशय पोटतिडकीने प्रश्न मांडतात....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार साहेब ते बघून घेतील. तुम्हाला काय करायचे आहे ? तुम्ही आमच्या पक्षाचे आहात की त्यांच्या पक्षाचे आहात ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी जे आश्वासन दिले ते मी पाळलेले आहे. मी मागील अधिवेशनामध्ये सांगितले होते की, आपण शेळया, मेंढयांसाठी दोन रुपये घेतो. ते आम्ही घेणार नाही. एकदा वनाचे क्षेत्र राखीव केल्यानंतर त्यामध्ये बदल करता येणार नाही.

यानंतर श्री.भोगले.....

अशुधारित मत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

हे अत्यंत विनम्रपणे सांगितले आहे. चर्चा करीत असताना मी हेही सांगितले की, सर्पमित्र संस्था उभी केली आहे. संपूर्ण भारतामध्ये ही दुसरी संस्था आहे. सर्पाचे विष रितसर काढून द्यावे, चुकीच्या पध्दतीने दिले जाऊ नये यासाठी संस्था उभी केली आहे.

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदय आपण पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देत आहात.

श्री.बबनराव पाचपुते : वन विभागाच्या पुरवणी मागण्यांमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल मी त्या सर्वांचे आभार मानतो आणि वन विभागाच्या मागण्या क्रमांक 64 ते 67 सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यांना मी लेखी उत्तर पाठवितो.

सभापती : सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.....

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्ताव दाखविण्यात आला आहे. मी दुपारी 4.00 वाजल्यापासून या प्रस्तावावर उत्तर देण्यासाठी सभागृहात थांबलो होतो. मला असे वाटते की, अंतिम आठवडा प्रस्तावातील विषय हा लोकलेखा समितीच्या अखत्यारितील विषय आहे. सभागृहासमोर सादर होणारे महालेखापालांचे अहवाल त्या समितीसमोर छाननीसाठी जातात. त्यामुळे या विषयावर जी चर्चा करावयाची असेल ती आता घेतली तर बरे होईल.

सभापती : काही काळापूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय श्री.दिवाकर रावते व अन्य गटनेते यांनी मला भेटून विनंती केली होती की, आज पुरवणी मागण्यांवरील चर्चा व त्यावरील उत्तर पूर्ण होण्यासाठी रात्री 9 ते 9.30 पर्यंत वेळ लागणार आहे. म्हणून आजच्या कार्यक्रमपत्रिकेतील अंतिम आठवडा प्रस्ताव उद्याच्या कार्यक्रमपत्रिकेवर दाखविण्यात यावा असे त्यांनी मत मांडले आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : या संदर्भात वेळीच घोषणा झाली असती योग्य झाले असते. 5 तास सभागृहात थांबल्यानंतर आता बिझिनेस पुढे ढकलला जात आहे. उद्या विधेयके चर्चेला येणार आहेत. टॅक्सेशनची बिले दोन्ही सभागृहासमोर चर्चेला येणार आहेत. अंतिम आठवडा प्रस्ताव या सभागृहात चर्चेला येईल त्यावेळी नेमके वित्त विभागाशी संबंधित विधानसभेत काही ना काही कामकाज असेल, त्यामुळे माझी विनंती आहे की, अंतिम आठवडा आजच प्रस्ताव चर्चेला घेण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : वित्त विभागाचे माननीय राज्यमंत्री नोट्स घेण्यासाठी या सभागृहात बसतील.

श्री.दिलीप वळसे पाटील : राज्यमंत्र्यांना सुध्दा टॅक्सेशन बिल सुरु होईल त्यावेळेला नोट घेण्यासाठी बसावे लागेल.

श्री.दिवाकर रावते : आपण आलात त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालेल. नेहमी या सभागृहात तेच उत्तर देतात. आपण आलात तर आनंद होईल. आपली तशी इच्छा आहे त्याचा आम्हाला आनंद वाटतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : या प्रस्तावामध्ये जो विषय दिला आहे त्या संदर्भात लोकलेखा समितीमध्ये पॅरा टू पॅरा चर्चा होते. दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य त्या समितीमध्ये असतात. या सभागृहात या विषयावर चर्चा करावी. परंतु या सभागृहात मागील 25 वर्षात असा विषय चर्चेला आला नाही. माझी आपल्याला विनंती आहे, आज या प्रस्तावावर चर्चा घ्यावी किंवा हा विषय ड्रॉप करावा.

सभापती : विरोधी पक्षातर्फे अंतिम आठवडा प्रस्ताव देण्यात आला आहे आणि तो स्वीकारला गेला आहे. आपण म्हणता ते बरोबर आहे. लोकलेखा समितीच्या माध्यमातून सातत्याने तपासणी होत असते. तो त्या समितीचा अधिकार आहे. परंतु अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या चर्चेला घेत असताना इतर जे कामकाज आहे त्या कामकाजाव्यतिरिक्त हे काम कसे ॲडजस्ट होइल याबाबत त्यांचेही सहकार्य घेतले जाईल आणि आपलेही सहकार्य घेईन.

सभागृहापुढील कामकाज आता संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 16 जून, 2009 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.15 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीत अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर सकाळी 11.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 9 वाजून 24 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 16 जून, 2009 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही